
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २७७३

REFBK-0022763

निबंध (राजकमल चौधरी)



REFBK-0022763

राजकीय लेख निबंध
संदर्भ शाखा
२२८६३
२८८३
२०१९९।८८

नरहर कुरुंदकर

# छाया प्रकाश

जनबोध प्रकाशन

*We all recognise*
*the need to restrain murderers,*
*and it is even more important*
*to restrain murderous states.*

**BURTRAND RUSSELL**

प्रकाशक :
जवाहर कोटेचा
जनबोध प्रकाशन
चिंचवड गाव
पुणे ४११०३३

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार
पुणे ४११०३०

किंमत : पंधरा रुपये

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

निबंध

यदुनाथ थत्ते यांस

# अनुक्रमणिका


' जनबोध 'ची कुळकथा ... ५

प्रस्तावना ... ७

१. निमित्त इसापनीतीचे ... २१

२. फॅसिझम... फॅसिझम... फॅसिझम ... ४३

३. लोकशाही : अन्वय आणि अर्थ ... ५९

४. लोकशाही म्हणजे काय ? ... ८२

५. एका ध्येयनिष्ठ कम्युनिस्टाचा कबुलीजबाब ... ९३

६. वस्तुस्थितीचे अटळ आव्हान आणि मार्क्सवादी ... ११५

७. जनता पक्षापुढील आव्हाने ... १२२

८. संपूर्ण क्रांतीची दिशा ... १४०

९. आणीबाणी आणि साहित्यिक ... १५६

परिशिष्ट : मैं धुनी युवकों की तलाश में हूँ ... १६७

# ‘ जनबोध ’ची कुळकथा

आणीबाणीच्या नावाखाली सप्तस्वातंत्र्यांचा अपहार करण्यात आला आणि त्यामुळे सर्वत्र एक भीतीचे वातावरण पसरले. लोकशाही जीवनाचा पाया जे लोकशिक्षण तेच बंद पडले. स्तुतिपाठकांचे पेव फुटले. सर्वत्र आबादी-आबाद असावी असे वातावरण प्रचारसाधनांचा वापर करून तयार करण्यात येत होते.

याही काळात ज्या ज्या साधनांनी लोकशिक्षणाचे कार्य चालवता येईल त्या त्या साधनांनी चालू ठेवले पाहिजे अशा जिद्दीने कार्य सुरू होते. साधना साप्ताहिकातर्फे हे काम होत होते. पण साधनेवर सरकारची वक्र दृष्टी होती आणि साधनेला चिरडून टाकण्याचा शासनाचा मनसुबा स्पष्ट दिसत होता. सरकारचे हे मनसुबे यशस्वी होऊ नयेत म्हणून न्यायालयाच्या मोर्चावर साधनेतर्फे श्री. सी. आर. दळवी, राणे आणि इतर मित्र शर्थीने झुंज देत होते. सरकारचे मनसुबे यशस्वी झाले तर ? तर पर्यायी व्यवस्था हवीच होती.

पुस्तिका काढून मग हे लोकशिक्षणाचे कार्य चालू ठेवायचे ठरले होते. प्रा. अ. भि. शहा आणि इतर काही मित्रांनी एकत्र जमून शैक्षणिक पुस्तिकांची एक यादी बनवली. लेखकांशी पत्रव्यवहार सुरू झाला. इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती या भाषांतून हे काम चालवायचे ठरले. इतर भाषांसाठीही प्रयत्न करायचा होता. मराठी पुस्तकांची जबाबदारी साधना-परिवाराने घ्यायचे ठरवले. आणि त्यातून ‘ जनबोध ’ आणि ‘ अभय ’ ह्या प्रकाशनांचा जन्म झाला. श्री. जवाहर कोटेचा यांनी ह्या प्रकाशनां-सोबत आपले नाव छापण्याचा धोका पत्करला.

संकल्पित प्रकाशनांची यादी काही मित्रांकडे सल्ल्यासाठी पाठवली होती. त्यात मुंबईचे कार्यकर्ते श्री प्रभूभाई संघवीही होते. त्यांच्या झडतीत जी कागदपत्रे पोलिसांच्या हाती पडली त्यात ‘ जनबोध ’च्या संकल्पित प्रकाशनांची यादीही होती. पण ‘ जनबोध ’चा पोलिसखात्याला विशेष बोध झाला नसावा ! अर्थात यातून एखादी तोहमत उभी राहण्याची शक्यता होतीच.

आणीबाणी संपली. साधनेचे काम पुन्हा सुरू झाले, पण आणीबाणीतील स्मृतींशी निगडित झालेले ' जनबोध 'चे कार्य थांबवणे इष्ट नाही असे श्री जवाहर कोटेचा यांना वाटू लागले आणि लोकशिक्षणासाठी पुढेही प्रकाशने करण्याचे ठरले. ' स्रोत ', ' नव्या वाटा, नव्या दिशा ', ' सीता ', ' हा राष्ट्रीय गुन्हा करू नका ', ' स्वगत ', ' जे. पी.ज ए प्रिझन डायरी ', ' संपूर्ण क्रांती ', ' लोकशाही : अन्वय आणि अर्थ ', ' लोकशाही : महात्मा गांधींची शिकवण ', ' बातचीत ', ' साधना व्हिंडिकेटेड ', ' इंदिरा गांधींच्या आव्हानाचे स्वरूप ', ' पँग्ज ऑफ कॉन्शन्स ' अशी छोटी-मोठी प्रकाशने ' जनबोध 'तर्फे वाचकांना सादर करण्यात आली. ' छायाप्रकाश ' हा लेखसंग्रह त्यापैकीच एक. श्री नरहर कुरुंदकरांच्या आणीबाणीच्या काळातील ' फॅसिझम ' व ' लोकशाही : अन्वय आणि अर्थ ' या पुस्तिका आणि अन्य काही लेख यांत समाविष्ट आहेत. आणीबाणीतल्या लेखांचे ' जनबोध 'ने प्रकाशन करावे हे युक्तच आहे.

' जनबोध 'च्या आणीबाणीतील निर्भय कामगिरीची स्मृती कायम राहावी म्हणून ' जनबोध प्रतिष्ठान ' सुरू करण्याचे ठरले असून लोकशिक्षणासाठी आवश्यक ती विविध कामे प्रतिष्ठानतर्फे हाती घेण्यात येतील. सुबुद्ध, सुजाण लोकमतावाचून यथार्थ लोकशाही आकारासच येऊ शकत नाही. म्हणून लोकशिक्षणाचे हे कार्य निरंतरच चालू ठेवावे लागणार आहे. जनबोध प्रतिष्ठान हा त्या दिशेचाच एक प्रयत्न आहे.

साधनेचा आणि जनबोधचा जन्म समान उद्दिष्टांसाठी झालेला आहे आणि त्यामुळे त्यांच्यांतला ऋणानुबंधाचा धागा बळकट आहे. त्यांचे कार्य परस्परपूरक आहे आणि तसेच ते पुढे चालणार आहे.

जनबोध प्रतिष्ठानला सर्वांच्या सदिच्छा व सहकार्य मिळत राहील अशी आशा आहे.

**जनबोध प्रतिष्ठान**

# प्रस्तावना

आणीबाणीच्या कालखंडात आणि पुढे आणीबाणीच्या संदर्भात जे काही मी लिहिले आणि बोललो त्यातील काही लेखांचा हा संग्रह आहे. आणीबाणीच्या काळात सातत्याने शासनाच्या विरोधी आवाज चालू ठेवला पाहिजे, असे ज्यांनी मानले त्या मंडळींच्या यादीत अगदी शेवटाला कुठेतरी माझे नाव घालावे लागेल, अशी माझी समजूत आहे. शासनाची इच्छा असतीच तर मला अटक करून तुरुंगात घालणे सहजच शक्य होते, इतके उद्योग मी करीत होतो. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे माझ्या घरी असणारा चर्चा व गप्पांचा अड्डा! यात सातत्याने शासनावर टीका चालूच असे. दुसरी गोष्ट म्हणजे माझी व्याख्याने. त्यातही शासनावर टीका असेच, आणि तिसरी गोष्ट म्हणजे माझे 'साधने'तील लेख. त्यातही शासनावर टीका होती. नेत्रदीपक शौर्यावर कोणताही अधिकार सांगण्याची माझी इच्छा नाही, कारण ते मी दाखवलेले नाही, पण आणीबाणीच्या काळात मी सातत्याने शासनाच्या विरोधी आवाज माझ्या अल्पस्वल्प शक्तीनुसार उठवीतच राहिलो ही गोष्ट नाकारण्याचीही माझी इच्छा नाही. ती नाकारण्याचे कारणही नाही.

आणीबाणीच्या काळात जी व्याख्याने मी सर्वत्र देत होतो त्यापैकी एक त्या काळातले लोकप्रिय व्याख्यान इसापनीतीच्या संदर्भात असे. ते या संग्रहात समाविष्ट आहे. पण दोन व्याख्याने या संग्रहात समाविष्ट नाहीत. ती मी अनेक ठिकाणी दिली, पण ती लेखरूपाने लिहिलेली नाहीत. म्हणून येथे संग्रहित झालेली नाहीत. त्यांपैकी एका व्याख्यानाचा विषय 'प्रगति-दशक' हा होता. त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांचे असे म्हणणे होते की, इंदिरा गांधी यांच्या कारकीर्दीत भारताची जी दहा वर्षांत सर्वांगीण प्रगती झाली तेवढी प्रगती मागच्या अठरा वर्षांत कधी झाली नव्हती. शंकरराव चव्हाणांना मी व्यक्तिशः ओळखत असल्यामुळे हा त्यांनी घेतलेला इंदिरा गांधींना प्रसन्न करण्याचा सोयिस्कर पवित्रा आहे, यापेक्षा त्याला जास्त महत्त्व नाही. इतके मला

समजत होते, पण खाजगी काही माहिती असणे याला अशा वेळी अर्थ नसतो. माननीय मुख्य मंत्री हे सतत प्रगतीचे दशक आहे, असे सांगत होते. त्याचा महाराष्ट्रव्यापी उत्सवही त्यांनी सुरू केला होता! माझे म्हणणे असे होते आणि ते व्याख्यानातून मी सांगत असे की, पंतप्रधानांच्या मते दुष्काळ पडले, औद्योगिक उत्पादन घटले, वीजनिर्मिती कमी झाली यामुळे टंचाई वाढली, महागाई वाढली, नाइलाजाने चलनवाढ करावी लागली व देश आर्थिक दुरवस्थेच्या काठावर येऊन उभा राहिला. विरोधी पक्षाने याचा गैरफायदा घेऊन या देशात अराजक माजवण्याचा प्रयत्न केला. जर पंतप्रधानांचे हे म्हणणे खरे असेल तर मुख्य मंत्री खोटे बोलत असले पाहिजेत आणि पंतप्रधान जर खोटे बोलत असतील तर त्यांचा खोटेपणा उघडकीस आणण्यासाठी मुख्य मंत्र्यांनी प्रयत्न करणे शिस्तीला धरून नाही. याच सुरामध्ये मी बरेचसे काही बोलत असे. व्याख्यानाचा अजून एक विषय अपक्ष व्यासपीठ हा होता. त्या व्याख्यानात लोकशाहीसाठी अपक्ष व्यासपीठाची कशी गरज आहे; त्याशिवाय शासनाच्या चुका दाखवता येणार नाहीत, असा सूर धरून शासन कोणकोणत्या चुका नित्य करीत असते याचा तपशील सांगण्याच्या निमित्ताने पुन्हा सरकारवर भरपूर टीका असे. शासनावर असणारे जे टीकेचे मुद्दे त्यातील एक महत्त्वाचा मुद्दा विश्वसनीयता हा होता.

माझे म्हणणे असे, की लोकांना भिन्नभिन्न मते लिहिण्याची व मांडण्याची जर परवानगी दिली नाही, तर जे लिहिले, बोलले आणि छापले जाते, ते खरे असेल कशावरून, हा प्रश्न उद्भवतो. आणि मग सर्व शासकीय माहितीची विश्वसनीयताच गळून पडते. त्यामुळे आणीबाणीत जे लिहिले, बोलले आणि छापले जाते त्यावर आमचा विश्वास उरलेला नाही. तुम्ही सांगता ते खोटे असेलच असे नाही, पण ते खरे आहे असे मानण्याकडे आमचा कल होत नाही, कारण तुमची विश्वसनीयता गेलेली आहे.

त्या काळात ज्या पद्धतीने लिहिणे मला योग्य वाटले त्या पद्धतीने मी लिहीत गेलो. फॅसिझमसारख्या लेखात तर जणू काही पंतप्रधानांनाच आपण उचलून धरत आहोत व त्यांचे हात बळकट करीत आहोत असा पवित्रा घेत मला जे सांगायचे ते मी सांगितले. या लेखाची भाषाशैली अगर मांडणी आज सुधारून घेणे मला योग्य वाटत नाही. त्या काळी साधनेने हे लेखही छापलेले आहेत. त्यापैकी काहींच्या स्वतंत्र पुस्तिका करूनही वाटलेल्या आहेत. आज पुन्हा आणीबाणीच्या भाववृत्तीत जाता

येणे शक्य नाही व त्या भाववृत्तीमध्ये जाऊन नव्याने लिखाण करणे शक्य नाही. म्हणून हे लेख जसेच्या तसे ठेवलेले आहेत. आणीबाणीनंतरच्या काळात आणीबाणीचा संदर्भ घेऊन आलेले काही लेख आहेत. ज्या हेतूसाठी जयप्रकाशांचे आंदोलन सुरू झाले, ज्या आंदोलनामुळे आणीबाणी आली, त्या उद्दिष्टांचे पुढे काय, या संदर्भात हे लिखाण आहे.

आणीबाणीच्या काळात लोकशाही म्हणजे काय, या विषयावर, दोन-तीन ठिकाणी मला बोलावे लागले. फार जणांनी या विषयावर बोलण्यासाठी मला उत्तेजन दिले नाही; पण ज्यांनी दिले त्यांच्यासमोर जे मुद्दे मी मांडत होतो ते थोडक्यात एका लेखात आलेले आहेत. आणीबाणीत लोकशाही चालूच आहे, असे शासनाचे म्हणणे होते. बहुमताचे राज्य आणि कायद्याचे राज्य या दोन कल्पनांच्यावर बोट ठेवून आणीबाणी हा लोकशाहीचाच भाग आहे, असे म्हणणारे काही पंडित त्या वेळी उदयाला आलेले होते. त्यांचा प्रतिवाद या लेखात आहे.

आणीबाणीच्या काळात लिहिलेले दोन छोटे लेख मात्र इथे संग्रहित केलेले नाहीत. त्यांपैकी एक म्हणजे इंदूर येथे मध्य प्रदेश मराठी साहित्य सभेच्या हीरक महोत्सवाच्या अध्यक्षपदावरून दिलेले व्याख्यान. अगदी थोडक्यात हे व्याख्यान सारांशाने त्या वेळी साधनेत आलेले आहे. दीड तासाच्या व्याख्यानाचा दोन पान सारांश मलाच समाधानकारक वाटला नाही. आज ते सगळे व्याख्यान पुन्हा लिहून काढणे मला शक्य वाटत नाही. कारण मुळातील धार आता शब्दांत पकडता येणे शक्य नाही. अजून एक लेख आचार्य परिषदेच्या निवेदनाविषयी होता. त्यात मला जे म्हणायचे होते ते त्या वेळी म्हटलेले नव्हते. खाजगी बैटकीत ते मी बोलत होतो, पण जाहीरपणे ते बोलणे मला गैरसोयीचे वाटत होते. म्हणून तो लेख गाळलेला आहे. कारण जो मुद्दा मला सांगायचा होता तो त्यात आलेला नाही.

आचार्य विनोबा भावे यांच्याविषयी माझ्या मनात (नेहमीच अतोनात आदर राहिला. आजही माझ्या मनात) अत्यंत आदराचीच भावना आहे. नानाविध विषयांचा व्यासंग करण्याची इच्छा आणि आवड हे विनोबांचें एक विलोभनीय वैशिष्ट्य आहे. जगातील बहुतेक प्रमुख धर्मसंप्रदायांचे वाङ्मय अत्यंत तपशिलाने व खोलात जाऊन मुळातून त्यांनी वाचलेले आहे. प्राचीन भारताचे तत्त्वज्ञान

तर जवळजवळ सगळेच त्यांच्या अवलोकनात आहे. हौस म्हणून तेवीस-चोवीस भाषा ते शिकले. त्यांपैकी सात-आठ भाषांच्यावर त्यांचे प्रभुत्वही आहे. विनोबांना चालते बोलते विद्यापीठ म्हणतात, ते काही उगीच नव्हे. त्यांच्या विद्याव्यासंगाला अतिशय शोभून दिसणारे असे ते अभिधान आहे. शिवाय विनोबा म्हणजे आपल्या प्राचीन भारतीय परंपरेतील ऋषीमुनींचे आपल्या डोळ्यांसमोर असणारे जिवंत आणि जागते उदाहरण आहे. व्रतस्थ आणि तपस्वी, चिंतनशील आणि कर्मयोगी, अनासक्त आणि तरीही सदैव समाजहितरत असलेला पुण्यपुरुष म्हणून विनोबा भावे यांच्याविषयी माझ्या मनात अतीव आदराची भूमिका नेहमीच राहत आली आहे. श्री. जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाला विनोबांनी पाठिंबा दिला नाही. उलट कसून विरोध केला याविषयी मला वाईट वाटले तरी आश्चर्य वाटले नाही.

आचार्य विनोबा भावे यांची भूमिका मला कधीच पटली नाही. पण एखाद्याची भूमिका आणि विचार करण्याची पद्धत आपल्याला पटत नसली म्हणजे त्याच्याविषयी अनादर दाखवावा अगर त्याच्या हेतूबद्दल संशय घ्यावा ही बाब लोकशाही प्रमाण मानणाऱ्या जीवनश्रद्धेशी तर विसंगत आहेच, पण जीवनातील सर्वसामान्य शिष्टाचाराशीसुद्धा विसंगत आहे. विनोबा भावे संघटना, आंदोलन, मागण्यांच्यासाठी संघर्ष याच्या नेहमीच विरोधी राहिले. यामुळेच त्यांनी भूदान यज्ञाच्या आंदोलनालाही कधी सुसंघटित स्वरूप दिले नाही. स्वतः देण्याचा प्रयत्न केला नाही, इतरांना देऊ दिले नाही. ज्यांनी ज्यांनी तसा प्रयत्न केला तो विनोबांनी मोडून काढला. त्यांना संघटना आणि आंदोलन मान्य नाही. एखादा जटिल प्रश्न सुटत नसेल तर काय करावे ? याला विनोबांचे उत्तर हे की, अशा प्रश्नांच्याविषयी बोलणे, विचार करणेही सोडून द्यावे. प्रश्न सोडून द्या म्हणजे आपोआप सुटतात, असे त्यांचे म्हणणे! तत्त्व म्हणून आणि व्यवहार म्हणून ज्या माणसाने संघटना व आंदोलन वर्ज्य मानले आहे, तो जयप्रकाशांच्या आंदोलनाला पाठिंबा देईल याचा संभवच नव्हता, आपण लोकांना विचार देणारे आहोत. आम्ही समाजात विचार पेरीत जाऊ, इथे आमची जबाबदारी संपली, हे विचार योग्य असतील तर रुचतील, वाढतील, बळकट होतील. आज नाही उद्या विचारांचा विजय होईल आणि जर हे विचार चुकीचे असतील तर काळाच्या ओघात वाहून जातील. पण विचार देण्यापलीकडे मागण्या, त्यासाठी संघटना व आंदोलन विनोबांच्या जीवननिष्ठेत बसत नाही.

इ. स. १९५० पासून ही त्यांची मते आहेत. ती त्यांनी आग्रहाने वारंवार सांगितलेली आहेत. ही त्यांची मते, मला कधीही मान्य नव्हती– आणि म्हणून विनोबांच्या विषयी कितीही आदर असला असला तरी ते आपले मार्गदर्शक नेते आहेत, असे मानण्याची वेळ माझ्यावर कधीही आली नाही. मी त्यांना आपले नेते कधीच मानले नाही. जे आपले नेते नाहीत, ज्यांचे आपले विचार जुळत नाहीत, त्यांच्या पाठिंब्याचीही अपेक्षा ठेवू नये आणि त्यांचे मार्गदर्शनही पत्करू नये. आपण कुणाचेही म्हणणे विचारात घेतो, विनोबांचेही म्हणणे विचारात घेऊ, अशी माझी सरळ, साधी भूमिका. इतकी सरळ, साधी भूमिका इतर मंडळींची नव्हती. विनोबा वारंवार आपली मते सांगत असताना आणि ती मते मूलतःच पटत नसताना लोकांनी विनोबांना आपले नेते मानले! त्यांनी आंदोलन करू नका असा दिलेला सल्ला फेटाळून लावून आंदोलन सुरू केले आणि त्यांच्या स्पष्ट निषेधाच्या नंतर आरंभ झालेल्या या आंदोलनाला त्यांनी पाठिंबा द्यावा, अशी अपेक्षा ठेवली. ती अपेक्षा चूक होती. तिचा भंग झाल्यामुळे अनेकजण चिडले, रागावले, एखाद-दुसऱ्या वेळी मीही सर्वांच्या बरोबर जाहीररीत्या सरकारी संत म्हणून विनोबांचा उपहास केला असेल, नाही असे नाही, पण मी हे सातत्याने सांगत आलो आहे, की जयप्रकाशांच्या आंदोलनाला विनोबांनी पाठिंबा द्यावा ही अपेक्षा चूक आहे आणि म्हणून विनोबांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला नाही, याविषयी माझी काहीही तक्रार नाही. उलट या आंदोलनाला विनोबांनी पाठिंबा दिला असता तर एखाद्या जाहीर सभेत मी त्यांचा गौरव केला असता, पण मनातल्या मनात हे वशिष्ठाचे पतन आहे, ही तत्त्वच्युती आहे, याची खूणगाठ बांधली असती.

तक्रार, विनोबांनी आंदोलनाला पाठिंबा दिला नाही याबद्दल नसून तक्रारीचे कारण विनोबांनी इंदिरा गांधींच्या दमनचक्राला पाठिंबा दिला याविषयी आहे. कारण ज्या मार्गाने इंदिरा गांधी जात होत्या त्या मार्गाने जाताना त्यांनी प्रथम आपला स्वतःचा पक्ष मोडीत काढला, नंतर लोकशाही आणि संविधानही मोडीत काढले, असत्य, भीती आणि दंड यांचा आधार घेऊन त्या सत्तेत राहाण्याचा प्रयत्न करीत होत्या. या तिन्ही बाबी अनैतिक व विनोबांच्या जीवननिष्ठेच्या विरोधी होत्या. विनोबांनी इंदिराजींच्या सत्तापिपासेमुळे पाशवी झालेल्या, दमनचक्रावर आधारलेल्या भूमिकेला 'अनुशासन-पर्व' म्हणून पाठिंबा दिला, या घटनेमुळे विलक्षण दुःख त्यांच्या सर्व निकटवर्तियांना झाले. मला तर स्वतःला दुःखही झाले,

रागही आला. पण तरीही आमच्या सर्व सहकाऱ्यांचे असे म्हणणे होते की, आणीबाणीच्या या काळात सर्व प्रतिकार कोसळून पडल्यानंतर विनोबा ही एकच नैतिक शक्ती आपल्याला आधार म्हणून उरलेली आहे. ही शक्ती खच्ची होईल आणि नैराश्य वाढेल असे काही बोलणे इष्ट नाही!

मला आठवते, की आणीबाणीच्या काळात ज्या ज्या वेळी चर्चेची वेळ येई तिथे तरुण मंडळींच्या मेळाव्यात एक प्रश्न मला विचारला जाई. तो म्हणजे विनोबांच्या अनुशासन-पर्व या शब्दप्रयोगाविषयी तुमचे काय मत आहे? उत्तर देताना मी अनेकदा हे सांगितले आहे की, विनोबा आमचे नेते नाहीत, त्यांना विचारून आंदोलन सुरू झालेले नाही, त्यामुळे आंदोलनाला त्यांचा कोणताही पाठिंबा अपेक्षित नाही. विनोबांचे शासनावर किती वजन आहे, हे माहीत नाही, त्यामुळे त्याविषयी बोलण्याचे कारण नाही. अनुशासन-पर्व हा शब्द महाभारतातला आहे. तिथे त्याचा अर्थ चर्चा व चिंतन असा आहे. विनोबांना अनुशासन-पर्व म्हणताना काय म्हणायचे ते मला माहीत नाही, पण तूर्त महाभारतातील अर्थ त्यांना अभिप्रेत आहे, असे आपण गृहीत धरू आणि विनोबांचा नाद सोडून देऊ. त्यांचे काम त्यांना करू द्या आणि आपण काय करणार याचा विचार करा. त्यांच्यावर टीका करण्यात वेळ घालवू नका. अर्धवट विनोबांच्या विरुद्ध, पण अर्धवट त्यांच्या बाजूने असे बोलण्याचे कारण, ही नैतिक शक्ती खच्ची होऊ नये हा मित्रमंडळींचा आग्रह होता. व्यक्तिशः मला हे माहिती होते की विनोबांनी इंदिरा गांधींना पाठिंबा देऊन आपल्या जीवनाचे नैतिक अधिष्ठान गमावले होते!

यानंतर पवनारला १६, १७, आणि १८ जानेवारी या दिवशी आचार्य संमेलन झाले. या आचार्य संमेलनानंतर एक सर्वसंमत निवेदन जनतेसमोर ठेवले. या निवेदनाच्या मागे विनोबांचीच प्रेरणा उभी होती. आचार्य संमेलनाने जे निवेदन दिलेले आहे त्याच्या आरंभीच सर्व चर्चेत विनोबांचा सल्ला व मार्गदर्शन मिळाल्याचा उल्लेख आहे. या निवेदनाच्या शेवटीसुद्धा विनोबांनीच पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. संपूर्ण निवेदनात विनोबांचा अजूनही काही ठिकाणी उल्लेख आलेला आहे. निवेदनात महात्मा गांधींपेक्षा विनोबांचाच उल्लेख अधिक वेळेला आलेला आहे! आचार्यांचे निवेदन हे विनोबांचेच निवेदन आहे, असे म्हणायला हरकत नाही. या निवेदनाला जागोजाग पाठिंबा दर्शविण्यासाठी बैठका घेण्यात आल्या. निवेदनाला पाठिंबा देण्यासाठी

सर्वत्र बैठका घेतल्या जाव्यात व विनोबांना पाठिंबा दिला जावा, या दृष्टीने मराठवाड्यात भाई गोविंददास श्रॉफ यांनी खूपच परिश्रम घेतले. गोविंदभाई हे तसे विनोबावादी नव्हते. त्यांचे म्हणणे असे की, शासनाने लोकशाही संपुष्टात आणलेली आहे, तिची पुन्हा स्थापना झाली पाहिजे, ही मागणी जागोजाग चर्चांमधून व्हावी, यासाठी हे निवेदन उपयोगी आहे. गोविंदभाईंनी निवेदनाचा आपल्याला काय अर्थ कळतो, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे असे की, कुणालाही आपण जो पाठिंबा देतो तो, त्याचे म्हणणे आपल्याला जसे समजले असेल त्याला पाठिंबा असतो. म्हणून गोविंदभाई चर्चांमधून या निवेदनाचा आपल्याला समजलेला अर्थ स्पष्ट करीत असत. त्यांचे स्पष्टीकरण असे होते की, श्री. जयप्रकाश नारायण यांनी आंदोलन सुरू केले व त्यामुळे इंदिरा गांधींना आणीबाणी जाहीर करावी लागली. आचार्यांचे निवेदन, आणीबाणी म्हणजे लोकशाहीची समाप्ती असे मानते व पुनरपि लोकशाहीची स्थापना करावी, अशी मागणी करते. शिवाय जयप्रकाशांना व त्यांच्या आंदोलनाला विरोध दाखवीत नाही. ही सगळी आचार्य संमेलनाची भूमिका अप्रत्यक्षपणे जयप्रकाशांना पाठिंबा देणारी व सौम्यपणे इंदिरा गांधींचा निषेध करणारी आहे. आचार्य संमेलनाच्या निवेदनाचा हा अर्थ गृहीत धरून आम्ही या निवेदनाला पाठिंबा देतो. मीही या निवेदनाला त्याकाळी पाठिंबा दिलेला आहे व लोकशाही पुन्हा स्थापन झाली पाहिजे, या मागणीचे साधन म्हणून त्याचा वापर केला आहे.

अतिशय चतुरपणे आचार्य संमेलनाच्या निवेदनात एक कुटिल व गलिच्छ अर्थ दडलेला आहे, हे त्या वेळी माझ्या लक्षात आले नाही. इतर कुणाच्या लक्षात आले असल्यास तसे कोणी बोलले नाही. आचार्य संमेलन जानेवारी ७६ ला झाले. यानंतरच्या काळात गोवधबंदीसाठी विनोबांनी प्राणांतिक उपोषण जाहीर केले! संपूर्ण भारतभर गोवधबंदीची विनोबांची मागणी त्या वेळच्या शासनाने मान्य केल्यामुळे हे उपोषण रद्द झाले. नंतर विनोबा भेटणाऱ्या अनेकांना हे सांगू लागले की, ऑक्टोबर ७६ अखेर सर्व राजबंदी सुटतील, डिसेंबर अखेर निवडणुका जाहीर होतील, आचार्य विनोबा भावे जेव्हा खात्रीलायक रीतीने अनेकांना हे सांगू लागले तेव्हा मी अनुमान असे केले की यातील ऑक्टोबर याला काही अर्थ नाही. कदाचित त्यानंतर एखादा-दुसरा महिना वाढेल, पण राजबंदी सोडण्याचा विचार चालू आहे. निवडणुकांची घोषणा डिसेंबरातच होईल असे नाही. महिना-दोन महिने तिथेही उशीर होईल,

पण निवडणुकांचा विचार चालू आहे. याबाबत ज्या उडत उडत बातम्या पोहोचत होत्या त्याचे थोडक्यात स्वरूप असे होते.

आचार्य विनोबा भावे यांचा पंतप्रधानांना सल्ला असा आहे की, त्यांनी मागचा इतिहास लक्षात घ्यावा. मागोमाग आंदोलन आणि तुरुंगवास यामुळे काँग्रेसची शक्ती व लोकप्रियता वाढली असा अनुभव आहे. या वेळी शासनात काँग्रेस आहे, तुरुंगात विरोधी पक्षांचे लोक आहेत. म्हणून लोकप्रियतेचा फायदा विरोधी पक्षांना मिळण्याचा संभव आहे. याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. म्हणून विनोबांचे म्हणणे असे की, इंदिरा गांधींनी आस्ते कदम जावे. त्यांनी बंदी घातलेल्या संघटना सोडून उरलेले सर्व राजकीय कार्यकर्ते ऑक्टोबर अखेर मोकळे करावेत आणि दोन महिने शांतपणे काय घडते याची वाट पाहावी. नंतर डिसेंबरात वृत्तपत्रांवरील सर्व बंधने मोकळी करावीत व जानेवारीपासून पुन्हा निवडणुका घेता कशा येतील, याबाबत विरोधी पक्षांशी बोलणी सुरू करावीत. सर्व बंधने टप्प्याटप्प्याने मोकळी करीत कुठेतरी सभांच्यावरील बंदी फेब्रुवारी अखेर मोकळी करावी. राजकीय कार्यकर्ते मोकळे आहेत, वृत्तपत्रांवर बंधने नाहीत, सभांना परवानगी आहे, या वातावरणात पण आणीबाणी चालू ठेवून एकूण लोकक्षोभाचा अंदाज घ्यावा व मगच निवडणुका जाहीर कराव्यात. इंदिरा गांधींचे फार मोठे उपकार मानले पाहिजेत की त्या आपल्या विजयाने इतक्या धुंद झालेल्या होत्या की त्यांनी विनोबांचा हा सल्ला मानला नाही! विनोबांचा सल्ला मानला असता तर परिस्थितीचे तातडीचे दडपण नाही म्हणून आपापले मतभेद बुडवून सर्वांनी एकत्र येऊन जनता पक्षही कायम केला नसता. तुरुंगातील मंडळी सुटून काही महिने झाले, सभांना परवानगी मिळून काही महिने झाले म्हणजे कोंडलेली वाफ निघून जाऊन क्षोभही तितका राहिला नसता आणि आहे त्या क्षोभाचा अंदाज घेऊन निवडणुकीची तयारी करण्यास काँग्रेसलाही उसंत सापडली असती. यानंतर काँग्रेसचा पाडाव कठीण होता. विनोबांनी काँग्रेसचे राज्य दीर्घजीवी व्हावे आणि इंदिरा गांधी याहीपुढे पंतप्रधान राहाव्यात याची चिंता करीत बसावे, ही दुःखाची गोष्ट म्हटली पाहिजे; पण आणीबाणीला पाठिंबा दिल्याच्यानंतर आणि आंदोलनाचा निषेध केल्याच्यानंतर हा क्रमबद्ध अधःपात अटळ होता.

काही जण असे म्हणत की विनोबांनी तसा सल्ला दिला आहे. काहीजण म्हणत विनोबांनी तसा सल्ला दिलेला नाही. ही त्यांची उगीचच बदनामी

आहे. काहीजण म्हणत गोवधबंदी हे निमित्त आहे. शासनावर दडपण आणून शासनाला लोकशाहीला प्रवृत्त करणे हा विनोबांचा हेतू आहे. असे नानाविध मुद्दे वेगवेगळ्या मंडळींच्या बोलण्यात येत, पण स्थूलमानाने विनोबांची बाजू घेण्याकडेच अनेकांचा कल असे आणि एक दिवस माझ्या हे लक्षात आले की, जो सल्ला विनोबांनी इंदिरा गांधींना दिला तो सल्ला आचार्य संमेलनाच्या निवेदनात गृहीत आहे. त्या निवेदनातच हे सांगितलेले आहे की, बंदी घातलेल्या संघटनांचे कार्यकर्ते वगळून इतर राजकीय कार्यकर्त्यांना तुरुंगातून सोडण्यात यावे. नंतर एकेक कलमे आलेली आहेत. यापैकी दुसऱ्या कलमात असे म्हटले आहे की, सर्वधर्मसमभाव आणि अहिंसा यावर श्रद्धा ठेवणारे राजकीय, सामाजिक कार्यकर्ते दीर्घकाळ तुरुंगात असणे राष्ट्राच्या आरोग्याच्या दृष्टीने हिताचे नाही. नागरिक स्वातंत्र्याचा संकोच, नियतकालिकांवरील बंधने व संसदेतील चर्चांच्या इतिवृत्ताच्या प्रसिद्धीस मनाई, दीर्घकाळ चालू असणे बरोबर नाही. ही मांडणी काळजीपूर्वक तपासली पाहिजे. सर्वधर्मसमभाव आणि अहिंसा यावर विश्वास असणारे राजकीय कार्यकर्ते दीर्घकाळपर्यंत तुरुंगात असणे बरोबर नाही, याचा अर्थ असा होतो की, जातीयवादी आणि हिंसक कार्यकर्ते यांविषयी आम्हाला काही म्हणावयाचे नाही. नक्षलवादी, आनंदमार्गी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक हे तुरुंगात आहेत, त्यांच्या संघटनांच्यावर बंदी आहे, याविषयी आम्हाला काही म्हणावयाचे नाही, पण संघटना कॉंग्रेसचे लोक, समाजवादी पक्षातील मंडळी, सर्वोदयवादी मंडळी आणि तत्सम इतर तुरुंगातून सोडले पाहिजेत. ज्या जनसंघवाल्यांना सोडायचे नाही, त्यांना संघाचे म्हणता येते, ज्या डाव्या कम्युनिस्टांना सोडावयाचे नाही त्यांना नक्षलाइट म्हणता येते. वेगळ्या भाषेत बंदी घातलेल्या संघटनांचे कार्यकर्ते वगळून इतर कार्यकर्ते सोडा, अशी ही मागणी आहे. आचार्य संमेलनाच्या निवेदनात जे आले आहे तोच विनोबांचा सल्ला असणार, असे मानणे भाग आहे. दुसऱ्या कलमात नागरिक स्वातंत्र्य ताबडतोब स्थापन करावे, वृत्तपत्रांवरील बंधने त्वरेने रद्द करावीत, अशी मागणी नाही. अनियमित काळपर्यंत ती चालू राहणे योग्य नाही, अशी मागणी आहे. राजबंदी तुरुंगात असणे, नागरिक स्वातंत्र्याचा संकोच आणि नियतकालिकांच्यावरील बंधने अनंत काळ चालू राहणे योग्य नाही. या मागणीसह पुढे तिसऱ्या कलमात अजून एक गमतीदार उल्लेख आहे.

आचार्य संमेलनाच्या निवेदनातील तिसऱ्या कलमात असे म्हटलेले आहे

की, स्वाभाविक परिस्थितीकडे जाण्यासाठी टप्प्याटप्प्याने वाटचाल करणे व निवडणुका घेणे शक्य तितक्या लवकर सोयिस्कर व्हावे या दृष्टीने आवश्यक वातावरण तयार करणे, याचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. शिवाय निवडणुकींच्या बाबतीत आवश्यक सुधारणांचाही सर्वांशी विचार-विनिमय करून स्वीकार झाला पाहिजे. म्हणजे आचार्य संमेलन टप्प्या-टप्प्याने स्वाभाविक परिस्थितीकडे जावे अशीही सूचना देते व निवडणूक-सुधारणांची चर्चा सर्वांशी व्हावी अशीही सूचना देते. वेगळ्या भाषेत आधी राजबंदी सोडा, नंतर सर्वांशी चर्चा सुरू करा व टप्प्याटप्प्याने स्वाभाविक अवस्थेपर्यंत या, हे जर आचार्य संमेलनाचे म्हणणे असेल तर राजबंदी सुटणे, वार्तांवरील बंधणे संपणे, निवडणुकीच्या बाबतीत चर्चा सुरू होणे हे टप्पे काही महिन्यांच्या अंतराने एका मागोमाग एक यावेत ही सूचना विनोबांनी केली असणार ही गोष्ट उघड आहे. कारण आचार्य संमेलनाचे निवेदन सतत आणीबाणीचे लाभ जतन करीत लोकशाहीकडे जाण्याच्या गोष्टी बोलत आहे.

आचार्य संमेलनाच्या निवेदनाच्या चौथ्या कलमात अहिंसेला पुन्हा एकदा वचनबद्ध होण्याचा, राजकीय पक्ष, नियतकालिके यांनी आत्मानु-शासनाला वचनबद्ध होण्याचा व हिंसेच्या निषेधाचा उल्लेख आहे. थोडक्यात म्हणजे तुरुंगातून सुटलेल्या राजबंद्यांच्या बरोबर व त्यांच्या संघटनांच्या बरोबर दीर्घ चर्चा करून शासनाने एक आचारसंहिता तयार करावी, अशी ही सूचना आहे. व्यवहारात याचा अर्थ वृत्तपत्रांनी शासनावर फार कठोर टीका करावयाची नाही. जाहीर सभेत सर्वांनीच संयमाने बोलायचे, भडक व्याख्याने द्यायची नाहीत, व्यक्तिगत टीका करायची नाही, असा होतो इंदिरा गांधींच्यावर वैयक्तिक टीका करायची नाही, आणीबाणीवर टीका करायची नाही, निवडणुका कार्यक्रमाधारे घ्यायच्या हा दर्शनीय सोज्वळपणाचा भाग आचार्यसंहितेच्या रूपाने सर्व पक्षांच्याकडून मंजूर करून घेणे यात शासनाला यश आले असते तर परिस्थिती फार कठीण झाली असती!

निवेदनाच्या पाचव्या कलमात संविधान दुरुस्तीचा उल्लेख आहे. या संविधानाच्या दुरुस्त्या आणीबाणीच्या काळात करण्यात येऊ नयेत, असेही या निवेदनात म्हटलेले नाही. या संविधान दुरुस्त्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या नसाव्यात, न्यायालयाच्या अधिकाराचा संकोच करणाऱ्या नसाव्यात असेही तिथे म्हटले नाही! शासनाने जी संविधान दुरुस्ती केली

तिला स्पष्टपणे पाठिंबा न देता पुष्कळशा संविधान दुरुस्त्या झालेल्या आहेतच, पण अजून काही दुरुस्त्यांचा विचार व्हायला पाहिजे, असे म्हटलेले आहे. एक प्रकारे हा संविधान दुरुस्तीच्या उद्योगाला अप्रत्यक्ष पाठिंबाच होता आणि तो या निवेदनात दिलेला आहे.

निवेदनात असल्या प्रकारच्या बाबी गृहीत आहेत, हे त्या काळी कुणाच्याच लक्षात आले नसेल, असे म्हणता आले नाही तरी ज्यांच्या हे लक्षात आले त्यांनी ते बोलून दाखवले नव्हते, असे मात्र म्हटले पाहिजे. या निवेदनात या बाबी गृहीत आहेत, हे माझ्या मात्र दीर्घकाळ लक्षात आलेले नव्हते. आचार्य विनोबा भावे यांचा अधःपात एका पक्षाची राजवट आणि त्यातही एका निर्दय, हुकूमशाही व्यक्तीची राजवट सांभाळून धरण्यासाठी सर्व प्रयत्न करावा या मर्यादेपर्यंत व्हावा, ही दुःखाची गोष्ट आहे! आचार्य विनोबा भावे यांच्यावर कोणत्याही व्यक्तिगत स्वार्थाचा आरोप करण्याची गरज नाही. इंदिरा गांधी आहेत तोपर्यंत आपली बूज राखली जाईल, आपला मोठेपणा जतन केला जाईल, असल्या प्रकारच्या कोणत्या स्वार्थी हेतूने विनोबा असे वागत होते, असे मला वाटत नाही. दीर्घकाळपर्यंत काँग्रेस पक्षाशी त्यांचा जो संबंध राहील त्या संबंधांचा हा नकळत झालेला परिपाक म्हटला पाहिजे. आपण पक्षातीत असे जरी म्हटले तरी आपला पक्ष म्हणजे काँग्रेस. काँग्रेसखेरीज या देशात शासन सांभाळायलाच कोणी नाही, म्हणून हरमार्गाने हे राज्य सांभाळून धरले पाहिजे. नाहीतर देशाची अखडताच धोक्यात येईल, असा काहीसा विचार करून विनोबा वागत होते आणि त्या अंतर्मनातल्या स्थिर भूमिके-पोटी कोणताही व्यक्तिगत स्वार्थ नसताना त्यांच्या हातून अशा गोष्टी घडत होत्या असे म्हटले पाहिजे. साधुत्व, निःस्वार्थपणा आणि तप इतक्या आधारे पक्षांचे निकाल लागत नाहीत, हे सगळे पुण्य कुणाच्या बाजूने उभे राहिले आहे, हेही पाहावे लागते, असा याचा अर्थ आहे.

सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा गांधींचा आणि त्यांच्या पक्षाचा प्रचंड पाडाव झाला, ही आमच्यासाठी तरी अत्यंत आनंदाची गोष्ट होती. एखाद्या राजकीय पक्षाचा पाडाव ही इतकी महत्त्वाची गोष्ट असावी, याला आमच्या परंपरेत कारणे आहेत. लोकशाही जर सुरळीत चालायची असेल तर राजकीय पक्षांनी प्रामाणिकपणे सत्तात्यागाची तयारी ठेवली पाहिजे. जर निवडणुकीत आमचा पराभव झाला तर आम्ही सत्तात्याग करूच, असे म्हणणे लोकशाहीला पुरेसे नसते. तुम्ही असेही म्हटले

पाहिजे की, ही आमची मते आहेत, हा आमचा कार्यक्रम आहे, जर ही मते आणि कार्यक्रम यांना जनता मत देणार असेल तर हा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी आम्ही सत्ता चालवू. जर हा कार्यक्रम लोकांना पटत नसेल तर आम्ही सत्ता सोडू, म्हणजे लोक कार्यक्रमाला मते देऊ शकतात. त्याऐवजी जर राजकीय पक्ष कार्यक्रमाचा विचार न करता सत्तेत राहता यावे म्हणून जो निवडून येऊ शकेल, मग त्याची मते कोणतीही असोत तो आमचा या मार्गाने जाऊ लागले तर सत्तेत राहणे आणि सत्तेत येणे हेच राजकारणात अंतिम ध्येय होऊन बसते. ज्या मागणीसाठी लोकमत प्रभावी झालेले आहे ती मागणी आम्हाला पटलीही नाही तरी लोकाग्रहास्तव स्वीकारू. ज्या मागणीविरुद्ध आंदोलन उभे राहते ती मागणी आम्हाला कितीही पटलेली असो ती आम्ही सोडून देऊ आणि कोणत्याही तडजोडी करू. आम्ही निवडून येऊ, हीच जर राजकारणातील अंतिम भूमिका मानली तर मग सत्तेसाठी सत्ता हे मूल्य अस्तित्वात येते आणि सर्व प्रकारचा भ्रष्टाचार व अधःपात सुरू होतो. काँग्रेस पक्षाने हा पर्याय पत्करलेला होता. यामुळे दिशाहीन, आकारहीन, पण सत्तेत असणारा अजस्र पक्ष असे काँग्रेसचे स्वरूप झाले होते. या पक्षाचा पाडाव हीच एक फार मोठी आनंदाची गोष्ट होती. तसा तो आनंद मला झाला.

पण हा पाडाव करीत असताना भिन्न भिन्न विचारांच्या मंडळींना परिस्थितीच्या दडपणाखाली एकत्र येऊन एक नवा पक्ष कायम करावा लागला. निश्चित विचारसरणीला न बांधलेला लाखो कार्यकर्त्यांचा मेळावा असे काँग्रेसचे स्वरूप होते. भिन्न भिन्न विचारांना बांधलेल्या कार्यकर्त्यांचा, परस्परविरोधी विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांचा मेळावा, हे जनता पक्षाचे स्वरूप आहे. ज्या सर्व अपप्रवृत्तींनी काँग्रेस पक्ष पोखरत गेला आणि पुढे कोसळला त्या सगळ्याच प्रवृत्ती निर्माण होण्याचा, वाढण्याचा धोका जनता पक्षात आहे. शेवटी लोकांमध्ये जागृती किती आहे, लोकमताचे दडपण किती आहे, यावरच राजकीय पक्ष हे कार्यक्रमानुसार नीट चालणार की नाही, हे कळत असते. आणि म्हणून पक्ष आपला असला तरी सतत त्यावर टीकेची धार धरली पाहिजे. उलट मला तर असेही वाटते की जे आपले मित्र आहेत त्यांची तपासणी अधिक कठोरपणे केली पाहिजे.

जनता पक्षाविषयी माझ्या मनात आत्मीयता आणि ममत्व आहे. ते लपवण्याचे कारण नाही. औद्योगीकरणावर केवळ भर देण्यापेक्षा सर्वसामान्य जनतेचे जीवनमान वाढले पाहिजे यावर भर देण्याची जनता

पक्षाची भूमिका देशाच्या व जनतेच्या हिताची आहे, असे मला वाटते. तरीही आवश्यक त्या स्पष्टपणे, आवश्यक त्या वेगाने जनता पक्ष जात नाही, म्हणून त्याच्यावर सतत जागरूकपणे टीका केली पाहिजे, असेही मला वाटते. या देशाचे आकारात्मक लोकशाहीचे स्वरूपच इंदिरा गांधींनी धोक्यात आणले होते. जनता पक्षाने ही आकारात्मक लोकशाही पुन्हा स्थापन केली आहे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे, असे मीही मानतो. पण ही बाब कितीही महत्त्वाची असली तरी ती पुरेशी नाही. केवळ काँग्रेसचा पाडाव पुरेसा नाही. आर्थिक कार्यक्रम वेगाने घेणे आवश्यक आहे आणि त्यासाठी सतत जागरूक राहणेही आवश्यक आहे. विरोधकांवरच नव्हे तर स्वकीयांच्यावरही सतत टीका करण्याची गरज असते. सततची टीका आणि जागरूकता ही लोकशाहीसाठी योजावी लागणारी आवश्यक किंमत आहे. या दृष्टीने आणीबाणीच्या नंतरच्या काळात केलेले काही लिखाणही इथे एकत्र गोळा केलेले आहे.

अलीकडे मला एक गोष्ट सतत जाणवत आलेली आहे. इतर कुणाला पटो अगर न पटो पण मला मात्र असे वाटते की हे भान मार्क्सवादामुळेच सतत विकसित होणारे आहे. वास्तवाचे काही नियम असतात. हे नियम आपल्या सदिच्छांनी पूर्णपणे नियंत्रित होणे कठीण असते. औद्योगीकरण वाढवायचे म्हटल्यानंतर शहरांमध्ये वाढ होणारच, ती टाळता येत नसते. भांडवलशाहीच्या विरुद्ध संघटितपणे लढा द्यायचा म्हटल्यानंतर एक संघटित कामगारांचा वर्ग अस्तित्वात येतच असतो. जे संघटित होऊ शकतात आणि दबाव निर्माण करू शकतात त्यांचे प्रश्न सुटत असताना त्यांना अजून संघटित करता आलेले नाही त्यांचे प्रश्न नुसतेच पडून राहतात! हा असंघटित जनतेचा भाग लोकसंख्येचा बहुसंख्याक भाग असतो. त्याचा विचार जर करायचा असेल तर मार्क्सवादाच्या कार्यक्रमाच्या पद्धतीचा भाग, संघटना करण्याच्या पद्धतीचा भाग याविषयी खूप मोठे चिंतन पुन्हा नव्याने केले पाहिजे. आपल्या देशात कम्युनिस्टांचा एक गट नेहमीच इंदिरा गांधींचा समर्थक राहिला. शक्यता ही आहे की, यापुढे कम्युनिस्टांचा अजून एक गट जनता पक्षाचा समर्थक राहील. कोण कुणाचे समर्थक आहेत याविषयी फारशी चिंता करीत न बसता कार्यक्रमांचा आग्रह धरून प्रभावी दडपण आणण्यासाठी आपल्या संघटनेचा व कार्यपद्धतीचा फेरविचार केला पाहिजे, याची गरज सर्वच मार्क्सवाद्यांना वाटावी, अशी परिस्थिती सध्या देशात आहे. काँग्रेसच्या पाडावानंतर आणि जनता पक्षाच्या विजयामुळे पुन्हा एकदा नवा आरंभ होत आहे, त्या टप्प्यावर थांबून विचार केला

पाहिजे. इतर कुणी नाही तरी मार्क्सवाद्यांनी केला पाहिजे, असे मला वाटते. त्या संदर्भात एक लेख आहे.

हे सारे लिखाण एकत्रित करून पुस्तकाच्या रूपाने आगावे असा, माझे मित्र श्री. यदुनाथ थत्ते यांचा प्रेमळ आग्रह राहिला. निवडणुकांत विजय झाल्याबरोबर लवकरात लवकर आपले पुस्तक काढले पाहिजे अशी घाई मला नव्हती, कारण हे सगळे प्रश्न वर्षानुवर्षे टिकणारे आहेत. तात्कालिकाच्या निमित्ताने आपण लिहितो, पण त्याचा संबंध दीर्घजीवी समस्यांशी असतो. त्या दृष्टीने पुस्तक काढण्यासाठी दीड-दोन वर्षांचा उशीर होणे मला इष्ट वाटले. या पुस्तकाच्या मुद्रण प्रतीसाठी प्रा. डॉ. भा. ग. महामुनी आणि माझे विद्यार्थीमित्र जीवन पिंपळवाडकर यांचे सर्वांगीण सहकार्य झाले. या सर्व सुहृदांचा मी ऋणी आहे.

— नरहर कुरुंदकर

# निमित्त इसापनीतीचे

जून १९७५ ला आणीबाणी जेव्हा जाहीर झाली त्यावेळी ज्या परिस्थितीत आपण नव्याने जातो आहोत तिचे सगळेच गांभीर्य लोकांना कळालेले होते, असे नाही. राजकारणात जो डाव नेत्यांना सोयिस्कर ठरतो आणि त्यांना जय मिळवून देतो तो डाव सहजासहजी बदलण्यास नेते तयार नसतात. हे कळत असूनही उगीचच आशेविरुद्ध आशा करीत असताना मनात वाटायचे, हा खटला चार–दोन महिने चालेल. ऑक्टोबर अखेरपर्यंत एकदा खटल्याचा निकाल लागला म्हणजे आणीबाणी रद्द होईल. हा आपला आशावाद भोळसटपणाचा आहे हे मला कळत होतेच; पण आपल्याच भोळेपणावर आपण विश्वास ठेवावा असेही वाटत असे. कऱ्हाड संमेलनाच्या वेळी अतिशय स्पष्टपणे मला हे प्रथमतः जाणवले की लोकशाही संपत आलेली आहे आणि तिचे लवकर पुनरुज्जीवन होण्याची शक्यता नाही. ज्या वेळी माणसे घाबरलेली असतात त्या वेळी शासनाच्या निषेधाचा आवाज कुठेतरी चालू असावा लागतो. हा निषेधाचा आवाज आपण चालू ठेवला पाहिजे, ही आपली जबाबदारी आहे, याची मला जाणीव आहे.

आपण निषेधाचा आवाज चालू कसा ठेवणार ? या प्रश्नाचा विचार मी करीत होतो. माझा धाकटा भाऊ मिसाखाली अटकेत होता. अशा वेळी अनावश्यक शौर्याचे प्रदर्शन करून आपणही तुरुंगात जाऊन बसले पाहिजे, असा विचार मी करणारच नव्हतो. पण ज्याप्रमाणे आपण तुरुंगात जाऊन बसले पाहिजे असे मला वाटत नव्हते त्याप्रमाणेच अगदीच आवश्यक ठरेल तर तीही किंमत आपण मोजली पाहिजे, याची मी मनाने तयारी ठेवली होती. आणि मी माझ्यासमोर काही दिशा निश्चित करून टाकलेल्या होत्या. प्रश्न माझ्या एकट्याचा नव्हता. मी व्याख्यान द्यायला तयार असलो तरी ज्या संस्था माझे व्याख्यान घेतील त्यांच्या कार्यकर्त्यांना उपसर्ग होऊ नये ही काळजी घेणे मला भाग होते. २ ऑक्टोबर ७५ ला मी बेकायदा जाहीर सभा घेतलेली होती, तरीही मला अटक झाली नव्हती. आपल्याला फारशा सवलती मिळणार नाहीत, पण नाइलाज झाल्याशिवाय आपल्याला अटकही होणार नाही याचा अंदाज मला आलेला होता. म्हणून मी व्याख्यानांसाठी काही नवे विषय तयार करून ठेवले. खाजगीत व गटसभात मी एक मुद्दा सतत सांगत असे. तो मुद्दा हा की, फार मोठी किंमत ज्या बोलण्याबद्दल द्यावी लागेल असे काही तुम्ही बोलू नका, पण जे बोलल्याबद्दल कुणालाही फारशी किंमत

मोजावी लागणार नाही, ते तरी तुम्ही बोलणार की नाही ? आणि इतकेही धैर्य नसेल तर निदान तुम्ही गप्प बसा, भीतीपोटी निदान सत्तेवरील मंडळींचे स्तुतिपाठ गात हिंडू नका. आणीबाणीत बोलण्याचा अधिकार हिरावला गेला तरी गप्प बसण्याचा अधिकार हिरावला जात नसतो.

आणीबाणीत एक चमत्कारिक पद्धती चालू असे : पोलीस खाते व्याख्यानाला परवानगी देतही नसे आणि परवानगी नाकारली असे स्पष्टपणे सांगतही नसे. याचा परिणाम असा होई की व्याख्यानाला परवानगी व्यवहारतः नाकारलेली असे, पण आम्हाला परवानगी नाकारली असे म्हणता येत नसे. स्थूल मानाने पोलिसांचा असा आग्रह असे की वर्तमानकालीन राजकारणाला स्पर्श करायचा नाही. पोलिसांचा हा दृष्टिकोण लक्षात घेऊन मी व्याख्यानाचे काही विषय निवडले होते. जर व्याख्यान महाविद्यालयात असेल तर लोकशाहीसाठी अपक्ष व्यासपीठाची किती आवश्यकता आहे यावर मी बोलत असे. स्थूल मानाने चौकट अशी—की लोकशाहीत सत्ताधारी पक्षाने काही चांगले केले हे विरोधी पक्ष कबूलच करीत नसतो. आणि अधिकारारूढ पक्षही आपले काही चुकले हे कबूल करीत नसतो. अशा वेळी योग्य-अयोग्य, बरे-वाईट, हिताचे-अहिताचे यांविषयी स्पष्टपणे भूमिका घेणारे एक अपक्ष व्यासपीठ लोकशाहीला अत्यंत आवश्यक असते. ही चौकट शिल्लक ठेवून सत्ताधारी पक्ष सोयिस्कर खोटे कसे बोलतो याचा मी विस्तार करीत असे. या विस्तारात शासनाच्या नानाविध भूमिकांवर टीका असे. त्यात वीस कलमी कार्यक्रमावरही टीका असे.

या आणीबाणीच्या काळात माझे एक व्याख्यान अतिशय लोकप्रिय झाले होते. जवळजवळ आणीबाणीच्या काळात या विषयावर मी पन्नास वेळा बोललो असेन. फक्त एके ठिकाणी म्हणजे नागपूरला या विषयावर मी बोलू शकलो नाही. निवडणुका जाहीर झाल्यानंतर व आणीबाणी शिथिल झाल्यानंतर मुंबईला या विषयावर मी शेवटचे बोललो. यापुढे कदाचित या विषयावर बोलणारही नाही आणि बोललोच तर जे आणीबाणीत बोलत होतो त्याहून मी फार निराळे बोलेन. या विषयाचे नाव ' इसापनीती ' असे असे.

सामान्यपणे इसापनीती या विषयावर बोलण्यासाठी पोलीस खाते खळखळ न करता परवानगी देत असे, पण व्याख्यान घेणारेच आपल्या प्रौढ व जाणकार श्रोत्यांच्या समोर हा बालकथांचा विषय मांडण्याबाबत नापसंती दाखवीत असत. त्यांना सांगावे लागे, आधी व्याख्यान ऐका आणि नंतरच या विषयासंबंधी मते द्या. व्याख्यान संपल्यानंतर याच विषयावर मी का बोललो हे प्रायः मला कुणी विचारीत नसे. ऐकणारे फारसे खोलात न शिरता आभार मानून मोकळे होत आणि जाता जाता मला असे सुचवीत की हा विषय फार चांगला आहे. तुम्ही महाराष्ट्रभर या विषयावर व्याख्याने देत हिंडले

पाहिजे. एखाद्या सरकारी नोकराला तो आभार मानू लागला म्हणजे मी हमखास विचारी, तुम्हाला या व्याख्यानात काय आवडले ? तो एकदम कावराबावरा होऊन इकडे–तिकडे पाही आणि ' बरंय येतो ' म्हणून निघून जाई. एक-दोन ठिकाणी परवानगी देण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्यांनी मला विचारले, तुम्ही मुद्दाम इसापनीती या विषयावर का बोलता ? मी सामान्यपणे स्पष्टीकरण असे करी की, आणीबाणी असल्यामुळे तुम्ही आम्हाला राजकारणावर बोलू देत नाही. अशा वेळी भारत नको, राजकारण नको, वर्तमानकाळ नको. मी श्रोत्यांना अडीच हजार वर्षांपूर्वीच्या एका कथाकाराची ओळख करून देतो. म्हणजे मला त्रास नको. व्याख्यान ठरविणाऱ्यांना त्रास नको. पोलीस अधिकाऱ्यांना मनातून काय वाटे हे सांगता येत नाही, पण जाहीरपणे तरी ते, ' साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे,' असे म्हणून परवानगी देत. व्याख्यान संपल्यानंतरसुद्धा पोलिसांनी कधी मला कमीजास्त विचारले नाही.

नागपूरला इसापनीतीवर माझे व्याख्यान होऊ शकले नाही, कारण व्याख्यानात काय असेल याचा आगाऊ अंदाज सभा घेणाऱ्यांना येऊ देण्याची चूक मी केली होती व त्यामुळे कार्यकर्ते हिंमत हरले होते. एके ठिकाणी तर काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेतेच माझ्या या व्याख्यानाला अध्यक्ष होते. त्यांनी कोणताही समारोप केला नाही. केवळ आभार मानून ते थांबले, पण खाजगीत मला ते म्हणाले, ' कुरुंदकर, तुम्हाला जेलचे डोहाळे होऊ लागलेले आहेत. तुम्ही काय करावे ते तुम्ही ठरवा. पण निदान काँग्रेसच्या नेत्यांना अध्यक्ष करू नका. आम्ही शिष्टाचार पाळतो यामुळे एखादे दिवशी आम्ही अडचणीत येऊ ! '

इसापनीतीविषयी जे व्याख्यान मी बनवलेले होते ते सगळेच्या सगळे बोलल्याप्रमाणे लेखरूपाने लिहिणे मला कठीणच आहे, कारण मूळ व्याख्यानातील जिवंतपणा माझ्या लेखी भाषेत उतरणे कठीणच आहे, पण मी व्याख्यान ऐसपैस सजवलेले होते. व्याख्यान देण्याचा हेतू केवळ वाङ्मयीन असून त्याचा राजकारणाशी काही संबंध नाही व वर्तमान राजकारणाशी तर त्याचा अजिबात संबंध नाही हे मी व्याख्यानाच्या ओघात पाच-दहा वेळा तरी घोळून-घोळून सांगत असे. यामुळेच हे व्याख्यान बरोबर वर्तमानकालीन राजकारणावर चालले आहे हे श्रोत्यांना कळत असे.

बंधू-भगिनींनो, आजच्या व्याख्यानासाठी इसापनीती हा विषय मी मुद्दाम निवडलेला आहे, याची दोन–तीन कारणे आहेत. पहिली गोष्ट ही की सध्या या देशात आणीबाणी चालू आहे. आणीबाणी चालू असल्यामुळे राजकारणावर शासनाची स्तुती करणे याखेरीज दुसरे काही बोलणे शक्य नाही. आपण शासनाची खरी-खोटी स्तुती करू शकतो. त्याला अजून मनाई नाही. कारण आजच्या राज्यकर्त्यांचा लोकशाहीवर विश्वास आहे असे

त्यांचे म्हणणे आहे. यामुळेच शासनाच्या अधिकृत भूमिकेला खरा अगर खोटा पाठिंबा कोणत्याही भाषेत देण्याची मोकळीक आपल्याला आहे. आणीबाणी ही अल्पकाळासाठी आहे असे शासनाचे म्हणणे आहे. हे त्यांचे म्हणणे खरे करून दाखवण्याची जबाबदारी तुमची-आमची सर्वांची आहे. आता आणीबाणी म्हटल्यानंतर काही बंधने येणार ही गोष्ट स्वाभाविकच आहे. राजकीय प्रश्नावर शासनाच्या विरोधी आपण काही बोलायचे नाही हे एक असे सर्वांनी पत्करलेले बंधन आहे. म्हणून मी असे ठरवलेले आहे की, आणीबाणी आहे तोपर्यंत राजकारणावर बोलायचेच नाही आणि वर्तमानकाळाविषयी कोणताही प्रश्न घेऊन आपण बोलू लागलो की जवळून-दुरून राजकारणाला स्पर्श होतोच. राजकारण सर्वस्वी वर्ज्य मानण्याच्या माझ्या इच्छेमुळे मी मुद्दाम इसापनीती हा विषय निवडलेला आहे. एक तर इसाप फार जुन्या काळी होऊन गेला आणि तो जुन्या काळच्या ग्रीस देशात होऊन गेला. काळही जुना आणि देशही वेगळा. यामुळे या व्याख्यानाचा आजच्या राजकारणाशी काही संबंध नाही हे कृपा करून आपण लक्षात घ्यावे.

हा विषय निवडण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण असे की, इसाप हा जगद्विख्यात आणि जगभर लोकप्रिय असणारा कथाकार आहे. एवढ्या मोठ्या कथाकाराची त्याच्या वाङ्मयावर प्रेम करणाऱ्यांनी एकमेकांना ओळख करून दिलीच पाहिजे. इसाप हा माझा अत्यंत आवडता कथाकार आहे. आपल्याला राजकारणावर बोलायचे नाही, तर मग आपण वाङ्मयावर बोलू. आणि वाङ्मयावर बोलताना आपण आपल्या आवडत्या कथा-कारावर बोलू असा विचार करून मी या विषयाकडे वळलो आहे.

ललित वाङ्मयामध्ये एक मोठी चमत्कारिक परिस्थिती असते. लेखक एका देशातील असतो, पण त्याचे वाङ्मय मात्र निरनिराळ्या देशांत लोकप्रिय असते. मोठमोठ्या लेखकांच्या बाबतीत असे सतत घडत आले की, देश आणि काळ यांच्या सीमा ओलांडून ते वाङ्मय आपल्याला आवडत असते. जणू काही या चांगल्या साहित्याच्या रूपाने आपण आपल्याच वर्तमानकाळात जगत असतो. डेन्मार्कचा राजपुत्र हॅम्लेट याची कथा शेक्सपियरच्या आधीची. शेक्सपियर इंग्लंडचा, तीनशे वर्षांपूर्वीचा. पण आपण शेक्सपियरच्या हॅम्लेटमध्ये आपलाच वर्तमान पहात असतो. वाचकांना वर्तमानकाळातच कलाकृती अनुभवावी लागते. म्हणूनच तर तिला आम्ही जिवंत असणारी मानतो.

इसापनीती या विषयावर बोलत असताना राजकारण टाळून एका विख्यात अमर कथा-कारावर बोलण्याची माझी इच्छा आहे. इसापविषयी बोलताना कुणाचा गैरसमज होऊ नये याची काळजी घेणे मला भाग आहे. इसापबाबत श्रोत्यांचा गैरसमज होण्याचा धोका मला दोन कारणांमुळे दिसतो. एक तर, जुना ग्रीस देश ही एक लोकशाही होती. आजच्यासारखी ती लोकशाही सर्वच नागरिकांना समान स्वातंत्र्य किंवा समान गुलाम-

गिरी देणारी नव्हती. जुन्या ग्रीसमधील लोकशाह्या विषम समाजरचनेसह होत्या. ज्या अथेन्समध्ये इसाप झाला असे आपण मानतो तिथे नागरिक नसलेले स्वतंत्र लोक दहा हजार होते. एकवीस हजार नागरिक होते. बाकी चार लक्ष गुलाम होते. पण विषमतेवर आधारलेली असली तरी ती लोकशाही होती! इसाप हा त्या लोकशाहीचा कथाकार. तो अडीच हजार वर्षांपूर्वीच्या त्या ग्रीक लोकशाहीविषयी बोलतो आहे. पण आपण पुरेशा सावधपणे त्याच्या कथा समजून घेतल्या नाहीत, तर तो जणू आपल्याचविषयी बोलतो आहे असे वाटू लागते.

इसाप बोलतो आहे प्राचीन ग्रीस लोकशाहीविषयी. तो त्या राजकारणाच्या संदर्भात बोलतो आहे. पण आपल्याला असे वाटते की, तो जणू आपल्याच राजकारणाविषयी बोलतो आहे. जुन्या ग्रीक राजकारणावर त्याने केलेली टीका आपल्याला आपल्याच राजकारणावरील टीका वाटण्याचा संभव आहे. म्हणून गैरसमज टाळण्यासाठी हे मुद्दाम सांगितले पाहिजे की, या व्याख्यानाचा संबंध परदेशाच्या भूतकाळाशी आहे, स्वदेशाच्या वर्तमानकाळाशी नाही.

कथा प्राण्यांची असली म्हणजे बालवाङ्मयाचा भाग असते आणि ती लहान मुलांसाठी असते असे समजणे धोक्याचे आहे. कारण प्राण्यांच्या कथेमध्येसुद्धा असा लोकविलक्षण आशय असतो की, या कथा लहान मुलांना समजू शकतीलच असे मानणे धोक्याचे असते.

इसापची एक कथा अशी आहे—
एकदा गावकऱ्यांना गावाबाहेर एक छोटे पिलू सापडले. हे पिलू अगदीच लहान असल्यामुळे ते कोल्ह्याचे आहे, लांडग्याचे आहे, वा कुत्र्याचे आहे हे गावकऱ्यांना समजेना. जर हे पिलू लांडगा अगर कोल्हा असेल, तर ते पाळणे धोक्याचे होते. आणि जर हे पिलू कुत्र्याचे असेल तर मग एक पाळता येण्याजोगा कुत्रा उगीचच सोडून देणे तोटयाचे होते. म्हणून गावकऱ्यांना निर्णय घेता येईना. त्यांची चर्चाच नुसती चालू राहिली. जेव्हा सर्व डोळसांच्या हे लक्षात आले की आपण निर्णय घेऊ शकत नाही, तेव्हा सर्व डोळस गावकरी गावातील सर्वांत शहाण्या माणसाजवळ गेले. हा सर्वांत शहाणा माणूस अंधळा होता. सर्व डोळस मंडळींनी अंधळयाला मार्गदर्शन करण्याची विनंती केली. तेव्हा गावातला सर्वांत शहाणा असा तो अंधळा म्हणाला, मित्रहो, तुम्हाला हजार वस्तू दिसत असल्यामुळे तुमची बुद्धी भरकटत जाते व त्यामुळे सोपे सत्य दिसतच नाही. मी अंधळा असल्यामुळे प्रत्येक वळणावर धोका खाणारे डोळे मला नाहीत. त्यामुळे सत्य मला सरळ दिसते. बंधूंनो, पिलू कोल्ह्याचे, कुत्र्याचे, की लांडग्याचे या प्रश्नाचा निर्णय तुम्ही ते पिलू मोठे झाल्यानंतर घ्या. पण ती मेंढी नव्हे यावर तुमचे एकमत

दिसते. तेव्हा हे पिलू गावात पाळण्याचे कारण दिसत नाही.

आता या कथेत डोळसांच्या गावात राहणारा जो सर्वांत शहाणा असा एकमार्गी अंधळा आहे, तो खरे म्हणजे सतरा वाटांवर भुलणारे डोळे नसल्यामुळे खरा डोळस आहे! या ठिकाणी असणारी खोच लहान मुलांच्या लक्षात येण्याचा संभव कमी आहे. प्रलोभनाला भुलणारे डोळे ज्याला आयुष्यभरात म्हातारपणापर्यंत कधी आलेच नाहीत, तो इतरांच्या प्रमाणे चतुर नसेल, कावेबाज नसेल, स्वतःच्या आणि इतरांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याइतका कुशल नसेल. पण तो मोह न पडणारा अंधळा म्हातारा सर्वांत शहाणा असतो, हे मुलांना कळणे फार कठीण आहे. मोठ्यांनासुद्धा जे कळत नाही ते लहानांना कळेल ही अपेक्षा चूक आहे.

इसापच्या कथा या प्रामुख्याने प्राणिकथा आहेत. पण त्या प्राणिकथा आहेत म्हणून ते बालवाङ्मय आहे ही समजूत करून घेणे मुळातच चूक आहे. शिवाय लोकांनी उगीचच अशी समजूत करून घेतली आहे की इसापच्या कथा या नीतिकथा आहेत. इसापच्या कथांमध्ये जो नैतिक उपदेश असतो तो लहान मुलांना समजावून सांगण्याजोगा असेलच याचा भरवसा नसतो.

एक कथा अशी आहे–
मदनदेवता ( मुळात क्युपिड ) एकदा थकून एका गुहेत झोपली. ती गुहा मृत्युदेवाची होती. झोप संपल्यावर मदनाने आपले बाण सावरले आणि तो बाहेर पडला. पण झाले काय, की मृत्यूच्या गुहेत मृत्युदेवाचेही काही बाण होते. काही मदनाचे बाण चुकून यमाच्या बाणात पडले. आणि यमाचे काही बाण चुकून मदनाच्या भात्यात आले! आजही जगात यामुळे विपरीत गोष्टी घडताना दिसतात. तरणीताठी माणसे मरून जातात. बाण मदनाने सोडला पण तो होता यमाचा. आणि म्हातारी माणसे कामपीडित होतात. बाण यमाने सोडला, पण तो होता मदनाचा. आता इसापच्या या कथेतून लहान मुलांना आपण नीतिबोध कोणता देणार? तात्पर्य, बाणांची सरमिसळ होऊ देऊ नये, इतके ज्याला कळते त्या अरसिक शिरोमणीला इसापच्या कथेचे मर्म कसे समजणार? म्हणून इसापच्या कथा हे बालवाङ्मय आहे, या भ्रमातून आपण प्रथम बाहेर पडले पाहिजे.

इसापचे कथावाङ्मय हे प्रौढ वाङ्मय आहे. एकाच अर्थाने ते प्रौढ वाङ्मय नसून अनेक अर्थाने ते प्रौढ वाङ्मय आहे. कथा सांगणारा इसाप हा स्वतः प्रौढ आहे, यात विशेष असे काहीच नाही, कारण बालवाङ्मयाचे बहुतेक सगळे लेखक प्रौढच असतात, पण इसापने ज्या मंडळींना कथा सांगितलेल्या आहेत तीही प्रौढ आहेत. इसापचा

श्रोता प्रौढ आहे, हे अनेकदा आपण विसरून जातो. प्रौढ मंडळींच्यासमोर एखादा मुद्दा समजावून सांगण्याच्या हेतूने इसापने या दृष्टान्तकथा वापरल्या आहेत. प्रौढांचे जे प्रश्न या कथा सागण्यासाठी इसापला प्रवृत्त करते झाले त्या प्रश्नांचे स्वरूपही प्रौढच आहे.

अशी एक कहाणी आहे–
इसाप ज्या मालकाच्याकडे नोकरीला होता त्याच्याकडे इतरही अनेक गुलाम होते. एकदा या गुलामांनी अंजीर खाऊन टाकले, आणि सर्वांनी मिळून आळ मात्र इसापवर घेतला. अंजीर इसापने खाल्ले अशी साक्ष देणारे बहुमत तिथे हजर होते! या वातावरणात इसाप आपल्या मालकाला म्हणाला, मी माझे निर्दोषत्व सिद्ध करून दाखवतो. तशी संधी मला मिळावी. त्याने तोंडात बोट घातले व उलटी केली. उलटीत पोटातले अन्न बाहेर आले, पण त्यात अंजीर नव्हते. इसाप म्हणाला, इतर सर्वांनीही या पद्धतीने आपले निर्दोषपण सिद्ध करावे.

आता या कथेत बालांचे काय आहे? ती प्रौढांनी प्रौढांसमोर सांगितलेली प्रौढांची कथा आहे. इसापच्या अनेक कथांचे स्वरूप असे आहे. कथांचे अपेक्षित श्रोते प्रौढ आहेत. त्यातील प्रश्न प्रौढ आहेत. म्हणून हे बालवाङ्मय नव्हे ही गोष्ट आपणाला प्रथमच समजून घेतली पाहिजे.

परंपरेने जे इसापचे जीवन आपल्यासमोर उपलब्ध आहे ते पाहताना असे दिसून येते की, आयुष्याचा एक काळ इसाप संसदेत होता. अथेन्स ही प्राचीन ग्रीक लोकशाही होती. ग्रीक देशात निवडणुका नसल्यामुळे सर्वच नागरिक संसदेचे सभासद असत. या संसद सभासदांच्यासमोर राजकीय प्रश्नांच्या संदर्भात इसापने अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत. काही गोष्टी अशा असतील की ज्यात असणारे राजकारण आज आपल्याला जाणवत नाही, काही गोष्टी अशा असतील ज्यांच्याशी मुळात राजकारणाचा संबंध नव्हता, पण आज आपल्याला तिथे राजकारण जाणवते. या दोन्ही बाजू गृहीत धरल्या, तरी अशा अनेक गोष्टी आपल्याला दिसतात जिथे राजकारणाचा संबंध अतिशय स्पष्ट आहे. संसदेत राजकारणाच्या संदर्भात सांगितलेल्या गोष्टी आपण बालवाङ्मयात कशा घालणार? मुलांचे मनोरंजन करण्यासाठी इसापची प्रसिद्धी नव्हती. आजच्या प्रौढ आई–बापांना इसाप आवडतो म्हणून त्याच्या कथा वाचून मुलांनी स्वतःचे मनोरंजन करून घ्यावे अशी आई–बापांची उगीचच भूमिका असते. सत्य तर असे की, मुलांनी इसाप वाचावा असे मुलांच्या आई–बापांना वाटते! हा पुरावाच ते वाङ्मय प्रौढांचे आहे हे सिद्ध करणारा आहे.

प्राण्यांची कथा असली म्हणजे ती मुलांचीच असते, असे आपण का समजावे, हे मला कळत नाही. पंचतंत्र प्राणिकथा सांगते. पण या कथा सांगण्याचा हेतू मुलांमधून एक चाणाक्ष, व्यवहारज्ञ जाणता तयार करावा हा आहे. तो व्यक्तिमत्त्वातील प्रौढत्व घडवण्याच्या प्रयासाचा भाग आहे. महाभारतात प्रौढ भीष्म प्रौढ युधिष्ठिराला आणि प्रौढ कणिक प्रौढ धृतराष्ट्राला विकसित राजकारणातील डावपेच कळावे म्हणून प्राणिकथा सांगतात. हे सगळे प्रौढ वाङ्मय आहे. मुलांच्या भाव-विश्वाशी जे एकरूप होत नाही त्याला काय बालवाङ्मय म्हणावे ?

महाकवी खलिल जिब्रान याची एक कथा आहे—
विस्तीर्ण पसरलेल्या वाळवंटात सकाळ होत होती. पहाटेचे सोनेरी किरण सगळ्या आसमंताला नवीन झळाळी आणि सौंदर्य देत होते. सकाळचे ऊन अंगावर पडलेला एक सुस्त कोल्हा क्रमाने आळस व जांभया देत झोपेतून जागा झाला. अंग झटकून उभा राहून तो कोल्हा म्हणाला, चला सकाळ झाली! लांबच लांब पसरलेल्या आपल्या सावलीकडे पाहून कोल्ह्याने असे ठरवले की, न्याहरीसाठी आपण उंट मारला पाहिजे. जेवणाचा विचार नंतर करू. आणि उंटाच्या शोधात कोल्हा निघाला. दुपारपर्यंत तो शिकार शोधीत होता. त्याला अजून उंटच काय पण ससाही मिळालेला नाही! भर दुपारचे ऊन चमकू लागलेले होते. भुकेने कोल्हा हैराण व केविलवाणा झालेला होता. तहानेने घसा सुकलेला होता. तेव्हा कोल्ह्याने आपल्या सावलीकडे पाहिले. चार पायांत सामावलेली ती छोटी सावली पाहून कोल्हा म्हणाला, काय मी वेडा पहा; एका उंदरावर माझे पोटभर जेवण झाले असते. उगीचच उंट शोधण्यात वेळ गेला.

आता ही प्राणिकथा आहे. तारुण्याच्या आरंभाला न पेलणारी स्वप्ने पाहणाऱ्यांची आणि परिस्थितीचे चटके बसताच न शोभणारी परिस्थितीसुद्धा पत्करायला तयार असणाऱ्या त्याच तरुणाची.

बहुतेक वेळा काय होते, सोळा-सतराव्या वर्षी शिवाजी होण्याची इच्छा असणारे लोक चोविसाव्या वर्षापर्यंत किराणा दुकानात मजूर व्हायला तयार होतात. दमनचक्राचा वरवंटा म्हणजे काय माहीत नसल्यामुळे गगनभेदी आरोळ्या ठोकून क्रांतीची प्रतिज्ञा घेणारे तरुण थोडा चटका बसताच इतके शेळपट होतात की, त्यांना रस्त्यावर चौघांनी जमून कुजबूज करण्याचीही भीती वाटायला लागते. न शोभणाऱ्या लाचारपणात तरुण तृप्त असलेले दिसू लागतात. अर्थात खलिल जिब्रानला आजच्या भारताविषयी काही म्हणायचे नाही. तो त्याच्या काळातल्या लेबनॉनविषयी बोलत असणार. म्हणून आपल्या शेळपट तरुणांशी या कथेचा काही संबंध नाही. मुद्दा इतकाच की, प्राणिकथा ही लाबकथा नसते. तसेच पाहिले तरी इसापविषयी आपल्याला जवळजवळ काहीच माहिती नाही. खरोखरच

इसाप या नावाचा कुणी भूतलावर जन्माला आलेला आणि मेलेला माणूस होऊन गेला काय ? याबाबत नक्की असे काहीच सांगता येणार नाही. कदाचित इसाप होऊन गेला असेल, कदाचित तो झालाही नसेल. नानाविध कथा सांगणारा असा तो कल्पित वक्ता असेल, नाहीतरी आपण अकबर-बिरबलाच्या कथा खूपच ऐकतो. सम्राटाची खुशामत करणे यातच ज्यांना आपल्या बुद्धीची इतिकर्तव्यता वाटते असे बिरबल दर पिढीत पहायला सापडतातच. कालपरत्वे अधिराज्य गाजवण्याचे प्रकार बदलतात. म्हणून खुशमस्कऱ्यांचेही प्रकार बदलतात. एकाने किंचाळावे, देशात सर्वांत लोकप्रिय कोण ? उरलेल्या हुजऱ्यांनी सांगावे आमचे साहेब! ही भाटांची मिथ्या स्तोत्रे शोधण्यासाठी जुने रजपूत काव्य पाहण्याची गरज नाही. आपली रोजची वर्तमानपत्रेसुद्धा पुरतात. वृत्ती म्हणून बिरबल सत्य असला तरी कथाकार बिरबल हे एक कल्पित आहे. या बिरबलाप्रमाणेच इसाप जर कल्पित असेल, ते एक काल्पनिक वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व असेल तर त्यात काही नवल नाही. इसवी सनाच्या चौदाव्या शतकात प्लानुडस याने इसापच्या कथांचा पहिला संग्रह प्रकाशित केला. आपल्याला ज्ञात असणारा इसापचा पहिला कथासंग्रह इतका उत्तरकालीन आहे.

प्लानुडसच्या पूर्वी इसापच्या कथाच अस्तित्वात नव्हत्या असा याचा अर्थ नव्हे. इसापच्या कथांचा याहून जुना संग्रह आज उपलब्ध नाही, इतकाच याचा अर्थ. म्हणून इसाप काल्पनिक नसून वास्तविक असेल, तर मग इसवी सनाच्यापूर्वी सहाव्या शतकात केव्हा-तरी त्याचे अस्तित्व घडून गेले असले पाहिजे. परंपरेने इसापचे जे चरित्र आपल्याला उपलब्ध आहे त्यात तो मूळचा ग्रीक नाही. इसाप हा मूळचा फिजिरियन. आपल्या समोर येतो तो गुलाम म्हणून. एकाकडून दुसऱ्याकडे असा अनेकांचा गुलाम म्हणून इसाप वावरत आला. अशी गुलामगिरीत त्याची किती वर्षे गेली ते काहीच सांगता येत नाही. शेवटी तो एक ग्रीक तत्त्वज्ञ झांथस याचा गुलाम होता. झांथस अथेन्सच्या संसदेचा सभासद होता. इसापच्या विलक्षण बुद्धिमत्तेने अथेन्समध्ये तळपायला आरंभ केल्यानंतर त्याच्याकडे अनेकांचे लक्ष गेले. एका विशिष्ट प्रसंगी सर्व राष्ट्र संभ्रमित असताना राष्ट्राचे मार्गदर्शन करण्यासाठी इसापने स्वातंत्र्य मागून घेतले. नंतर तो अथेन्सच्या संसदेचा सभासद झाला. पुढच्या काळात डेल्फाय आणि अथेन्स यांचे युद्ध चालू असताना डेल्फायने अट घातली की इसाप जर आमच्या हवाली करीत असाल तर अथेन्सचा वेढा आम्ही उठवू. इसाप म्हणाला, तुमची स्वतंत्र असण्याची इच्छा सतत प्रज्वलित ठेवणारा इसाप जर तुम्ही शांततेसाठी शत्रूंच्या हवाली करणार असाल तर तुमच्या वाट्याला जे येईल ते शांततेच्या नावाने गुलामाचे जीवन असेल!

स्वातंत्र्य हे मूल्यच असे आहे. जे सहजगत्या मिळाले म्हणजे माणसे बेजबाबदारपणे उधळताना लाजत नाहीत आणि जेव्हा स्वातंत्र्य टिकवण्यासाठी किंमत मोजण्याची पाळी येते त्यावेळी राष्ट्राचे सर्व तप, मांगल्य आणि वैराग्य शत्रूंच्या हवाली करून माणसे

चामडी वाचवण्याच्या उद्योगाला लागतात ! सुरक्षिततेच्या मोहाने त्यांना असे वाटते की आपण फक्त जिभाच कापून देतो आहोत. आपण खूर आणि शेपूट चिटकून घेतो आहोत, हे माणसांना कळत नाही ! माणसाची जात तप, वैराग्य विकते, तिथे इसाप म्हणजे नाइलाजाने पत्करलेला शहाणपणा. तो सोडायला तर माणसे उत्सुक असणारच. तेव्हा अथेन्सवासीयांनी इसाप डेल्फायच्या हवाली केला. डेल्फायला इसापचा वध करण्यात आला. लोकांना न पेलवणारे स्वातंत्र्य आग्रहाने देऊ पाहणाऱ्यांचा शेवट असाच व्हावा, ही इतिहासाची रीतच आहे ! देहरूपाने इसाप डेल्फायला मिळाला, पण तो खरोखरी मेला नाही. एका विशिष्ट ध्येयवादामुळे निर्माण झालेला शहाणपणा क्षणकाळ पराभूत झाल्यासारखा वाटतो, पण पराभव माणसांचा होतो, विचार तुरुंगातही मरत नाहीत, दवाखान्यातही मरत नाहीत.

कधी कधी वाटते, बिरबलच खरा असू शकतो. इसाप खोटाच असायला पाहिजे. एक दिवस अकबराला वांग्याची भाजी आवडली. बिरबलने वांग्याची अफाट स्तुती केली. एक दिवस अकबराला वांगे नावडते झाले. बिरबलने वांग्याची चौफेर निंदा केली. बिरबलचा मुद्दा बरोबर आहे. तो नोकर वांग्याचा नव्हता, अकबराचा होता ! कल्पितात निदान बिरबल अकबराचा खुशमस्कऱ्या असतो. वास्तवातल्या बिरबलाला औरंगजेबसुद्धा मिळत नाही. स्वतःला अकबर समजणाऱ्या कोणत्या तरी नादानावर चौऱ्या ढाळण्यात बिरबलचा जन्म जातो. पण हा बिरबल खरा असतो. तो खूपदा आपल्याला भेटतो. म्हणून कधी वाटते, इसाप हे कल्पित पात्रच असले पाहिजे, तर कधी असेही वाटते की इसाप वास्तविकच असला पाहिजे. म्हणून तर तो आपल्याला इतका दुर्मिळ झाला आहे.

इसाप वास्तविक असो वा कल्पित, तो काही भारतीय नव्हे. तो दूरदेशचा रहिवासी. काळाच्याही दृष्टीने तो किती दूर असणारा माणूस. म्हणून तो जे बोलतो त्याचा आपल्या वर्तमानकाळाशी काही संबंध असणार नाही, हे उघडच आहे. म्हणून त्याच्या कथा वर्तमानकाळाशी संबंधित नाहीत. हे आपण समजून घेतले पाहिजे. मी त्या कथा सांगत असताना व वर्तमानकाळाशी संबंध जोडतो आहे, तो त्या कथा समजाव्यात म्हणून. बाकी त्या वर्तमानाच्या कथाच नाहीत.

इसापच्या कथा म्हणजे चमकदार बुद्धीच्या कथा नव्हत. अतिरेकी, चमकदार बुद्धी असल्यामुळे इसाप कधी अडचणीत सापडत नाही. आणि इतरांना हास्यास्पद बनवून स्वतः कधी निसटून जात नाही. तशा त्या कथा नसिरोद्दीनच्या आहेत. मुल्ला नसिरोद्दीन याच्या मागे एकदा सावकार लागला. म्हणून नसिरोद्दीन पळत पळत घरात शिरला व माडीवर जाऊन लपला. त्याने बायकोला सांगितले, कुणी विचारले तर मी घरी नाही म्हणून सांग. मागोमाग सावकार आले. पत्नीने सांगितले, नसिरोद्दीन घरी नाहीत.

सावकार म्हणाला, मी नसिरोद्दीनला घरात शिरताना पाह्यले आहे. मी वाट पहात बाहेर बसतो. केव्हा ना केव्हा त्याला बाहेर पडावे लागेल. मला फुरसत आहे. माडीवरून नसिरोद्दीन व्यापाऱ्याचे बोलणे ऐकत होता. त्याला व्यापाऱ्याचा मूर्खपणा सहन होईना. म्हणून खिडकी उघडून वरून नसिरोद्दीन व्यापाऱ्याला म्हणाला, मूर्खा, समोरच्या दरवाजाने आत गेलेला माणूस पाहून दारावर तू वाट पहात बसणार. अरे, तो मागच्या दाराने निघून गेला असावा, हा तर्क तुला कसा सुचत नाही? अतिशहाणपणामुळे नसिरोद्दीन असा संकटात सापडतो. कारण त्याच्याजवळ बुद्धी आहे, विवेक आणि समंजसपणा नाही. इसापची कथा ही बुद्धिवंत माणसाची कथा आहे, पण त्या ठिकाणी बुद्धी, विवेक आणि समंजसपणाची दासी झालेली आहे.

एकदा नसिरोद्दीनची अंगठी हरवली. ही अंगठी तो आपल्या अंगणात शोधीत होता. शेजाऱ्यांनी नसिरोद्दीनला विचारले, काय शोधतो आहेस? तो म्हणाला, अंगठी शोधतो आहे. शेजारी म्हणाले, आम्ही मदत करावी काय? नसिरोद्दीन म्हणाला, मित्रांनो, मी तुमच्या मदतीचे स्वागत करीन. मग एक जण अंगणात आला. त्याचे पाहून दुसरा आला. नंतर तिसरा आला. हळूहळू अंगठी शोधणाऱ्या मंडळींनी सगळे अंगण भरून गेले. नसिरोद्दीन ओसरीवर शांतपणे विश्रांती घेत बसला! लोक अंगठी शोधून शोधून दमले. शेवटी नसिरोद्दीनला म्हणाले, मुल्ला आम्ही खूप शोधले, पण अंगठी काही सापडत नाही. नसिरोद्दीन म्हणाला, अंगठी सापडणारच नाही. कारण ती इथे हरवलेली नाही. लोक म्हणाले, मूर्खा, अंगठी इथे हरवलेली नव्हती तर इथे शोधलीस कशाला? नसिरोद्दीन म्हणाला, इथे प्रकाश भरपूर आहे, म्हणून ही जागा शोधायला चांगली आहे. बहुतेक वेळा राज्यकर्ते जे जिथे हरवते ते तिथे स्वतः शोधीत नाहीत. कुठे काय हरवले ते समजू देत नाहीत. जिथे गर्दी राबवता येईल तिथे सापडो न सापडो, सर्वांनी शोध घ्यावा असे राज्यकर्त्यांना वाटते! मुल्ला नसिरोद्दीन लाखोंना चकवा देण्यासाठी आपली बुद्धी वापरतो. इसाप चकवेखोर नव्हे, इसाप निश्चित तत्त्वांसाठी कठोर होणारा, सर्वांविषयी करुणा असणारा मार्गदर्शक आहे.

इसापच्या गोष्टी या संदर्भात पाह्यला पाहिजेत. एक गोष्ट तर इसापने मोठी चांगली लिहिली आहे.

एका तळ्याच्या काठी दोन माजलेले बळू झुंज खेळत होते. आणि माजलेल्या बैलांची ही रोमांचकारी झुंज पाहण्यासाठी तळ्याच्या काठावर सगळे बेडूक जमलेले होते. बेडकांच्या या गर्दीला पाहून एक शहाणा म्हातारा बेडूक म्हणाला, मित्रांनो, प्रसंग फार कठीण आहे. दोन बैलांची झुंज बेडकांनी कधी आनंदाने पाहू नये. कारण त्यांच्यातील एक कुणी तरी हरतो. इसाप ज्या वेळेला हरण्याचा उल्लेख करतो,

त्या वेळेला तो झुंज हरण्याचा आहे. निवडणूक अगर तिचे खटले हरण्याचा नाही. हे आपण समजून घेतले पाहिजे. तो शहाणा बेडूक म्हणाला, हरलेला बैल स्वतःला वाचवण्यासाठी जेव्हा इकडे-तिकडे पळू लागतो तेव्हा सगळे बेडूक पायाखाली तुडवीत जातो! इसापच्या काळीसुद्धा कुणाच्या तरी पायाखाली तुडवले जाणे इतकेच भविष्य बेडकांना असावे असे दिसते. तसा जर आपण व्यापक विचार केला तर तुडवले जाण्यात बेडकांना फार चिंतेचे कारण नसते, कारण त्यांची संतती खूप असते. इसापला मात्र बेडूक फुकट मरू नयेत याची चिंता सतत असलेली दिसते!

तूर्तास आता निवडणुका वगैरे बंद आहेत. त्या पुन्हा केव्हा सुरू होतील हे कुणालाच माहिती नाही. पण गेल्या वर्षीपर्यंत निवडणुका सतत चालू होत्या. इसापच्या अनेक कहाण्या अशा आहेत की मधून मधून मला वाटते आपल्या निवडणुकांचे रहस्य इसापला कसे कळले? त्याच्या वेळी तर निवडणुका नव्हत्या. खरे म्हणजे इसापला आपले जीवन कळलेले नाही. त्याच्या कथेत आपण आपले जीवन शोधतो आहोत इतकेच.

इसापची एक कथा अशी आहे की. सापाचे पिलू सळसळत वाटेने चालले होते. या सापाच्या जाण्याच्या रस्त्यात एक कानस अडवी पडलेली होती. सापाचे पिलू त्या कानशीला म्हणाले, अग बाजूला सरक. हा रस्ता माझ्या वहिवाटीचा आहे. पण कानशीने काही उत्तर दिले नाही. साप म्हणाला, तुला कळत नाही काय? तू माझी वाट का अडवतेस? मला निष्कारण भांडण्याची इच्छा नाही. रस्ता माझा आहे. तू बाजूला सरक.

तरीही कानस गप्पच होती. तेव्हा सापाने कानशीला बाजूला सरक नाहीतर दंश करीन अशी धमकी दिली. शेवटी साप कानशीवर चालून गेला. आणि तो कानशीला चावू लागला. कानशीला चावे काढता काढता सापाचे दात पडले. हा वेळपर्यंत गप्प बसलेली कानस आता बोलकी झाली आणि म्हणाली, गड्या ज्याच्याशी घासल्याने लोखंडी गजाचे तुकडे पडतात त्याच्याशी चावण्याचा खेळ करू नये. नाही तर आपले दात पडतात. पुढच्या आयुष्यात एवढा धडा जरी तुझ्या लक्षात राहिला तरी तुझे कल्याण होईल. पेलत नाही ते करू नये. इसापच्या समोर एखादा धटिंगण संसदेचा नेता होता काय? की त्याच्यासमोर नांगी टाकणे सर्वांना हिताचे वाटत होते. हे आपल्याला सांगता येत नाही. पण ही कथा मात्र त्याने लिहिली आहे.

इसापच्या अनेक कथा, धटिंगणाशी झगडून नष्ट होण्यापेक्षा समंजसपणा पत्करून आपला आपण बचाव करून घ्यावा असे सांगणाऱ्या आहेत. त्या दृष्टीने एका कोल्ह्याची गोष्ट पाहण्याजोगी आहे.

पशूंचा दरबार भरलेला होता. या दरबारात सर्व मानकरी एकत्र बसलेले होते. या मानकऱ्यांमधे एक हरीण आपापसात वाटून कसे घ्यावे, याचा वाद पडलेला होता. मेलेले हरीण सर्वांनी समान वाटून घ्यावे, अशी सूचना एका गाढवाने केली. बलावर चालणाऱ्या राज्यात समतेचा आग्रह धरणे हा गाढवपणाच असतो! पण सिंहाने या सूचनेला पाठिंबा दिला. सिंह म्हणाला, समता ही चांगली गोष्ट आहे. समतेच्या कल्पनेला माझा पाठिंबा आहे. आणि म्हणून वस्तूंची वाटणी समतेने व्हावी ही कल्पना मला मान्य आहे. तेव्हा सर्वानुमते असे ठरले की गाढवाने समान वाटे करावेत. गाढवाने मेलेल्या हरणाचे प्रामाणिकपणे समान वाटे केले. आपला वाटा पाहिल्याबरोबर सिंह इतका रागावला की समतेच्या नावाखाली हरणाने सर्वांची फसवणूक केली, असा आरोप सिंहाने गाढवावर केला आणि पंजाच्या एका फटक्यात त्याने गाढव मारून टाकले! यानंतर सिंह कोल्ह्याला म्हणाला, आता वाटणी करण्याची जबाबदारी तू उचलली पाहिजेस. कोल्हा म्हणाला, महाराज मी वाटणी करतो. पण समतेची जी कल्पना न्यायावर आधारलेली नाही ती मला पटणारी नाही. म्हणून जर न्यायाची कल्पना आद्य असे सर्वजण मान्य करणार असतील तर मी वाटणी करतो. न्यायाला कोणाचाच विरोध नव्हता! सिंहानेही न्यायाला मान्यता दिली. मग कोल्ह्याने मेलेल्या हरणाचा भला मोठा तुकडा न्याय म्हणून सिंहाला दिला. उरलेल्यांचे वाटे लहान-लहान केले. आपल्या गरजेपुरता एक तुकडा त्याने स्वतःला ठेवला. तो म्हणाला, महाराज, माझ्या वाटणीला न्याय या आद्य तत्त्वाचा मुख्य आधार आहे. समता मी न्यायाशी सुसंगत करून घेतलेली आहे. न्याय, समता हे सर्व पोकळ शब्द धूळफेक म्हणून उधळीत प्रत्यक्षात कोल्ह्याने आपल्याला भरपूर वाटा दिला आहे हे पाहून सिंह प्रसन्न झाला. त्याने कोल्ह्याची स्तुती केली– आणि ही वाटणी सर्वांनी स्वीकारावी, आपणही आपला वाटा निमूटपणे स्वीकारू असे सांगितले! कोल्ह्याने न्याय म्हणून दिलेला वाटा सिंहाने न्याय म्हणून स्वीकारल्यावर उरलेल्यांनी ही वाटणी निमूटपणे मान्य केली. पुढे सिंह म्हणाला, वा कोल्ह्या, तू खरोखरच चतुर आहेस, इतके मोठे शहाणपण तुला शिकवले कुणी? कोल्हा म्हणाला, महाराज मजजवळ जे काही शहाणपण आहे ते मेलेल्या गाढवाने शिकवलेले आहे! कोल्ह्याचे म्हणणे बरोबर आहे. न्याय आणि समता या शब्दांचा कोणता अर्थ आपल्याला जिवंत ठेवील याचे भान कोल्ह्याला गाढवाचे प्रेत पाहून येतच होते!

इसापच्या अनेक कथांमधून बलवंताच्या समोर आपला टिकाव कसा करून घ्यावा, दुबळ्यांनी फुकट न मरता स्वतःला वाचवावे कसे, हाच मुद्दा सांगितलेला असतो. ज्या काळात इसाप होता त्या काळात कायद्याचे राज्य नव्हते. नागरिकांचे मूलभूत अधिकारही कुठे ग्रथित केलेले नव्हते. अशा वेळी इसाप दुसरे काय सांगणार? जेव्हा कायदा अस्तित्वातच नसतो तेव्हा किंवा ज्या वेळी अस्तित्वात असलेले कायदे अमलात नसतात

त्या वेळी बचावाशिवाय इसाप दुसरे काय सांगणार ? पण इसाप जेव्हा बचावाच्या गोष्टी बोलतो त्या वेळेला तो अन्याय सहन करण्याच्या गोष्टी सांगत नसतो. अन्यायाचा प्रतिकार करण्याचे मार्ग शोधण्याचा त्याचा उपदेश असतो आणि हे मार्ग योग्य प्रकारे वापरता येईपर्यंत टिकून राहिले पाहिजेत, इतकेच त्याला सांगायचे असते. कधी इसापला असे वाटते की बलवंताच्याही काही दुबळ्या जागा असतात. आपल्या ताकदीच्या अहंतेमुळे काही खुळेपणा बलवंतांच्या ठिकाणीसुद्धा निर्माण होतो. त्याचा फायदा घेतला पाहिजे. या दृष्टीने विहिरीतल्या प्रतिबिंबाकडे सिंहाचे लक्ष वेधून सिंहाला विहिरीत उडी मारण्यास व अशा रीतीने आपला बचाव करून घेण्यास शिकणारा इसापचा ससा पाहण्याजोगा आहे. काही वेळेला चिखलाच्या डेऱ्यावर हत्तींना चालून जाण्यास सांगून त्यांना फसवणारा कोल्हा आढळतो, पण इसापच्या कथेत हत्तीचे डोळे फोडणारे व त्याला अंधळा करून धुळींला मिळवणारे पक्षीही आहेत. अन्याय करणाऱ्या धटिंगणासमोर पड खाऊन आपला जीव वाचवायचा हे इसाप सांगतोच, पण ते सांगण्याचा हेतू अन्याय सहन करणे हा नसतो. तर प्रतिकाराची रीत शोधून काढणे हा असतो, हेही आपण लक्षात घ्यायला हवे.

इसापच्या डोळ्यांसमोर असणारे राजकारण आणि आपण ज्या राजकारणाचा विचार करतो ते राजकारण यांत काहीतरी फरक असलाच पाहिजे. अडीच हजार वर्षांपूर्वीच्या मागासलेल्या जगात वंशपरंपरागत राजेशाह्या राजेशाह्या म्हणून चालू होत्या. हुकूमशाह्या हुकूमशाह्या म्हणून चालू होत्या. आजच्याइतके जग त्या वेळी सुधारलेले नव्हते. इंग्लंडमध्ये राजेशाहीच्या नावाने लोकशाही चालते. आजच्या जगात कोणत्या नावाने काय चालेल हे सांगता येत नाही! आपल्या पाहण्यात असे देश आहेत की जिथे लोकशाहीच्या नावाने हुकूमशाही चालवण्याचे प्रयोग अतिशय उत्साहाने चालतात. म्हणून प्रथम हे कबूल केलेच पाहिजे की इसापच्या डोळ्यांसमोरचे राजकारण आणि आपल्या समोरचे आधुनिक राजकारण यांत काहीतरी फरक असलाच पाहिजे. पण तो फरक इतका सूक्ष्म असतो की, शब्दांतून ती सांगता येईलच असे नाही. या दृष्टीने इसापने एक खेकड्याची गोष्ट सांगितली आहे.

एक होता चुलता खेकडा. तो चुलता असल्यामुळे त्याला सर्वजण काका म्हणत. एके दिवशी एक पुतण्या खेकडा समोरून चाललेला होता. तेव्हा चुलत्याने पुतण्याला हाक मारून थांबवले आणि चुलता पुतण्याला म्हणाला, अरे थांब. मी तुला काही गोष्टी सांगू इच्छितो. पुतण्या थांबला. नंतर चुलता खेकडा म्हणाला, अरे उद्धटा, तू एवढा मोठा झालास, वयाने वाढलास, घोड्याएवढा दिसू लागलास, पण अजून तू तिरपा चालतोस? तेव्हा पुतण्या खेकडा म्हणाला, काका मी कितीही मोठा झालो तरी शेवटी तुमच्यापेक्षा लहान असणार. मी तिरपा चालतो हे म्हणण्यापूर्वी तुम्ही आपण

कसे चालतो याचा विचार करायला नको काय ? चुलता खेकडा संतापून म्हणाला, प्रश्नाला उत्तर देण्याचे सोडून तू विषयान्तर काय करतोस ? वाद चाललेला आहे तुझ्या चालण्याविषयी. माझ्या चालण्याचा प्रश्न कुठे निर्माण झाला ? नेहमी चुलता खेकडा पुतण्या चांगला चालत नाही याविषयी तक्रार करताना आढळतो. ही प्रथा आजही चालू राहिलेली दिसते. पण इसापने चुलता खेकडा सत्तेत होता ही नोंद केलेली नाही. यामुळे जो सूक्ष्म फरक पडतो तो सरळ पाहणाऱ्यांच्या लक्षात येण्याजोगा नाही.

इसापच्या काही कथांमध्ये तर दोन–दोन, तीन–तीन बाबी एकत्र गुंफलेल्या असतात. एकच कथा वेगवेगळ्या पैलूंना एकत्र सांधीत असताना दिसते. काही कथा कितीही लांब–रुंद असल्या तरी त्यात मुद्याची दिशा सरळ असते. एका कथेत तो म्हणतो, समुद्रकाठच्या वाळवंटात सिंह शतपावली करत हिंडत होता. त्या वेळेला समुद्रातून एक देवमासासुद्धा हवा खाण्यासाठी वर आला होता. तोही पाण्यात पोहत होता. सिंहाने देवमाशाला विचारले, आपण कोण ? तेव्हा देवमासा म्हणाला, मी समुद्रातल्या सर्व जलचरांचा सम्राट आहे. तुम्ही कोण ? तेव्हा सिंह म्हणाला, मी जमिनीवरील सर्व पशूंचा सम्राट आहे. दोन्ही सम्राटांना परस्परांच्या भेटीने खूपच आनंद झाला. दोघांनीही एकमेकांची स्तुती केली व त्यानंतर दोघांनी परस्परांशी मैत्रीचा करार केला. परस्परांच्याविषयी स्नेह ठेवावा, एकमेकांच्या प्रदेशावर आक्रमण करू नये, एकावर आक्रमण झाले तर दुसऱ्याने तत्काळ मदतीसाठी धावून यावे. एकाच्या शत्रूशी दुसऱ्याने मैत्री करू नये. उभय सम्राटांनी या करारावर संमतिदर्शक शिक्कामोर्तब केले. दोन सम्राटांच्यामधील हा ऐतिहासिक महत्त्वाचा करार सर्वांच्याच आदराचा विषय होता. पुढे काही दिवसांनी घटना अशी घडली की एका रानरेड्याबरोबर सिंहाची गाठ पडली. आणि दोघांची जबरदस्त झुंज सुरू झाली. पण रेड्याने आपल्या शिंगांनी सिंहाला जागोजाग जखमी करून पळवून लावले. चिडलेला, पराभूत आणि जखमी सिंह पळत पळत समुद्राच्या काठी आला आणि त्याने देवमाशाला सांगितले की तू विश्वासघातकी आहेस. तू करारभंग केलेला आहेस. देवमासा म्हणाला, पृथ्वीवरच्या सम्राटा, तू विचार कर. समुद्रात तुला येता येईल काय ? इथे तू बुडूनच मरशील. आणि मी तरी जमिनीवर कसा येणार ? मला चालायला पाय कुठे आहेत ? तेव्हा आपण एकमेकाला कधीच कोणती मदत करू शकणार नाही. आणि एकमेकांच्या प्रदेशावर आक्रमण करू शकणार नाही. सिंह म्हणाला, जर असे असेल तर या करारांना अर्थ काय ? देवमासा म्हणाला, हे असे करार कधीही मोडले जाणार नाहीत. ते आपोआपच पाळले जातात, कारण हे करार शोभेचेच असतात. ते दिसायला बरे दिसतात म्हणून करायचे असतात. अथेन्सने कुठल्या तरी दूरच्या राष्ट्राशी, जे कधी उपयोगी पडणार नाहीत, त्याच्याशी मैत्रीचा करार करणे निरर्थक आहे इतकेच इसापला सुचवायचे असावे. ही कथा किती लांब असली तरी एकपदरी आहे.

इसापच्या सगळ्याच कथा अशा एकपदरी नाहीत. त्यांना अनेक पदर असतात. अनेक सूत्रे मनात ठेवून या कथा सांगितलेल्या असतात. त्यामुळे त्यातील हेतूंची गुंफण गुंतागुंतीची असते. एक कथा अशी आहे की, एका जंगलातून एक सिंह चाललेला होता. डुलत-डुलत इकडे-तिकडे पाहत जाणाऱ्या या सिंहाला मधेच एक ससा दिसला. सिंहाने समोर जाऊन त्या सशाला अडवले, आणि म्हटले, थांब. समोर सिंह पाहिल्याबरोबर त्या सशाला आपले मरण दिसू लागले. ससा भीतीने थरथर कापू लागला. सिंह म्हणाला, अरे, भ्यायला काय झाले ? मी तुला मारलेले नाही. मारणारही नाही. कोणतीही धमकी दिलेली नाही. धमकी देणारही नाही. तेव्हा तुला भिण्याचे काही कारण नाही. तू शांतपणे विचार कर. आणि मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दे. मला सांग या जंगलचा राजा कोण आहे ? ससा म्हणाला, महाराज, जंगलचे राजे आपण आहात. हे जंगल वंशपरंपरेने आपले आहे. आपण म्हणजे जंगल. सिंह म्हणजे जंगल. जंगल म्हणजे सिंह. सिंह म्हणाला, मला हे उत्तर नको आहे. प्रथम हे नीट लक्षात घे. तुला कोणतीही भीती दाखवलेली नाही. नंतर हे लक्षात घे, तुला कोणतेही प्रलोभन दाखवलेले नाही. आता तू थंड डोक्याने विचारपूर्वक शोध घे आणि सत्य हुडकून काढ. तो तुझा निर्भय मनाने घेतलेला प्रामाणिक सत्याचा शोध असला पाहिजे. आणि आता सांग, जंगलचा राजा कोण आहे ? तरीही ससा म्हणाला, महाराज, जंगलचे राजे आपणच आहात. तेव्हा सिंह म्हणाला, हा तुझा स्वतंत्र बुद्धीने घेतलेला निर्णय आहे. तेव्हा त्याचा प्रचार तू केला पाहिजेस. सशाला आपण जिवंत सुटणार याचा इतका आनंद झाला की तो ओरडत निघाला, ऐका हो ऐका, सर्वजण ऐका. भीतीशिवाय, प्रलोभनाशिवाय संपूर्ण सत्याचा घेतलेला शोध सर्वजण ऐका. जंगलचा राजा सिंह आहे. सिंह म्हणजे जंगल. जंगल म्हणजे सिंह. पाहता पाहता ससा दरबारच्या विदूषकाप्रमाणे सर्वांच्या हसण्याचा विषय झाला !

पुढे चालून सिंहाने हा सगळा प्रकार एका मेंढीबरोबर, शेळीबरोबर, हरणाबरोबर केला. आणि सारेचजण जंगलभर सिंहाचे मोठेपण गर्जत निघाले. सर्व जंगलभर एकच आवाज दुमदुमत होता. सिंह म्हणजे जंगल. जंगल म्हणजे सिंह. सिंह हा जंगलचा एकमेव राजा आहे. सिंहही डुलत डुलत चाललेला होता. जाता–जाता सिंह एका कोल्ह्याजवळ आला आणि म्हणाला, रे कोल्ह्या, थांब. जंगलचा राजा कोण हे तू मला सांग. तेव्हा कोल्हा म्हणाला, महाराज, मला माहीत असते तर मी तुम्हाला नक्की सांगितले असते. पण तो समोरचा हत्ती आहे ना, अफाट शक्ती असणारा आणि तरीही तिचा वापर न करता वर्षानुवर्षे कोपऱ्यात बसून गवत खाणारा, त्या हत्तीला जंगलचा राजा कोण आहे हे माहीत आहे. सिंह डुलत डुलत हत्तीकडे गेला. हत्तीच्या समोर उभा राहून त्याला विचारू लागला, काय रे, जंगलचा राजा कोण ? हत्तीने सोंडेत सिंहाचे शेपूट धरले आणि सिंह उचलला व गरगर फिरवून तो दूर भिरकावून लावला. एका झाडाच्या

बुंध्यावर जाऊन सिंह आदळला. त्याचे सर्व अंग ठेचून निघाले. अंगात काटे मोडले. ठेचलेले अंग सावरीत लंगडत लंगडत सिंह हत्तीकडे आला आणि म्हणाला, भलताच आततायी दिसतोस रे. असे मारामारीवर येण्याचे कारणच काय ? जंगलचा राजा कोण हे माहीत नसेल तर माहीत नाही म्हणून गप्प बसावे. शांततेचे मार्ग सोडून इतर मार्गाने जाणे योग्य आहे काय ?

हत्तीला शांततेचा उपदेश करणाऱ्या सिंहाला हत्तीने काय उत्तर दिले, सिंहाने हत्तीचा सूड घेण्यासाठी काय काय प्रयत्न केले, दरम्यान शेळ्या, मेंढ्या आणि ससे हत्तीविरुद्ध कोणती व्याख्याने देऊ लागले, इत्यादी बाबी इसापने सांगितलेल्या नाहीत. बलोन्मत्त धटिंगण आपल्याला वरचढ भेटला म्हणजे कसे सरळ येतात हे इसापला सांगायचे आहे, की भय असताना सत्याच्या नावे सत्ताधाऱ्यांना सोयीचे असत्यच प्रचारात असते हे इसापला सांगायचे आहे, की जीव वाचल्याच्या आनंदात शेळ्या, मेंढ्या आणि ससे उच्चरवाने स्तुतिपाठ गातात, हे इसापला सांगायचे आहे, हे कुणी सांगावे ? कधी कधी तर असे वाटावे की शक्ती असून कोपऱ्यात बसणारे बलवान हत्तीच सिंहाच्या अरेरावीला कारण असतात, हत्तीचे गप्प बसणेच गुन्हा असतो असे तर त्याला म्हणायचे नसेल ? इसाप जनावरांचा चांगला ज्ञाता होता. यामुळे त्याला काय म्हणायचे असेल ते सांगता येत नाही.

इसापच्या सगळ्याच कथांत केवळ प्राणी नसतात. काही वेळेला प्राण्यांच्या इतकेच त्या कथेतील माणसांना महत्त्व असते. हरामखोर माणसे या नावाची इसापची एक अशीच गंमतीदार कथा आहे. एकदा एक लांडगा सूर्य मावळल्यानंतर रात्रीच्या वेळी एका गावात शिरला. जर कुठे काही खायला मिळाले तर पहावे, एखादी शिकार करावी असा लांडग्याचा हेतू होता. जुन्या काळातील ती गावे सूर्य मावळल्यानंतर फार लवकर शांत होत असत. तसेच हे गाव होते. सर्व रस्ते मोकळे होते. सगळीकडे शांतता होती. रस्त्यातून एकही प्राणी हिंडत नव्हता. गायी, गुरे, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या सगळे बंदोबस्तात ठेवलेले होते. लांडगा गावातून बराच वेळ हिंडला, पण त्याला काहीच शिकार मिळाली नाही. असाच एका घरासमोरून तो चालला होता. त्या घरातून मुलाचे रडणे ऐकू येत होते. आईने मुलाला विचारले, बाळा का रडतोस ? तुला तहान लागली आहे का ? पण ते मूल आपले रडतच होते. आईने पुन्हा विचारले, भूक लागली आहे का ? काही दुखते खुपते आहे का ? तरी ते मूल आपले रडतच होते. कारण नसतानरडणाऱ्या या मुलाचा आईला राग आला. आणि आई म्हणाली, अरे उगीच का रडतोस ? गप्प बसतोस की खिडकीच्या बाहेर लांडग्याच्या समोर देऊ फेकून ? आईने हे वाक्य उच्चारले त्या वेळेला लांडगा घरासमोरच होता. ते मूल एकदम गप्प बसले.

लांडगा म्हणाला, मी तसा शांतपणे वाट पहाणारा आहे. उतावळेपणा करत नसतो. या स्त्रीने शब्द दिलेला आहे, की जर ते मूल रडायचे थांबले नाही तर ती त्या मुलाला खिडकीतून बाहेर लांडग्यासमोर टाकील. मी वाट पहायला तयार आहे. मूलच ते. ते आता गप्प बसले तरी पुन्हा रडणारच. आणि झालेही तसेच. तासा-दोन तासाने ते मूल पुन्हा रडू लागले. मुलाच्या आईने रडण्याचे पुन्हा कारण विचारले. शेवटी संतापून आईने मुलाला पुन्हा लांडग्यासमोर टाकण्याची धमकी दिली व मूल गप्प बसले. हा प्रकार रात्रभर चालू होता. पुन:पुन्हा मूल रडे. पुन:पुन्हा आई धमक्या देई. आणि मूल गप्प बसे. शेवटी सकाळ होत आली. सकाळच्या वेळी ते मूल पुन्हा रडू लागले. आईने विचारले, बाळा का रडतोस? ते मूल म्हणाले हे पहा, मी आता रडण्याचे थांबणार नाही. आणि रडण्याचे कारणही सांगणार नाही. आता रात्र संपून पहाट होत आली आहे. आता मी भिणारही नाही. सबंध रात्रभर लांडग्याची भीती घालून तू मला गप्प केलेस काय? मी आता भिगार नाही. असे सांगून ते मूल जोरजोराने रडू लागले. तेव्हा आता हे मूल बाहेर फेकले जाणार, याची लांडग्याची खात्री झाली. पण पहावे तो थोड्या वेळाने ती आई पुढे झाली. तिने मुलाला उचलून खांद्यावर घेतले आणि त्याची समजूत घालीत ती म्हणाली, वेडा रे वेडा. तुला कोण बाहेर फेकणार होते? जगातल्या कोणत्यातरी आईने आपले मूल लांडग्यासमोर टाकले आहे काय? तसे नुसते म्हणायचे असते. हे ऐकून लांडगा भयंकर संतापला!

सडकेवरच करकरा दात खात लांडगा ओरडला, काय माणसाची हरामखोर जात आहे पहा. रात्रभर मी इथे थांबलोय. तो या बाईच्या शब्दावर. आणि आता ही खुशाल निर्लज्जपणे आपले शब्द खोटे होते म्हणून सांगते?

इसापने गोष्ट इथे संपवली आहे. लांडगे ज्या वेळेला इतरांना तत्त्वनिष्ठेच्या गोष्टी सांगू लागतात, प्राणी इतरांना हरामखोर म्हणू लागतात त्या वेळेला मायेच्या पोटी कुणीतरी कुणाचे तरी रक्षण करीत असतो. जगात बहुतेक वेळेला सैतानालाच बायबल पाठ असलेले दिसते! गोळ्या झाडीतच लोक शांततेच्या गोष्टी बोलतात! हुकूमशहाच लोकशाहीचे कैवारी होऊ लागतात! लांडगेच माणसांना हरामखोर म्हणायला लागतात! बोलणारा काय बोलतो यापेक्षा बोलणाऱ्याचे स्वरूप काय आहे, याला महत्त्व द्यायला आपण शिकले पाहिजे.

इसापच्या अशा कितीही गोष्टी सांगता येतील. त्या गोष्टी सांगून संपणाऱ्या नाहीत. माझा मुद्दा इतकाच होता की इसाप हा प्रौढांचा कथाकार आहे, बालवाङ्मयाचा लेखक नव्हे. आत्तापर्यंतच्या गोष्टींवरून एवढा मुद्दा स्पष्ट व्हायला हरकत नसावी. म्हणूनच शेवटी इसापच्या तीन गोष्टी सांगून मी थांबणार आहे. या गोष्टींतील पहिली गोष्ट लोकशाहीची

गोष्ट म्हणून ओळखली जाते. आचार्य अत्रे आपल्या व्याख्यानात अनेकदा ही गोष्ट सांगत. इसापने आपल्या गोष्टीचे नाव ' शहाणे गाढव ' असे ठेवले आहे. काही व्यापारी गाढवावर माल लादून व्यापार करीत निघालेले होते. सकाळच्या वेळीं एका नदीकाठी व्यापाऱ्यांचा मुक्काम पडला. व्यापारी चुली मांडून स्वयंपाक करू लागले. गाढवे चरत होती. त्यांच्या पाठीवर ओझे तसेच होते. इतक्यात अशी आवई उठली की चोर आले, पळा, पळा! सगळे व्यापारी घाईगर्दीने पळण्याचा प्रयास करू लागले. गाढवे मात्र शांतपणे चरत होती. तेव्हा व्यापारी गाढवांना म्हणाले, अरे चरता काय? चोर आले, डाकू आले, पळा, पळा!

चरणाऱ्या गाढवांपैकी एक शहाणे गाढव होते.

या शहाण्या गाढवाने मान वर करून व्यापाऱ्यांना विचारले, काहो, डाकूंनी जर आम्हाला पकडले तर आमच्या पाठीवरचे ओझे वाढणार आहे काय? व्यापारी म्हणाले, तसे काही नाही. जितके ओझे लादता येणे शक्य आहे तितके आम्ही लादलेलेच आहे. अधिक ओझे वाढण्याची शक्यताच नाही. तेव्हा शहाणे गाढव म्हणाले, समजा आम्ही तुमच्याबरोबर पळालो तर आमच्या पाठीवरचे ओझे कमी होणार काय? व्यापारी म्हणाले, तसेही नाही. हे इतकेच ओझे तुमच्यावर राहणार आहे. तेव्हा ते शहाणे गाढव म्हणाले, जर ओझे वाढणार नसेल, कमी होणार नसेल तर मग तुम्हीच पळा. आम्ही चरतो. तोंडदेखल्या घोषणा आणि लांबरुंद व्याख्याने यांना काहीच अर्थ नाही. व्यापारी राज्यकर्त्यांचे ओझे जनतेवर जर तितकेच राहणार असेल तर मग घोषणा ' गरिबी हटाव ' असली तरी काय आणि ' लोकशाही बचाव ' असली काय, त्यात कोणाला रस वाटण्याचे कारण नाही. सर्वसामान्य दरिद्र्याच्या जीवनात काही प्रतिष्ठा प्राप्त होणार असतील तर लोकशाहीला अर्थ असतो. एरवी मोठमोठ्या घोषणा भूल-थापाच असतात. त्यांना दुसरा कोणता अर्थ नसतो.

इसापची दुसरी गोष्ट स्वातंत्र्याच्या संदर्भात आहे. या गोष्टीचे नाव ' चांदीच्या वाळ्याचा अर्थ ' असे आहे. एकदा एका गरुड पक्षाने अथेन्सच्या मध्यवर्ती चौरस्त्यावर एक चांदीचा वाळा आणून टाकला. अनपेक्षितरीत्या गरुडाने चांदीचा वाळा नगरीत आणून टाकावा, ही गोष्ट लोकांना चमत्कारिक वाटली. आणि मग सर्वत्र चर्चा सुरू झाली, या चांदीच्या वाळ्याचा अर्थ काय? चांदीच्या वाळ्याचा अर्थ कुणालाही सांगता येत नव्हता. शेवटी सर्वजण इसापकडे गेले. इसाप म्हणाला, मित्रहो, चांदीच्या वाळ्याचा अर्थ मला माहीत आहे, पण तो मला सांगता येणार नाही. कारण चांदीच्या वाळ्याचा अर्थ फक्त स्वतंत्र नागरिकच सांगू शकतो. हा अर्थ समजून घेण्यासाठी सर्वानुमते इसापला गुलामगिरीतून मुक्त करण्यात आले! आता इसाप अथेन्सचा स्वतंत्र नागरिक

म्हणून संसदेचा सभासद झालेला होता. तो म्हणाला, ज्या वेळेला बलवान राष्ट्रे दुबळ्या राष्ट्रांना नानाविध प्रकारचे साह्य देऊ करतात, तेव्हा तो चांदीचा वाळा असतो. तो अलंकाराप्रमाणे मोहक असतो. पण बलवंतांनी घातलेला व दुबळ्यांनी अलंकार म्हणून स्वीकारलेला चांदीचा वाळा हा केव्हा लोखंडी बेडी होईल याचा नेम नसतो. म्हणून उल्फाय विरोधी लढण्यासाठी स्पार्टाची मदत घेणे आणि स्पार्टाच्या अटी पत्करणे यातून पुढे गुलामगिरीच येत असते. स्वातंत्र्य आपणच आपल्या ताकदीवर मिळवायचे असते, आपणच आपल्या ताकदीवर टिकवायचे असते. स्वातंत्र्याचे महत्त्व ज्यांना समजते आणि स्वातंत्र्यासाठी जगण्या-मरण्यास जे तयार असतात त्यांच्या हातापायांत असणाऱ्या बेड्या अलंकार ठरतात. एवढी आस्था नसणाऱ्यांना जे चांदीचे वाळे मिळतात त्यांच्या बेड्याच होत असतात!

सुरक्षिततेच्या वेड्या आशेमुळे स्वातंत्र्याशी तडजोड करायला जे तयार होतात ते पहिल्यांदा स्वातंत्र्य गमावून गुलाम बनतात आणि गुलामांना प्रतिष्ठेचे जीवन नसतेच. म्हणून स्वातंत्र्यावर तडजोड करणारे, स्वातंत्र्य व सुरक्षितता दोन्ही गमावतात! स्वातंत्र्य ही कल्पना अनेक कथाकारांच्या कथांचा विषय झालेली आहे. इसापनेसुद्धा स्वातंत्र्यावर अनेक कथा लिहिलेल्या आहेत. म्हणूनच मला असे वाटते की इसाप जन्मजात गुलाम नसावा. तो युद्धजित असावा. इसापने स्वातंत्र्यावर लिहिलेल्या सर्व कथांमध्ये मला ही चांदीच्या वाळ्याची गोष्ट सर्वांत जास्त आवडते. ज्यांच्याजवळ ज्ञान आहे त्यांनी आपले ज्ञान इतरांच्या सेवेला देण्यासाठी स्वातंत्र्य ही किंमत मागितली नाही. इसापने चांदीच्या वाळ्याचा अर्थ सांगताना किंमत म्हणून स्वातंत्र्य मागितले आहे. कोणत्याही समाजातील शहाण्या माणसांनी आपल्या शहाणपणाचा लाभ सत्तेला देण्यापूर्वी, खरे म्हणजे सर्व समाजाला, पण निदान स्वतःला तरी स्वातंत्र्य मागून घेतले पाहिजे! स्वतःला शहाणे म्हणवणाऱ्यांना एवढेही भान राहात नाही, हेच एक दुर्दैव आहे.

इसापची अजून एक कथा आहे. ती कथा स्वातंत्र्याची नाही. त्याप्रमाणे लोकशाहीची नाही. मग ती कथा आहे तरी कशाची? ती कथा कशाची आहे हे मलाही नीट सांगता येणार नाही. पण ती कथा आहे आणि माझी आवडती आहे, इतकेच फारतर सांगता येईल. म्हणून या कथेकडे इतर कोणत्याही दृष्टीने न पहाता फक्त माझी आवडती कथा म्हणून पहावे.

कथा अशी आहे—

एकदा पारध्याच्या जाळ्यात लाखो पक्षी अडकले. सकाळच्या वेळी पारधी क्रमाने जाळे उकलीत चालू लागले. तो एक एक पक्षी उचलीत असे आणि त्याची मान मुरगाळीत असे.

असे पाखरांचे निर्दालन करीतच पारधी येत होते. अशा वेळी वाऱ्याची एक झुळुक आली आणि पारध्याच्या दोन्ही डोळ्यांत धुळीचे कण गेले. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. ते पाहून एक पक्षी म्हणाला, बिचारा पारधी कर्तव्य म्हणून तो आपल्या माना मुरगाळीत येत आहे, पण हे करीत असताना त्याच्या कोमल अंतःकरणाला किती वेदना होत आहेत ! त्याच्या डोळ्यांतून घळघळ वाहणारे अश्रू त्याच्या कोमल अंतः-करणाची खूण आहेत ! एका पक्षाचे हे बोलणे ऐकून जाळ्यात अडकलेला म्हातारा पक्षी म्हणाला, मित्रहो, मी म्हाताराच आहे. मला आता काहीच मिळवायचे राहिलेले नाही. पारध्याने मान मुरगाळली तरी आणि न मुरगाळली तरी मी फार थोड्या दिवसांचा सोबती आहे. तेव्हा मी काय सांगतो ते नीट ऐका आणि समजून घ्या. जेव्हा आपण जाळ्यात सापडलेलो असतो आणि माना मुरगाळीत पारधी येत असतो त्यावेळी निदान आपले भान शिल्लक असावे. माना मुरगाळीत येणाऱ्या पारध्याच्या हातावर पडलेले रक्ताचे डाग पहावेत, त्याच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू निदान जाळ्यात अडकलेल्या पक्ष्यांनी पाहण्याच्या भानगडीत पडू नये. इसापला या कथेने नेमके काय सांगायचे होते, मला माहीत नाही. पण ही कथा मला आवडते इतके मात्र खरे.

या ठिकाणी मी माझे व्याख्यान संपवीत असे. मला जरी कथेचा अर्थ माहीत नाही असे मी म्हणत असलो तरी कळणाऱ्याला कथेचा अर्थ कळतच होता. खरे म्हणजे इसापच्या कथांच्यावर यापेक्षा कितीतरी निराळ्या पद्धतीने बोलता येणे शक्य आहे, पण मी मुळी इसापवर बोलतच नव्हतो. इसापचे निमित्त करून मी माझे व्याख्यान देत होतो. प्रत्येक व्याख्यानात थोडा फार तपशील बदले, एखाद दुसरे उदाहरण बदले पण स्थूल मानाने हे व्याख्यान वरच्या क्रमाने चालत असे. समोरचे श्रोते जाणकार असले तर त्यांना सूचक पद्धतीने मी अनेक बाबी सांगत असे. त्या काळात घटना दुरुस्ती चालू होती. कुठेतरी बोलण्याच्या ओघात रांजणात अडकलेल्या वासराचे डोके सोडविण्यासाठी डोकेच तोडून टाकण्याची सूचना देणाऱ्या उंटावरच्या शहाण्याची गोष्ट मी आणीतच असे. आणि लोकशाही वाचवण्यासाठी तिची मान मोडण्याचा उद्योग करणारे जे शहाणे-त्यांच्यावर दोन-चार ताशेरे झाडीत असे. श्रोते फार जाणकार नसले तर मग एखाद-दुसरी गोष्ट कमी झाली तरी चालेल, पण तिचा आशय अधिक स्पष्ट करून सांगणे मला कर्तव्य वाटे. एका गावी तर समोरच्या श्रोत्यांच्या काही लक्षातच येत नाही हे पाहून मी आणीबाणीसारखे जाळे लावले होते. जयप्रकाश नारायणांसारखा म्हातारा पक्षी होता हेही सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण इसाप हे निमित्त होते. माझा हेतू शासन-विरोधी आवाज चालू ठेवणे इतकाच होता.

तसा विचार केला तर एखादी कथा इसापची आहे किंवा नाही हे सांगणेच फार कठीण आहे. प्लानुडसने जो संग्रह सिद्ध केला त्यात असणाऱ्या कथासुद्धा इसापच्या आहेत

याची खात्री नाही. त्या संग्रहातील कथांच्या बाबतीत फार तर इतके म्हणता येईल की इसवी सनाच्या चौदाव्या शतकात या कथा इसापच्या मानल्या जात होत्या. ज्या कथा प्लानुडसच्या संग्रहात नाहीत त्या इसापच्या नावे नंतरच्या काळात पडलेल्या आहेत. पंचतंत्रातील अनेक कथा मुळात भारतीय, पण त्या आता इसापच्या नावे युरोपात प्रचलित आहेत! अशा वेळी अमुक कथा इसापची आहे हाही एक अंदाज व या कथेमागे अथेन्सची लोकशाही आहे हा अजून एक अंदाज. इसापच्या कथा बालवाङ्मय नव्हे, एवढा एक मुद्दा खरा. उरलेल्या सर्व बाबी आणीबाणीतील माझ्या व्याख्यानाची सोय म्हणून आलेल्या आहेत, हे सत्य आता नोंदवणे भाग आहे. मी सांगितलेल्या जवळजवळ सर्व कथा इसापच्या नावे असणाऱ्या कोणत्या ना कोणत्या संग्रहातील आहेत. म्हणून त्या कथा इसापच्या नावे आहेत, हे खरे पण त्या कथा मी ज्या पद्धतीने सांगितल्या त्या पद्धतीने कथासंग्रहात सांगितलेल्या असतील अशी खात्री नाही. म्हणून या विवेचनाकडे इसापविषयीचे विवेचन म्हणून पहायचे नाही. नाव इसापचे, निमित्त इसापचे आणि सोय तुमची–माझी–सर्वांची. हेच या विवेचनाचे खरे स्वरूप आहे हे विसरता येणार नाही.

# फॅसिझम....फॅसिझम....फॅसिझम....

सध्या देशात फॅसिझमविरुद्ध सभा-संमेलने आणि परिषदा मोठ्या प्रमाणात होत आहेत. ह्या देशात लोकशाही चालू असावी आणि चालू राहावी ह्यावर ज्यांचा ज्यांचा विश्वास आहे त्या सर्वांचा हुकुमशाहीशी विरोध असणार, हे पुन्हा सांगण्याची गरज नाही. हुकुमशाहीचा प्रकार कोणताही असो, लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या कुठल्याही माणसाला कोणत्याही स्वरूपातील हुकुमशाहीविरुद्ध आपला आवाज उठवणे आवश्यकच असते. फॅसिझम हा हुकुमशाहीचाच एक प्रकार आहे. किंबहुना हुकुमशाहीला तात्त्विक अधिष्ठान देऊन ती अधिक भयावह करण्याचा असा हा प्रकार आहे म्हणूनच हुकुमशाहीचा निषेध होणे आवश्यक असते. आपल्या देशात फॅसिझमविरुद्ध वातावरण निर्माण करण्याचा संघटित प्रयत्न सातत्याने होणार असेल तर ती एक स्वागतार्ह घटना म्हटली पाहिजे. आणि जेवढ्या जास्त प्रमाणात फॅसिझमविरुद्ध लोकमत संघटित करता येईल तेवढ्या मोठ्या प्रमाणावर ते संघटित करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. जगाचा एक कठोर नियम असा आहे की, घोषणाबाजीला आरंभ झाला म्हणजे मूळ मुद्दा बाजूला पडतो, आणि घोषणाच महत्त्वाच्या होऊ लागतात. ज्या ठिकाणी घोषणांचा वापर मूळ मुद्दा नजरेआड करण्यासाठी केला जातो त्या ठिकाणी ही शक्यता जास्त असते की फॅसिझम-विरोधाच्या नावाने भलतीच मंडळी झोडपली जातील– आणि जे खरेखुरे फॅसिस्ट आहेत तेच जास्तीत जास्त आरडाओरड लोकशाहीच्या संरक्षणासाठी करू लागतील !

पंतप्रधान इंदिरा गांधींनी ह्याबाबत अनेकदा जाहीर रीतीने इशारा दिलेला आहे. पंतप्रधानांविषयी कुणाचे मत काहीही असले तरी तो इशारा एक महत्त्वाचे सत्य नोंद करीत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयी बोलताना पंतप्रधान असे म्हणाल्या की, ज्या मंडळींनी न्याय-अन्यायाची तमा व क्षिती न बाळगता वेळोवेळी विविध प्रकारच्या हुकूमशाह्यांच्या बरोबर तडजोड केली, ज्यांना पाकिस्तानातील हुकुमशाह्या मित्र वाटल्या, आणि चीनमधील हुकुमशहा ज्यांना विचारात घेण्याजोगे वाटले, अशा मंडळींनी फुकटच लोकशाहीच्या प्रेमाचा कळवळा दाखवावा, ही गोष्ट दांभिकपणाची आहे. पंतप्रधानांच्या ह्या विधानात वर्तमानकालीन राजकारणाचा, विशेषतः ब्रिटन व अमेरिकेचा संबंध आहे. अय्यूबखान, याह्याखान आणि माओ-त्से-तुंग ह्यांच्याविषयी मनात ममत्व बाळगून, जगातल्या नानाविध देशांत खुनी राजकारण चालवण्यात सहभागी राहून, आणि

व्हिएतनामसारख्या राष्ट्रात वर्षानुवर्षे जनतेच्या विरुद्ध म्हणजेच राष्ट्राच्या विरुद्ध कोणाचे तरी संरक्षण करण्याचा रक्तरंजित अत्याचारी प्रकार हाताळून पुन्हा एकदा लोकशाहीचे कौतुक एखाद्याने सांगावे, हा दंभाचाच प्रकार म्हटला पाहिजे. विविध प्रकारच्या जगातील हुकूमशाह्यांना सावरून धरणाऱ्यांनी लोकशाहीच्या गप्पा मारू नयेत. पंतप्रधानांचे हे मत अतिशय योग्य आहे.

फॅसिझमच्या वाढीलासुद्धा लोकशाहीवादी राष्ट्रांनीच फार मोठे खतपाणी दिलेले आहे. हिटलर आणि मुसोलिनी ह्यांच्या आक्रमक व अत्याचारी राजकारणाकडे दीर्घकाळ डोळेझाक करण्याचे धोरण इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेने स्वीकारलेले होते. फॅसिझमचा भस्मासूर जगाचा ग्रास करील एवढे अक्राळविक्राळ रूप धारण करून उभा राहिला. ह्या घटनेच्या पापाची जबाबदारी इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका ह्यांनी स्वीकारणे भाग आहे. ह्या विवेचनाचा एक सोपा अर्थ आहे, तो अर्थ असा की, जे रोज लोकशाहीच्या नावाने जप करतात ते लोकशाहीवादी असतीलच ह्याची खात्री नाही. दांभिकांना नेहमीच नानाविध प्रकारच्या खोटेपणाची गरज लागत असते. ही माणसे वेगवेगळ्या मान्यवर कल्पना आपल्या स्वार्थासाठी वापरण्यात वाकबगार असतात; इसापनीतीत ज्या नानाविध पशु-पक्ष्यांच्या गोष्टी आहेत त्यांत वेगवेगळ्या दांभिकांच्याही गोष्टी आहेत. अशा गोष्टीतच एक गोष्ट मैत्रीचा पुकारा करणाऱ्या लांडग्याची आहे! असे निरनिराळे लांडगे शेळीचे कातडे पांघरून वावरत असतात. त्यांचे शब्द बाजूला सारून आपण कृतीचा शोध घेतला तर फॅसिस्ट प्रवृत्ती अधिक नेमकेपणाने ओळखता येण्याचा संभव जास्त आहे. कारण फॅसिझम हा केवळ बाह्याकार नव्हे, ती प्रवृत्ती आहे. त्यामुळे मनोवृत्तीचा शोध, वर्तणुकीचा शोध अशा वेळी महत्त्वाचा ठरतो.

इंग्लंड, अमेरिका आणि फ्रान्स ह्यांना दोष देताना सोव्हिएट रशियाचे समर्थन करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेण्याचे कारण नाही. रशियाने पोलंड, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया या ठिकाणी जे सामर्थ्याचे प्रदर्शन केले तो काही मोठा शांततावादाचा आविर्भाव नव्हता. विशेषतः झेकोस्लोव्हाकियात रशियाने जेव्हा फौजा ओतल्या त्या वेळी तर सामान्यपणे रशिया-समर्थक असणाऱ्या मंडळींनाही अतीव वेदना झाल्या. प्रा. दि. के. बेडेकर माझ्याशी बोलताना म्हणाले : "मी नुकताच दिल्लीवरून परत येत आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकारिणीतील एका ज्येष्ठ सदस्याशी मी बोलून परतत आहे. माझे सोडा, पण त्या ज्येष्ठ कम्युनिस्ट नेत्याचेही मत असे आहे की, रशियाचे हे कृत्य म्हणजे नागवे आक्रमण आहे!" तेव्हा सोव्हिएट रशियासुद्धा आक्रमक व अत्याचारी होत असतो. रशियानेसुद्धा हिटलरशी मैत्रीचा तह करून एक नवीन पान कम्युनिस्टांच्या इतिहासाला जोडलेलेच आहे. म्हणून रशिया म्हणजे काही तरी शुद्ध, निष्कलंक असा सत्पुरुषाचा अवतार आहे असा माझा भ्रम नाही. पण फॅसिझमच्या वाढीबद्दल रशियाला

दोष देण्याची माझी तयारी नाही. रशिया आणि तेथील कम्युनिझम ह्यांचा नाश करण्याच्या पिसाट वेडाने झपाटलेल्या तथाकथित लोकशाहीवादी राष्ट्रांनीच फॅसिझमला वाढवले होते. मैत्रीचे तह करीत रशिया फक्त जीव बचावीत होता. ज्यांनी हिंस्र जनावरे अन्न देऊन पुष्ट केली ते, आणि ज्यांनी बचावाचा प्रयत्न केला ते, ह्यांना एका मापाने मोजण्यात अर्थ नसतो.

युरोपातील प्रसिद्ध लोकशाहीवादी राष्ट्रे इंग्लंड आणि फ्रान्स तशी तर आक्रमक नसणारी. लोकशाही वर्षानुवर्षे युरोपच्या इतर राष्ट्रांत जीवन जगत आली, पण ती छोटी राष्ट्रे. इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्या भोवती जे तेजोवलय आहे त्याचा झगमगाट काही निराळाच आहे. सबंध आशिया, आफ्रिका गुलाम करून लुटून ह्यांनी फस्त केला. काही शतके ही लूट पचवलेली असल्यामुळे ह्या पौष्टिक खाद्याची क्रांती इंग्लंड, फ्रान्सच्या लोकशाहीच्या मुखवट्यावर झळकत असते. आणि विसाव्या शतकात ह्यांच्याशी सहकार्य करणारी अमेरिका उदयाला आली. जगातल्या सर्व हुकुमशाह्या केवळ कम्युनिझमच्या भीतीपोटी सावरून धरण्याचा प्रयत्न करणारी ही मंडळी बाह्याकाराने लोकशाहीवादी असतील, पण ती अंतरंगाने फॅसिस्टच आहेत असे मला वाटते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात काही धटिंगण शक्तीच्या जोरावर आपले स्वार्थ सांभाळीत असतात. तरीही ते लोकशाहीचा जप करीतच असतात. ह्यामुळेच खऱ्या फॅसिस्टाला ओळखणे अतिशय कठीण होऊन जात असते.

पंतप्रधान इंदिरा गांधींनी २२ जुलै १९७५ रोजी लोकसभेत जे भाषण केले त्यात ओघाओघाने फॅसिझम म्हणजे काय ह्याबाबत त्यांचे विचार आलेले आहेत. पंतप्रधान सांगतात : “काल आणखी एका सभासदाने फॅसिझम म्हणजे काय हे जाणून घेण्याची इच्छा दर्शवली. फॅसिझम म्हणजे केवळ दडपशाही नव्हे. पोलिसी बळाचा अतिरेकी वापर करणे, किंवा लोकांना तुरुंगात टाकणे असाही फॅसिझम ह्या शब्दाचा अर्थ नाही. फॅसिझम म्हणजे खोटेपणाचा वापर! स्थूलमानाने फॅसिझम म्हणजे महान असत्याचाच प्रकार. फॅसिझम म्हणजे बळीच्या बोकडाचा शोध घेणे.” ह्याच व्याख्यानात इतर विषय हाताळून पुन्हा एकदा फॅसिझमकडे वळताना पंतप्रधान म्हणतात : “असत्याचा प्रचार-प्रसार करणे, बळीचे बकरे हुडकणे ह्यापेक्षाही फॅसिझमचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे हिंसाचाराची तरफदारी करणे, हिंसाचाराला उत्तेजन देणे, हिंसेची प्रशिक्षणे देणे.” पंतप्रधानांच्या ह्या व्याख्यानात बोलण्याच्या ओघामुळे काही मुद्द्यांवरील भर थोडा कमी-जास्त झालेला आहे. गोळीबार, पोलिसी बळाचा वापर, लोकांना तुरुंगात टाकणे म्हणजे काही फॅसिझम नव्हे, असे त्या म्हणतात. खरे म्हणजे त्यांना असे म्हणायचे आहे की, ह्या सगळ्या बाबी चांगल्या नसून वाईटच, पण त्या पुष्कळदा लोकशाही बुडवू इच्छिणाऱ्यांच्या आघातापासून लोकशाहीचे संरक्षण करणाऱ्या मंडळींनाही कराव्या लागतात. ते आता

फॅसिझमचे निर्णायक गमक नव्हे. पंतप्रधानांनी फॅसिझमची निर्णायक लक्षणे तीन ठरविली आहेत. खरे म्हणजे ही लक्षणे तीन नसून दोनच आहेत. असत्याचा प्रचार करणे आणि बळीचे बकरे शोधून काढणे ह्या दोन बाबी भिन्न नसतात. बळीचा बकरा शोधून काढण्यासाठीच असत्याचा प्रचार केला जातो. मूळ प्रश्न डावलून इतर कुणावर तरी दोषाचे खापर फोडणे हा असत्य प्रचाराचाच एक भाग असतो. असत्याचा धडाकेबाज प्रचार आणि गरज पडेल तर हिंसेला उत्तेजन व तरफदारी ही फॅसिझमची ठळक वैशिष्ट्ये आहेत पंतप्रधानांच्या ह्या भूमिकेशी सहमत व्हायला हरकत नाही. मात्र असत्याचा चौरस प्रचार करणारे कोण, आणि गरजेनुसार हिंसेचा वापर करणारे व समर्थन करणारे कोण ह्यांची यादी आपण काळजीपूर्वक निश्चित केली पाहिजे.

स्थूलमानाने फॅसिझमचा विचार करताना पंतप्रधानांनी दाखविलेली दिशा ही मला योग्य वाटते. फॅसिझमचा विचार खऱ्या लोकशाहीचे मारेकरी म्हणून करायचा असतो. त्यासाठी लोकशाहीचा बुरखा घेणारे दांभिकही शोधावे लागतात. पाशवी बळावर सत्ता टिकवण्याचा यत्न करणारे शोधावे लागतात, आणि अत्यंत छातीठोकपणे असत्याचा प्रचार व प्रसार करणारे शोधावे लागतात. मी फॅसिझमचा विचार करताना ह्या सर्व विवेचनात ठिकठिकाणी थोडी थोडी तपशिलाची भर घालू इच्छितो.

फॅसिझमच्या उदयाला पहिल्या महायुद्धातील पराभवाची पार्श्वभूमी आहे. खरे म्हणजे जर्मनीच्या ठिकाणी संघटना–सामर्थ्य जास्त होते. आक्रमण करून जग गुलाम करण्याची शक्ती जर्मनीत जास्त होती. सर्व प्रकारचे भयानक अत्याचार रेखीवपणे रेटून नेण्यासाठी जे एक जंगली व निर्दय सामर्थ्य लागते तेही जर्मनीजवळ जास्त होते. जर्मनीचा पाडाव करण्यासाठीच जगाला एकत्र यावे लागले होते; आणि आपल्या प्रजेवर हिटलरच्या व्यक्तित्वाची पकडही जास्त बळकट होती. तरीसुद्धा शिवीगाळ करण्यासाठी व इतरांचा धिक्कार करण्यासाठी फॅसिझम हा शब्द जसा लोकप्रिय ठरला तसा नाझीझम हा शब्द लोकप्रिय ठरला नाही. हिटलरलासुद्धा लोक फॅसिस्ट म्हणून शिव्या देतात. स्वतः हिटलर फॅसिस्टांच्या मानाने कितीतरी जास्त कर्तबगार व म्हणून अधिकच भयानक असा माणूस होता! पण ‘नाझी’ शब्दापेक्षा ‘फॅसिस्ट’ हा शब्द अधिक लोकप्रिय ठरला ह्याची कारणे दोन आहेत : एक तर मुसोलिनीचा उदय हिटलरच्या पूर्वी झाला, आणि दुसरे म्हणजे, स्पेनमध्ये जाहीर रीतीने फॅसिस्टांच्या विरुद्ध लोकशाहीवाद्यांना प्रथम लढावे लागले. शब्द कोणताही वापरला तरी जे इटली, जर्मनीत घडले आणि पेरॉंच्या नेतृत्वाखाली जे अर्जेन्टिनात घडले त्या साऱ्याचे स्वरूप एकच होते. मी जाणीवपूर्वक ह्या यादीत स्पेनचा उल्लेख करीत नाही, त्याची कारणेही पुढे क्रमाक्रमाने स्पष्ट होतीलच.

पहिल्या महायुद्धानंतरचा इटली हा एक लोकशाही व्यवस्था राबवणारा देश होता.

इटलीला एक नामधारी राजा होता, पण कारभार लोकांनी निवडून दिलेले, लोकशाही पद्धतीने अस्तित्वात आलेले सरकार पाहात होते. ही इटलीतील लोकशाही एक तर विविध प्रकारच्या भ्रष्टाचारांनी भरलेली होती. दुसरे म्हणजे सत्तेत असणारे गट एकमेकांवर प्यादेमात करण्यासाठी सारखे आपआपसांत झगडत होते. राजकीय कारस्थाने व सत्ता टिकवण्यासाठी अस्तित्वात येणाऱ्या तडजोडी ह्यांना ऊत आलेला होता व जनतेचे प्रश्न तसेच लोंबकळत पडलेले होते. ह्या वातावरणात मुसोलिनीने आपली काळे डगलेवाल्या फॅसिस्ट स्वयंसेवकांची संघटना निर्माण केली होती. फॅसिस्टांनी निवडणुकीत भाग घेतलेला होता, पण निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. निवडणुकीच्या मार्गाने सत्ता हाती घेण्यात अपयश आल्यामुळे फॅसिस्टांनी शक्तीच्या जोरावर इ. स. १९२२ सालच्या ऑक्टोबरमध्ये सत्ता हाती घेतली. मुसोलिनी ड्यूस म्हणजे नेता म्हणून ओळखला जाई. फॅसिस्टांच्या राजसत्तेचा आरंभ अशा प्रकारे होतो. मुसोलिनीच्या उदयाची, विजयाची आणि पुढे त्याची सत्ता स्थिरावण्याची कारणे आपण नीट समजून घेतली पाहिजेत. जनतेचे प्रश्न सोडवण्यात लोकशाहीला अपयश आले. ह्या अपयशाचे कारण भ्रष्टाचार व राजकीय नेत्यांची सत्ता-स्पर्धा हे होते. ज्या वेळी आपण देशात फॅसिस्ट प्रवृत्ती वाढत आहेत असे म्हणतो त्या वेळी वेगळ्या शब्दांत आपण अशी कबुली देत असतो की चालू असलेली लोकशाही जनतेचे प्रश्न सोडवण्यात अयशस्वी ठरलेली आहे. ह्याचे कारण जे सत्तेत आहेत त्यांनी भ्रष्टाचाराला संरक्षण देऊन वाढवले आहे व सत्तेतल्या मंडळींना सत्ता टिकवणे ह्यापेक्षा वेगळा उद्योग राहिलेला नाही हे आहे. हे ठिकाण मोठे चमत्कारिक आहे. पुष्कळदा देशात फॅसिस्ट प्रवृत्ती क्रमाने वाढत आहेत असे गंभीरपणे लोक बोलतात, त्यांना आपण कशाची कबुली देतो आहोत ह्याचे भान राहिलेले नसते. जेव्हा चालू लोकशाही जनतेचे प्रश्न सोडवण्यात अयशस्वी होते तेव्हा जनतेने क्रांती करावी हा पहिला पर्याय उपलब्ध असतो. हितसंबंधियांनी लोकशाहीचा अनावश्यक खेळ गुंडाळून टाकावा हा दुसरा पर्याय उपलब्ध असतो. भाषा सोडून वर्तन पाहिले म्हणजे नेमके फॅसिस्ट कोण आहेत हे समजणे सोपे जात असते.

फॅसिझमचे दोन प्रमुख शत्रू सर्वप्रसिद्ध आहेत. फॅसिझम हा संसदीय लोकशाहीचा शत्रू असतो. संसदीय लोकशाहीत ठराविक काळानंतर निवडणुका घ्याव्या लागतात. ह्या निवडणुकांमध्ये पराभव होण्याची शक्यता असते. म्हणून संसदीय लोकशाही आचरणात आणणाऱ्या राजकीय पक्षांना लोकमत विरोधी गेल्यास सत्तात्याग करण्याची तयारी ठेवावी लागते. फॅसिस्टांचे वैशिष्ट्य सत्ता ताब्यात घेणे आणि ती हर-मार्गाने ताब्यात टिकविणे ह्यात असते. विजयाची खात्री असली म्हणजे फॅसिस्ट निवडणुका घेतातच. प्रौढ मतदानावर आधारलेल्या निवडणुका घेणे ह्यात फॅसिझमच्याविरुद्ध काही नाही. मात्र ह्या निवडणुकीत आपल्याखेरीज कुणी निवडून येणार नाही ह्याची फॅसिस्ट

काळजी घेतात. मुसोलिनीने इ. स. १९२२ मध्ये सत्ता ताब्यात घेतली. सत्ता हाती घेतल्यानंतर मुसोलिनीने हे जाहीर केले होते की, संसदेच्या इच्छेविरुद्ध आपण राज्य करणार नाही. म्हणून त्याने इ. स. १९२४ ला निवडणुकाही घेतल्या. हाती सत्ता आल्यानंतर व आपले सर्व विरोधक पाशवी शक्तीच्या जोरावर निष्प्रभ करून टाकल्या-नंतर निवडणुका घेणे फॅसिस्टांनासुद्धा परवडते.

एकदा फॅसिस्टांच्या हाती सत्ता आली म्हणजे ती सत्ता हातातून जाऊ नये ह्यासाठी विरोधकांचे खून पाडणे, भयाचे वातावरण निर्माण करणे, पक्षांवर बंदी घालणे, माणसांना तुरुंगात लोटणे– हे सर्व उद्योग फॅसिस्ट करतात. ह्यानंतर संसदेत नेत्यांनी बोलावे आणि इतरांनी टाळ्या वाजवून स्वागत करावे, हा एकच खेळ सुरू होतो! काही निष्प्रभ विरोधक आपल्यावर टीका करण्यासाठी संसदेत जिवंत ठेवणे फॅसिस्टांच्या सोयीचे असते. म्हणून फॅसिस्ट निवडणुका घेतात, राष्ट्राची गरज म्हणून सोयिस्कर घटना-दुरुस्ती करतात, जनतेच्याकडून मान्यता मिळवण्यासाठी संसदेत ठराव पास करून घेतात. असा सगळा खेळ फॅसिस्ट करीतच असतात. ज्यांनी लोकशाहीचा बाह्याकार सांभाळला ते फॅसिस्ट नव्हेत असे मानणे हा एक भ्रम ठरेल, हा पंतप्रधानांचा इशारा अगदी बरोबर आहे. सत्तास्थानी असणारी माणसेसुद्धा अतिशय मार्मिक सत्ये बोलतच असतात. मुसोलिनीनंतर जर्मनीत हिटलरचा उदय उदय झाला. हिटलरनेसुद्धा निवडणुका लढवल्याच होत्या. जर्मनीतही संसदीय लोकशाहीचा जनतेचा प्रश्न सोडवण्याच्या प्रयत्नात झालेला पराजय हेच त्याच्या उदयाचे कारण होते. हिटलरने तर निवडणुकीच्या मार्गाने सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला तसा क्रांती करूनही सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला. पण हिटलरचे क्रांतीचे प्रयत्न अयशस्वी ठरले. निवडणुकीतूनच त्याची शक्ती वाढत गेली. १९३२ साली त्याच्या पक्षाला एक कोटी पस्तीस लक्ष मते पडलेली होती, व ह्या पक्षाने संसदेत २२५ जागा जिंकलेल्या होत्या. सत्ता हातात घेण्यापूर्वी पुरेशी शक्ती हिटलरने संपादन केलेली होती. हिंडेनबुर्गच्या मृत्यूनंतर हिटलर सत्ताधिकारी झाला. त्याने ३० जानेवारी १९३३ ला सत्ता स्वीकार केला. (ह्याच तारखेला १५ वर्षांनंतर हिंदुस्थानात महात्मा गांधींचा खून झाला होता!) एकाच रूपात हिटलर वावरत असतो असे समजण्याचे कारण नाही. जर्मनीचे उदाहरण मुद्दाम ह्यासाठी घेतले की, निवडणुकीच्या मार्गाने फॅसिस्ट सत्तेवर येत नसतात असा भ्रम शिल्लक नसावा.

फॅसिस्ट निवडणुकीच्या मार्गाने सत्तेवर येतात. ते जमले नाही तर उठाव करून सत्ता ताब्यात घेतात; उठाव फसले तर पुन्हा निवडणुका घेतात. फॅसिझम ओळखणे अवघड जाते ते ह्यामुळे. ज्या वेळी आपण फॅसिझम संसदीय लोकशाहीचा शत्रू असतो असे म्हणतो त्या वेळी त्याचा नक्की अर्थ समजून घेतला पाहिजे. संसदीय लोकशाहीचे सोंग फॅसिस्ट सजवीत नसतात असा ह्याचा अर्थ नाही. फॅसिस्ट लोकशाहीचे शत्रू असतात

ह्याचा अर्थ असा की, फॅसिस्ट हाती आलेली सत्ता कधीही सोडीत नाहीत. सत्ता टिकवण्यासाठी सगळे मार्ग ते वापरतात. सोपे मार्ग परवडतात तोवर अवघड मार्ग वापरीत नाहीत. गरज पडेल त्या वेळेला कोणताही मार्ग वापरतात. विरोधी पक्ष खच्ची करणे हा त्यांचा पहिला कार्यक्रम असतो; आणि निष्प्रभ विरोधी पक्षांकडे पाहून ह्यांना जनतेची साथ नाही असे म्हणणे हा त्यांचा दुसरा कार्यक्रम असतो. फॅसिस्टसुद्धा स्वतःला जनतेचे प्रतिनिधीच मानतात.

जोपर्यंत सत्तेचे प्रलोभन दाखवून विरोधी पक्षांतील कार्यकर्ते फोडून लाचार करता येतात तोपर्यंत गोळ्या घालून मारण्याची गरज नसते. जोपर्यंत कोणत्याही पक्षाशी सोयिस्कर सोयरिकी करता येतात तोपर्यंत चिंताच नसते. जोपर्यंत जाती, धर्म व पैसा यशस्वी रीतीने हाताळता येतो, व विरोधी पक्षांत फूट पाडता येते तोपर्यंत अडचण नसते. ज्या वेळी हे मार्ग अपुरे ठरतात त्या वेळी लाखाचे लष्कर उभे करून त्या दडपणाखाली निवडणूक घेता येते, बंदी घालून पक्ष मोडता येतात, माणसे तुरुंगात पाठवता येतात, बोलणारी सर्व तोंडे बंद करता येतात,– सगळ्याच गोष्टी करता येतात. मूर्ख फॅसिस्ट हे करताना आपली मूठ उघडी करतात; आमचा लोकशाहीवर विश्वास नाही असे ते सरळ सांगतात. चतुर फॅसिस्टांना आपली मूठ उघडण्याचे बंधन नसते. अतिशय मोकळेपणाने आपण हे सगळे लोकशाहीच्या रक्षणासाठी करीत आहो असे सांगणे शक्य असते. कारण विरोधकांची तोंडे बंद केल्यानंतर सत्तेकडून आलेले कोणतेही विधान खोटे ठरवणेच शक्य नसते. असत्य हे सत्य म्हणून बिनधोकपणे वावरू शकेल इतकी सोय जर करता आली तर शिष्टसंमत कल्पना म्हणून परवडणारी लोकशाही सोयीनुसार वापरणे ह्याला फॅसिस्टांची हरकत नसते. म्हणूनच पंतप्रधानांनी असा अतिशय मार्मिक इशारा दिला आहे की, असत्याचा प्रचार व प्रसार करणे हे फॅसिझमचे प्रमुख लक्षण आहे. इंदिरा गांधींचा मुद्दा अगदी बरोबर आहे.

वर हे सांगितलेले आहेच की, चालू लोकशाही ही जनतेचे प्रश्न सोडवू शकली नाही म्हणजे फॅसिझमचा उदय होतो. पण चालू लोकशाहीने जनतेचे प्रश्न का सोडवू नयेत ? ह्याचे खरे कारण असे असते की, जनतेला मते मागायची असल्यामुळे तिला आश्वासने देणे भाग असते; आणि ही आश्वासने जर पूर्ण करायची तर जे सत्ता भोगीत असतात त्यांचे हितसंबंध धोक्यात येणे भाग असते. काही काही देशांचा इतिहास मोठा चमत्कारिक असतो. हिंदुस्थानसारखा देश हा असाच चमत्कारिक देश आहे. अमुक एक पुरोगामी कार्यक्रम शासनाने स्वीकारलाच पाहिजे, ह्या मुद्द्यावर संघटितपणे प्रभावी दडपण निर्माण करणे भारतात क्वचितच जमते. अगदीच जमत नाही असे नाही, पण सामान्यपणे जमत नाही, हे मात्र खरे. त्यामुळे अमुक एक कार्यक्रम स्वीकारलाच पाहिजे असे सत्तेवर दडपण कुणाचेच नसते. पण जनतेची अजून एक चमत्कारिक वर्तणूक चालू

असते. तुम्ही उपयोगी व चांगले कार्यक्रम घ्या. प्रायः जनता कुरकुर करीत ते कार्यक्रम स्वीकारते. ती बंड करून उठत नाही. म्हणून कोणताही पुरोगामी कार्यक्रम अमलात आणत असताना सरकारला जनतेच्या बंडाची भीती नसते. एखाद्या पुरोगामी कार्यक्रमाला तर अचानकच कौतुकाने जनता असा प्रतिसाद देते की कोणीही आश्चर्यचकित व्हावे. म्हणून कोणताही पुरोगामी कार्यक्रम कधीही शासनाला धोक्याचा ठरत नाही. जनतेचे प्रश्न सोडवणारा कार्यक्रम शासन लोकप्रिय करते तरीसुद्धा लोकांचे प्रश्न सुटत नाहीत. आपले हितसंबंध धोक्यात आणून लोकप्रिय व्हावे, असे शासनाला वाटत नाही. मग कोणतेच प्रश्न न सोडवता लोकप्रियता टिकवून धरण्याचा एक विनोदी प्रकार सुरू होतो. पतप्रधान ज्याला असत्य म्हणत आहेत त्याचे स्वरूप असे असते.

ज्या देशात संसदीय लोकशाहीचे नाव घेऊन हितसंबंध जतन करणारे लोक राज्यकर्ते होतील तिथे जनतेचे प्रश्न सोडवण्यात संसदीय लोकशाहीला अपयश येणारच. लोकांवर निष्ठा नसणारे लोक एका दंभाच्या आधारे लोकनेते म्हणून सत्ताधारी होऊन बसले तर मग संसदीय लोकशाही अपयशी होणे भाग असते. आणि संसदीय लोकशाही अपयशी होऊ लागली म्हणजे त्याच हितसंबंधियांना आपले हितसंबंध टिकविण्यासाठी लोकशाही गुंडाळणे भाग असते. त्या त्या देशात, त्या त्या परिस्थितीत सत्ता टिकवण्यासाठी किती टक्के लोकशाही गुंडाळणे भाग आहे ह्याचा निर्णय फॅसिस्ट घेत असतात. ह्या विवेचनाचे दोन अर्थ उघड आहेत. खऱ्या लोकशाहीवर श्रद्धा नसणारे लोक लोकशाही मार्गाने सत्तेत आले म्हणजे फॅसिझमचा उदय होतो. कारण ही पुण्यवान मंडळी विरोधी पक्ष वाढूच देत नाहीत, पर्यायी पक्ष तयारच होऊ देत नाहीत, म्हणून संसदीय लोकशाही रुजूच देत नाहीत. आम्ही सत्तेत राहणे भागच आहे, नाही तर देशात अराजक येईल, हे सांगणे खपून जाईल अशी परिस्थिती ही माणसे निर्माण करतात. वरील विवेचनाचा दुसरा अर्थ असा आहे की, ज्यांचे हितसंबंध सांभाळावयाचे असल्यामुळे संसदीय लोकशाही अयशस्वी होते त्यांचेच हितसंबंध सांभाळता यावे म्हणून फॅसिझमचा उदय होत असतो. हे सूत्र लक्षात ठेवले म्हणजे फॅसिस्ट मंडळींना ओळखणे सोपे जाते. वॅटकिन्सनी सामाजिक शास्त्रांच्या ज्ञानकोशात फॅसिझमचे एक सूत्रच हे सांगितले आहे : सत्ता हाती घेण्याची व सर्व मार्गांनी सत्ता टिकवण्याची जिद्द म्हणजे फॅसिझम ! लोकशाहीचे शत्रू हे फॅसिस्टांचे एक ठळक वैशिष्ट्य आहे.

'फॅसिझम हा कम्युनिझमचा शत्रू आहे' असा गवगवा बराच झालेला आहे. हा गवगवा अर्धा खरा आहे, आणि अर्धा खोटा आहे. मुसोलिनी कम्युनिस्टांचा शत्रू होता. स्पेनमध्ये फालांजिस्ट चळवळीतून फ्रँकोचा उदय झाला. फ्रँको कम्युनिस्टांचा शत्रूच आहे. चीनमधील कोमिनटांग पक्ष कम्युनिस्टांचा शत्रू होता. अर्जेन्टिनातील पेरॉनिस्ट कम्युनिस्टांचे विरोधकच आहेत. तेव्हा फॅसिस्ट कम्युनिस्टांचे शत्रू असतात ही गोष्ट

खरीच आहे. जगातील बऱ्या लोकशाह्या उद्योगपतींच्या भोगदासी आहेत. त्यामुळे कम्युनिस्टांचे शत्रू असणाऱ्या फॅसिस्टांना वाढण्यास, बळकट होण्यास, ह्या लोकशाह्या नेहमीच साह्यभूत होत आल्या. ज्या वेळी मुसोलिनीने 'ॲबिसिनिया'वर आक्रमण केले त्याच वेळीं जर इंग्लंड, फ्रान्सने कठोर भूमिका स्वीकारली असती, आणि जर्मनीने ऱ्हाइनलँडमध्ये सेना आणताच इंग्लंडने अंतिमोत्तर दिले असते तर दुसरे महायुद्ध अजिबात टळले तरी असते, अगर एक-दोन डिव्हिजन सेना घेऊन एखाद्या कमांडरने ते महिन्याभरात जिंकले असते,—असे मत चर्चिलनेच दिले आहे. हा साधुपुरुष हे का घडले नाही ह्याचे उत्तर मात्र देत नाही! हे न घडण्याचे कारण असे आहे की, कम्युनिझमचा नायनाट करण्यासाठी फॅसिझम हे हत्यार चांगले आहे असे आपले साम्राज्य जतन करण्याची पवित्र इच्छा असणाऱ्या लोकशाहीवाद्यांना वाटत होते! फॅसिझम स्थिर होतो, बलवान होतो ह्याचे कारण हे आहे की, हितसंबंधीय मंडळींना जगातून कम्युनिझमचा नायनाट व्हावा ह्यासाठी सूक्तासूक्त कोणतेही मार्ग वापरणे उचित वाटते. असुराच्या नाशासाठी भगवान विष्णू अशाच लबाड्या करीत नव्हते का? मग त्या इंग्लंड, फ्रान्सनेच केल्या तर काय हरकत आहे? वेदाचे रक्षण करण्यासाठी जे विष्णू करतो त्यातल्या काही बाबी बायबलचे रक्षण करण्यासाठी विंग्स्टनने केल्या तर काय हरकत आहे? असा हा साधा हिशोब आहे.

म्हणून फॅसिस्ट हे कम्युनिस्टांचे विरोधक असतातच; पण ते कम्युनिस्टांचे विरोधक, कम्युनिस्ट हे कम्युनिस्ट आहेत ह्यासाठी नसतात. कम्युनिस्टांचा विरोध खाजगी जायदादी जातात, कारखाने जातात, संपत्ती जाते, भोगविलास जातो, सत्ता जाते,— ह्यांसाठी असतो. आर्थिक हितसंबंध महत्त्वाचे असतात. जर कम्युनिस्टांनी ह्या मुद्द्यावर गप्प बसायचे ठरवले तर मग नुसती रशिया आणि जर्मनी ह्यांचीच तडजोड होत नाही, गप्प बसायचे ठरवले तर कोणत्याही देशांत जमीनदार-भांडवलदारांचा पक्ष कम्युनिस्टांना आपल्या मांडीवर नांदवण्यास तयार असतो! कम्युनिस्ट हा डावा पक्ष असल्यामुळे त्यांना सम्राटाच्या डाव्या मांडीवर बसण्याचे स्वातंत्र्य असते! भांडणाचा मुद्दा कम्युनिस्ट हे नाव नाही, तसे तर फॅसिस्ट स्वतःला सोशलिस्टच म्हणवीत. मुसोलिनी समाजवादी पक्षात होता. हिटलरच्या तर पक्षाचेच नाव 'राष्ट्रीय समाजवादी' असे होते. फॅसिस्टांची स्वतःला समाजवादी म्हणवण्यास हरकत नसते. नाव परवडत असेल तर त्यांना तसे कोणतेही चालते. त्यांची खरी हरकत आर्थिक हितसंबंध धोक्यात आणणाऱ्या परिस्थितीला असते. म्हणून फॅसिस्ट हे समाजवादाचे शत्रू असतात. तुम्ही मार्क्सचे नाव घेऊन या, द्वंद्वात्मक स्वयंगती सांगा, मात्र आर्थिक हितसंबंध धोक्यात आणू नका!— फॅसिस्टांचे अशा कम्युनिस्टांशी प्रेम जुळते!! पण तुम्ही कोणतेही लेबल न लावता, कोणत्याही नावाचा अगर दर्शनाचा सैद्धान्तिक आग्रह न धरता कार्यक्रमाकडे वळा, उद्योगपतींचे आणि जमीनदारांचे हितसंबंध धोक्यात येतील असा प्रयत्न करा, फॅसिस्ट तुमचे शत्रू

असतात. फॅसिझम हा जनतेला न्याय आणि प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या खऱ्या समाजवादाचा शत्रू असतो, आणि समाजवादाचा शत्रू म्हणून फॅसिझम कम्युनिझमचा शत्रू असतो. पंतप्रधानांनी ह्यासाठी मुद्दाम आग्रहपूर्वक हे सांगितले आहे की, " आपण ठोकळेबाज व सैद्धान्तिक समाजवादी नाही. " पंतप्रधानांचा हा मुद्दा महत्त्वाचा आहे. पोथ्यांची पूजा आणि मंत्रांचा जप ह्याला अर्थ नसतो. पोथीचे नाव वेद, पुराण असले तरी निरर्थक असते; आणि पोथीचे नाव दास कॅपिटल असले तरी निरर्थक असते. मंत्र डायलेक्टिक्स आणि क्लास स्ट्रगल हा जरी असला तरी तो कोटी नाम-जपही निरर्थक असतो. मूळ मुद्दा साखर-कारखानदारांची थैली स्वीकारून त्यांना पुरोगामी असे शिफारसपत्र द्यायचे की नाही हा असतो. म्हणून खरा प्रश्न कार्यक्रमाचा असतो. जनतेला न्याय व प्रतिष्ठा देऊन समर्थ करण्याचा असतो. फॅसिस्ट ह्या मूळ मुद्द्याचे शत्रू असतात. म्हणून पंतप्रधानांनी समाजवादाच्या शत्रूंचे फॅसिस्ट म्हणून वर्णन केले आहे ते अगदी बरोबर आहे.

संस्थानिक, जमीनदार, उद्योगपती, काळाबाजारवाले असे सर्व प्रतिष्ठित जनतेचे शत्रू कोणते नाव घेऊन जमत आहेत ह्याकडे दुर्लक्ष करून त्यांचा समूह कुठे जमलेला आहे व त्यांच्याबरोबर कोणकोण आहेत हे पाहिले म्हणजे फॅसिस्टांचे किल्ले नक्की मोजता येतात. पंतप्रधानांनी मोठ्या चतुरपणे ह्या सत्याकडे लक्ष वेधले आहे; नवे जग जुन्या जगाच्या मानाने फार बदलून गेलेले आहे. जुन्या जगात ज्यांना एकेका घोषवाक्याबरोबर ओळखता येत असे त्यांना नव्या जगात घोषणांच्या आधारे ओळखणेच कठीण झालेले आहे! भारतातील सर्व राजकीय पक्षांच्याकडे आपण नजर फेकली तर असे दिसून येते की, सर्वचजण लोकशाहीवादी आहेत. काहीजण तर आपण खऱ्या लोकशाहीचे पुरस्कर्ते आहोत असे सांगून उरलेल्या सर्वांच्या लोकशाहीला विरोध करतात! सर्वच जण समाजवादी आहेत, अगदी जातीयवादी पक्षसुद्धा आपण सेक्युलर असल्याचे आवर्जून सांगतातच. ह्यामुळे होते काय की, सगळेच राजकीय पक्ष एकसारखे दिसू लागतात. म्हणून घोषणांच्या आधारे पत्ताच लागत नाही. घोषणा सोडून देऊन प्रत्यक्ष कामाकडे पाहावे लागते.

सगळ्याच हुकुमशाह्यांना आपल्या हाती अमर्याद सत्ता केंद्रित करण्याचा नाद असतो. म्हणून सर्व उद्योगधंदे आपल्या एकट्याच्या मालकीचे असावेत असे हुकूमशहांना वाटते. ह्यामुळे आधुनिक काळात सरकारी मालकीचे उद्योगधंदे करून मूठभर मंडळींनी सत्ता केंद्रित करावी ह्या घटनेला राष्ट्रीयीकरण आणि समाजवादाचा आरंभ असे गोंडस नाव देण्याची सोय उपलब्ध झाली. ह्यामुळे आफ्रिकेतील इदी अमिनसुद्धा राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कर्ता होऊन बसलेला आहे! उलट भांडवलशाही राष्ट्राला भांडवलशाही टिकवून धरण्यासाठीच सरकारी क्षेत्रे वाढवावी लागत आहेत. अमेरिकेतच सरकारी क्षेत्रे वाढत

जातात. भांडवलशाहीने स्वतःच्या बचावासाठी उभारलेल्या ह्या व्यूहरचना लोकशाही मार्गाने मिश्र अर्थव्यवस्थेतून समाजवादाकडे जाण्याचा प्रवास म्हणून सांगण्याची सोय आता उपलब्ध झाली आहे. आपल्या प्रत्येक वाक्याला सत्ताधीश गोंडस नावेही घेऊ शकतात, आणि समर्थनासाठी विद्वान माणसे भाड्यानेही घेऊ शकतात. म्हणूनच आता घोषणांना अर्थ राहिलेला नाही. घोषणांच्या मागे असणारा आशय तपासण्याची वेळ आली आहे.

ज्यांच्या राजवटीत सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सतत वाढत जाते, चैनीचे उत्पादन कमी आणि गरजेचे उत्पादन जास्त असा प्रकार होतो व ज्यांच्या हाती संपत्ती गोळा झाली आहे अशी मंडळी क्रमाने गरीब होत जाताना दिसतात, बेकारी कमी होते आणि जनतेचे खरे उत्पन्न वाढत जाते, त्या राजवटींना नाव कोणतेही असले तरी त्या समाजवादी राजवटी आहेत असे आपण ओळखायला पाहिजे, आणि ज्यांच्या राजवटीत प्रथम शंभर टक्के महागाई वाढते व नंतर पन्नास टक्के पगार वाढतो अशा प्रकारे पगारवाढ करूनसुद्धा खऱ्या उत्पन्नात पंचवीस टक्के घटच होत असते, हा उद्योग करणाऱ्या राजवटी आपण समजून घेतल्या पाहिजेत. ह्याच राजवटीत जर एकेका उद्योगपतीची संपत्ती झपाट्याने वाढत असेल तर आपण हेही समजून घेतले पाहिजे की, ह्या राजवटी केवळ सोंग म्हणून समाजवादाचा जप करीत आहेत.

फॅसिझम हा लोकशाही आणि समाजवादाचा शत्रू असतो, हे निर्विवाद सत्य आहे; पण फॅसिस्ट मंडळी आपण फॅसिस्ट आहोत, हे जाहीर रीतीने कबूल करतीलच ह्याची खात्री नाही. त्यांनी जाहीर रीतीने आपण फॅसिस्ट आहोत हे कबूल करावे ही अपेक्षा म्हणजे चोरांनी परवानेधारक बनण्यासाठी अर्ज करावा ह्यासारखीच भ्रामक अपेक्षा नाही काय ? पंतप्रधानांनी हे सांगितलेच आहे की, फॅसिझमचे एक ठळक वैशिष्ट्य असत्य हे आहे. म्हणून फॅसिस्ट मंडळी लोकशाही समाजवादाचा नामजप करण्याचा धोका आहे, आणि लोकशाही गुंडाळून लष्कराच्या ताकदीवर आपले राज्य टिकवण्याचाही धोका आहे. म्हणून आपण घोषणांच्या आधारे फसणार नाही ह्याची काळजी घेतली पाहिजे. असत्याचा प्रचार करणारे लोक अमुकच थाप मारतील अशी खात्री नाही. सत्ता टिकवण्यासाठी पक्षाचे दोन तुकडे ज्यांनी केले त्यांचा निःस्वार्थपणा समजावून सांगणाऱ्या कुजबुजी वेगाने चालू असतात; आणि ज्यांचा अर्धा जन्म स्वातंत्र्य मिळवण्यात गेला, आणि उरलेला जन्म सत्तेपासून दूर राहण्यात गेला, त्यांच्याहीविषयी अशी कुजबुज सुरू होते की ह्यांना विदेशी पैसा मिळत असला पाहिजे! कुजबुज आणि अफवा ह्यावर फॅसिझमची फार मोठी भिस्त असते, ह्याकडे पंतप्रधानांनी मुद्दाम लक्ष वेधले आहे. ज्यांना लाजच उरलेली नसते अशा मंडळींनी परंपरेने परक्या राष्ट्रांकडे पाहून आपली धोरणे आखावी व मधून-मधून आमच्या विरोधकांना परराष्ट्राची मदत मिळते असा आक्रोश करावा ही बाब

उद्वेगाची आहे. पण राजकारणाच्या वक्र गतीला नीति-नियम परवडत नाहीत. सत्ता मग इंग्रजांची असो अगर भारतीयांची, सत्ताधाऱ्यांना गांधी परवडतच नसतो. ज्यांना सत्तेचा वारसा मिळतो त्यांना त्यागाचा वारसा परवडणारच नाही !

फॅसिझमचे काही ठरलेले अडाखे असतात. लोकशाही असफल होऊ लागली म्हणजे बेकारी वाढते, भ्रष्टाचार वाढतो, महागाई वाढते, आणि लोक त्रस्त होऊन जातात. जिकडे तिकडे एक हलकल्लोळ आणि चीड उसळलेली असते. निदान प्रथमदर्शनी तरी अराजक माजल्याचे दिसते. अशा पार्श्वभूमीवर फॅसिझमचा अवतार होत असतो. फॅसिझमचे काही आग्रहाचे मुद्दे असतात. पहिला आग्रहाचा मुद्दा हा की, आम्ही शांतता आणि व्यवस्था निर्माण केली आहे. इंग्रजांचासुद्धा हिंदुस्थान जिंकल्यानंतर हाच दावा होता. दुसरा मुद्दा असा की, आम्ही महागाई कमी करीत आहोत. तिसरा मुद्दा असा की, चोर– काळाबाजारवाले ह्यांच्याविरुद्ध आवाडी उघडून आम्ही भ्रष्टाचार कमी करीत आहोत. आणि ह्यापुढे लवकरच आम्ही उत्पादन वाढवून दारिद्र्य कमी करणार आहोत, बेकारी संपवणार आहोत. शांतता, स्वस्ताई, भ्रष्टाचारविरोधी मोहीम, ह्या आजच्या नगदी तीन, आणि दारिद्र्यनाश व बेकारीनाश अशा उद्याच्या उधार दोन, ह्या पाच फॅसिस्टांच्या हुकमी घोषणा असतात.

फॅसिझम कधी शांतता निर्माण करीत नाही. बोलणाऱ्यांची तोंडे शिवून, लिहिणाऱ्यांचे हात बांधून, आणि छातीवर बंदूक रोखून जेव्हा सर्वांना गप्प केले जाते त्याला शांती म्हणत नसून भीती म्हणतात! फॅसिस्टांना सत्याची कदर करण्याचे कारणच काय ? फॅसिझम कधी महागाई कमी करू शकत नाही. तो वस्तूंचे भाव कमी करील. वस्तूंचे भाव वाढवताना व पगारही वाढताना दारिद्र्य कसे वाढते हे सर्व-प्रसिद्ध आहे. वस्तूचे भाव कमी करून दारिद्र्य वाढवण्याच्या काही स्वतंत्र योजना आहेत ! महागाई कमी करण्याचा मार्ग उत्पादनात जनतेचा वाटा वाढवणे, संपत्तीत जनतेचा वाटा वाढवणे हा असतो. फॅसिझमला भांडवलशाहीचे रक्षण करायचे असते, म्हणून महागाई कमी करता येत नाही. बेकारी मात्र फॅसिझम मोठ्या प्रमाणात कमी करू शकतो. सर्वांनाच आपल्या सोयीनुसार गुलाम म्हणून वापरायचे ठरल्यानंतर बेकारी ह्या शब्दाला अर्थ नसतो. गुलामांना बेकार म्हणण्यात अर्थ नाही. लायकीनुसार उचित काम, आणि कामानुसार उचित पगार, ह्या सूत्राच्या संदर्भात बेकारी ह्या शब्दाला अर्थ असतो. सर्वांनाच गुलाम करून वेठीला धरले म्हणजे जनतेचे शोषण वाढते. ह्यालाच फॅसिस्ट बेकारी कमी झाली असे म्हणतात. आणि जी दोन उद्याची आश्वासने आहेत त्यांबाबत तर सत्तेला प्रश्न विचारण्याची सोयच नाही. कारण फॅसिझमला टाळ्या वाजवणारे हातच हवे असतात. शंका घेणारी मूटभर डोकी केव्हाही समाजात अल्पसंख्यच असतात. ह्या अल्पसंख्येने बहुसंख्येच्या प्रतिनिधी असणाऱ्या शासनाला त्रास द्यावा हे फॅसिस्टांना पटत नाही.

म्हणून फॅसिस्ट हाताच्या पाच बोटांप्रमाणे पाच घोषणा नाचवीत असतात. ह्या पाच घोषणा एकत्र जमल्या, जनतेच्या अवस्थेत काही बदल होत नसला म्हणजे तिथे ठळक खूण अशी समजावी की, पाच बोटे एकत्र येऊन त्यांनी आपली सलामी दिलेली आहे. अशा रीतीच्या वळलेल्या मुटी फॅसिझमची खात्रीलायक खूण असतात.

ह्या सगळ्या गदारोळात जनता म्हणजे काय, हे समजणे कठीण आहे. लोकशाही जनतेकडून आणि जनतेसाठी असते. फॅसिझम स्वतःकडूनच असतो, पण तोही जनतेसाठीच असतो. ही जनता म्हणजे कोण, ह्याचे उत्तर देणे राजकारणात फार कठीण आहे. जेव्हा आपण निवडून येतो तेव्हा जनतेने आपल्या बाजूने स्पष्ट कौल दिलेला असतो. जेव्हा आपण निवडणुकीत पडतो, त्या वेळीं जनतेच्या शत्रूंनी जनतेला धोका दिलेला असतो. ज्या वेळेला आपल्या सभेला प्रचंड गर्दी असते तेव्हा जनतेचा कौल सभाच सांगते आहे असे म्हणायचे असते. जेव्हा विरोधकांच्या सभेला गर्दी जमू लागते तेव्हा जनतेच्या हितसंबंधाला बाधक असणारी हुल्लडबाजी सुरू झाली असा त्याचा अर्थ असतो. ह्यामुळे जनता म्हणजे काय, हे सांगणे फारच कठीण जाते. आणि हे सांगणे कठीण व्हावे हीच फॅसिस्टांची इच्छा असते. ज्या वेळेला आपल्या पक्षाला कमी मते पडून जास्त जागा मिळत असतात त्या वेळीं जनतेच्या कौलाचा पुरावा जिंकलेल्या जागा हा असतो. ज्या वेळेला जागा मिळत नाहीत त्या वेळेला पडलेली मते हा जनतेचा कौल असतो. खरी गंमत ह्यापुढे आहे;–कारण ज्यांना मतेही मिळत नाहीत आणि जागाही मिळत नाहीत अशी मंडळी निवडणुकीच्या मार्गाने जनतेचा आवाज व्यक्त होऊ शकत नाही असे मानतात ! कित्येकदा तर नेता निवडून येतो आणि पक्ष पडतो. त्या वेळेला जनतेचा कौल नेत्याच्या बाजूने असतो. फॅसिझममध्ये ह्या जनतेला शासन जे जे करील त्याला बिनशर्त पाठिंबा देण्याचा संपूर्ण हक्क असतो; कारण शासन जनतेचे प्रतिनिधी असते. जनतेच्या प्रतिनिधी असणाऱ्या शासनाच्याविरुद्ध बोलणारे हे जनतेचे शत्रू असतात. त्यामुळे जनतेच्या शत्रूंचा जर जनतेने नायनाट केला तर तो जनतेचा रास्त हक्क मानावा लागतो.

ह्या जनतेला एक नेता लागतो. इटलीत ह्या नेत्याला 'ड्यूस' म्हणत. जर्मनीत त्याला 'फ्यूहरर' म्हणत. प्रत्येक देशात ह्या नेत्याला वेगळे नाव असते. पण नाव वेगळे असले तरी नेता असतोच. ह्या नेत्यावर सारखे विश्वासाचे ठराव पास होत असतात. जनतेचा प्रतिनिधी पक्ष असतो, पक्षाचा प्रतिनिधी नेता असतो, आणि नेता हाच राष्ट्र असतो. लोकांनी अविश्वास व्यक्त केला तर नेता सत्ता सोडीत नाही. खरे म्हणजे तो अविश्वास व्यक्त करण्यासाठी एकत्र जमण्यापूर्वीच विरोधकांची वासलात लावतो. जनतेला जनतेवर अविश्वास व्यक्त करण्याचा हक्क नसतोच ! म्हणून नेत्यावर विश्वास व्यक्त करणे ह्याशिवाय दुसरे काही करणे शक्य नसते. तरीही वेळोवेळी सर्वांनी नेत्यावर विश्वास व्यक्त करावा

अशी फॅसिझममध्ये प्रथा आहे. आमचा एकमेव नेता, आमचा महान नेता, आमचा अलौकिक नेता—फक्त तोच एक राष्ट्र तारू शकतो. तो म्हणजे राष्ट्र. अशी सगळी वाक्ये ठरलेली असतात. हा आमचा महान नेता—यापुढे मुसोलिनी म्हणायचे, हिटलर म्हणायचे, माओ म्हणायचे, की स्टॅलिन म्हणायचे हे त्या त्या देशानुसार ठरते. किंबहुना 'गेल्या हजार वर्षांतील आमचा सर्वश्रेष्ठ नेता' हे बिरुद कायम राहते; आणि दर दहा वर्षाला बिरुदधारी मात्र बदलतो. तरीसुद्धा हे सगळे करायचे असते. जनतेच्या नावे हे सगळे चालले असल्यामुळे नाममात्र सुधारकांचे कार्यक्रम चालू असतात; हे कार्यक्रम यशस्वी झाल्याच्या घोषणाही चालू राहतात.

मानवजातीच्या इतिहासात लोकशाहीचा काळ फार थोडा आहे. सगळा काळ कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या हुकूमशहांचाच आहे. लष्करी हुकूमशाह्या, धर्मगुरूंच्या हुकूमशाह्या, राजेशाह्या— हे सगळे हुकूमशाहीचेच प्रकार आहेत. त्याप्रमाणेच फॅसिझम हाही हुकूमशाहीचा प्रकार आहे. पण उरलेल्या हुकूमशाह्या जनतेच्या पाठिंब्यावर अस्तित्वात येत नाहीत; जनतेच्या पाठिंब्याची त्यांना गरजही नसते. फॅसिझम ही वेगळ्या प्रकारची हुकूमशाही आहे. ह्या हुकूमशाहीला जनतेतील एका मोठ्या गटाचाच सक्रिय पाठिंबा असतो. हजारो शिस्तबद्ध, कृतिप्रवण कार्यकर्ते ह्यांच्या ताकदीवर फॅसिझम उभा राहत असतो. निदान इटली, जर्मनीत तो अशा प्रकारे उभा राहिला. हे हजारो लोक भाडोत्री नसतात. ते ध्येयवादी आणि निष्ठावंत असतात. प्राण देण्यास आणि घेण्यास हे अनुयायी तयार असतात. अशा हजारो निष्ठावंत कार्यतत्पर कार्यकर्त्यांची फळी उभी करणे ह्यात फॅसिझमचे यश असते. जर्मनीसारख्या सहा-सात कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशात तीन—साडेतीन कोटी मतदान होते. हिटलरला मिळालेली सव्वा कोटी मते ही बहुसंख्या नव्हे, तरी हे सव्वा कोटी काही भांडवलदार नव्हते. ह्या श्रद्धावान अनुयायांच्या ताकदीवर हिटलर उभा असतो. म्हणून फॅसिझमला दास्याचे व दारिद्र्याचे जतन करून मालक व धनवान ह्यांच्या संरक्षणार्थ प्राणपणाने लढणारी दासांची एक निष्ठावंत सेना हवी असते. फॅसिझमचे यश बेड्यांच्या संरक्षणार्थ प्राणपणाने लढण्याची प्रेरणा कैद्यांच्या मनात प्रबल करण्यात असते.

ह्यासाठी फॅसिझमला तत्त्वज्ञान लागते. ते तत्त्वज्ञान जितके धूसर व अंधुक असेल आणि जितके आकर्षक असेल तितके चांगले. परंपरावादी मनाला सर्वांत आकर्षक परंपरा असतात. म्हणूनच फॅसिझम परंपरा, धर्म, राष्ट्र, पंथ ह्यांच्या वैभवाची गीते गात असतो. फॅसिझमला धर्मगुरू आणि साधुसंत आपल्या पाठिंब्यासाठी हवे असतात. स्पेनमध्ये रोमन कॅथॉलिकांनी लवकर शरणागती द्यावी ही मुसोलिनीची अपेक्षा. केवळ फौजांनी स्पेन जिंकणे लवकर जमत नाही म्हणून मुसोलिनीने फ्रँकोला पाठिंबा देणारे पोपचे फर्मानही काढवले होते! फॅसिस्ट धार्मिक नसतात, पण धर्म आणि राष्ट्रपरंपरा ह्यांचा ते

कुशल वापर करीत असतात. मुसोलिनी रोमला जुन्या वैभवापर्यंत नेण्याची पुन्हा प्रतिज्ञा करीत होता. हिटलरला जगाचे स्वामी होण्याचा हक्क असणारा जो नॉर्डिक वंश, त्याचा मोठा आधार वाटे. जपान म्हणजे तर नेहमीच उगवत्या सूर्याचा देश. म्हणून हुकूमशहांना ते धार्मिक नसूनही धर्माचा वापर सोयीचा असतो. फॅसिस्ट कधी संत नसतात, पण आपल्या काळातील साधुसंतांचे आशीर्वाद मिळवण्यात फॅसिस्टांना यश येत असते. जसे राज्यकर्ते धार्मिक नसतात तसे धर्मगुरूही धार्मिक नसतात. त्यांनाही आपापल्या इस्टेटीचे संरक्षण करण्याचे हमी देणारे हवेच असतात. चतुर साधुसंतांनासुद्धा आपला आशीर्वाद घेणारी सत्ता हवीच असते. म्हणून फॅसिझम इतिहास, परंपरा, राष्ट्र, वैभव ह्या सगळ्यांच्या घोषणा करीत असतो. असल्या प्रकारचे आधार फॅसिझमला लागतातच. कारण कोणते तरी भ्रम पक्केपणी मनात रुजवल्याशिवाय आत्महत्या करणारे पिसाट श्रद्धाळू मन जन्माला घालता येत नाही. शुद्धीवर असणारी माणसे गुलामगिरी संपवून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करणार. पूर्वी रणांगणावर सैन्याला दारू पाजली जात असे. नव्या जगात तशीच धुंदी आणणारे तत्त्वज्ञान पाजण्याचा प्रयत्न होतो.

ह्या ठिकाणी एक बाब आपण समजून घेतली पाहिजे. नाही तर पुन्हा एकदा चिकटपट्टीच्या आहारी जाऊन आपण बाटलीतला मुद्दा विसरूनच जाऊ. फॅसिस्टांना धर्म, परंपरा, संस्कृती, राष्ट्र ह्यांच्याविषयी प्रेम नसते. गुंगी आणण्यासाठी ही मादक द्रव्ये चांगली आहेत, इतकाच त्यांचा मुद्दा असतो. पण जर एखाद्या राष्ट्रात नशा चढण्यासाठी ही द्रव्ये उपयोगी नसली तर फॅसिस्टांच्यासाठी धर्म महत्त्वाचा नसून नशा महत्त्वाची आहे ! आणि जर धर्मामुळे नशा येत नसेल तर मग फॅसिस्ट त्या त्या समाजात नशा आणणारी द्रव्ये कोणती, ह्याचा शोध घेतील. पाकिस्तानात नशा आणण्यासाठी इस्लाम लागतो. म्हणून सर्वत्र इस्लाम नशा आणण्यासाठी उपयोगी पडेल असे नाही. अफगाणिस्तानात युद्धज्वर वाढवण्यासाठी इस्लामपेक्षा पाकिस्तानविरोध सोयीचा असतो. कुणाला धर्मापेक्षा वंश सोयिस्कर असतो. कुणाला भाषा सोयिस्कर असते. म्हणून खरा मुद्दा जनतेला भ्रमात ठेवून नशा व गुंगी आणणे हा असतो. जे नशेला उपयोगी ते फॅसिस्टांना उपयोगी. ह्यामुळे धर्म व परंपरांचे नाव न घेताही फॅसिस्टांना नवी चलनी नाणी वापरता येतातच. घोड्याला चार पाय असतात हे खरे आहे. धर्म, राष्ट्र, परंपरा ह्यांचा वापर फॅसिस्ट करतात हेही खरे आहे. पण चार पाय असणारा घोडाच असतो हे खरे नाही. म्हणून धर्माचे नाव न घेणारे फॅसिस्ट नसतातच ह्या भ्रमात कुणी राहू नये.

फॅसिझम हे एक आक्रमक तत्त्वज्ञान आहे. इतरांच्यावर गुलामगिरी लादणे हे फॅसिझमचे ठळक वैशिष्ट्य आहे. इटलीने ॲबिसिनियावर गुलामगिरी लादली, जर्मनीने ऑस्ट्रिया-पोलंडवर गुलामगिरी लादली, जपानने कोरिया-मांचूरिया येथे गुलामगिरी लादली. पण काही फॅसिस्ट इतके महत्त्वाकांक्षी नसतात. आपल्याच देशाच्या आत आपल्या प्रजेवर

गुलामगिरी लादणे, एवढीच त्यांची महत्त्वाकांक्षा असते. स्वतःच्या चतुःसीमेबाहेर ते शांतता-वादी राहायला तयार असतात. कारण आपली जनता नुसती गुलाम करणे फॅसिझमला पुरत नाही. कोणत्या तरी ध्येयवादाने लोक मारले जावे लागतात. असा मारून टाकणारा ध्येयवाद नसला तर फॅसिस्ट मंडळी उरलेल्यांच्या वाऱ्याला जात नाहीत, ती आपल्याच सीमेत गप्प बसतात. अर्जेन्टिनामध्ये पेरॉंचे स्वरूप असे आहे. स्पेनमध्ये फ्रँकोचे स्वरूप असे आहे. म्हणून सामान्यपणे फॅसिझम परराष्ट्र-राजकारणात आक्रमक असतो हे खरे असले तरी फॅसिझमचे ते निर्णायक गमक नव्हे. इतरांच्यावर गुलामगिरी लादणे हे फॅसिझमचे कायम वैशिष्ट्य आहे, पण हे इतर म्हणजे परराष्ट्रीयच असले पाहिजेत अशी काही शर्त नाही. स्वदेशबांधव जरी गुलाम करता आले तरी काही फॅसिस्टांना तितके यश पुरे वाटते.

# लोकशाही : अन्वय आणि अर्थ

१२ जून १९७५ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याविषयी न्यायालयात दीर्घकाळ चालू असलेल्या खटल्याचा निकाल लागला. हा निकाल इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध लागला. आणीबाणी जाहीर झाल्यामुळे आज ज्या विपरीत राजकीय अवस्थेत सर्व भारत देश सापडलेला दिसतो त्या अवस्थेचा आरंभ या खटल्याच्या निकालापासून होतो. तसे पाहिले तर या खटल्यात विलक्षण असे काहीही नव्हते. प्रत्येक निवडणुकी-नंतर निवडणुकीत पडलेले उमेदवार अशा प्रकारे न्यायालयाकडे धाव घेतच आलेले आहेत. अधूनमधून काही खटल्यांच्या बाबतीत न्यायालयांनी विजयी उमेदवारांच्याविरुद्ध निकाल दिलेले आहेत. ज्या वेळेला न्यायालय अशा प्रकारे निकाल देते आणि विजयी उमेदवाराच्या विरुद्ध जाऊन त्याला दोषी ठरवते, त्या त्या वेळी न्यायालयांनी फक्त निवड-णूक रद्द केलेली नाही तर त्याबरोबर दोषी ठरलेल्या उमेदवाराला सहा वर्षांसाठी निवड-णुकीस उभे राहण्यास व मतदान करण्यासही अपात्र ठरवले आहे. असे अनेक खटले भारतात चालू असतात. यांपैकी उत्तर प्रदेशातील रायबरेली मतदारसंघातून निवडून आलेला उमेदवार भ्रष्टाचार करून अवैध मार्गाने निवडून आलेला आहे, असे पडलेल्या उमेदवाराचे मत होते. तशी त्याने न्यायालयाकडे मागणी केली होती. न्यायालयाने ही मागणी मान्य केली आणि विजयी उमेदवाराची निवड रद्द ठरवली. यापूर्वी अशा प्रकारे मुख्य मंत्री भ्रष्टाचारी ठरलेले आहेत. त्यांना निवडणुकीस अपात्र ठरवण्यात आले आहे. त्याचे एक ठळक उदाहरण द्वारकाप्रसाद मिश्र यांचे होते. केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्रीही असेच अपात्र ठरलेले आहेत. त्याचे एक ठळक उदाहरण डॉ. चन्ना रेड्डी हे आहे!

आपल्या देशात न्यायालयांनी भ्रष्टाचारी म्हणून ठरवलेल्या उमेदवाराचा राजकीय मृत्यू व्हावाच असा नियम नाही. टी. टी. कृष्णम्माचारी यांच्यावर दोषारोप ठेवल्यामुळे त्यांना मंत्रिमंडळातून जावे लागले, पण त्यानंतर ते पुन्हा मंत्रिमंडळात आले. आज के. डी. मालवीय असेच मंत्रिमंडळात आहेत. न्यायालयांनी भ्रष्ट म्हणून दोषारोप ठेवला ही गोष्ट आपल्या देशात मंत्री होण्यासाठी अपात्रतेची मानली जात नसे. पण ज्या वेळी न्यायालय एखाद्या माणसास नुसते भ्रष्ट ठरवीत नाही तर त्यापुढे जाऊन निवडणुकीस अपात्र ठरवते, अशा माणसांना कार्यकारिणीत जागा देऊन पंतप्रधानांचे

निकट सल्लागार म्हणून वावरण्याची सोय असते. असे द्वारकाप्रसादांचे झाले. अशा मंडळींना गव्हर्नर होण्याचीही संधी मिळते, हे चन्ना रेड्डींचे झाले. मुद्दाम या बाबीकडे यासाठी लक्ष वेधायचे की, आणीबाणी जाहीर होण्यापूर्वी ज्या प्रकारच्या घटना या देशात घडत होत्या त्यापेक्षा आणीबाणी जाहीर झाल्यामुळे तत्त्वतः फार मोठा फरक असणारी घटना घडलेली नाही. जो काही फरक असेल तो प्रमाणाचा आहे, प्रकाराचा नाही. पूर्वी न्यायालयाचे निर्णय प्रथम अमलात आणून नंतरच्या व्यवहाराने हे न्याय-निर्णय पुसून टाकले जात, नवीन घडले असेल तर ते इतकेच की न्यायनिर्णय अमलातही न आणता या वेळी पुसून टाकण्यात आला! रायबरेलीचा खटला हा एक सामान्य खटला होता. पण या मतदार संघातून स्वतः पंतप्रधान इंदिरा गांधी लोकसभेच्या उमेद-वार असल्यामुळे उमेदवाराच्या असामान्य स्थानामुळे हा खटला असामान्य ठरला. या देशातील पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी वैयक्तिक आकस फारसा कुणाला नव्हता. दुसरे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्याविषयी सर्वसामान्य जनतेत किंवा राजकीय पक्षांत पाच-दहा वरिष्ठ काँग्रेस नेते सोडले तर कुणाला वैयक्तिक आकस नव्हता. इंदिरा गांधी यांचे स्वरूप निराळे होते. काँग्रेस पक्षात काय आणि काँग्रेस पक्षा-बाहेर काय, त्यांच्याविषयी वैयक्तिक आकसाचे प्रमाण फार मोठे होते. विशेषतः त्या पंतप्रधान झाल्या आणि लगोलग आलेल्या १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा मोठ्या प्रमाणात पाडाव झाला. यामुळे विरोधी पक्षांच्या सत्तेवर येण्याच्या आशा प्रज्वलित झाल्या आणि काँग्रेस पक्षात पंतप्रधानांना नामधारी करण्याची प्रक्रिया जोरात सुरू झाली. याचा शेवट, १९६९ साली काँग्रेसचा राष्ट्रपतिपदाचा अधिकृत उमेदवार पंतप्रधानांनी पाडून दाखवावा, काँग्रेस संघटनेची दोन शकले उडावी, यात झाला आणि तरीही इंदिरा गांधीच पंतप्रधान राहिल्या! १९७१ सालच्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधानांनी जो अभूतपूर्व विजय मिळवला त्यामुळे काँग्रेस पक्षात त्यांच्याविरुद्ध बोलण्याची शक्ती असणारा माणूस उरला नाही व विरोधी पक्ष वैफल्यग्रस्त झाला. इंदिरा गांधींच्याविरुद्ध वैयक्तिक आकस असण्याचे हे एकमेव नसले तरी एक प्रमुख कारण म्हटले पाहिजे. अशा या वातावरणात अलाहाबाद हायकोर्टामध्ये पंतप्रधानांच्या विरुद्ध खटला चालू होता. न्यायमूर्ती सिन्हा यांनी या खटल्याचा निकाल देताना व्यक्तिशः इंदिरा गांधींच्याविषयी असे मत दिले की, त्या अविश्वसनीय साक्षीदार आहेत. त्यामुळे न्यायालय त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू शकत नाही. एकाच प्रश्नाविषयी शपथेवर त्या वेगवेगळी मते न्यायालयात देतात! सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाच्या या शेऱ्याविषयी मत-प्रदर्शन केलेले नाही. म्हणून हायकोर्टाचा हा शेरा आजही अबाधित राहिलेला आहे! याखेरीज न्यायमूर्तींनी पंतप्रधानांची निवड अवैध ठरवली, त्यांना सहा वर्षे निवडणुकीत सहभागी होण्यास न्यायालयाने अपात्र ठरवले व भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध मानला. उच्च न्यायालयाचा हा निवाडा ज्या दिवशी जाहीर झाला त्या दिवशी विरोधी पक्ष आनंदाने बेभान झाला! निवडणुकीच्या मार्गाने जी बाई हटवणे अशक्यच दिसू लागलेले

होते तिचा राजकीय मृत्यू न्यायालयाच्या निर्णयामुळे घडून येतो आहे याविषयी सर्वजण खुशीत होते. लोकशाही राजकारणात विरुद्ध पक्षांनी मतदानाच्या जोरावर सत्तान्तर घडवून आणावे ही अपेक्षा असते. मतदानाच्या शक्तीविषयी निराश झालेल्या मंडळींनी न्यायालयाच्या आशेवर राजकीय भवितव्याचे निर्णय घ्यावे ही लोकशाहीच्या दृष्टीने फार स्पृहणीय गोष्ट आहे असे त्याही वेळी माझे मत नव्हते. आजही तेच माझे मत कायम आहे.

विरोधी पक्षांनी पंतप्रधानांनी राजीनामा द्यावा अशी जोरदार मागणी केली. कॉंग्रेस पक्ष अधिकारावर असला व कायम राहिला तरी चालेल, जगजीवनराम अगर यशवंतराव चव्हाण यांच्यापैकी कुणी पंतप्रधान झाले तरी चालेल, पण इंदिरा गांधी नको, अशी भूमिका विरोधी पक्षांनी घेतली. एखाद्या पक्षाला आणि त्याच्या कार्यक्रमाला विरोध करण्याऐवजी व्यक्तीला विरोध करण्यात आणि व्यक्तीवर राजकारण केंद्रित करण्यात लोक-शाहीची मोठी प्रगती होते, असे कुणीही प्रामाणिक लोकशाहीवादी मानणार नाही. मागच्या पुढच्या घटनांचा फारसा अंदाज न आलेली मंडळी सिन्हांच्या न्यायनिर्णयाने अतिशय आनंदित झाली होती. १२ जून रोजी सर्वप्रथम माझी गाठ दुपारी एका जन-संघाच्या महत्त्वाच्या नेत्याशी पडली. आपला आनंद शब्दातून व्यक्त होऊ नये याविषयी तो अटोकाट प्रयत्न करत होता. लोकशाहीत न्यायालय किती बलवान असते आणि निर्भय न्यायाधीश देशाच्या राजकारणावर केवढा प्रभाव टाकू शकतो, याविषयी तो मला माहिती सांगत होता! मी या निर्णयामुळे अत्यंत अस्वस्थ झालो होतो. असल्या प्रकारचे निर्णय लोकशाही समाप्त तर करणार नाहीत, अशी भीती मी बोलून दाखवली. पण आमच्या मित्राला या चिंतेतील गांभीर्य लक्षात आले नाही. यानंतर माझी भेट समाज-वादी पक्षाच्या एका खासदाराशी झाली. त्यांना हा न्यायनिर्णय खरोखरच न्याय्य आहे की काय, याविषयी शंका वाटत होती. पण एकंदरीने झाली ही घटना बरी झाली, असे मत त्यांनी दिले. सायंकाळी समाजवादी पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याची माझी भेट झाली. ते म्हणाले, इंदिरा गांधी चिडणार, संतापणार, कुरकुरणार, पण चार-आठ दिवसांत त्या राजीनामा देणार, हे नक्की आहे. आजच जर त्यांनी राजीनामा दिला असता तर ते शोभून दिसले असते. मी मात्र अस्वस्थच होतो. त्याच दिवशी सायंकाळी मी व्याख्यानात असा उल्लेख केला आहे की, ज्या लोकशाहीविषयी मी बोलत आहे ते संविधान जर यापुढे शिल्लक राहिले तरच या चर्चेला अर्थ आहे. ते शिल्लक राहील असे आता खात्रीलायक रीतीने सांगणे कठीण आहे.

आपल्या देशात लबाड्या भरपूर चालतात. त्यामुळे अमुक एक बाब नैतिक आहे की नाही, त्याविषयी चर्चा करणे फार कठीण झालेले आहे. पंतप्रधानांनी राजीनामा दिला असता तर ते शोभनीय कृत्य झाले असते, असे म्हणणारी मंडळी खरोखरच इंदिरा

गांधींनी राजीनामा दिला असता तर त्यांच्या सचोटीचे कौतुक करण्यास पुढे आली असतीच असे नाही, कदाचित हा न्यायनिर्णय त्यांनी आपल्या सोयीने चारित्र्यहननासाठी वापरलाही असता आणि हे फक्त विरोधी पक्षांकडूनच घडते असे नाही, यापेक्षा शेकडो पट अधिक आणि घृणास्पद स्वरूपात सत्ताधाऱ्यांच्याकडूनही घडते! ज्या पद्धतीने गेले ९-१० महिने जयप्रकाशांचे चारित्र्यहनन चालू आहे ते कमी घृगास्पद आहे असे मला वाटत नाही. पण तरीही एक प्रश्न शिल्लकच राहतो. न्यायमूर्ती सिन्हा यांचा न्यायनिर्णय हा हायकोर्टाचा निर्णय होता तेव्हा पंतप्रधानांनी न्यायालयाचा आदर करणे आवश्यक होते की नाही, या प्रश्नाचे उत्तर देता येणे कठीण आहे. कारण न्यायालये आणि शासन यांचा झगडा गेली दहा वर्षे क्रमाने उग्र होत आलेला आहे. ' ही न्यायालये प्रतिगामी असून जनतेच्या प्रगतीला व राष्ट्राच्या सामर्थ्याला अडथळा निर्माण करत आहेत ' असे शासनाचे मत होते आणि ' या राज्यकर्त्यांना वेळोवेळी धडा शिकवला पाहिजे ' असे मनात ठेवून वागल्याप्रमाणे न्यायालये वागत होती. यातूनच ज्येष्ठताक्रम डावलून अजितनाथ रे यांची सरन्यायाधीशपदी नेमणूक झाली. न्यायसंस्था आणि शासन यांचा झगडा चालू असताना आणि न्यायाधीशांच्याविषयी शासनाच्या मनात फारसा आदर राहिलेला नसताना जर न्यायनिर्णय पंतप्रधानांच्या विरोधी गेला तर पंतप्रधान हे निर्णय पाळतील या भ्रमात राहण्याचे कारण नव्हते! संस्थानिकांच्या विशेष हक्कांच्या बाबत जेव्हा शासनाचा संसदेत पराभव झाला तेव्हा जे घटनादुरुस्ती करून जमले नाही ते संसदेला गुंडाळून ठेवून राष्ट्रपतींच्या कार्यकारी आज्ञेने साधण्यात आले! आणि ही कार्यकारी आज्ञा जेव्हा न्यायालयांनी रद्द केली तेव्हा काही काळ थांबून नवी घटनादुरुस्ती आणण्यात आली व तिला पूर्वकालीन परिणामकारकता देण्यात आली! बँक राष्ट्रीयीकरणाच्या बाबतीतसुद्धा हाच प्रकार घडलेला होता. जर एखादा प्रश्न शासनाने प्रतिष्ठेचा मानला तर मग न्यायालय आणि संसद दोघांनाही गुंडाळून ठेवण्याची शासनाची तयारी असते, ही गोष्ट एव्हाना स्पष्ट झालेली होती! यानंतर न्यायनिर्णयाची बूज पंतप्रधानांनी ठेवावी ही अपेक्षा स्वप्नाळू मानणे भाग आहे. इतकी तयारी तर आणीबाणीपूर्वीचीच होती.

मला स्वतःला न्यायमूर्ती सिन्हा यांचा निर्णय कधीच समाधानकारक वाटला नाही. उमेदवार निवडणूक खर्चाची मर्यादा ओलांडीत नसतात काय? प्रायः सत्ताधारी पक्षाचे उमेदवार खर्चाची मर्यादा नेहमीच ओलांडतात. प्रांतिक मंत्र्यांनासुद्धा विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी किमान तीन लक्ष रुपये खर्च येतोच. विशेष अटीतटीच्या जागांचा खर्च पाच लाखांची मर्यादाही ओलांडतो. आणि इतके खर्च तर पुष्कळदा साखर कारखान्यांच्या निवडणुकीतही होतात! त्यामुळे रायबरेली मतदारसंघात पंतप्रधानांच्या निवडणुकीचा खर्च ही निवडणूक लोकसभेची असल्यामुळे किमान वीस लाखांहून अधिक झालेला असणार, हे उघड आहे. तेव्हा निवडणूक खर्चाची मर्यादा

ओलांडली गेली यात वाद नाही आणि शासकीय कर्मचाऱ्यांचा वापर सत्ताधारी पक्ष निवडणुकीत सर्रास करतो. सगळ्या शासनयंत्रणेचा वापर निवडणुकीत होत असतो, हे खरे आहे. ते हा इंदिरा गांधींनी खर्चाची मर्यादा ओलांडली व शासकीय व्यक्तींचा वापर केला यात खोटे असे काहीच नाही. प्रश्न असा आहे की, न्यायालयात जो पुरावा सादर झाला त्या पुराव्यावरून न्यायमूर्तींनी काढलेले निष्कर्ष समर्थनीय आहेत काय ? मला ते कधी समर्थनीय वाटले नाहीत. म्हणून सिन्हांचा न्यायनिवाडा न्यायाधीशाचा निर्णय आहे असे मला वाटत नाही. कोणत्याही कायद्यात न्यायाधीशांना काही अवकाश असतो. हा अवकाश निष्पक्षपातीपणे वापरणे हे न्यायाधीशांचे काम आहे. सिन्हांनी याच ठिकाणी पक्षपात केला असे मला वाटते. असा पक्षपात करण्यास कायद्यातच जागा होती. म्हणून इकडे सुप्रीम कोर्टात अपील चालू असताना संसदेने निवडणूक कायदा दुरुस्त केला व त्याला पूर्वकालीन परिणामकारकता दिली. या दुरुस्त्या जर झाल्या नसत्या तर सुप्रीम कोर्टाचा निर्णय इंदिरा गांधींना अनुकूल लागण्याची शक्यता नव्हती ! व्यक्तिशः मी मात्र सुप्रीम कोर्टाचा निर्णय इंदिरा गांधींच्या विरुद्ध गेल्यानंतरसुद्धा हा न्यायनिर्णय नव्हे असेच मानले असते.

संसदेने निवडणूक कायद्यात ज्या दुरुस्त्या सुचवल्या आहेत त्यांचे स्वरूप असे आहे— एखादी व्यक्ती नेमकी कोणत्या दिवसापासून उमेदवार झाली याविषयी संदिग्धता होती. म्हणून न्यायालये या बाबतीत निर्णय देऊ शकत. खरे म्हणजे अर्ज परत घेण्याची तारीख ज्या दिवशी संपते त्या दिवशीच्यानंतर कोणताही उमेदवार हा उमेदवार मानायला पाहिजे. आजही संसद हे मान्य करीत नाही ! ज्या दिवशी उमेदवार निवडणुकीचा फॉर्म भरतो त्या दिवसापासून तो उमेदवार आहे असे नवा कायदा सांगतो ! ! सिन्हांनी काँग्रेस पक्षाने इंदिरा गांधींना रायबरेलीचे तिकिट दिले त्याच्या पूर्वीपासून त्यांना उमेदवार ठरवले आहे. म्हणजे दुरुस्तीपूर्वीचा कायदा फॉर्म भरण्यापूर्वीच एखाद्याला उमेदवार ठरवू शकत होता ! दुरुस्त कायद्याने नागरिकाला निवडणुकीचा अर्ज भरल्यानंतर उमेदवार समजावे, अशी भूमिका घेतली आहे. या मुद्द्यावर सिन्हांनी पक्षपात केला व इंदिरा गांधींना फॉर्म भरण्यापूर्वी, तिकिट मिळण्यापूर्वी उमेदवार गृहीत धरले, ती चूक आहे असे मला वाटते आणि दुरुस्त कायदा हाच योग्य आहे असेही मला वाटते. दुसरी महत्त्वाची दुरुस्ती खर्चाबाबत आहे. उमेदवाराचा निवडणूक खर्च म्हणजे काय ? न्यायालये या बाबतीत विविध भूमिका घेऊ शकत. सर्वसामान्यपणे न्यायालये निवडणूक जाहीर झालेल्या दिवसापासून उमेदवाराने केलेला खर्च हा निवडणूक खर्च गृहीत धरीत. पुष्कळदा तर पक्षाने केलेला उमेदवारासाठी खर्च हाही यात गृहीत धरला जाई. नव्या दुरुस्तीमुळे उमेदवाराने स्वतः केलेला खर्च आणि तोही फॉर्म भरल्यादिवसापासून केलेला खर्च इतकाच निवडणूक खर्च ठरवला आहे. इंदिरा गांधींनी ही खर्चाची मर्यादा ओलांडली असे खालच्या न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाही, म्हणून अपिलात हा प्रश्न नव्हता. एका दुरुस्तीच्या

अन्वये निवडणूक आयोगाने मान्य केलेली चिन्हे म्हणजे धार्मिक बाबीचा निवडणुकीसाठी वापर असे मानू नये हा निर्णय दिला आहे. निवडणूक आयोग जी चिन्हे ठरवील त्यातूनच एक उमेदवाराने निवडावे लागते. अखिल भारतीय पक्षाला भारतभर हीच चिन्हे निवडावयाची असतात. न्यायालयांना ही आयोगाने ठरवलेली चिन्हे धार्मिक म्हणण्याचा हक्क असू नये, हे कायदा करून सांगावे लागावे, ही गोष्ट न्यायसंस्थेच्या प्रामाणिकपणाविषयी शासन किती साशंक आहे यावर प्रकाश टाकणारी समजली पाहिजे. एखाद्या सरकारी नोकराने जर राजीनामा दिला तर या व्यक्तीची सेवामुक्ती कोणत्या दिवसापासून मानण्यात यावी ? राजीनामा मंजूर करणाऱ्या पत्रात जी तारीख असेल ती सेवामुक्तीची तारीख समजावी, यासाठीही एक कायदा करावा लागला ! एखाद्या शासकीय नोकराने शासकीय काम म्हणून जे कार्य केले त्याचा उमेदवाराला जर अप्रत्यक्षपणे फायदा झाला तर तो भ्रष्टाचार समजू नये, असाही एक कायदा आहे ! संसदेने निवडणूक कायद्यात जी दुरुस्ती केली आहे तिचे स्वरूप अशा प्रकारचे आहे. प्रायः या दुरुस्त्या न्यायालयीन आग्रही व एकांतिक भूमिकांना समंजस करणाऱ्या अशाच आहेत. त्यामुळे या दुरुस्त्यांवर फारसा आक्षेप घेण्यास जागा नाही, असे मला वाटते.

आक्षेपार्ह बाब निराळीच आहे. हायकोर्टने ज्या मुद्द्यावर इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरवली त्या मुद्द्याचे स्वरूप असे होते की, तुम्ही न्यायनिर्णय असमाधानकारक म्हणू शकता, न्यायाधीशांना यापेक्षा वेगळ्या पद्धतीने कायद्याचा अर्थ लावता आला असता असे म्हणू शकता, सुप्रीम कोर्टातील एका न्यायमूर्तींनी तसा प्रयत्न केला आहे, पण सिन्हांनी लावलेला कायद्याचा अर्थ चूक आहे असे तुम्ही म्हणू शकत नाही ! म्हणून निवडणूक कायद्यात दुरुस्ती केल्याशिवाय इंदिरा गांधी दोषमुक्त होणे शक्य नव्हते. आक्षेपार्ह असेल तर ते हे की, शासनाने कायदेच बदलले आणि आपल्याला अनुकूल निर्णय यावा याची व्यवस्था केली ! कायदे बदलणे आणि त्यांना पूर्णकालीन परिणामकारकता देणे याचा अर्थ संसदेतील बहुमताच्या जोरावर शासनाने स्वतःच न्यायाधीश होणे व आपणच आपल्याला निर्दोष सोडणे हा होतो ! पंतप्रधानांनी नेमके हे केले आहे. म्हणून सुप्रीम कोर्टात जे झाले तो अपिलाचा निर्णयच नव्हता. अपिलात पुरावा तोच असतो. कायदे तेच असतात. कायद्याचा वापर योग्य प्रकारे झाला की नाही, पुराव्याचा योग्य अर्थ लावला की नाही, हे वरचे न्यायालय पाहते. अपील चालू असताना कायदेच बदलले तर मग ते अपील राहिले नाही ! आज जे कायदे आहेत ते जर त्यावेळी असते तर जो निर्णय आम्ही देतो तो सिन्हांनी दिला असता असे मत एका न्यायमूर्तींनी दिले आहे ! म्हणून नैतिकता पाहायची तर पंतप्रधान खटला जिंकल्या नसून खटला हरल्या आहेत. मला मात्र खटल्यांच्या निकालावर राजकारणाच्या दिशा अवलंबून असाव्यात, भारतीय लोकशाहीचे जगणे–मरणे अवलंबून असावे ही गोष्ट फारशी शुभ वाटत नाही.

इंदिरा गांधींच्या खटल्याने पुन्हा एकदा राजकीय वस्तुवाद सिद्ध झालेला आहे. राजकारणाला ध्येयवादाची एक पातळी असते. त्याप्रमाणे व्यावहारिक वस्तुवादाची एक पातळी असते. राजकारणातील वस्तुवाद असा की लोकशाहीची उभारणी लोकशाहीवर श्रद्धा असणाऱ्या जनतेच्या जागृत व संघटित शक्तीच्या आधारे व्हायला हवी. भारतीय लोकशाहीच्या परंपरेत जनतेच्या जागृतीचे प्रमाण फार अल्प आहे. विरोधी पक्षांजवळ काय किंवा अधिकारारूढ पक्षाजवळ काय, संघटनासामर्थ्य मुळातच कमी आहे. काँग्रेस सत्तेवर असल्यामुळे त्या मांडवात गर्दी जास्त आहे, पण ही गर्दी म्हणजे संघटना नव्हे. सार्वजनिक जीवनात आपले संघटनात्मक कार्य अजून फारच अपक्व आहे. बलवान संघटना कुणाच्याच जवळ नाहीत आणि जनता फारशी जागृत नाही. ही अवस्था जर अस्तित्वात असेल तर मग आपण लोकशाही कोणत्या सामर्थ्यावर टिकवणार आहोत? भारतीय लोकशाही जनतेच्या शक्तीवर कधी बलवान झाली नाही. लोकशाहीच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा असणारे नेते इतकाच आमच्या लोकशाहीला आधार राहिला आहे.

ज्या वेळेला लोकशाही नेत्यांच्या आधारे टिकून असते त्या वेळेला नेत्याला ती परवडली पाहिजे, ही लोकशाही जिवंत असण्यासाठी आवश्यक अट असते. जी लोकशाही परवडत नाही ती आम्ही गुंडाळून ठेवू, जी लोकशाही परवडते ती आम्ही चालू ठेवू आणि आम्ही लोकशाहीवादी आहोत म्हणून लोकशाही या देशात क्रमाने रुजवत नेऊ अशी भूमिका जर नेत्यांनी घेतली तर मग लोकशाही नेहमीच दुबळी आणि वरवरची रचना ठरत असते. कारण लोकशाही ही मूल्यांच्या आधारे उभी राहणारी समाजव्यवस्था असते. बहुमताचे राज्य म्हणजे लोकशाही. पण या बहुमताने अल्पमताचे रक्षण केले पाहिजे. अल्पमताला बहुमत होण्याची मुक्त संधी दिली पाहिजे. या बहुमताने कायद्याच्या आधारे राज्य केले पाहिजे. आणि सर्वच कायदे काही मूल्यांना सुसंगत असले पाहिजेत. म्हणजे आपण शेवटी मूल्यांवर आलो. आपण अल्पमतात येण्याचा धोका शिल्लक ठेवणे हे गैरसोयीचे, बहुमताने इच्छेनुसार काम करण्याच्या ऐवजी कायद्याप्रमाणे काम करणे हेही गैरसोयीचे आणि मूल्ये सांभाळणे हे तर सर्वांनाच गैरसोयीचे! म्हणून लोकशाही ही राष्ट्र व जनता यांना सर्वांत सोयिस्कर रचना असते. पण विरोधी पक्ष व अधिकारारूढ पक्ष या दोघांनाही ती वेळोवेळी गैरसोयीची ठरणारीही रचना असते. कारण मूल्ये ही सर्वांच्या कल्याणासाठी असतात आणि सर्वांचे कल्याण ही बाब काहींना गैरसोयीची असते! जर सत्ताधारी नेता सोयिस्कर पडेल आणि परवडेल तितकी लोकशाही शिल्लक ठेवू असे म्हणू लागला तर त्यामुळे लोकशाही रुजण्याची शक्यता कमी असते. भारतात तरीही पंचवीस वर्षे लोकशाही टिकली. याचे कारण हे की लोकशाही रुजण्याचे प्रमाण कमी होते. या सत्याच्या अर्ध्या भागाचा उरलेला अर्धा भाग हा आहे की जनतेची शासनावर आपल्या इच्छा लादण्याची जागृत संघटित शक्तीही नव्हती. त्यामुळे विद्रोहाचे प्रमाणही अल्प होते.

ही प्रक्रिया आजची नाही. तिला फार पूर्वीच आरंभ झालेला आहे. लोकशाही केवळ कायद्यावर टिकत नसते. तर ती कायद्यात नसणाऱ्या पण मूल्ये सांभाळणाऱ्या नव्या प्रथा–परंपरा बलवान करण्यावर टिकत असते. या प्रथा–परंपरा आपण मूल्यानुसारी निर्माण करायला हव्या, त्या केल्या नाहीत. उलट मूल्यविरोधी प्रथा निर्माण करून कायदेही व्यवहारात आपण निष्प्राण केले. ही गोष्ट लोकशाही बलवान करणारी नसून लोकशाहीला गाभ्यातूनच शुष्क करीत नेणारी आहे, हे आपण ओळखले पाहिजे. या विपरीत प्रक्रियेला जुना इतिहास आहे. गव्हर्नर आणि राष्ट्रपती यांनी आपली काल-मर्यादा संपल्यानंतर राजकारण-निवृत्त व्हायला हवे. पण हा संकेत पहिल्या निवडणुकी-पूर्वी आपल्या लोकशाहीने मोडला व राजगोपालाचारींना केंद्रीय गृहमंत्री म्हणून स्वीकारण्यात आले! पहिल्याच निवडणुकीत विधान सभेत पडलेले मोरारजी देसाई मुख्य-मंत्री करण्यात आले! राजाजी निवडून न येताच दोन-अडीच वर्षे लोकशाहीत मुख्य मंत्री राहिले! पुढे तर निवडणुकीत पडलेला मंत्री गव्हर्नर हा अलिखित नियम झाला. सभापती, न्यायाधीश अपक्ष असतात, पण त्यांच्यासमोर निवृत्तीनंतर गव्हर्नर होण्याचे प्रलोभन ठेवण्यात आले. या सर्व घटना लोकशाहीला बलवान करणाऱ्या नसून दुबळ्या करणाऱ्या होत्या. यांना जोडूनच इतर पक्षांतील निवडून आलेले लोक फोडून आपल्या पक्षात घेण्याचा कार्यक्रम सुरू झाला. टी. प्रकाशम् अशा तऱ्हेनेच मुख्य मंत्री झाले! परिणामी विरोधी पक्षांना प्रलोभने दाखवून आपल्या पक्षात आणणे, शासनाच्या विकास-कार्याचा पक्षहितासाठी वापर करणे या प्रथा बलवान होत गेल्या. सत्ताधारी पक्षाने आपण सर्व मार्ग वापरून सत्तेत राहू हे स्पष्ट केल्यानंतर, विरोधी पक्षांनी सर्व प्रकारच्या आघाड्यांना आरंभ केला. म्हणजे त्यांनी आपल्या वागणुकीने हे जाहीर केले की काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी आपणही शक्य ते सर्व मार्ग वापरू! यानंतर दर पाच वर्षांनी निवडणुका होत राहणे एवढीच एक लोकशाही शिल्लक राहत होती, तशी ती राहिली! जी लोकशाही सत्तेला परवडते ती सोयिस्कर असल्यामुळे सोय म्हणून जतन करायची आणि जी गैरसोयीची ठरून परवडत नाही ती लोकशाही गुंडाळून ठेवायची, ही प्रथा आपल्याकडे फार जुनी आहे! आजही यापेक्षा वेगळे काही घडत नाही. आपण जुन्याच पेरलेल्या बीजाची फळे खातो आहोत हे समजून घेणे व व्यक्ती इंदिरा गांधी यांच्याविषयीची आकसबुद्धी सोडणे फार महत्त्वाचे आहे.

लोकशाहीचा खरा आधार जनता असते. जनतेला लोकशाहीविषयी औदासीन्य असेल तर लोकशाही कोसळून पडते. हा राजकारणातला साधा वस्तुवाद आहे. जनतेची भीती नसताना भ्रष्ट व्यवहाराची दीर्घ परंपरा असणारा सत्ताधारी पक्ष लोकशाहीची बूज राखण्यासाठी सत्ता सोडील ही अपेक्षाच चुकीची आहे. न्यायालये हा मानवी संस्कृतीतील संस्कृतीचा भाग असतो. न्यायालये आपला निर्णय देतात. इतकीच त्यांची सत्ता असते. हा निर्णय अमलात आणण्याचे बळ न्यायालयांच्या जवळ नसते. ज्यांच्याजवळ बळ

असते त्यांनी स्वतःला अप्रतिष्ठेचा आणि गैरसोयीचा ठरणारा न्यायनिर्णय आदरपूर्वक स्वीकारायचा ही लोकशाही संस्कृतीची खूण आहे. पण जिथे हा सगळा अभिनयाचाच भाग असतो तिथे अशा संस्कृतीची चर्चा करण्यात अर्थ नसतो. सैन्य एकनिष्ठ असताना, पक्षात निर्विवाद बहुमत, संसदेत निर्विवाद बहुमत असताना आणि लोकक्षोभाची भीती नसताना पंतप्रधानांची निवडणूक रद्द करण्याजोगे न्यायनिर्णय अमलात येत नसतात ! ते अमलात आणणारी शक्तीच अस्तित्वात नसते. एवढा राजकीय वस्तुवाद आपण नव्याने सिद्ध करीत आहोत. स्वार्थ हा माणसाला जन्मजात असतो. या स्वार्थाच्या विरुद्ध जेव्हा नीती उभी राहते त्यावेळी वातावरण सत्तापिपासेचे आणि दंभाचे असेल तर नीतीला स्वतःचे बळ नसते. अधूनमधून लोकशाहीचा अभिनय शिल्लक राहावा इतकेच शासनविरोधी न्यायनिर्णय सरकार स्वीकारीत असते.

इ. स. १९७५ पूर्वीची जुनी लोकशाही मृत झालेली आहे, ती लोकशाही अस्तित्वात आणण्यासाठी जे संविधान १९५० साली मान्य करण्यात आले होते त्याचा अस्थिचर्म-मय सांगाडा बव्हंशी शिल्लक राहिला असला तरी त्यातील प्राण निघून गेलेला आहे, अशा प्रकारची चर्चा ही अर्धसत्य चर्चा आहे हे आपण समजून घ्यावे. पूर्वीही लोकशाही सोयीपुरतीच होती, तेव्हा सांगाड्यात प्राण पूर्वीही नव्हता. याहीपुढे हा सांगाडा टिकवण्याचा प्रयत्न चालू राहणार आहे. नव्या जगातच अशा प्रकारच्या दंभाची अपरि-हार्यता निर्माण झालेली आहे. हा पाडाव लोकशाहीचा नव्हे. या देशात लोकशाही निर्माण व्हावी आणि ती रुजावी यासाठी जनतेची शक्ती वाढवण्याचा आपण प्रयत्नच केला नाही. निवडणुकांचे कर्मकांड जर नियमितपणे चालू राहिले तर आपोआपच लोकशाही परिपक्व होईल असे आपण मानले. आपोआपच एका यांत्रिक घडामोडीतून एक आशयगर्भ सजीव व्यवस्था साकार होईल असे आपण मानले. त्या आपल्या समजुतीचा हा पाडाव आहे. फरक झालेला असेल तर तो जाणिवेत आहे. पूर्वी ही लोकशाही जमिनीत न रुजता हवेत ढगांप्रमाणे तरंगत होती. पण साधारणपणे समाजाची ही जाणीव होती की आपण निवडणुकीच्या मार्गाने सत्तांतर करू शकतो. नव्याने निर्माण झाले असेल तर ते हे की ही जाणीव संपलेली आहे. यापुढे लोकशाहीच्या मार्गाने सत्तान्तर कठीण आहे ही जाणीव तरुणांच्यामध्ये बळावत जाणार आहे. तिचे राजकारणावर होणारे परिणाम भयावह असतील. या कोंडीतून बाहेर पडण्याचा मार्ग हुकूमशाहीविरुद्ध उठाव हा नाही. बलाने बलाचा पाडाव आणि बलाने सत्तेचे अस्तित्व टिकवणे या प्रक्रिया मानवी इतिहासात कधी वर्ज्य नव्हत्या. भारतातही त्या सारेच जण वर्ज्य मानतील याची खात्री नाही. पण या मार्गातून एक हुकूमशाही जाईल इतकेच होणे शक्य आहे, हा लोकशाही निर्माण करण्याचा मार्ग असणार नाही.

लोकशाही निर्मितीचा मार्ग शासनाच्या पोटात जनतेची धास्ती निर्माण करण्याचा असतो.

जागृत झालेल्या जनतेने आपला धाक निर्माण करावा आणि शासनाला योग्य मार्गाने जाण्यास भाग पाडावे, हा लोकशाहीचा मार्ग असतो. जयप्रकाशांनी हात घातला होता तो या मार्गाला. ते स्वतः सत्तेत येऊ इच्छित नव्हते. अमक्यालाच सत्तेत आणावे अशी त्यांची फारशी आग्रही मागणी नव्हती. जे कुणी सत्तेत असतील त्यांच्या मनात सदैव जनतेचा धाक असावा, असे नवे जग ते निर्माण करू पाहत होते. अंतिमतः यातून हितसंबंध असणाऱ्या सर्वांच्याच स्वार्थाला हादरे बसणार होते. जनतेला जागृत करण्याचा व राजकीय शिक्षण देण्याचा हा पहिलाच स्वातंत्र्योत्तर मोठा प्रयत्न होता. नव्या परिस्थितीमुळे हा प्रयत्न आज तरी वाया गेला आहे असे दिसते. पण उद्या पुन्हा हाच प्रयत्न करणे भाग आहे. लोक हा आधार घेऊन लोकशाहीची मांडणी करावी लागते. हा मार्ग अवघड असेल पण त्याला पर्याय नाही.

जूनच्या शेवटच्या आठवड्यात इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली. ही आणीबाणी त्यांनी कधी जाहीर केली याविषयी वाद आहे. काहीजण म्हणतात, ती २६ जूनला जाहीर झाली. काहीजण म्हणतात, ती २५ जूनला जाहीर झाली. शासन प्रायः २५ जूनची तारीख सांगत असते. आपल्याला ती नभोवाणीवरून जाहीर झाली तेव्हा कळले इतकेच काय ते. आणीबाणीच्या घोषणेला फारसा प्रतिकार या देशात झालाच नाही. पाश्चिमात्त्य देशांत आणीबाणी म्हटल्याबरोबर जे चित्र डोळ्यांसमोर येते तसे आपल्या येथे फारसे काही झाले नाही. आणीबाणी पुकारीत असताना शासनाने पूर्वतयारी केलेली असते. गरज पडेल तर उठाव करणाऱ्या बंडखोर शहरांत लष्कर ओतले जात असते. अशा प्रकारे लष्कर शहरांत घुसवण्याची तयारी शासनाने केलेली असणारच. तशी ती केली होती असे मला सत्तेतील एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले, ते बहुधा खरे असणार. आणीबाणी जाहीर करतानाच, गरज पडेल तर लष्कर वापरू, ही भूमिका घ्यावी लागते, यात शंका नाही. पण अशी कोणतीही गरज पडली नाही. भारतातील कोणतेही शहर लष्कराच्या ताब्यात द्यावे लागले नाही. किंबहुना किरकोळ प्रकार सोडले तर कुठे फार मोठा गोळीबारही करावा लागला नाही. आणीबाणी जाहीर झाल्यानंतर तसे फारसे काहीच घडले नाही! शाळा व महाविद्यालये सुरळीतपणे चालू झाली. विद्यार्थी नीट शाळांच्यामधून जाऊ लागले. कारखाने चालूच राहिले. खेळ, बाजार, सिनेमे यांत काही फरक पडला नाही. लोकांचे दैनंदिन जीवन कुठे विस्कळीत झाले नाही. शासनाच्या वतीने या घटनेचे स्पष्टीकरण असे केले जाते की जनतेने उत्स्फूर्तपणे आणीबाणीला प्रचंड पाठिंबा दिलेला आहे. विरोधकांना जनतेत थोडासुद्धा प्रतिसाद नाही, ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे.

आणीबाणीला फारसा प्रतिकार झाला नाही ही गोष्ट खरीच आहे. पण असा प्रतिकार न होण्याची कारणे कोणती हेही आपण समजून घेतले पाहिजे. आणीबाणीच्या पूर्वीसुद्धा

महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, गोवा, केरळ आणि मद्रास इथे चळवळ नव्हतीच. यामुळे जिथे शासनविरोधी चळवळच नव्हती तिथे फारसा प्रतिकार झाला नाही यात नवल नाही. उत्तर भारतात पंजाब, हरियाना, काश्मीर, हिमाचल प्रदेश, राजस्थान, आसाम, ओरिसा, बंगाल इथेही चळवळ नव्हती. म्हणजे चळवळ होती कुठे? सर्व चळवळच गुजरात आणि बिहार या दोन प्रांतांत होती. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि दिल्ली इथे चळवळीला प्रचंड पाठिंबा होता. पण पाठिंबा म्हणजे स्वतःची चालू असणारी चळवळ नव्हे. चळवळ फक्त गुजरात, बिहारमध्येच होती. त्यातही गुजरातमध्ये निवडणुका होऊन गेलेल्या होत्या. त्यांचे निकाल लागलेले होते आणि विरोधी पक्षांचे सरकार सत्ता हाती घेण्याच्या तयारीत होते. पंतप्रधानांनी अतिशय चातुर्यपूर्वक गुजरातेत विरोधी पक्षाचे सरकार येऊ दिले. आपण लोकशाहीचे मारेकरी नव्हे, केवळ नाइलाज म्हणून केवळ तात्पुरती एक कडवट योजना आपण करतो आहो, असा अभिनय करण्यासाठी, शिवाय गुजरात पूर्णपणे शांत ठेवण्यासाठी. हा पवित्रा चतुरपणाचा होता. इतर काहीही कुणी म्हणो, बाईंच्या चतुरपणाविषयी दुमत असण्याचे कारण नाही.

राष्ट्र धोक्यात यावे, राष्ट्राचे अस्तित्व व स्थैर्य धोक्यात यावे, कायद्याच्या आधारे राज्य चालवणेच अशक्य व्हावे एवढा मोठा समाजात गोंधळ चालू असावा असे चित्रच नव्हते. राष्ट्राचे ऐक्य टिकवण्यासाठी आणीबाणी ही पंतप्रधानांची घोषणा आहे. ज्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आणीबाणी जाहीर झाली त्यावेळी बिहारमध्ये विधानसभेला घेराव चालू नव्हते आणि दिल्लीत लोकसभेचा घेराव अजून यायचा होता. राष्ट्र धोक्यात आलेले नव्हते. लोकशाही धोक्यात आलेली नव्हती. पण पंतप्रधानांना आपल्याविरुद्धचे आंदोलन इथून वाढत जाईल व त्यामुळे आपण धोक्यात येऊ असे वाटत असावे. प्रतिकार फारसा झाला नाही याचे एक कारण हे की देशव्यापी चळवळ चालू नव्हती.

प्रतिकार न होण्याचे दुसरेही कारण आपण लक्षात घेतले पाहिजे. शासन कोणतेही असो, त्याच्याजवळ बातम्या इकडून तिकडे वेगाने पोचवण्यासाठी बिनतारी यंत्रांची व्यवस्था असते. शासनाजवळ लष्कर, पोलीस व शस्त्रे असतात. बंगालमध्ये लाखाचे लष्कर उभे करून निवडणुका घेण्याचे काम जो पंतप्रधान लोकशाही चालू असताना करू शकतो, तो पंतप्रधान आपले अस्तित्व धोक्यात आल्यानंतर लष्कर वापरणारच! सत्तेवर असणारे सत्तेवर राहण्यासाठी सामर्थ्य वापरून पाहणारच. विरोधी पक्षांचे बळ लष्कर व पोलीस नसते. त्यांचे बळ असते विद्यार्थी, कर्मचारी व कामगार यांच्या संघटना. लष्करी सामर्थ्याच्या जोरावर आणीबाणी पुकारणाऱ्यांना उत्तर असते देशव्यापी सार्वत्रिक संप. हा संप करण्यात जर यश आले तर आणीबाणी पुकारणारे शासन मोडूनच पडत असते! भारतात अशी परिस्थिती नव्हती. विविध कामगारांच्या, कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या

सार्वत्रिक संपाची तयारीच नव्हती. बिनलोकशाही मार्गाने उठाव करून सत्ता ताब्यात घेणे हा कुणाचा हेतूही नव्हता आणि त्या दृष्टीने कोणती सिद्धताही झाली नव्हती. जर कर्मचारी आणि कामगार संपावर जाणार नसतील आणि बातमी नेणारे जनतेचे एकमेव साधन वर्तमानपत्र बंद पडले तर मग प्रतिकार कोण करणार ? आणीबाणीनंतर प्रतिकार काहीच झाला नाही, ही घटना शासनाला जनतेचा पाठिंबा असल्याची द्योतक नव्हे. जर जनतेचा शासनाला पाठिंबा असता तर गुजरातेतील नगरपालिकांच्या निवडणुकांत काँग्रेसची धुळधाण झाली नसती. प्रतिकार झाला नाही याचे कारण शासन उलथून टाकण्याची कुणाची इच्छाच नव्हती, शासन अशक्य व्हावे अशी वेळही आली नव्हती हे आहे. राष्ट्र धोक्यात आलेलेच नव्हते, त्यामुळे धोक्यातून राष्ट्र वाचवण्याचा प्रश्नच नव्हता. राष्ट्राचे ऐक्य टिकवणाऱ्या पंतप्रधान ही नुसतीच वाऱ्यावरील घोषणा आहे. ती ज्यांनी केली त्यांचाही तिच्यावर विश्वास नव्हता !

इंदिरा गांधींच्या खटल्याचा निकाल लागला तेव्हा मी अस्वस्थ होतो याची नोंद वर आलेली आहे. इंदिरा गांधी लष्कर उभे करून निवडणुका घेऊ शकतात, आपल्या पक्षातील अधिकृत उमेदवार पाडू शकतात, मुदतपूर्व निवडणुका घेऊ शकतात, हे मला अनुभवाने माहीत होते. त्यामुळे त्या संविधानच काही काळासाठी स्थगित करून आपल्या हाती सत्ता घेतील की काय, अशी मला भीती वाटत होती. आपणही शेवटी रोमँटिक असतो. एका टोकाला जाऊन विचार करतो. जर सर्व घटना चालू ठेवून, लोकशाहीचा आभास चालू ठेवून, सगळी सत्ता आपल्या हाती घेणे शक्य असेल तर मग घटना स्थगित करण्याचे कारणच नाही ! लाखो माणसे तुरुंगात टाकून ती बातमीच वर्तमानपत्रांत येऊ द्यायची नाही, सर्व वर्तमानपत्रांतून फक्त शासनाच्या बातम्याच छापायच्या, ही सोय करता येत असेल तर मग वर्तमानपत्रे बंद कशासाठी करायची ? जो हेतू सभ्य दिसणाऱ्या पद्धतीने पूर्ण करता येतो तो हेतू सभ्य न दिसणाऱ्या पद्धतीने पूर्ण करण्याचे कारणच नाही. माझ्या स्वप्नाळू मनाला चटकन हे वास्तववादी भान आले नाही. पुढे हळूहळू माझ्या हे लक्षात आले की, सारेच चालू ठेवून काहीच चालू नसेल याची व्यवस्था करण्याचे नवे रस्ते चतुर तज्ज्ञांनी शोधलेले आहेत. आपल्याला ते चटकन जाणवत नाहीत एवढेच काय ते !

आणीबाणी लागू करण्याचे शासनाने दिलेले एक कारण राष्ट्र धोक्यात आले हे किती फुसके आहे याचा उल्लेख वर आलेला आहे. आणीबाणीचे दुसरे कारण देश आर्थिक आपत्तीत सापडलेला होता असे सांगितले जाते. पैकी देश आर्थिक आपत्तीत सापडला होता हे खरे आहे. काही प्रमाणात आणीबाणीनंतरच्या काळात आपण आर्थिक परिस्थिती सावरू शकलो आहोत हेही खरे आहे. चलनवृद्धीला आळा बसलेला आहे. भाववाढ जवळपास रोखली गेलेली आहे. अजून '७२ च्या पातळीवर सर्वच किंमती

उतरलेल्या नाहीत, पण त्या ७५ च्या मानाने उतरलेल्या आहेत हे खरे आहे. पण या बाबतीत दोष कुणाचा आणि आणीबाणीचा ही परिस्थिती सुधारण्याला उपयोगी किती झाला, या बाबी मात्र वादग्रस्त आहेत, या देशात प्रचंड भाववाढ झाली, चलनवृद्धीही झाली. हे आपण मान्य केले तरी याला जबाबदार विरोधी पक्ष नव्हते. दोन-तीन वर्षांपूर्वी पाऊस धड झाला नाही आणि प्रचंड दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली हे विरोधी पक्षाचे घातपाती कृत्य असून यंदा पाऊस उत्तम झाला, पिके चांगली आली, हा पंतप्रधानांनी अचूक वेळी आणीबाणी जाहीर करण्याचा परिणाम आहे, असे जर कुणी म्हणणार असेल तर मग त्याच्याशी चर्चा करण्यात अर्थ नसतो. कारण जे जाणीवपूर्वक नागडे असत्य आग्रहाने सांगतात त्यांना समजूतदार चर्चा फारसे समजावून देऊ शकत नाही. नागड्या असत्याचा आग्रहाने पुरस्कार हे फॅसिस्टांचे तंत्र आहे. फॅसिस्टांची प्रचार पद्धती काही प्रमाणात आमची लोकशाही अंगीकारू इच्छिते असे दिसते.

धान्याचे भाव डिसेंबरपासूनच उताराकडे झुकू लागलेले होते. एप्रिल-मे महिन्यांत तर धान्यभाव उतरत आहेत हे सर्वांनाच जाणवू लागलेले होते. अन्नधान्याचे भाव उतरू लागले हा आणीबाणी जाहीर करण्यापूर्वी शासनाने स्वीकारलेल्या आर्थिक धोरणाचा परिणाम आहे. आणीबाणी असती अगर नसती तरी हेच झाले असते. परदेशांतून पतरूपाने प्रचंड धान्य खरेदी केल्यानंतर राष्ट्रीय कर्ज वाढते, पण तात्पुरती बाब म्हणजे धान्याचे भाव उतरतात, ही घडूनच येते. एक पावसाळयाचा अनुकूल हंगाम आला की धान्यपरिस्थिती सुधारते याचा आणीबाणीशी काही संबंध नाही. १९६८ सालीसुद्धा आपली धान्यपरिस्थिती अशीच चांगली होती. आणि एखादे वर्ष जर दुष्काळी आले तर आपली धान्यपरिस्थिती पुन्हा एकदा पलीकडल्या वर्षाइतकीच बिकट होणार आहे. राष्ट्रीय कर्ज वाढवत नेऊन जे तात्पुरते इलाज केलेले असतात ते तात्पुरतेच असतात. त्यामुळे देशात तातडीने उत्पात होणे थांबवता आले तरी असे उपाय स्थिरपणे सामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी उपयोगी नसतात. तरीही भाववाढ आवरली गेली, अर्थव्यवस्था थोडी का होईना सुधारली, चलनवृद्धी कमी झाली—याचे श्रेय आपण शासनकर्त्या पक्षास व त्याच्या नेतृत्वास देण्याला हरकत नाही. पंतप्रधानांच्या हिशेबशून्य शासनाने चलनवृद्धी केलेली होती, त्यांनीच ती कमी केली, हे नाही म्हटले तरी थोडेसे बरेच झाले असे म्हणायला हरकत नाही. मुद्दा इतकाच आहे की हे यश मिळवण्यासाठी आणीबाणीची गरज नव्हती आणि आणीबाणीमुळे हे यश मिळालेलेही नाही.

देश आर्थिक संकटातून तारण्यासाठी आणीबाणी या भूमिकेला अर्थशास्त्रात फारसा आधार सापडण्याचा संभव नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, आणीबाणीनंतर शासनाने जो कार्यक्रम घेतला तो पाहिल्यानंतर 'आर्थिक आपत्ती टाळण्यासाठी

आणीबाणी ' या घोषणेला पुरावा सापडत नाही. पण या स्पष्टीकरणातील राजकीय चातुर्य आपण मान्य केले पाहिजे. लवकर या देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची फारशी शक्यता नाही, म्हणून दीर्घकाळपर्यंत आणीबाणी चालू ठेवायची असेल तर 'आर्थिक आपत्तीसाठी आणीबाणी ' हे स्पष्टीकरण चांगले आहे! शिवाय या स्पष्टीकरणाला पुरोगामित्वाचा व डाव्या आर्थिक धोरणाचा आशय नसला तरी तसा गंध येतो! त्यामुळे दिसायला हे स्पष्टीकरण मोठे चांगले दिसते. काहीही असो, एका मर्यादित अर्थाने बाईंनी डाव जिंकलेला आहे. त्या हरल्या असत्या तर कोणी दया दाखवणार नव्हते. त्यांनी जिंकल्यानंतर इतरांना दया दाखवावी, या अपेक्षेत कितीसा अर्थ आहे कोण जाणे!

इंदिरा गांधी अलाहाबाद हायकोर्टात खटला हरल्या. हा खटला हरल्यानंतर लोकशाही चालू राहिली असती तर राष्ट्रव्यापी आंदोलन उग्र करण्यात विरोधी पक्षाला कदाचित यश आले असते, कदाचित यश आले नसते. पण त्यांच्याच पक्षात त्यांच्याविरुद्ध कट शिजू लागले असते. जनमानसात डागाळलेली प्रतिमा घेऊन फिरणे कठीण होते. निवडणूक कायद्याच्या दुरुस्तीला पूर्व तारखेपासून अंमल देणे सोपे नव्हते, आणीबाणीचे पटण्याजोगे कारण इतकेच दिसते! नेमके हेच कारण कधी इंदिरा गांधी मान्य करणार नाहीत. इंदिरा गांधींचा खटला हे आणीबाणीचे कारण नव्हे, हा मुद्दा सिद्ध करण्यासाठीच खटला जिंकून जमाना झाला तरी आणीबाणी चालू राहिलेली आहे. विरोधी पक्षांनी आपल्याला बहुमताच्या प्रतिनिधी असणाऱ्या रास्त पंतप्रधान असे मानावे, या आपल्या स्थानाला उद्याच्या निवडणुकीतसुद्धा आव्हान मिळू नये; ही पंतप्रधानांची मागणी आहे. ती पूर्ण होईपावेतो देशाचा धोका संपलेला आहे असे त्या मान्य करणार नाहीत. आणि ही मागणी विरोधी पक्ष मान्य करणार नाहीत. या कोंडीमुळे गरज संपलेल्या आणीबाणीला उगीचच जिवंत राहावे लागते आहे असे दिसते!

आणीबाणीवर नोकरदार, मध्यमवर्ग निहायत खुश आहे! त्यांचे पगार व्यवस्थित मिळत आहेत. निरनिराळ्या वस्तूंचे भाव उतरत आहेत. ज्यांचे भाव उतरत नाहीत त्यांचे निदान चढत नाहीत, हा एक दिलासाच आहे. शाळा-कॉलेजेसमध्ये संप नाहीत, कारखान्यांत मजुरांचे संप नाहीत, लाठीचार्ज-गोळीबार नाही, कान किटवणारी व्याख्याने नाहीत, असे कसे सगळीकडे शांत व सुरळीत जग दिसत आहे! यावर मध्यमवर्गाने लुब्ध होऊ नये तर काय करावे? हळूच कुणी तरी खाजगीत कुजबुजल्याप्रमाणे कानात सांगतो, 'बरे आहे, चांगले चालू आहे. आपली काही तक्रार नाही.' या मंडळींना भारतीय राजकारणाची गती कधी कळत नाही असे म्हणणे भाग आहे.

भारतीय उद्योगव्यवस्थेत क्रमाने मंदी दृश्यमान होते आहे. मंदीचा एक आरंभ माल न खपता पडून राहण्यात होतो आहे. जागोजाग डागडुजी चालू असली तरी अर्थव्यवस्थेला

खरी गती मिळालेली नाही. खऱ्या अर्थाने उत्पादनवाढीची प्रक्रिया गतिमान झालेली नाही. हे चित्र फारसे चांगले नव्हे. ही गोष्ट मध्यमवर्गाला पटेलच असे नाही. मागोमाग संप नको असे करार करण्याचे प्रयत्न झाले. विकसनशील देशात विकासाचा कार्यक्रम चालू असताना संप नकोत, विकासाच्या गाड्याला खीळ नको, असे शासनाचे म्हणणे होते. म्हणून संपबंदी हे त्यांचे आवाहन होते आणि या आवाहनाला कम्युनिस्टांसहित सर्व विरोधी पक्षांचा फार चांगला प्रतिसाद होता. संपात मजुरांचे हाल होत असतात. संपाची त्यांना हौस नसते. पण संप नको हा करार एकतर्फी होऊ शकत नाही. मजूर संप करणार नाहीत या बाजूला शासनाने भाववाढ होणार नाही आणि जर भाववाढ झाली तर त्याप्रमाणात आपोआप पगारवाढ होईल अशी हमी घ्यावी लागते. आणि मालकांनी कपात करणार नाही, ले-ऑफ करणार नाही, टाळेबंदी करणार नाही अशी हमी द्यावी लागते. 'संप नको' करारास मजूर उत्सुक होते, पण आवश्यक हमी देण्यास शासन व मालक तयार नव्हते. म्हणून पूर्वी असे करार झाले नाहीत.

आज काय झाले आहे? शासनाची पूर्वीची भूमिका कायमच आहे. ज्या प्रमाणात महागाई वाढेल त्या प्रमाणात पगार वाढेल हे तत्त्व शासनाने कबूल केलेले नाही. उलट बोनसकडे उशिरा मिळणारा पगार म्हणून पाहावे व हक्क म्हणून बोनस द्यावा हे धोरण बदलून शासनाने नफा झाला तर बोनस द्यावा व तोही ४·५ टक्के द्यावा, अशी भूमिका घेतली आहे. म्हणजे मालकांचा नफा मिळवण्याचा हक्क कायम राहिला, मजुरांच्या हिताकडे उदासीनतेने पाहण्याची शासनाची वृत्ती चालू राहिली, मजुरांचा संप करण्याचा हक्क मात्र गेला! ही दिशा भांडवलशाहीला दुबळे करणारी नसून भांडवलशाही सरकारच्या अधिक कच्छपी लागेल याची सोय करण्याची व मजुरांना दुबळे करण्याची आहे.

भारतीय राजकारणाची एक चमत्कारिक परिस्थिती आहे. जनतेने संघटित होऊन शासनावर दडपण आणावे आणि एखादी कल्पना मान्य करण्यास शासनाला भाग पाडावे, असे आपल्या देशात सहसा होत नाही. पण प्रौढ मतदान, शिक्षण विकास, खुला प्रचार व निवडणुका यामुळे वाढलेल्या जनतेच्या आकांक्षा व उत्पादनवाढीची मंद गती यांमुळे जनतेत असमाधान मात्र तीव्र असते. अशा असमाधानी लोकमताचा ताण नाही म्हटले तरी शासनकर्त्यांना जाणवतच असतो. या कंगालांची लाजेकाजे, भीतीपोटी काही ना काही सोय करणे शासनाला भाग असते. मात्र जर शासनाने आपण होऊन एखादे पुरोगामी पाऊल टाकले तर जनतेचा मिळणारा प्रतिसाद उदंड असतो. संस्थानिकांचे तनखे बंद केल्यामुळे आणि बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावण्यास मदत किती झाली हा वादाचा मुद्दा आहे. पण शासन प्रामाणिकपणे सधनवर्गाला वठणीवर आणू इच्छिते असे लोकमत निर्माण होताच जनतेत सत्ताधारी पक्षाला प्रचंड पाठिंबा मात्र निर्माण झाला. कोणताही पुरोगामी

कार्यक्रम, कोणताही डावा कार्यक्रम घेण्यास या देशात जनतेचा अडथळा नाही. उलट अशा कार्यक्रमांना जनतेचा उत्साही पाठिंबा मिळतो.

भारतात पुरोगामी कार्यक्रम शासनाला लोकप्रिय करतो व शासनकर्त्या पक्षाची लोकप्रियता वाढवतो, असा इतिहास आहे. पुरोगामी कार्यक्रमामुळे लोक बंड करीत नाहीत, उलट पक्षाचे सामर्थ्य वाढते हे माहीत असूनसुद्धा काँग्रेस पक्ष फारशी पुरोगामी पावले उचलीत नाही. या ठिकाणी अडथळा जनतेचा नसून काँग्रेस पक्षाचाच आहे! ज्यांचे हितसंबंध धोक्यात आणल्याशिवाय कोट्यवधी कंगालांचे जीवनमान सुधारता येणार नाही ती सर्व मंडळी बहुसंख्येने सत्ताधारी पक्षाच्या मांडवात मांड्या ठोकून सुखरूपपणे विश्रांती घेत आहेत. या मुद्द्यावर विरोधी पक्षाचा विरोध नगण्य असतो. पण वरिष्ठ वर्गाच्या हितसंबंधांनी मायापाशबद्ध झालेला काँग्रेस पक्ष लोकप्रिय व बळकट होण्यासाठीसुद्धा पुरोगामी कार्यक्रम आखीत नसतो!

याचा थोडक्यात अर्थ असा आहे की काँग्रेसचा प्रत्यक्ष व्यवहार नेहमीच मध्यावरून चालतो. उजव्यांचा पक्ष असल्यामुळे डावे होता येत नाही आणि जनतेचा ताण असल्यामुळे उजवे होता येत नाही. म्हणून इकडे तिकडे झोकांड्या खात हा पक्ष नेहमी मध्यम मार्गाने जातो,– म्हणजे सधन वर्गावर फारसा ताण न वाढवता जनतेवरचा ताण कमी करण्याचा प्रयत्न करीत असतो. आणीबाणीमुळे लोकमताचा हा ताण संपलेला आहे. म्हणून शासनाचे धोरण आणीबाणीच्या काळात अधिक भांडवलदारधार्जिणे, सधन वर्गाला अधिक अनुकूल, समाजातील विषमता अधिक वाढवणारे असे झालेले आहे. संविधान न्यायालय तयार करीत नाही. कायदेही न्यायालय तयार करीत नाही. कायदे संविधानाला सुसंगत आहेत की नाही हे तपासण्याचा न्यायालयांचा अधिकारही न्यायालयांनी न्यायालयाला दिलेला नाही. सर्वच बाबी संसदेत होतात. गरज पडेल त्यावेळी संसद घटनादुरुस्ती करीत असते. आजवर इतक्या घटनादुरुस्त्या झाल्या पण जायदाद हा व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे या मुद्द्यावर घटनादुरुस्ती झालेली नाही! मालमत्तेचा अधिकार रद्द झालेला नाही! व्यक्तींच्या मालकीच्या वस्तू असतील, त्या असाव्यात. समाजातील सगळ्याच बाबी काही संविधानात मूलभूत हक्क म्हणून नोंदवलेल्या नसतात. प्रश्न नागरिकांना जायदाद असावी की नाही हा नाही. माणसाला माणसाप्रमाणे जगण्याइतके किमान वेतन मिळेल हा हक्क मूलभूत आहे की जायदाद असणाऱ्यांची जायदाद सुरक्षित राहील हा हक्क मूलभूत आहे, असा तो प्रश्न आहे.

भारतात नोकऱ्या मिळणे हा मूलभूत हक्क नाही, तरी नोकऱ्या आहेत, पगार आहेत, पेन्शनी आहेत. नागरिकांच्या मालकीची इस्टेट असण्यासाठी ती मूलभूत हक्कात नोंदवणे आवश्यक नसते. ज्यांच्याजवळ जायदादी आहेत, त्यांच्या जायदादी सुरक्षित राहाव्या

आणि ज्यांच्याजवळ नाहीत त्यांना कधीच फारसे काही मिळू नये ही सोय करण्यासाठी मूलभूत हक्कात मालमत्तेचा अधिकार असतो! हा हक्क नोंदवणारी संसद– घटनादुरुस्त्या करून घटनेला खेळण्याचे स्वरूप आणणारी संसद– जायदादीचा मूलभूत हक्क मात्र रद्द करत नाही! कारण संसदेत ज्यांचे बहुमत आहे त्यांचे शासन आहे व शासन त्यांचे आहे त्यांना हा हक्क जतन करणे ही गोष्ट प्रचंड मताने निवडून येण्यापेक्षा अधिक मूलभूत महत्त्वाची वाटते. सत्ताधारी पक्षाचा हा व्यवहार विषमता कमी करण्याला आड येत असतो. ही पापाची जबाबदारी आपल्या माथ्यावर घेण्याऐवजी या देशातील न्यायालये जनतेच्या प्रगतीच्या आड येत आहेत अशी ओरड करणे दांभिकपणाचे आहे!

जी न्यायालये आपले निर्णय अमलात आणू शकत नाहीत, जी न्यायालये न्यायकक्षेतून शासनाचा व्यवहार काढून घेतला तर रोखू शकत नाहीत, शासनाला गुन्हेगारांना शासन करावे या मुद्द्यावर भाग पाडू शकत नाहीत, ती न्यायालये शासनाची इच्छा असल्यानंतर देशाची प्रगती काय अडवू शकणार? मुळातच भारतीय संविधानात न्यायालयापेक्षा शासन बलवान. आणीबाणीपूर्वी जी घटनादुरुस्ती झाली त्यामुळे शासन अधिक बलवान व न्यायालय अधिक दुबळे झाले. आणीबाणीत तर शासनाला जाब विचारण्याचीसुद्धा न्यायालयाची शक्ती कमी झाली आहे! अशा अवस्थेत वेळोवेळी प्रगतीला अडथळा म्हणून न्यायालये जबाबदार धरणे हे सोयीचे असले तरी खरे नाही, हे सांगणे आवश्यक झाले आहे. मुळातच भारतीय संविधानात विधिसत्ता, कार्यकारीसत्ता आणि न्यायसत्ता यांची विभागणी फारशी काटेकोर नाही. भारतीय संविधानात संसदेचे सार्वभौमत्व, शासनाचे सार्वभौमत्व यांचा अर्थ व्यवहारात एकच होतो. म्हणून तर संसद सार्वभौम आहे हा मुद्दा जोरजोराने मांडणे सोयीचे ठरते. जनतेची कवडीएवढी आस्था नसणाऱ्यांना संसद जनतेची प्रतिनिधी आहे असे सांगण्यात रस वाटतो!

आणीबाणीनंतर भारताचा आर्थिक व्यवहार अधिकाधिक उजवा होत चाललेला आहे. बोनस देण्याच्या बंधनातून उद्योगपती मुक्त झालेले आहेत. आणीबाणीच्या काळात नव्याने कोणत्याही उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केले जाणार नाही याची हमी मिळाली आहे. आयकराचा दर ७७ टक्क्यांवरून ६६ टक्क्यांवर आला आहे. संपत्ती-कराचा सर्वोच्च दर २½ टक्के झाला आहे. नव्या भांडवली खर्चात २५ टक्के सूट देण्यात आली आहे. स्कूटर, मोटर, रेफ्रिजिरेटर, टेलिव्हिजन इत्यादींवरचे कर कमी करण्यात आले आहेत. या सगळ्यांचा थोडक्यात अर्थ हा आहे की, शासनाने उत्पादनवाढीला उत्तेजन म्हणून उद्योगपतींच्या अनुनयाला प्रारंभ केलेला आहे. ही तर भांडवलशाहीची नेहमीची मागणी होती.

उत्पादनवाढीला अडथळा होईल असे काही करू नका म्हणजे आपोआपच दारिद्र्य कमी

होईल, जीवनमान वाढेल, हे भांडवलदारांचे आवडते सूत्र आहे. कोणताही कर वाढला, संपत्तीला कुठेही मर्यादा घातली की उत्पादनवाढीला अडथळा होतो असे भांडवलदार म्हणतात! शासनाने हे नव्याने मान्य केलेले दिसते. परदेशी मदत कमी करीत नेण्याचे ध्येय बाजूला ठेवून आता ही मदत एक स्वाभाविक बाब म्हणून स्वीकारण्यात येत आहे. या वर्षी हे मदतीचे प्रमाण १३४१ कोटी राहील, गतवर्षी हे प्रमाण ९३९ कोटी होते. याहीपुढे हे प्रमाण वाढणारच आहे. या भूमिकेमुळे उत्पादन वाढेल ही गोष्ट खरी असली तरी उत्पादन कशाचे वाढेल? गोरगरिबांच्या जीवनावश्यक बाबींचे उत्पादन वाढणार नाही, वरिष्ठ मध्यमवर्ग आणि सधनवर्ग यांच्या गरजेचे उत्पादन वाढेल. आपल्या अंदाजपत्रकात जी व्यवस्था करण्यात आली आहे त्यामुळे अवजड उद्योगधंदे विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. याचा अर्थ यापुढच्या काही वर्षांत विषमतेचे प्रमाण वाढेल इतकाच आहे. म्हणून या अंदाजपत्रकाचे वर्णन तज्ज्ञांनी 'बाय राइट क्विक मार्च' असे केले आहे! उजवा कल असणारा पक्ष लोकमताचा ताण संपल्यानंतर जास्तच उजवीकडे झुकू लागतो असा याचा अर्थ आहे.

तशा फसव्या घटना खूप आहेत. देशव्यापी नियोजनाला आता सुटीच मिळालेली आहे! संपूर्ण साधनसंपत्ती आणि गरजा विचारात घेऊन एका विशिष्ट हेतूने अर्थ-व्यवस्था नियोजित करण्याचा निदान नेहरूयुगात प्रयत्न होता. पित्याची भूमिका मुक्त राजकारण व नियोजित अर्थरचना ही होती. घोषणा कोणत्याही असोत माननीय कन्येचा व्यवहार मुक्त अर्थव्यवस्था आणि नियोजित राजकारण या दिशेने चालू आहे! निरनिराळे प्रकल्प शासन इच्छेनुसार स्वीकारते. त्यामागे कुठे स्पष्ट हेतू आहेत असे दिसत नाही. या संदर्भात 'गरिबी हटाव'मधील काय शिल्लक राहणे शक्य आहे? व्यासपीठावरील घोषणा व्यवहारात आणावयाच्या नाहीतच याची ग्वाही केंद्रीय अंदाजपत्रकाने दिली आहे.

भारतीय राजकारणाच्या आरंभापासून म्हणजे एकोणिसाव्या शतकापासून शेतकऱ्यांचे दारिद्र्य, हा सर्वांच्या चिंतेचा विषय राहिला आहे. दादाभाई नौरोजी व न्या. रानडे यांनीसुद्धा या मुद्द्यावर फार जोर दिलेला आहे. तेव्हाही हे नेते असे सांगत आले की शेतकरी कर्जनिवारण कायदा हा ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यावर उपाय नव्हे. शेतकऱ्यांना स्वस्त दराने विपुल प्रमाणात कर्जे उपलब्ध करून देणे व कोरडवाहू शेती परवडेल अशी व्यवस्था करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हा याला उपाय आहे. या चिंतनाला आता ९० वर्षे होत आली. आजही स्थूलमानाने हाच मुद्दा खरा आहे. दोन एकरां-खालील सर्व शेतकऱ्यांना कर्जमुक्ती ही भूमिका अर्धी हास्यास्पद व अर्धी भेसूर आहे! हास्यास्पद यासाठी की कुटुंबाचे पालनपोषण होण्यासाठी जी जमीन लागते त्या-मानाने ही दोन एकर कोरडवाहू जमीन निरुपयोगी आहे. आपल्या मालकीची जमीन

कसून त्यावर जगणारा जो शेतकरी त्याला या कर्जमुक्तीचा फायदा नाही. ज्या दरिद्र्यांना या कर्जमुक्तीचा आज फायदा होईल त्यांना उद्या वस्तू गहाण ठेवण्याऐवजी दर गरजेच्या वेळी वस्तू विकूनच टाकाव्या लागतील. त्यामुळे त्यांचाही खरा फायदा फारसा होणार नाही. शिवाय ग्रामीण भागात सावकाऱ्या कुणाच्या आहेत ते जगजाहीर आहे. या सावकारांनाच कर्जमुक्तीच्या कायद्याची अमलबजावणी करण्यात पुढाकार घ्यावा लागणार आहे! कारण तेच नेते आहेत! मूलगामी अर्थपरिवर्तनाला असे डागडुजीचे उपाय उपयोगी पडत नसतात. हेच जमीनवाटपासंबंधी म्हणावे लागेल.

प्रत्यक्षात जमीन वाटली किती गेली आणि तिचा उत्पादनवाढीला किंवा गरिबांच्या जगण्याला उपयोग किती झाला हे अजून ठरायचे आहे. तूर्त फक्त नेते मंडळींनी नांगर हाती धरल्याचे फोटो तेवढे उपलब्ध आहेत! अर्थसंकल्प उजवीकडे झुकणारा: असल्यानंतर ग्रामीण जनतेचे कोणतेच कल्याण होत नसते आणि सधन शेतकऱ्यांचे नुकसानही होत नसते, हे सांगायला अर्थतज्ज्ञांची गरज नसते. यामुळेच २० कलमी कार्यक्रमाविषयी बोलताना आमचे एक मित्र म्हणाले, "या कार्यक्रमातील पहिले कलम असे आहे की पुढील एकोणीस कलमे अमलात आणल्यास गरिबी दूर होईल! २० वे कलम असे आहे की वरील एकोणीस कलमे अमलात आणल्यास गरिबी दूर होईल!" मी विचारले "मधल्या अठरा कलमांचे काय?" तेव्हा ते म्हणाले, "राष्ट्र धोक्यात आलेले आहे. आणीबाणी चालू आहे अशा वेळी मधली कलमे स्पष्टपणे सांगणे देशहिताच्या दृष्टीने योग्य होणार नाही!!"

नाही म्हणावयास आणीबाणीचा एक फायदा दिसतो. कुटुंब नियोजनाच्या गेल्या पंचवीस वर्षांतील भव्य व अलौकिक कार्याची म्हणजेच त्या भव्य अपयशाची जाणीव आता दाहकपणे होत आहे. या अपयशी कुटुंब नियोजनाच्या कालखंडातील शेवटची अपयशी दहा वर्षे प्रगती दशकातील आहेत! या प्रगती दशकाच्या कालखंडातील पहिली ३ वर्षे पंतप्रधानांचे चालत नव्हते. शेवटची पाच वर्षे आर्थिक आपत्तीची झाली. तरीही या दशकाच्या शेवटी निदान कुटुंब नियोजन या क्षेत्रात शासनाची निदान भूमिका तरी प्रगत झाली हे बरे झाले. महाराष्ट्र सक्तीच्या कुटुंब नियोजनाच्या भूमिकेत अग्रेसर आहे. हे नवे धोरण परंपरावादी धार्मिक राजकारणाला मुळापासून कमकुवत करणारे ठरेल असे दिसते. आणीबाणीचा लाभ एवढाच आहे की, जातीयवादी प्रतिगाम्यांना फारशी आरडाओरड करता आली नाही म्हणून प्रगतीचे एक पाऊल पुढे टाकणे शक्य झाले आहे. आता सर्व भारताला या बाबतीत फरफटत पुढे जाणे आणि या प्रश्नावर आग्रही भूमिका घेणे भाग झाले आहे. आणीबाणीचा फायदा म्हटला तर तो एवढाच आहे.

आणीबाणीचे तोटे यादी करून लांबरुंद मोजून दाखवता येतील, पण त्या यादीत अर्थ

नाही. मुख्य गोष्ट म्हणजे स्वातंत्र्यच धोक्यात आले. मूठभर विचारवंतांचे विचरा-स्वातंत्र्य धोक्यात आले असे नसून चर्चा करण्याचे, टीका करण्याचे, अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचे, अन्याय वेशीवर टांगण्याचे अशी सर्वच स्वातंत्र्ये धोक्यात आली. ही स्वातंत्र्ये गरिबी दूर करण्यासाठी, लोककल्याणासाठी धोक्यात आणावी लागली आहेत असा शासनाचा दावा आहे. पैकी आणीबाणीत दरिद्रयांच्या कल्याणाची सोय किती याचा पुरेसा ऊहापोह वर झालेला आहे.

ज्यांनी कधीच व्यक्तिस्वातंत्र्य आदरणीय मानले नाही त्यांनी व ज्यांनी बंदुकांच्या जोरावर सर्वांची तोंडे शिवून टाकली, त्यांनी या देशात पाच-सहा महिने फॅसिस्टविरोधी मेळावे घेण्याचा एक जंगी कार्यक्रम पार पाडला! प्रत्यक्ष काँग्रेसपक्षच या मेळाव्याचा खाजगीत उल्लेख ‘ फॅसिस्टांचा मेळावा ’ असा करीत असे. त्यामुळे इतरांना चर्चा करण्याची गरजच नव्हती. छातीवर बसून गळा घोटणाऱ्याने अन्याय, अन्याय म्हणून ओरडावे आणि पराभूतपणे मातीत लोळत पडलेल्यांच्याकडे अन्यायी म्हणून बोट दाखवावे, हे फक्त आणीबाणीतच शक्य असते! असल्या प्रकारच्या उद्योगांनी फक्त हास्यास्पदता वाढते. शासनाची विश्वसनीयता कमी होते. किती खोटे बोलणे पचेल याला मर्यादा असते. ही मर्यादा ओलांडल्यानंतर इतर कुणाची फसवणूक करणेसुद्धा कठीण होते!

मूळ म्हणजे स्वातंत्र्य गमावून भाकरीचा प्रश्न सुटेल ही अपेक्षाच चुकीची आहे. उपाशी माणसांना, दरिद्र्यांना स्वातंत्र्य असले तरच त्यांच्या आरडाओरडीमुळे भाकरीचा प्रश्न सुटण्याच्या बेतात येतो. प्रौढ सार्वत्रिक मतदान असले म्हणजे लोकशाही क्रमाक्रमाने समाजवादात रूपांतरित होणे अटळ असते. किंबहुना प्रौढ सार्वत्रिक मतदानावर आधार-लेली लोकशाही परिपक्व होण्याची क्रिया क्रमाने समाजवाद अंगीकारतच जात असते असे म्हणावे लागेल. मजुरांच्या हुकूमशाहीचे फलित काय असते हा मुद्दा क्षणभर आपण बाजूस ठेवू. पण उद्योगपती, सधन शेतकरी आणि भांडवलदार यांच्या बलवान पक्षाच्या हुकूमशाहीचे फलित काय होईल यावर वाद करण्याचे कारण पडू नये. ‘ गरिबी हटवू ’ असे आश्वासन देऊन तोंड शिवणाऱ्यांनी फक्त आपल्याविरुद्धचे आवाज बंद केलेले असतात, गरिबी हटवलेली नसते! स्वातंत्र्य हिसकावून घेऊन त्या मोबदल्यात भाकरीचा प्रश्न आपण सोडवणार आहोत अशी घोषणा करणारे भाकरीचा प्रश्न सोड-वण्याच्या उत्कट इच्छेपोटी स्वातंत्र्य हिरावून घेत नसतात. स्वातंत्र्य असल्यामुळे निर्भय झालेले जे भिकारी गोंगाट करीत होते त्या भिकाऱ्यांचा गोंगाट थांबवला म्हणजे मालकांना स्वस्थपणे खाल्लेले पचवत बसता येते! स्वातंत्र्य गमावल्याने भाकरीचा प्रश्न सुटत नसतो. स्वातंत्र्य गमावल्याने आपला भाकरीचा प्रश्न सुटला नाही असे विव्हळण्याचा हक्क तेवढा बाद होतो! दरिद्र्यांच्या बलवान संघटनांनी सत्ता उलथून पाडून क्रांती करणे ही निराळी घटना असते, असलेल्या सत्ताधीशांनी आणीबाणी पुकारणे ही निराळी घटना

असते. आपल्या देशात आणीबाणी जारी झाली आहे, क्रांती झालेली नाही, इतके तरी भान आपण ठेवायला हवे.

आज आणीबाणी आहे. उद्या काय होणार ? हा सर्वांच्याच समोर चिंतेचा प्रश्न आहे. मला स्वतःला याबाबत लोक ज्याची चिंता करतात त्याची चिंता फारशी वाटत नाही. आज तुरुंगात असणारे हजारो राजबंदी कायम तुरुंगात राहणार नाहीत. क्रमाक्रमाने माणसे सोडण्यास आरंभ झालेला आहे. वरिष्ठ पातळीवर दरमहा कुणाला सोडावे याच्या याद्या तयार होत आहेत. त्यामुळे पुढील काही महिन्यांत बहुतेक सगळे राजबंदी सुटतील याविषयी मला शंका नाही. सार्वत्रिक निवडणुका होणारच आहेत. सत्ताधारी पक्षाला सोयिस्कर अशा वेळीं म्हणजे नवा हंगाम पदरात पडल्यानंतर निवडणुका होणारच आहेत. येत्या नोव्हेंबरनंतर केव्हाही निवडणुका होऊ शकतील. आजही राजकीय पक्षांना बंदी घातलेली नाही. राजकीय पक्षांना बंदी घालण्याचे कारणही पडणार नाही ! प्रश्न आणीबाणी उठेल काय इतकाच आहे. आणीबाणी चालू असतानाही निवडणुका घेता येतात. त्यामुळे निवडणुकीपूर्वी आणीबाणी उठेल याची खात्री नाही. आणीबाणी उठली तरी वर्तमानपत्रांना जुने स्वातंत्र्य पुन्हा मिळणार नाही. त्यांच्यावर बंधने चालू राहतील. तुरुंगातून राजबंदी सुटल्यानंतर आणि निवडणुका झाल्यानंतर आणीबाणी आहे की नाही, याबाबत लोक आजच्याहीपेक्षा जास्त उदासीन होतील. यथाक्रम या सगळ्या घटना घडतील. त्याची फारशी चिंता मला नाही. माझी चिंता यापेक्षा निराळीच आहे.

हुकूमशाही दीर्घकाळ राबण्यासाठीसुद्धा एक तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्यांची यंत्रणा लागत असते. सत्ताधारी पक्षाजवळ अशी यंत्रणाही नाही. शिस्तबद्ध संघटना उभारण्याची त्यांची इच्छाही नाही, तसा त्यांचा प्रयत्न चालत नाही. काँग्रेस हा मेळावा होता; आजही हा मेळावा जसाच्या तसा कायम आहे. त्याचे संघटनेत रूपांतर झालेले नाही, आणि तसे रूपांतर करणे सोपे काम नाही. संजीव गांधीला भावी पंतप्रधान म्हणून विकसित करीत नेण्याइतके काँग्रेसपक्ष शिस्तबद्ध करणे सोपे नाही !

हिटलर हुकूमशहा होता. पण त्याच्या हाती कडव्या अनुयायांचे दल होते. स्टॅलिन हाही हुकूमशहा होता. पण त्याच्याहीजवळ शिस्तबद्ध संघटना होती. समाजपरिवर्तन करू पाहणाऱ्या हुकूमशाहीलासुद्धा निष्ठावंत कडव्या अनुयायांचे दल लागते. पंतप्रधान इंदिरा गांधी हट्टी व आग्रही आहेत. थोड्या राखीव अंतःकरणाच्या आहेत आणि चतुर आहेत. पण त्या हुकूमशाहीवादी असतील असे दिसत नाही. तत्त्वनिष्ठ संघटना नसल्या म्हणजे जी एकाधिकारशाही येते तिच्यात नेत्याच्या भोवती खुशमस्करे वाढू लागतात. त्यांची लायकी आणि कर्तृत्व बेताचे असते आणि प्रामाणिकपणा संशयास्पद असतो अशा

वेळी राज्ययंत्र तेच राहते. घोषणा तेवढ्या वाढत जातात. आणीबाणीच्या या वर्षात प्रशासनाची कार्यक्षमता वाढलेली नाही. तेच जुने शैथिल्य चालू आहे. लाल फितीचा तोच प्रभाव आजही आहे. पूर्वी भ्रष्टाचाराविरुद्ध आरडाओरडा होत असे; ती आता संपलेली आहे. म्हणून सर्व प्रकारचा भ्रष्टाचार कमी झालेला नसून वाढलेला आहे. काही काळा पैसा उजेडात आला. उजेडात आला तो नगण्य आहे, इतका काळा पैसा अजून देशात वावरतो आहे! भ्रष्ट, अकार्यक्षम; नोकरशाही, संघटनाशून्य भ्रष्ट संधिसाधूंचा पक्ष यांची प्रामाणिक हातमिळवणी जरी झाली तरी त्यामुळे भ्रष्टाचार वाढतो, कार्यक्षमता वाढत नसते.

असे दिसते की या परिस्थितीची सर्वांत चांगली जाणीव स्वतः इंदिरा गांधींनाच आहे. आपण दरिद्री जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवू शकत नाही याची त्यांना जाणीव आहे. या देशात संघटित पक्ष नाहीच. अशा वेळी जर तरुणांचा लोकशाहीवरील विश्वास ढासळला तर पुढच्या काही वर्षांत शांततामय कारभार अशक्य होऊन जाईल याची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच त्या संसदीय लोकशाहीचा सांगाडा मोडीत काढायला तयार नाहीत. "आपण राजकीय पक्षांना बंदी घातलेली नाही. फारच थोडे लोक तुरुंगात आहेत," असे त्या वारंवार सांगत असतात. त्यांनी पुनःपुन्हा मतस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्यावरील आपला विश्वास जाहीर केलेला आहे. या देशात एक नाममात्र लोकशाही चालू राहिली पाहिजे, निवडणुका चालू राहिल्या पाहिजेत, राजकीय पक्षांना सरकारवर टीका करण्याचे स्वातंत्र्य शिल्लक आहे हा भास चालू राहिला पाहिजे, याविषयी त्या दक्ष आहेत. अनेक विरोधी पक्षांच्या राजकीय कार्यकर्त्यांना अटक न करता मोकळे ठेवण्यामागची भूमिका ही आहे. म्हणून लोकशाहीचा आभास टिकवावा याविषयी त्या दक्ष आहेत. जे जाहीर हुकूमशाहीवादी आहेत त्यांनाही विसाव्या शतकात लोकमताचा आपल्याला प्रचंड पाठिंबा आहे असा आभास टिकवावा लागतो. ती नव्या जगाची गरज आहे. मग ज्यांनी लोकशाहीचा अभिनय पत्करला आहे त्यांना तर सामान्य जनतेचा देशात लोकशाही आहे यावरील विश्वास टिकवणे भाग आहे म्हणूनच निवडणुका घेणे चालू आहे!

मला चिंता असेल तर ती ही आहे की या देशात एकतंत्री कारभार लोकशाहीच्या नावाने राजरोस प्रतिष्ठितपणे वावरू लागेल आणि खरीखुरी लोकशाही अस्तित्वात नसताना लोकशाही आहेच हा भ्रम मात्र रुजू लागेल. हा खरा धोका आहे! लोकशाहीतील सर्व गैरसोयी टाळून तिच्या सोयी आणि हुकूमशाहीतील सर्व बदनामी टाळून तिच्या सोयी यांचा समन्वय चतुरपणे घालण्याचा एक प्रयत्न या देशात चालू आहे. हा प्रयत्न स्थिरावेल की काय, अशी भीती आज निर्माण झाली आहे. चिंतेचा खरा विषय असेल तर हा आहे. या वातावरणातून बाहेर कसे पडायचे हे सांगणे कठीण आहे. काही काळ

तरी निवडणुका आणि वैधानिक कार्य दुय्यम लेखून जनतेला संघटित करणारे कार्य प्रधान समजावे. असा प्रयत्न केल्याशिवाय या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा रस्ता सापडणे कठीण आहे. दुःख असेल तर ते हे आहे की ज्या कार्यावर बंदी आहे ते काम बंदीच असल्यामुळे बंद पडलेले आहे, पण ज्या कार्यावर बंदी नाही तेही काम केवळ हतोत्साह झाल्यामुळे बंद पडलेले आहे. ज्या मुद्द्यांवर अजून विरोधी आवाज उठवणे शक्य आहे ते तर बोलाल की नाही ? शासनाच्या विरोधी जे बोलणे परवडते, फारशी किंमत न मोजता जे करणे परवडते, तेही करण्याची उमेद संपलेली आहे, आणि ही गोष्ट कोणीच चांगली म्हणणे शक्य नाही.

वेळी राज्ययंत्र तेच राहते. घोषणा तेवढ्या वाढत जातात. आणीबाणीच्या या वर्षात प्रशासनाची कार्यक्षमता वाढलेली नाही. तेच जुने शैथिल्य चालू आहे. लाल फितीचा तोच प्रभाव आजही आहे. पूर्वी भ्रष्टाचाराविरुद्ध आरडाओरडा होत असे; ती आता संपलेली आहे. म्हणून सर्व प्रकारचा भ्रष्टाचार कमी झालेला नसून वाढलेला आहे. काही काळा पैसा उजेडात आला. उजेडात आला तो नगण्य आहे, इतका काळा पैसा अजून देशात वावरतो आहे! भ्रष्ट, अकार्यक्षम, नोकरशाही, संघटनाशून्य भ्रष्ट संधिसाधूंचा पक्ष यांची प्रामाणिक हातमिळवणी जरी झाली तरी त्यामुळे भ्रष्टाचार वाढतो, कार्यक्षमता वाढत नसते.

असे दिसते की या परिस्थितीची सर्वांत चांगली जाणीव स्वतः इंदिरा गांधींनाच आहे. आपण दरिद्री जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवू शकत नाही याची त्यांना जाणीव आहे. या देशात संघटित पक्ष नाहीच. अशा वेळी जर तरुणांचा लोकशाहीवरील विश्वास ढासळला तर पुढच्या काही वर्षांत शांततामय कारभार अशक्य होऊन जाईल याची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच त्या संसदीय लोकशाहीचा सांगाडा मोडीत काढायला तयार नाहीत. "आपण राजकीय पक्षांना बंदी घातलेली नाही. फारच थोडे लोक तुरुंगात आहेत," असे त्या वारंवार सांगत असतात. त्यांनी पुनःपुन्हा मतस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्यावरील आपला विश्वास जाहीर केलेला आहे. या देशात एक नाममात्र लोकशाही चालू राहिली पाहिजे, निवडणुका चालू राहिल्या पाहिजेत, राजकीय पक्षांना सरकारवर टीका करण्याचे स्वातंत्र्य शिल्लक आहे हा भास चालू राहिला पाहिजे, याविषयी त्या दक्ष आहेत. अनेक विरोधी पक्षांच्या राजकीय कार्यकर्त्यांना अटक न करता मोकळे ठेवण्यामागची भूमिका ही आहे. म्हणून लोकशाहीचा आभास टिकवावा याविषयी त्या दक्ष आहेत. जे जाहीर हुकूमशाहीवादी आहेत त्यांनाही विसाव्या शतकात लोकमताचा आपल्याला प्रचंड पाठिंबा आहे असा आभास टिकवावा लागतो. ती नव्या जगाची गरज आहे. मग ज्यांनी लोकशाहीचा अभिनय पत्करला आहे त्यांना तर सामान्य जनतेचा देशात लोकशाही आहे यावरील विश्वास टिकवणे भाग आहे म्हणूनच निवडणुका घेणे चालू आहे!

मला चिंता असेल तर ती ही आहे की या देशात एकतंत्री कारभार लोकशाहीच्या नावाने राजरोस प्रतिष्ठितपणे वावरू लागेल आणि खरीखुरी लोकशाही अस्तित्वात नसताना लोकशाही आहेच हा भ्रम मात्र रुजू लागेल. हा खरा धोका आहे! लोकशाहीतील सर्व गैरसोयी टाळून तिच्या सोयी आणि हुकूमशाहीतील सर्व बदनामी टाळून तिच्या सोयी यांचा समन्वय चतुरपणे घालण्याचा एक प्रयत्न या देशात चालू आहे. हा प्रयत्न स्थिरावेल की काय, अशी भीती आज निर्माण झाली आहे. चिंतेचा खरा विषय असेल तर हा आहे. या वातावरणातून बाहेर कसे पडायचे हे सांगणे कठीण आहे. काही काळ

तरी निवडणुका आणि वैधानिक कार्य दुय्यम लेखून जनतेला संघटित करणारे कार्य प्रधान समजावे. असा प्रयत्न केल्याशिवाय या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा रस्ता सापडणे कठीण आहे. दुःख असेल तर ते हे आहे की ज्या कार्यावर बंदी आहे ते काम बंदीच असल्यामुळे बंद पडलेले आहे, पण ज्या कार्यावर बंदी नाही तेही काम केवळ हतोत्साह झाल्यामुळे बंद पडलेले आहे. ज्या मुद्द्यांवर अजून विरोधी आवाज उठवणे शक्य आहे ते तर बोलाल की नाही? शासनाच्या विरोधी जे बोलणे परवडते, फारशी किंमत न मोजता जे करणे परवडते, तेही करण्याची उमेद संपलेली आहे, आणि ही गोष्ट कोणीच चांगली म्हणणे शक्य नाही.

जनावरांच्या जगातील नियम माणसांनी बदलून सुधारून घेतलेला आहे. येथे माणसांच्या जगात शारीरिक शक्तीपेक्षा इतर शक्ती महत्त्वाच्या ठरतात. नायक, नेता वा अधिपती ह्याला कधी जन्मपरंपरेचा आधार असतो, कधी विचारांचा, कधी बौद्धिकक्षमतेचा आधार असतो, पण किती शृंगारून सजवली तरी तिला राजेशाही असे नाव दिले अगर नेत्याचे आज्ञापालन म्हटले तरी वास्तवता तीच राहते. प्राणिसृष्टीतूनच माणसाचा उदय झालेला आहे, म्हणून तो वारसा हुकूमशाहीच्या रूपाने चालत आलेला आहे. माणूस हा जनावरांच्यापेक्षा निराळा आहे. प्रत्येकाला व्यक्तिमत्त्व आहे, ते जतन केलेच पाहिजे, ह्या श्रद्धा माणसाच्या संस्कृतीचा भाग आहेत. लोकशाही हा असा सांस्कृतिक मूल्यांचा आविष्कार असतो, म्हणूनच ती जतन करावी लागते, डोळ्यांत तेल घालून जपावी लागते.

आज लोकशाही म्हटल्याबरोबर ज्या कल्पना आपल्या मनात येतात त्या पूर्वी नव्हत्या. भारतीय गणतंत्राची फारशी माहिती उपलब्ध नाही, पण जी काही माहिती उपलब्ध आहे त्यावरून असे दिसते की ह्या गणतंत्राच्या गणसभा असत. माणसे जन्मतःच गणसभेची सभासद असत. तिथे गणसभेत येण्यासाठी निवडणूक नव्हती. त्या कुळा-बाहेरचा माणूस गणसभेत येऊ शकत नसे. रक्ताच्या नात्याने बांधलेल्या कुलसमूहांची ती लोकशाही होती. ही जुन्या जगाची लोकशाहीच होती, पण ती प्रातिनिधिक लोकशाही नव्हती आणि ह्या लोकशाहीचा आधार प्रदेश नव्हता तर कुळ होता. ह्याही गणतंत्रात दास गुलाम असतील, पण त्यांची विशेष माहिती उपलब्ध नाही.

त्या मानाने ग्रीक नगर राज्यांची व तेथील गणतंत्राची माहिती आपणास अधिक प्रमा-णात उपलब्ध आहे. ग्रीक गणतंत्रे हीसुद्धा लोकशाहीच होती. पण त्या लोकशाहीत पुरुषांनाच स्थान होते. स्त्रिया संसदसदस्य होऊ शकत नव्हत्या. ही राज्ये एकेका मोठ्या नगरीची होती. त्यांचा प्रदेशविस्तार फारसा नसे. राज्याची लोकसंख्याही फार मोठी नसे. ती काही लाखांत मोजता येई. ह्या गणतंत्रात मोठी लोकसंख्या गुलाम होती. स्वतंत्र नागरिकांच्या पुरतीच ही लोकशाही होती. संसदेत सारे कामकाज बहुमताने चाले. संसदेला जाहीर सभेचेच रूप असे. म्हणून वक्तृत्व ह्या गणतंत्रात फार महत्त्वाचे असे. ही प्रातिनिधिक लोकशाही नव्हती. प्राचीन भारतीय लोकशाह्यांची जर तपशिलाने माहिती उपलब्ध झाली तर थोड्या फार फरकाने चित्र ह्यासारखेच दिसणार आहे. ह्या सर्व जुन्या लोकशाह्यांमध्ये विषमता हा समाजरचनेचा भाग होता. सामाजिक विषमता व गुलामगिरी एकीकडे आणि लोकशाही दुसरीकडे ह्यांत काही विसंवाद आहे, असे प्राचीन जगाला वाटलेले दिसत नाही. मग ते पूर्वेचे जग असो की पश्चिमेचे जग असो. अथेन्स ह्या प्रसिद्ध नगरराज्यात नागरिक एकवीस हजार होते. हे सारे पुरुष. नागरिक नसणारे स्वतंत्र दहा हजार लोक होते. हे संसदेचे सदस्य नव्हते. गुलाम चार लक्ष होते.

नागरिकांच्या व इतर स्वतंत्रांच्या बायकामुलांचा जरी हिशेब केला तरी राज्यातील ८० टक्के प्रजा गुलाम होती असा ह्याचा अर्थ आहे.

आधुनिक जगातील लोकशाहीचे माहेरघर इंग्लंड मानले जाते. इंग्लंडमधील प्रसिद्ध मॅग्नाचार्टा ही सनद इ. स. १२१५ ची आहे. ह्या सनदेला लोकशाहीचा उगम असे मोठे गोंडस नाव इतिहासकारांनी दिलेले आहे. संपूर्ण हिंदुस्थान ज्या वेळी दक्षिणेत हिंदू राजे आणि उत्तरेत नव-स्थापित मुस्लिम राजे ह्यांनी भरलेला होता त्या काळी, जेव्हा भारतीय मन, धर्म, राजे, धार्मिक अन्याय व धार्मिक लढाया ह्यात गुंतले होते त्या काळी इंग्लंड लोकशाहीची पहिली वाट मांडीत होते. असा काही तर गैरसमज अनेकांचा होतो. सत्य ह्यापेक्षा निराळे आहे. मानवमात्रांच्या समतेवर विश्वास नसणारा राजा आणि त्याच भूमिकेचे सरदार ह्यांच्यातील हा झगडा आहे. ह्या झगड्यात सरदारांनी राजाचा पराभव करून आपले हक्क स्थापन केले इतकेच मॅग्नाचार्टाचे सत्य आहे. मॅग्नाचार्टामुळे झाले काय तर एका राजाच्या सत्तेऐवजी सरदार मंडळींची सत्ता निर्णायक महत्त्वाची ठरली. जुन्या मुस्लिम राजवटीत तुर्क उमरावांच्या सभेने तलवारींनी जो हक्क मान्य केलेला होता तोच हक्क इंग्लंडमध्ये प्रथम तलवारींनी स्थापन केला. नंतर शब्दांच्यामध्ये करार झाला. मॅग्नाचार्टानंतर अनेक घटना घडल्या. इ. स. १६४९ मध्ये क्रॉम्वेलने राज्यक्रांती करून राजा मारला, पण सर्व माणसांची समानता ही कल्पना ह्या मंडळासमोर नव्हती. सरदार, जागीरदार, धर्मगुरू ह्यांचीच ही राजवट होती. इंग्लंड ॲंग्लिकन चर्चचे म्हणून रोम कॅथलिक, प्रॉटेस्टंट व ज्यू हे ह्या राजवटीत दुय्यम नागरिकच होते. ह्या परिस्थितीत पहिला महत्त्वाचा बदल इ. स. १८३२ साली होतो.

इ. स. १८३२ साली धर्मगुरू व सरदार नसणाऱ्या सामान्यांना मतदानाचा हक्क प्राप्त होतो. पण हे सामान्य म्हणजे सधन सामान्य आहेत! सर्व प्रौढ पुरुषांना मतदानाचा अधिकार एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी प्राप्त होतो. स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त होऊन प्रौढ सार्वत्रिक मतदानावर आधारलेली पहिली निवडणूक इंग्लंडमध्ये इ. स. १९२८ साली झाली. ज्या इंग्लंडला लोकशाहीचे माहेरघर म्हणण्यात येते तिथे लोकशाही होती, पण लोकशाहीत स्त्रियांना वाव नव्हता, शेतकरी आणि मजुरांना वाव नव्हता. धर्माच्यामुळे नागरिकांच्या हक्कांत फरक होत असे. एकोणिसाव्या शतकापर्यंत इंग्लंडमध्ये गुलामगिरीही भरपूर होती. आपल्याच प्रजेला गुलाम ठेवणारी अशी ही लोकशाही अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया, आफ्रिका ह्या ठिकाणी साम्राज्ये निर्माण करून कोट्यवधी लोकांना गुलाम करीत होती, पिळून लुटून दरिद्री करीत होती, ह्यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. आश्चर्य असेल तर फ्रान्स आणि अमेरिकेचे आहे. इंग्लंडमध्ये परंपरा न तोडता क्रमबद्ध विकास होतो म्हणून नव्या जाणिवा स्वीकारणारे इंग्लिश मन प्रबल परंपरावादीही आहे. अमेरिकेचे तसे नाही. अमेरिकेने आरंभापासून

धर्माधर्मातील समता व व्यक्तींची स्वतंत्रता ह्यावर भर दिलेला होता. "प्रतिनिधी नाहीत तर मग करही नाही" ही घोषणा तत्त्वतः ज्यांच्यावर राज्य करायचे त्यांचे संसदेत प्रतिनिधित्व हवे असे सांगणारी आहे. सर्व माणसे समान आहेत ही कल्पना अमेरिकन क्रांतीच्या नेत्यांत फार प्रभावी होती, म्हणूनच तिचा संविधानाच्या जाहीर-नाम्यात उल्लेख आहे. अमेरिकेत निग्रो गुलाम जास्त होते, मताधिकार संपत्तिमानांना होता. अथेन्समध्ये गुलाम जास्त, नागरिक फार कमी व थोडे स्वतंत्र अशी रचना होती. अमेरिकेत गुलाम थोडे, नागरिक नसणारे स्वतंत्र ९० टक्के व नागरिक पाच-सहा टक्के अशी रचना होती. क्रांतीनंतर ८२ वर्षे निग्रोंना गुलामीतून मुक्त करण्याचा प्रश्नच मान्य झाला नाही, आणि इ. स. १८६२ साली निग्रो गुलामगिरीतून मुक्त झाले असे इतर लोक म्हणतात, पण अमेरिकेतील निग्रोंना आपण अजून गुलाम आहोत असे वाटते. अमेरिकेत स्त्रियांना मतदानाचा अधिकार १९२० साली मिळाला.

फ्रान्सच्या राज्यक्रांतीने तर जगाला धक्का दिला, विचारवंतांनी राजकीय विचार मांडावे आणि ह्या विचारांनी प्रभावित झालेल्या नेत्यांनी एका विचारसरणीला प्रमाण मानून क्रांती करावी, ही घटना फ्रान्समध्ये प्रथमच घडत होती. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ह्या घोषणा फ्रेंच राज्यक्रांतीत फार महत्त्वाच्या होत्या. फ्रेंच राज्यक्रांती फार काळ टिकली नाही, तिच्यातून नेपोलियनचा विजय झाला, हे तर खरेच, पण माझ्या समोर वेगळा प्रश्न आहे. समजा फ्रेंच राज्यक्रांती स्थिरावली असती तर तिने स्त्रियांना समान अधिकार दिले असते काय ? इतिहास असा आहे की फ्रान्समध्ये स्त्री मतदानाचा अधिकार १९४५ साली दुसऱ्या महायुद्धानंतरच्या राज्यघटनेने दिला आहे! फ्रेंच राज्यक्रांती, शेत-मजूर, छोटे शेतकरी व मजूर हेही इतरांचे इतकेच समान आहेत, हे मान्य करण्यास तयार नव्हती. क्रांतिकारकांनी आपल्या कारकीर्दीत जे कायदे केले त्यातील एका कायद्याने असे सांगितले आहे की, ह्या प्रजासत्ताकात मजुरांच्या व कामगारांच्या संघटनांना बंदी राहील. कारण ह्या संघटनांचा कल मालकांचे स्वातंत्र्य संकुचित करण्याकडे असतो. फ्रेंच क्रांतिकारकांचा राजा, सरदार व धर्मगुरूंना विरोध होता, पण त्यामुळे त्यांचा जमीनदारीला विरोध होता असे समजण्याचे कारण नाही. फ्रेंच राज्यक्रांती, जमीनदार व व्यापारी ह्यांचे रक्षण करीत होती. त्यांना जमीनदार चाले, जहागीरदार व सरदार नको होता. आणि ह्या लोकशाहीवाद्यांना जगावर साम्राज्य गाजवण्याचाही संकोच नव्हता. आफ्रिका आणि आशियात राष्ट्र म्हणून अस्तित्वात येण्यासाठी सर्वांत घनघोर व रक्त-रंजित संघर्ष करावा लागला दोन देशांना. एक म्हणजे व्हिएटनाम ( जुना इंडोचायना ) व दुसरा अल्जिरिया. हे दोन्ही देश फ्रेंच वसाहती होते !

लोकशाहीचा विचार करताना मला नेहमी जाणवणारे दुसरे सत्य असे आहे की, जगात लोकशाही असणारे देश फार थोडे आहेत. बाकी सर्वत्र कोणत्यातरी प्रकारची हुकूम-

शाहीच आहे. आजही विसाव्या शतकात मानवजातीच्या फार मोठ्या विभागाला लोकशाही राज्यपद्धती रुजलेली अगर पचलेली दिसत नाही—आणि जे देश लोकशाही-वादी म्हणून प्रसिद्ध, त्यांचीही परंपरा स्वतःच्या जनतेला गुलाम ठेवणारी व इतर राष्ट्रांना गुलाम करणारीच राहिली ! लोकशाही व गुलामगिरी ह्यांत विरोध आहे असे तोंडाने बोलणे निराळे आणि ही भूमिका व्यवहारात दिसणे निराळे. लोकशाहीवादी असे स्वतःविषयी म्हणणाऱ्या राष्ट्रांचा व्यवहार नेहमी गुलामगिरीशी सुसंवादी राहिला.

लोकशाहीवादी राष्ट्रांच्या ह्या दीर्घकालीन परंपरेमुळे दोन कल्पना फार बदनाम झालेल्या आहेत. एकतर लोकशाही ही कल्पनाच बदनाम झाली. ज्याच्याजवळ जायदाद व संपत्ती आहे त्यांची ती मालमत्ता सुरक्षित राहावी व जे दरिद्री आहेत त्यांनी नेहमी दरिद्रीच राहावे, ह्याची मोठ्या कौशल्याने सोय करणारी अशी राजवट म्हणजे लोकशाही. ही कल्पना भांडवलदारांच्या सोयीसाठी निघालेली आहे. लोकशाहीवादी म्हणजे भांडवल-शाहीवादी असा प्रचार जो होत असतो व ज्यामुळे लोकशाही अप्रतिष्ठित होते त्याला कारण लोकशाहीवादी राष्ट्रांचा इतिहास हेच आहे. लोकशाहीचा आधार स्वातंत्र्य हा असतो. लोकशाही बदनाम झाली की स्वातंत्र्य ही कल्पनाही बदनाम होते. कोट्यवधी लोक उपाशी, नागवे व दरिद्री असताना स्वातंत्र्याला काय अर्थ आहे, ह्या मुद्द्यापासून टीकेला आरंभ होत असतो आणि ह्या टीकेचा शेवट स्वातंत्र्य हे मूटभर वरिष्ठ वर्गाला हवे असून जनतेला भाकर हवी आहे, या ठिकाणी होतो ! आम्हाला स्वातंत्र्य नको, भाकर हवी, अशी घोषणा मग केली जाते.

स्वातंत्र्य निर्माण करणे, बलवान करणे, स्वातंत्र्याची आस्था निर्माण करणे कठीण काम आहे. स्वातंत्र्याचा संकोच करणे फार सोपे आहे. अजून सुसंस्कृत व समृद्ध व्यक्तिमत्त्व असणारा माणूस संख्येने फार अल्प आहे. म्हणून जो माणूस अस्तित्वात आहे त्याला स्वातंत्र्याची गरज फारशी वाटत नाही. कधी राष्ट्र संकटात आहे म्हणून तर कधी भाकर देतो म्हणून स्वातंत्र्य नाहीसे करणे कधीच फारसे अवघड नसते. अवघड असते स्वातंत्र्य टिकवणे. लोकशाहीवादी राष्ट्रे ज्या पद्धतीने वागली त्यामुळे लोकशाही व स्वातंत्र्य ह्या कल्पना फार बदनाम झाल्या, हे दुर्दैवी असले तरी सत्य आहे.

लोकशाहीच्या संदर्भात हा सगळा विचार करण्याचे कारण म्हणजे एक मुद्दा स्पष्ट व्हावा. तो मुद्दा असा की लोकशाही म्हणजे काय, हे लोकशाहीच्या इतिहासावरून कळत नाही. इतिहासावरून फक्त लोकशाही म्हणजे काय नव्हे, इतकेच कळते. अजून लोकशाही-बाबतचा एक भ्रम व गैरसमज दूर केला पाहिजे. अब्राहम लिंकनने केलेली लोकशाहीची व्याख्या अतिशय प्रसिद्ध आहे. जनतेचे जनतेकडून व जनतेसाठी शासन म्हणजे लोकशाही अशी ही व्याख्या आहे. हे लवकर लक्षातच येत नाही. मूळ गफलतीचे कारण

लिंकन नसून रूसो आहे. रूसोने जनरल विलची कल्पना मांडलेली होती. जनतेचे मत, सर्वसाधारण मत, जनतेचे बहुमत ह्या सगळ्या शब्दांतून जनरल विल ही कल्पनाच व्यक्त होत असते. लोकशाहीचा व्यवहार असा जनतेचा कौल घेऊनच चालणार यात वाद नाही. पण हा व्यवहार झाला. हे तत्त्वज्ञान नव्हे. जे जनतेकडून बहुमताने निवडून येतील ते जनतेच्या कल्याणासाठीच राज्य करतील अशी खात्री बाळगता येत नाही. (जे बहुमताने निवडून येतील त्यांना जनतेचे बहुमत मिळालेले आहे, अशीही खात्री देता येत नाही आणि मतदान न करणारे सोडून दिले तरी जे मतदान करतील त्यांच्याही बहुमताची खात्री देता येत नाही!) ज्या कार्यक्रमासाठी बहुमताने जनतेने निवडून दिले तो कार्यक्रम प्रामाणिकपणे अमलात आणणार असे जरी जनप्रतिनिधींनी ठरवले तरीसुद्धा हा कार्यक्रम जनतेच्या कल्याणासाठी योग्य कार्यक्रम असेल याचीही खात्री देता येत नाही.

बहुमत, जनतेचे बहुमत म्हणजे लोकशाही हा एक भ्रमच आहे. संसदेला बहुमताने अमुक करण्याचा अधिकार आहे का? असा प्रश्न आपण विचारतो. खरे तर प्रश्न असा विचारायला हवा, सर्व जनतेलासुद्धा बहुमताने वाटेल ते करण्याचा अधिकार आहे का? माझ्या मते जनतेलासुद्धा बहुमताने वाटेल ते करण्याचा अधिकार नाही, लोकशाहीत नाही. अल्पमतवाल्यांचे काही हक्क मानलेच पाहिजेत. नाहीतर लोकशाहीला काही अर्थच उरणार नाही. लोकशाहीचा व्यवहार बहुमतानेच चालणार हे उघड आहे. वाद त्यावर नाही. वाद आहे तो असा की बहुमत हे लोकशाहीचे तत्त्वज्ञान आहे का?

ज्या ठिकाणापासून आपण विचाराला आरंभ केला ते हे ठिकाण आहे. राजकीय कल्पनांना इतिहास असतो हे खरेच आहे; पण ह्या कल्पनांना विकासही असतो. विकासाचे टप्पे ओलांडीत ती कल्पना वर्तमानात येते. आज आपण लोकशाही श्रद्धेय व प्रमाण मानतो म्हणजे काय प्रमाण मानतो? अथेन्सप्रमाणे २१ हजार नागरिकांच्या मागे चार लक्ष गुलाम ही कल्पना आपण प्रमाण मानतो का? अठराव्या शतकातील इंग्लंडप्रमाणे जग सुधारण्यासाठी इतरांना गुलाम करणे ही आपली ऐतिहासिक जबाबदारी आहे, असे आपण मानतो का? सभ्य दरबारी भाषेत हे वाक्य असे आहे : ईश्वरी कृपेने सुधारणा घडून पुढारलेले होण्याचा ज्यांना प्रथम योग आला त्यांनी आपले सर्व सामर्थ्य मागासलेल्यांच्या सुधारणेसाठी एकवटले पाहिजे. ते एक ऐतिहासिक कर्तव्य आहे. मग हे कर्तव्य पार पाडताना जे मागासलेले आहेत त्यांना कितीही दुःख वाटो! निश्चितच आपण लोकशाही राष्ट्रांचा व्यवहार म्हणताना ती कल्पना प्रमाण समजत नाही.

आपण कल्पनांचा इतिहासही विचारात घेतो तसा विकासही विचारात घेतो. लोकशाहीच्या

विचाराच्या विकासात लॉक, मिल, मार्क्स आणि गांधी हे मला फार महत्त्वाचे टप्पे वाटतात. ह्या यादीत मी मार्क्सचे नाव घेतल्याबद्दल बुचकळ्यात पडण्याचे काही कारण नाही. मी कम्युनिस्ट पक्षाचा व्यवहार हा लोकशाहीच्या विकासातील फार महत्त्वाचा टप्पा आहे असे म्हणत नाही, मी मार्क्स ह्या विचारवंताबद्दल बोलतो आहे. त्याचा संदर्भ घेतल्याशिवाय लोकशाही ही कल्पना कधी पूर्णच होणार नाही. कारण मार्क्स हा मानवजातीच्या स्वातंत्र्याचा एक महत्त्वाचा प्रवक्ता आहे. बहुमत हा मुद्दा मध्यवर्ती न समजणाऱ्या विचारवंतांचे हे टप्पे आहेत.

लॉक असे मानतो की मानवाचे काही मूलभूत अधिकार आहेत. हे मूलभूत अधिकार माणसाला शासनसत्तेने, राजसत्तेने दिलेले नाहीत. ते माणसाचे निसर्गसिद्ध अधिकार आहेत. ह्या अधिकारांच्या रक्षणासाठी शासनसत्ता असते, म्हणून शासनाला हे अधिकार कमी करता येत नाहीत. हे अधिकार प्रशासनाला, संसदेला, फार काय जनतेच्या बहुमतालाही कमी करता येत नाहीत, असा लॉकच्या म्हणण्याचा आशय आहे. मानवाचे मूलभूत अधिकार ही महत्त्वाची लोकशाही कल्पना आहे. आपण लॉकशी अनेक मुद्द्यांवर भांडू शकतो. प्रथम म्हणजे हे अधिकार निसर्गदत्त आहेत का ? की ते जनावरांच्यापेक्षा निराळे असे माणूसपण सिद्ध करण्याच्या प्रयत्नात माणसांनीच प्रतिष्ठा दिलेले व माणसाचे माणूसपण टिकवण्यासाठी आवश्यक असणारे सांस्कृतिक अधिकार आहेत ? मी मूलभूत अधिकार सांस्कृतिक मानतो. दुसरे म्हणजे लॉक सांगतो ते सर्व अधिकार मूलभूत आहेत का ? काही मूलभूत अधिकार लॉकने नोंदवले नाहीत, म्हणून ते मूलभूत मानू नयेत का ? असे आपण लॉकशी भांडू शकतो. पण सर्व भांडणानंतर एक मुद्दा शिल्लक राहतो तो असा की मानवाचे काही मूलभूत अधिकार आहेत. ते शासनाला कमी करता येत नसतात. ह्या अधिकारांच्या रक्षणासाठी शासन असते. लोकशाहीतील ही महत्त्वाची कल्पना आहे.

मिल हा कायद्याचे राज्य ही कल्पना आग्रहाने प्रतिपादन करणारा विचारवंत आहे. त्याची कल्पना अशी की शासनाने जे राज्य करायचे ते कायद्याप्रमाणे तर असले पाहिजेच, पण हा कायदाही सर्वांना सारखा असायला हवा. आणि ज्याला आपण कायदा म्हणतो तो तरी मन मानेल तसा असून कसे भागेल ? ह्या कायद्याच्या मागे काही साधारण तत्त्वे असली पाहिजेत. साधारण, सर्वसामान्य आणि स्थिर अशी तत्त्वे. ती सर्वांनाच लागू असणार. त्या तत्त्वावर आधारलेला कायदा तोही सर्वांनाच लागू असणार व समानतेने लागू असणार. म्हणजे मिल हा लोकशाहीची कल्पना तत्त्वावर आधारलेल्या राजवटींची मानतो. ही तत्त्वे कोणती ? माणसाच्या स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेची जपणूक करणे, हे ते तत्त्व आहे. माणसांना ह्या तत्त्वाशी तडजोड करण्याचा हक्क असावा काय ? अशा तडजोडीची इच्छा माणसांना नेहमी असते. प्रश्न इच्छेचा नसून उचित हक्कांचा आहे.

मिलनंतरच्या काळात एका राजकीय विचारवंताने म्हटले आहे की जनतेला सर्व हक्क असतात, पण हे हक्क विकण्याचा हक्क मात्र नसतो! जनतेच्या बहुमतालासुद्धा हे हक्क विकण्याचा अधिकार नाही. ही भूमिका आपल्याला पुन्हा बहुमताच्या निरपवाद प्रेमापासून दूर नेते.

आपले व्यक्तिमत्त्व जतन करणे, जोपासणे, समृद्ध करणे हा माणसाचा नुसता मूलभूत अधिकार नाही. ती माणसाच्या माणूसपणाची सारगर्भता आहे. त्यात माणूसपणाची सार्थकता आहे. मानवाने निर्माण केलेल्या संस्कृतीचा अंतिम आशय हाच आहे. माणसाने माणूस असावे की नाही, माणूस व्हावे की नाही, हा बहुमताने निर्णय घेण्याचा प्रश्न नाही. तो निर्णयांपलीकडचा प्रश्न आहे. लोकशाही म्हणजे ह्या तत्त्वाला अंगीकारणारी समाजरचना व शासन म्हणून नुसते शासन लोकशाहीवादी असणे पुरेसे नाही, समाजही, समाजरचनाही, स्वातंत्र्यावर आधारलेली असावी लागते. समता हे ह्या मानवी स्वातंत्र्याचेच एक नाव म्हटले पाहिजे.

माणूस स्वतंत्र असला पाहिजे हे नुसते मान्य करून काय होणार? कारण माणूस स्वतंत्र नाही. हा माणूस गुलाम होतो आणि कधी सुखाने तर कधी वैतागाने तो गुलाम राहणे पत्करतो. माणूस हा शेवटी दोन पायांचा पशूच आहे. प्राणिसृष्टीतून आपल्या पशुत्वाचा वारसा माणूस घेऊन येतो. हा वारसा विसरू म्हटले तरी विसरता येणार नाही. माणसामधील माणूस गुलाम करणारा सर्वांत प्रबल दोर, सर्वांत दृढबंध हे त्याचे पशुत्वच आहे. त्याची भूक, सुरक्षितता त्याला गुलाम करते. शरीर रूपाने अस्तित्व टिकवण्याची प्रबल जीवशास्त्रीय प्रेरणा त्याला गुलाम करते. म्हणून माणसाच्या प्राथमिक गरजांच्या पूर्ततेची हमी देणारी समाजरचना आल्याविना माणूस स्वतंत्र होत नाही. ह्यालाच आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता असे म्हणतात. मार्क्सचे विवेचन प्रमाण मानणाऱ्यांनी माणूस किती प्रमाणात स्वतंत्र केला हा निराळा मुद्दा आहे. कारण रूसो वा लॉकचा नामजप करणाऱ्यांनी किती कोटी माणसे गुलाम केली, हा आपण रूसो व लॉकचा गुन्हा समजत नाही कम्युनिस्ट राजवटी ह्या स्वातंत्र्याचा आविष्कार करणाऱ्या राजवटी नसतीलही कदाचित, पण मार्क्सचे तत्त्वज्ञान मात्र माणूस खरोखरी स्वतंत्र कसा होईल हे सांगणारे तत्त्वज्ञान होते. एंजल्सने समाजवादाची व्याख्याच "स्वातंत्र्यावर आधारलेला समाज" अशी केली आहे. मानवी स्वातंत्र्याचा विचार करताना जे लोक मार्क्सकडे दुर्लक्ष करतात त्यांना माणसांच्यासाठी स्वातंत्र्य नको असते, त्यांना फक्त स्वतःची स्वतंत्रता हवी असते, असे म्हणणे भाग आहे. लोकशाहीत जर स्वातंत्र्याची संकल्पना असेल तर गुलामीचा सर्वांत मोठा बंध तोडण्याचे दायित्व आपण मान्य केलेच पाहिजे.

मार्क्स स्वातंत्र्य कसे निर्माण होईल हे सांगतो. गांधींनी कुणाला स्वातंत्र्याची गरज आहे

हे सांगितले आहे. विसाव्या शतकातील प्रज्ञाशाली महर्षींत अत्यंत अशास्त्रीय भाषेत खोल शास्त्रीय सत्य सांगणारा गांधी हा सर्वांत मोठा महात्मा आहे! आपले सगळे विचार आधुनिक विज्ञान, शास्त्र व यंत्र यांनी भारावलेले होते. नवा विचार मांडणारेही शहरांतले नवे शिक्षित होते. त्यांच्या डोळ्यांसमोर जसा मजूर व कामगार होता तसा शेतकरी नव्हता. संपत्ती व समृद्धी वाढावी यासाठी औद्योगीकरण हाच मंत्र सर्वांच्या समोर होता. ग्रामीण भाग हा चिंतनाचा प्रधानविषय गांधींनी केला. जे सर्वांत असंघटित, दरिद्री, अशिक्षित आणि मागासलेले त्यांना विकासात अग्रहक्क हवा. स्वातंत्र्याची खरी गरज त्यांनाच असते. तुम्ही मोकळीक मान्य करता की राष्ट्रीयीकरण करता, हा मुद्दा गांधींसमोर महत्त्वाचा नाही. कोट्यवधी दरिद्रयांना काय मिळायला हवे व काय मिळते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे, हा महात्मा गांधींचा मुद्दा होता. कामगारांच्या नावे बोलणाऱ्यांनी कामगारांना काही दिले नसेल व शेतकऱ्यांचा कळवळा दाखविणाऱ्यांनी शेतकऱ्यांना काही दिले नसेल तर तो दोष गांधींचा नव्हे.

गांधींच्या चिंतनातून स्वातंत्र्य कुणासाठी हा महत्त्वाचा मुद्दा निर्माण होतो. स्वातंत्र्याचा जप करणाऱ्यांच्या मनात, असलेली जायदाद जतन करण्याचे व मुक्तपणे सुखाची साधने गोळा करण्याचे म्हणजेच जायदाद वाढवण्याचे स्वातंत्र्य असेल व त्या भूमिकेला अनुसरून त्यांनी स्वातंत्र्याची कल्पना मांडलीही असेल, पण तो सोयीचा व्यवहार झाला. स्वातंत्र्याचे ते तत्त्वज्ञान नव्हे. राजेशाहीत राजाला स्वातंत्र्य नको असते. सर्वांना लुटून खाण्याचा अधिकार बळकावीत व सामर्थ्यशाली लोक शतकानुशतके बजावीतच आलेले आहेत. अधिकार इतरांनी मान्य केलेला आहे की नाही हे ते संविधानाच्या ग्रंथात पाहत नसतात. बलवंतांच्या हातात असलेला दंडा हा त्यांच्या सर्व हक्कांचा आधार असतो. स्वातंत्र्याची त्याला गरज नसते. ज्याच्या जवळ काही नसते, सर्व तऱ्हेच्या अभावाने जे होरपळत असतात त्यांनाच आक्रोशाची गरज असते, निदान आक्रोश मोकळेपणाने करता यावा ह्यासाठी स्वातंत्र्याची गरज असते. फ्रेंच राज्यक्रांतीत राजे, सरदार व धर्मगुरू स्वातंत्र्य मागत नव्हते. स्वातंत्र्य हे नेहमीच भिकारी व त्यांचे नेते मागतात.

तुम्हाला स्वातंत्र्य हवे की भाकर हवी, हा प्रश्नच चूक आहे. मूठभर काही जणांना जायदाद सापडण्याचा अनिर्बंध हक्क हवा की कोट्यवधी दरिद्रयांना समाधानाचे जीवन हवे, हा प्रश्न विचारण्यात अर्थ नाही कारण कोट्यवधी दरिद्री काय उत्तर देतील हे स्पष्टच आहे. पण ह्या दरिद्रयांना आपल्या इच्छा व्यक्त करण्याचा अधिकार हवा, त्यांना शासन निवडण्याचा, बदलण्याचा हक्क हवा, त्यांना मागणी करण्याच्या हक्क हवा, स्वातंत्र्य जेव्हा जाते तेव्हा कोट्यवधी दुबळ्यांचा आवाज बंद होतो. जेव्हा आक्रोश चालू असतो तेव्हाही सुखासुखी सहजासहजी काही मिळत नसतेच. जेव्हा गादी

उलथण्याची भीती असते तेव्हाही लोक इस्टेटींना मुंगळ्याप्रमाणे घट्ट बिलगूनच बसतात हा जायदादवाला वर्ग आक्रोश व भीती संपल्यानंतर काही देत नसतो. दिले दिले, सगळे दिले असे, तो नुसताच ओरडत राहतो. मिळाले नाही हे म्हणण्याचा हक्क बंद असतो. उलट मिळाले, मिळाले असे ओरडण्यासाठी भाड्याने माणसे गोळा केली जातात! म्हणूनच स्वातंत्र्य हवे असते ते कोट्यवधी दरिद्र्यांना. हा दरिद्रीनारायण गांधींचा परमेश्वर होता. लोकशाही ही सर्वांची राजवट आहे, ह्या जुन्या कल्पनेचा आशय ती स्वातंत्र्यासाठी असणारी, माणसाचे माणूसपण जतन करण्यासाठी आवश्यक असणारी राजवट आहे, ह्या दिशेने विकसित होतो. लॉक आणि मिलचे महत्त्व ह्या दिशेसाठी आहे. हे स्वातंत्र्य आर्थिक दास्य नष्ट करून निर्माण करावे लागते व ते प्रामुख्याने दरिद्र्यांना माणूस म्हणून जगता येणे शक्य व्हावे ह्यासाठी असते, ही कृपा मार्क्स व गांधी ह्या महात्म्यांची आहे. हा विकास मान्य करून व पत्करून जी लोकशाहीची कल्पना साकार होते ती श्रद्धेय आहे. हा झगडा शब्दांवर नसून आशयावर आहे.

आता आपण लोकशाहीची अधिक चांगली व्याख्या करू शकतो. लोकशाहीचा व्यवहार बहुमताने चालतो तसा तो चालावा. पण बहुमत हा व्यवहाराचा भाग झाला, व्याख्येचा नव्हे. ( लोकशाही म्हणजे निवडून आलेल्या, दिलेल्या प्रतिनिधींच्या बहुमताची अगर साक्षात जनतेच्या बहुमताची राजवट नव्हे, जनतेकडून आणि जनतेची हे लोकशाहीचे अनुषंगिक भाग आहेत. स्वतंत्र असणे हा माणसाचा मूलभूत हक्क आहे, हे तत्त्व मान्य करून माणसाला गुलाम करणाऱ्या सर्व बेड्या तोडणारी, माणसाच्या स्वातंत्र्याला मुक्त अवकाश देणारी व हे स्वातंत्र्य सर्वांना उपभोगायला मिळावे, या भूमिकेशी वचनबद्ध असणारी जी समाजरचना, तिची शासनपद्धती म्हणजे लोकशाही. ) निवडणुका व बहुमत ह्या बाबी स्वातंत्र्याचा आविष्कार म्हणून महत्त्वाच्या आहेत.

भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन झेकोस्लोव्हाकियाला गेले होते. तेथे संसदेत बोलताना ते म्हणाले, शासन जे काही करील त्यावर पसंतीचे शिक्कामोर्तब करणे ह्यासाठी संसद अस्तित्वात असते असे आम्ही मानीत नाही, संसदेची आमच्या मते प्रमुख कामे तीन असतात. जनतेला काय हवे ते संसद सांगते, तो जनतेचा आविष्कार असतो. शासनाचे काय चुकते ते सांगून शासनावर नियंत्रण ठेवणारी संसद असते. शासनाने काय करावे ह्याचे आदेश देणारी संसद असते. शासन स्वसमर्थनासाठी संसदेत येत नसते, ते आदेश घेण्यासाठी संसदेत येते. तत्त्वज्ञ राजा ज्या संसदेविषयी बोलतो आहे ती लोकशाहीची संसद आहे. तिचे मूल्य स्वातंत्र्य हे आहे.

# एका ध्येयनिष्ठ कम्युनिस्टाचा कबुलीजबाब

केरळमधील प्रसिद्ध भारतीय कम्युनिस्ट नेते के. दामोदरन् यांचे नुकतेच निधन झाले. जवळपास पन्नास वर्षे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या आणि समाजवादाच्या सेवेत व्यतीत केलेले असे ते कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या आद्य-प्रवर्तकांत आणि संस्थापकांत त्यांची गणना होते. एकतर दामोदरन् यांच्या पाठीशी प्रदीर्घ आयुष्यव्यापी अशा ध्येयवादी व स्वार्थशून्य जीवनाची पुण्याई होती. त्यामुळे त्यांच्या चिंतनाला विशेष मोल आहे. दुसरे म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्षातसुद्धा अखिल भारतीय नेतृत्वाच्या पातळीवर दीर्घकाळ त्यांनी कार्य केलेले आहे. जवळजवळ २५ वर्षे अखिल भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या ज्येष्ठ नेतृत्वात ते वावरत होते. म्हणून पक्षाच्या ध्येयधोरणाला आकार देणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश करावा लागेल. पक्षाची संपूर्ण अंतर्गत माहिती त्यांना साक्षात होती. यामुळे दामोदरन् यांच्या पाठीशी राजकीय जाणते-पणा आणि अनुभवही होता. तिसरी म्हणजे दामोदरन् हे चिकित्सक विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. एक बुद्धिवान, चिंतनशील आणि अभ्यासू कार्यकर्ते म्हणून आणि एक विद्वान नेते म्हणून त्यांची ख्याती होती. तत्त्वज्ञानाचेही दामोदरन् फार मोठे अभ्यासक होते. एका ध्येयवादी, अनुभवी, जाणत्या, विद्वान राजकीय कार्यकर्त्याचे चिंतन म्हणून दामोदरन् यांच्या लिखाणाला त्यामुळेच विशेष महत्त्व आहे.

लंडनहून प्रसिद्ध होणाऱ्या ' न्यू लेफ्ट रिव्ह्यू ' या नियतकालिकाच्या सप्टेंबर–ऑक्टोबर १९७५ च्या अंकात दामोदरन् यांची प्रदीर्घ मुलाखत छापली गेलेली आहे. ' न्यू लेफ्ट रिव्ह्यू ' हे नियतकालिक ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत नियतकालिक नाही. मार्क्स-वादावर श्रद्धा असणारे, स्वतःला डावे समजणारे अनेक लेखक या नियतकालिकातून आपले चिंतन व्यक्त करतात. प्रामुख्याने डाव्या चळवळीतील नव्या चिंतनाचे प्रति-निधित्व या नियतकालिकात असते. ती उजव्या अगर डाव्या कम्युनिस्ट पक्षाची अधिकृत पक्षीय मते नसतात. त्यामुळे भिन्न भिन्न विचारांच्या छटांना या नियतकालिकात वाव आहे. के. दामोदरन् यांची मते अधिकृत कम्युनिस्ट पक्षापेक्षा निराळी, अधिकृत भूमिकेवर टीका करणारी असावीत आणि ती त्यांनी जाहीर रीतीने अनधिकृत नियत-कालिकातून मांडावीत ही घटनाच लक्षणीय आहे. ज्या माणसाने ही मुलाखत घेतलेली आहे तो तारिक अली हा कार्यकर्ता कम्युनिस्ट नसून ट्रॉटस्कीवादी आहे आणि ट्रॉटस्की-

वादी ही अधिकृत कम्युनिस्ट पक्षात शिवी मानली जाते. एका ट्रॉस्टकीवादी कार्यकर्त्या-समोर मनमोकळेपणाने दामोदरन् यांनी चर्चा करावी हीसुद्धा लक्षणीय घटना आहे. के. दामोदरन् जे विचार मांडीत आहेत त्यांची अधिक बारकाईने छाननी झाली पाहिजे. त्या चिंतनातील महत्त्व व मर्यादांचा अधिक बारकाईने शोध झाला पाहिजे.

मुलाखतीच्या शेवटच्या-शेवटच्या भागात काही महत्त्वाचे प्रश्न आलेले आहेत. तारीक अली ट्रॉटस्कीवादी असल्यामुळे ट्रॉटस्कीविषयी त्याने प्रश्न विचारावा ही गोष्ट स्वाभाविकच आहे. ट्रॉटस्की हा रशियन राज्यक्रांतीच्या नेत्यांपैकी एक होता. त्याची मते क्रांतीपूर्वी अधिकृत पक्षभूमिकेला आक्षेपार्ह वाटत असत. लेनिननेसुद्धा ट्रॉटस्कीची दखल घेऊन त्याला उत्तरे दिली आहेत. पण हे मतभेद एका मर्यादेपर्यंत आहेत. रशियन राज्यक्रांतीनंतर ट्रॉटस्की हा प्रमुख नेत्यांच्यापैकी एक झाला. लेनिनच्या मृत्यूनंतर स्टॅलीन आणि ट्रॉटस्की या सत्तास्पर्धेत ट्रॉटस्कीचा पराभव झाला. पुढे मेक्सिकोत त्याचा खून झाला. कम्युनिस्ट पक्ष ट्रॉटस्कीला नेहमी शिव्या मोजीत असतो आणि त्याचा धिक्कार करीत असतो. एकतर त्याला साम्राज्यशाहीचा हेर आणि फॅसिस्टांचा दलाल म्हणून शिव्या मोजल्या जातात, नाहीतर प्रतिक्रांतिकारक, अतिरेकी, साहसवादी, कामगारशत्रू असे त्याला संबोधिले जाते. स्टॅलीनच्या सर्व कालखंडात आणि पुढेही ट्रॉटस्कीची अशीच हेटाळणी झाली. अलीकडे ट्रॉटस्कीविषयी फारशी शिवीगाळ होत नाही, फक्त त्याचा दृष्टिकोण चुकीचा होता एवढीच टीका होते. अजूनही रशियन कम्युनिस्ट पार्टीने ट्रॉटस्कीला योग्य न्याय दिलेला नाही.

दामोदरन् म्हणतात, मी ट्रॉटस्कीचा अनुयायी नाही आणि नव्हतो. त्यांचे हे म्हणणे बरोबर आहे. कारण ते जर ट्रॉटस्कीचे अनुयायी असते तर त्यांना कम्युनिस्ट पक्षात जागाच राहिली नसती. दामोदरन् यांचे दैवत स्टॅलीन होते. सर्वच कम्युनिस्टांची देवता त्या काळी स्टॅलीन होती, तिथे दामोदरन् यांचीही होती, यात काही नवल नाही. या आपल्या जुन्या देवतेच्या व दैवताच्या ठिकऱ्या उडालेल्या आहेत असे दामोदरन् सांगतात, क्रुश्चेव्ह रशियाचा पंतप्रधानही होता, पक्षाचा चिटणीसही होता. त्याने अधिकृतरीत्या स्टॅलिनच्या पापकृत्यांचा पाढा वाचून स्टॅलिनचे अवमूल्यन केले. सोवियट रशियानेच दैवतपदावरून स्टॅलिनची हकालपट्टी केलेली आहे. तेव्हा या देवतेच्या ठिकऱ्या उडाल्या यात नवल काहीच नाही. पण ही घटना घडत असताना दामोदरन् यांच्या मनाचा काही विकास झालेला आहे तो महत्त्वाचा आहे. या विकासाविषयी ते अतिशय संक्षेपाने सांगतात; पण त्यांचे या बाबतीतील संक्षिप्त मार्गदर्शनसुद्धा अत्यंत महत्त्वाचे आहे. दामोदरन् म्हणतात, स्टॅलीन ही माझी देवता, पण ती आता भंगलेली आहे. एका भंगलेल्या दैवताच्या ठिकाणी भंगलेले अगर न भंगलेले दुसरे दैवत मला बसवायचे नाही, कारण आता अशी दैवतपूजा करण्यावर माझा विश्वास राहिलेला नाही. माझा

दैवतपूजेवर विश्वास नाही, ही खरे म्हणजे लोकशाही आणि विचारस्वातंत्र्य यांची घोषणा आहे. दामोदरन् यांनी ती पूर्ण जबाबदारीने केलेली असेल असे मानायला हरकत नाही.

स्टॅलीन ही आमची देवता होती. जे स्टॅलीन म्हणत असे ते आम्हाला बरोबर वाटत असे. आता हे लक्षात येते की स्टॅलिनने चुका खूप केल्या, क्रूरकृत्ये पुष्कळ केली, लबाड्याही खूप केल्या. वैयक्तिक स्वार्थासाठी त्याने पुष्कळच भानगडी केल्या. आज हे सगळे उघडकीस येत आहे. पण यामुळे जुनीच अंधश्रद्धा चालू राहणे बरोबर नाही. काल स्टॅलीन जे सांगत होता ते सगळे आम्ही निःशंकपणे मान्य करत होतो. आज तितक्याच निःशंकपणे स्टॅलीन चुकला आणि क्रुश्चेव्ह जे सांगतो ते सर्व शब्दशः बरोबर आहे असे मानायचे काय ? म्हणजे झाले काय तर दैवत बदलले. अंधश्रद्धेची परंपरा तीच चालू आहे. दामोदरन् ह्यांना ते मान्य नाही. ते पुन्हा अंधश्रद्धेची कास धरण्यास तयार नाहीत. स्टॅलिनने लेनिनचे अवमूल्यन केले नव्हते. क्रुश्चेव्हने स्टॅलिनचे अवमूल्यन केले, तरी त्याने लेनिनची प्रतिमा अभंग ठेवली आहे. पण क्रुश्चेव्हची देवता होऊ शकली नाही. एक दिवस त्याचाही पाडाव झाला आणि त्याच्याही चुकांची यादी वाचण्यात आली ! आता नेतृत्व कॉ. ब्रेझनेव्हकडे आहे. या सगळ्या उद्योगात अजूनतरी लेनिन ही देवता अभंग आहे. दामोदरन् ज्या वेळेला म्हणतात की आता माझा दैवतपूजेवर विश्वास नाही, त्या वेळेला त्यांना हे म्हणायचे आहे की स्टॅलिनच्या चुका आता आम्हाला समजलेल्या आहेत, पण स्टॅलिनच्या सगळ्याच चुका आमच्यासमोर आल्या असतील असे नाही. अजूनही काही चुकांची कबुली देणे गैरसोयीचे वाटत असल्यामुळे त्या झाकून ठेवण्यात आल्या असतील. दुसरे म्हणजे ज्या चुका स्टॅलिनने केल्या नाहीत असेही काही त्याच्या नावावर उगीचच टाकले जात असेल. तिसरे म्हणजे तुम्ही ज्या चुका म्हणता त्या सगळ्याच चुका असतील असे नाही. एकूण काय तर स्टॅलीन निर्दोष व अचूक नव्हता हे आम्ही मान्य करू, पण आजचेही नेते निर्दोष व अचूक नसणार असे आम्ही गृहीत धरू. तुम्ही सांगावे व आम्ही ऐकावे असे आता चालणार नाही. आता आम्हाला पटेल तेवढे आम्ही मान्य करू, उरलेल्या चुका दाखवू असे दामोदरन् सांगत आहेत. पक्षशिस्त ही विचारस्वातंत्र्याच्या विरोधी जाता कामा नये, कारण पक्षही चुकत असतो अशी ही भूमिका आहे. एकनिष्ठेकडून स्वातंत्र्याकडे हा प्रवास स्वागतार्ह आणि विकासाचा मानणे भाग आहे.

आता दामोदरन् म्हणतात की, स्टॅलिनने ज्यांचा निषेध केला त्यांचा पुन्हा एकदा नव्याने गंभीरपणे विचार केला पाहिजे. विशेषतः ट्रॉटस्की, बुखारिन, रोझा लॅक्झेंबर्ग यांचाही नव्याने फेरविचार करावा लागेल आणि जे रशियाबाहेरचे मार्क्सवादी विचारवंत आहेत,–उदाहरणार्थ, लुकास याचाही विचार व्हायला पाहिजे. दामोदरन् यांनी प्रत्यक्ष

उल्लेख केलेला नाही, पण त्यांना मार्शल टिटो व चीनचे नेते माओ यांच्याहीबाबत नव्याने विचार केला पाहिजे, असे वाटत असावे.

जो आपल्याबरोबर आहे तो आपला मित्र व सहकारी याविषयी कम्युनिस्ट पक्षातसुद्धा मतभेद नसतो. पण जो आपल्याबरोबर नाही तो साम्राज्यशाहीचा हस्तक, भांडवलदारांचा एजंट, कामगारांचा शत्रू असे मानण्याची गरज नाही. कामगारांचे मित्र व समाजवादाचे चाहतेसुद्धा परस्परांचे विरोधक व प्रामाणिक मतभेद असणारे असू शकतात, असे दामोदरन् यांना आता वाटू लागलेले आहे. खरे म्हणजे मार्क्सचे तत्त्वज्ञान सामाजिक स्थित्यंतराची कारणे सांगणारे आणि सामाजिक स्थित्यंतराचा विचार करणारे तत्त्वज्ञान आहे. अशा तत्त्वज्ञानाच्या बाबतीत अनुयायांच्याकडून तीन प्रकारच्या चुका होण्याचा संभव असतो. एक तर सामाजिक जीवनातील स्थित्यंतर सांगणारे तत्त्वज्ञान वैयक्तिक जीवनातील छोट्या-मोठ्या घटनांचे स्पष्टीकरण करण्यासाठी वापरणे मुळातच चूक असते. रशियात कामगारांनी क्रांती का केली, याचे स्पष्टीकरण देणारे तत्त्वज्ञान एखाद्या व्यक्तीला भूक का लागत नाही, झोप का येत नाही हे सांगायला अपुरे ठरत असते. अनुयायी ही चूक नेहमी करतात. सामाजिक गतीचे तत्त्वज्ञान ते व्यक्तीच्या जीवनाला वापरतात. ही पहिल्या प्रकारची चूक आहे. दुसरे म्हणजे सामाजिक प्रश्नाचा विचार करतानासुद्धा मार्क्सवादाचा योग्य पद्धतीने वापर करता येईलच असे नाही. मार्क्सवादी सिद्धांतसुद्धा वापरणाऱ्याच्या आकलन व गरजांच्यानुसार वेगवेगळ्या पद्धतीने वापरला जाऊ शकतो. छत्रपती शिवाजीमहाराजांच्याकडे मध्ययुगातील एक सरंजामदार राजा व विषम समाजरचनेचा एक रक्षणकर्ता म्हणूनही पाहण्याची सोय उपलब्ध आहे, आणि गुलाम जनतेच्या स्वातंत्र्याचा नेता म्हणूनही महाराजांच्याकडे पाहता येते. या ठिकाणी जी चूक होते तिचे स्वरूप सिद्धांताचा वापर करता न येणे या जातीचे आहे दामोदरन् यांनी पहिल्या प्रकारची चूक गृहीत धरली आहे. दुसऱ्या प्रकारची चूक स्पष्टपणे नोंदवून मानण्यात आली आहे. पण अजून एक तिसऱ्या प्रकारची चूक असते.– ती म्हणजे मूळ सिद्धांतातच काही उणिवा व अपुरेपणा असतो. उदाहरणार्थ, मार्क्सवादी विवेचन जड जगत, सजीव जगत म्हणजे वनस्पती आणि सचेतन म्हणजे प्राणी यांच्या वैयक्तिक अगर सामूहिक स्पष्टीकरणाला फारसे उपयोगी पडत नाही. तो मानवी जीवनाचा सिद्धांत आहे. मानवेतरांना तो लागू पडत नाही. मानवी जीवनातसुद्धा मार्क्सवादाने जीवशास्त्रीय प्रेरणांच्यापैकी काहींचा विचार केलेला आहे, पण कामवासनेसारख्या प्रबल प्रेरणेचे स्थान फारसे ओळखलेले नाही. म्हणून मार्क्सवादी विवेचनाच्या सामर्थ्य-मर्यादांचाही पुन्हा एकदा शोध घ्यावा लागेल. कदाचित मार्क्सवादाच्या उणिवाही विचारात घ्याव्या लागतील. दामोदरन् यांच्या विचारस्वातंत्र्याच्या कक्षा मार्क्सचाही फेरविचार करण्यास तयार असणे इतक्या रुंदावलेल्या आहेत काय ? याविषयी शंका वाटते.

माणूस चुकू शकतो, नेते चुकू शकतात, राष्ट्रे चुका करू शकतात, सोव्हिएट रशियासुद्धा चुकू शकतो हे दामोदरन् यांनी मान्य केलेले आहे. झेकोस्लोव्हाकियावर ज्या वेळी आक्रमण झाले त्या वेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षात फार मोठे वादळ निर्माण झाले. तारिक अली यांनी या मुद्द्यावर जो प्रश्न विचारलेला आहे त्यात खोच आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट सामान्यपणे चीनवादी म्हणून ओळखले जातात. रशियाने झेकोस्लोव्हाकियावर आक्रमण करताच चीनवादी कम्युनिस्टांनी त्याचा ताबडतोब निषेध करायला हवा होता, पण तसे झाले नाही. मार्क्सवादी कम्युनिस्टांनी रशियन आक्रमणाचे समर्थन केले! तारिक अली यांनी उपस्थित न केलेला मुद्दा असा आहे की झेकोस्लाव नेते दुबचेक यांचा 'मानवी चेहऱ्याचा समाजवाद' नामक प्रबंध चुकीचा असून तो निषेधार्ह आहे अशी मार्क्सवादी कम्युनिस्टांची भूमिका होती मूळ भूमिकेपासून दुरावलेल्या झेकोस्लोव्हाकियाचा पाडाव मार्क्सवादी कम्युनिस्टांनी समर्थनीय मानला, उलट भारतीय कम्युनिस्ट पक्ष रशियावादी मानला जातो, तेव्हा या पक्षाने रशियाचे निःसंदिग्ध समर्थन करावे ही अपेक्षा होती, पण तसे घडले नाही. झेकोस्लोव्हाकियाबाबत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने गुळमुळीत व अर्धवट भूमिका घेतली. जाहीर रीतीने पक्ष या मुद्द्यावर गोलमोल बोलत राहिला, पण पक्षातील बहुमत रशियन धोरणाला आक्रमण समजावे व रशियाचा निषेध करण्यात यावा या बाजूचे होते. तारिक अलींनी खोचकपणे असे विचारले आहे की, रशियन आक्रमणाला तुमचा विरोध प्रामाणिक होता की भारतीय जनमताच्या सामान्य कलाशी सुसंगत राहायचे यासाठी होता!

दामोदरन् यांनी या निमित्ताने आपल्या पक्षाच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला आहे. ते सांगतात, दुबचेक यांचा प्रबंध भारतीय कम्युनिस्ट पक्षाने मान्य केला होता. याचा अर्थ असा होतो की, दुबचेक यांची भूमिका एका व्यक्तीची नव्हती. झेकोस्लोव्हाकियन कम्युनिस्ट पक्षाने पक्ष म्हणून त्या भूमिकेला अधिकृत मान्यता दिलेली होती. रशियाचाही या भूमिकेला पाठिंबा होता. भारतीय कम्युनिस्टांनीही या भूमिकेला पाठिंबा दिलेला होता. दुबचेक यांची भूमिका त्यांच्या पक्षाला मान्य आणि जगातल्या अनेक पक्षांना मान्य अशी भूमिका होती, दुबचेक मान्य भूमिकेची अमलबजावणी करीत होते. म्हणजे रशियन आक्रमण कामगारशत्रूंच्या नायनाटासाठी व समाजवादाच्या रक्षणासाठी नव्हते. ते समाजवाद्यांचे समाजवाद्यांवर राष्ट्रीय हितासाठी आक्रमण होते असे दामोदरन यांना म्हणायचे आहे. समाजवादी राष्ट्रे आक्रमण करू शकतात असा याचा पहिला अर्थ आहे आणि जनहिताचे प्रश्न गुंडाळून ठेवून आपल्या सोयीखातर समाजवादी राष्ट्रे समाजवादी राष्ट्रांवर आक्रमण करू शकतात, असा याचा दुसरा अर्थ आहे. इथपर्यंतचा भाग दामोदरन् यांनी मान्यच केलेला आहे.

सरंजामशाही राष्ट्रे शेजारच्या दुबळ्या सरंजामशाही राष्ट्रांवर आक्रमण करीतच आली.

सर्व जुना इतिहास या लढायांनी भरलेला आहे. भांडवलशाही राष्ट्रे उरलेल्या भांडवलशाही राष्ट्रांवर आक्रमण करतात हा दोन महायुद्धांचा इतिहास आहे. तेव्हा समाजवादी राष्ट्रे जर एकमेकांवर आक्रमण करू लागली तर त्यात वेगळे असे काहीच नाही. रक्षण आणि आक्रमण यांच्या प्रेरणा जीवशास्त्रीय आहेत. व्यक्ती आपल्या आणि आपल्या कळपाच्या रक्षणार्थ आक्रमण करीतच असतात. या जीवशास्त्रीय प्रेरणा पाच-पन्नास वर्षांत बदलणाऱ्या नाहीत. जगातली सर्वच राष्ट्रे जेव्हा समाजवादी होतील, त्यानंतर काही शतकांनी या प्रेरणांत लक्षणीय बदल होण्याचा संभव दिसतो. दामोदरन् यांनी समाजवादी राष्ट्रे आक्रमण करू शकतात, हे कबूल करावे हेच खूप महत्त्वाचे आहे.

ते सांगतात, जेव्हा झेक राष्ट्रावर रशियाचे आक्रमण झाले तेव्हा पक्षात या मुद्द्यावर अनेकविध प्रकाराची चर्चा झाली. ह्याबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रीय समितीची दिल्लीला बैठक बोलावण्यात आली. फारसे सभासद या बैठकीला उपस्थित नव्हते, तरी सत्तर सभासद उपस्थित होते. चर्चा होत असताना रशियाला अनुकूल पस्तीस आणि प्रतिकूल चौतीस अशी संख्या होती! दोघेजण तटस्थ होते, ते पुढे प्रतिकूल बाजूला मिळाले, म्हणून रशियाविरोधकांचे बहुमत झाले. असे बहुमत होताच नेत्यांनी तीन महिन्यांनी पुन्हा चर्चा करावी, असा निर्णय घेतला! अशी चर्चा मात्र कधी झाली नाही. 'झेकोस्लोव्हाकिया कुणीकडे?' असे जे पुस्तक दामोदरन् संपादित करत होते, त्यावर पक्षाने बहिष्कार घातला! दामोदरन् यांनी माफी मागावी, अशी मागणी करण्यात आली. आपल्या पक्षात ध्येयवादी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचे बहुमत जरी असले तरी ते गुंडाळले जाते! दडपण आणण्यासाठी रशियातून माणसे बोलावली जातात आणि रशियाच्या तंत्राने सर्व कारभार चालतो, हे दामोदरन् यांनी सांगितले हे फार बरे झाले. कम्युनिस्टेतरांना या माहितीत नवीन असे काही नाही, पण एका ज्येष्ठ पक्षसदस्याने पक्षात कार्यकारिणीचे सदस्य असताना एक नेता म्हणून आमच्या पक्षात आमचेही काही चालत नाही, आमच्या बहुमताचेही चालत नाही, सूत्रचालन नेहमी वेगळीकडून होत असते, हे जाहीररीतीने सांगितले ही महत्त्वाची गोष्ट आहे. इतक्या मोकळेपणाने कम्युनिस्ट नेते प्रायः कबुल्या देत नसतात.

आपल्या मुलाखतीत दामोदरन् यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाविषयी, मागच्या इतिहासाविषयी, त्याचप्रमाणे वर्तमान संघर्षाविषयी पुष्कळच माहिती दिलेली आहे. ही माहिती बऱ्याच प्रमाणात नवी आहे, कारण ती लिखित स्वरूपात पक्षाच्या इतिहासात उपलब्ध नाही. ते म्हणतात, भारतात कम्युनिस्ट गट १९२० ते १९३० या दशकात स्थापन होण्यास प्रारंभ झाला. या दशकात असणारे गट प्रांतिक स्वरूपाचे होते. या गटांना चुकीचे मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या भूमिका चुकत गेल्या. कम्युनिस्टांच्या भूमिका मार्क्सवादाच्या अभ्यासातून ठरत नसत किंवा परिस्थितीच्या अभ्या-

सातून ठरत नसत. त्या मार्गदर्शनातून ठरत व हे मार्गदशन रशिया करत असे, हे दामोदरन् यांनी मान्य केले आहे. या ठिकाणी चुकीचे मार्गदर्शन म्हणजे काय? आणि चूक झाली ती कोणती? हे एकदा समजून घेतले पाहिजे.

इ. स. १९२० नंतर महात्मा गांधींच्या राजकीय नेतृत्वाचा काळ सुरू होतो. गांधीजी मार्क्सवादी नव्हते, ते कम्युनिस्टही नव्हते, यावर दुमत नाही. पण ते या देशातील जनतेचे नेते होते. ब्रिटिश साम्राज्यशाहीचे हुजरे नव्हते. १९२० ते १९३० या दशकात त्या वेळच्या कम्युनिस्टांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला साम्राज्यवाद जतन करण्याची चळवळ मानली! गांधीजींना देशी भांडवलदारांचे रक्षणकर्ते आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीचे हस्तक मानले!– ही फार मोठी चूक झाली असे दामोदरन् नोंदवतात. ही चूक रशियाच्या चुकीच्या मार्गदर्शनामुळे झाली. असे चुकीचे मार्गदर्शन रशियाने चीनलाही केले होते. चीनमध्येही समाजवादी आंदोलनाचे नुकसान झाले होते. हे सांगून दामोदरन् म्हणतात, फरक इतकाच आहे की चिनी नेत्यांनी आपल्या चुका भरून काढल्या आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष नेहमीच परप्रत्ययनेय बुद्धीचा राहिला, म्हणून तो ते नुकसान भरून काढू शकला नाही.

आपण हे गृहीत धरू की त्यावेळी कम्युनिस्टांची चूक झाली. निदान आज तरी ती चूक पटलेली आहे काय? आज तरी भारतीय कम्युनिस्ट पक्ष आपल्या अधिकृत इतिहासात हे नोंदवायला तयार आहे काय की, भारतीय अवस्था १९२० च्या सुमारास कामगार-क्रांतीची अवस्था नव्हती, ती अवस्था फक्त राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या समावेशक चळवळीची होती. अशी चळवळ त्यावेळी महात्मा गांधींनी केली. त्यांचा निर्णय ऐतिहासिक दृष्टीने अचूक ठरलेला आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने एक पक्ष म्हणून त्या काळात परिस्थितीच्या मूल्यमापनाची चूक केली. जनतेच्या हिताविरुद्ध त्या काळी पक्ष अशा चुका करत गेला, कारण पक्ष त्या काळात जनतेचा प्रतिनिधी नव्हता. तो स्वप्नाळू, साहसवादी, डाव्या अतिरेकी भूमिका घेणाऱ्या, पण मूलतः मनाने मध्यमवर्गीय असणाऱ्या बुद्धिजीवी कार्यकर्त्यांचा गट होता. आज तरी कम्युनिस्ट पक्ष आपल्या अधिकृत इतिहासात ही नोंद करण्यास तयार आहे काय? आज तरी कम्युनिस्टांना आपल्या चुका प्रामाणिकपणे कळालेल्या आहेत असे मानायला जागा नाही.

१९३६–३७ साली कम्युनिस्ट सोशॅलिस्टांची एक युती झाली होती. या युतीबाबत सोशॅलिस्टांचा नेहमीच असा आरोप राहिला की कम्युनिस्ट अप्रामाणिकपणे वागले, त्यांनी पक्ष पोखरून काढला व युतीचा गैरफायदा घेतला. भारतीय समाजवादी या अनुभवामुळे एकदा जे साशंक झाले ते कम्युनिस्टांबाबत नेहमीच साशंक राहिले. या घटनेविषयी दामोदरन् यांचा खुलासा असा आहे की, भारतीय कम्युनिस्ट पक्षाची

पद्धतशीर स्थापना १९३४–३५ साली झाली, पण त्यावेळी जे संप झाले त्यामुळे कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली गेली. या काळात आम्ही उघडपणे स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून न घेता कॉंग्रेस सोशॅलिस्ट म्हणवून घ्यायचे ठरवले आणि कॉंग्रेस सोशॅलिस्ट पक्षात शिरून त्या आवरणाचा फायदा घेऊन आम्ही आमचे वजन वाढवले. दामोदरन् सांगतात, १९३० ते ३२ या कालखंडात आम्ही कायदेभंगाच्या चळवळीत पूर्णपणे गढून गेलो होतो. थोडक्यात दामोदरन् ह्यांना असे म्हणावयाचे आहे की, केरळमध्ये कम्युनिस्ट राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाशी एकरूप झाले होते, म्हणूनच तिथे कम्युनिस्ट पक्ष इतका बलवान होऊ शकला. दामोदरन् ह्यांचे हे मत चीन व व्हिएतनामच्या अनुभवावर आधारलेले आहे. आजही कम्युनिस्टांना राष्ट्रीय आशा-आकांक्षेशी एकरूप होऊनच आपली शक्ती वाढवता येईल.

जुन्या काळी कम्युनिस्टांना फारसे कळत नव्हते आणि नव्या काळी त्यांना खूपसे कळू लागलेले आहे, असे समजण्याचे कारण नाही. भारत-रशिया मैत्रीचा भारतीय कम्युनिस्ट नेहमी पुरस्कार करतात. पण ही मैत्री भारताच्या हिताची आहे म्हणून ती चिरायू होवो, असे ते एकदाही म्हणणार नाहीत. त्यांच्या मनात असे असते की भारताच्या हिताचा हा मुद्दा गौण असून, ती मैत्री रशियाशी आहे हाच खरा मुद्दा आहे. राष्ट्रीय आकांक्षेशी एकरूप होण्यापूर्वी चिनी व व्हिएतनामी पक्षांना सोव्हिएट मार्गदर्शन गुंडाळून ठेवण्याचे प्रशिक्षण घ्यावे लागलेले आहे. हे प्रशिक्षण भारतात उपलब्ध नाही.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची सभासद-संख्या १९३४ च्या सुमारास दीडशे होती. यापूर्वीच्या काळात ही संख्या याहीपेक्षा कमी असणार, हे उघड आहे. म्हणजेच १९३० पूर्वी कम्युनिस्ट पक्ष पक्ष नव्हता, मोठ्या शहरांतून वावरणाऱ्या मूठभर तरुणांचा तो गट होता, असा त्याचा अर्थ आहे. १९३९ साली भारतभर मिळून कम्युनिस्ट पक्ष-सदस्यांची संख्या ३००० पर्यंत गेली. पाच वर्षांत सभासद-संख्या वीस पट वाढण्याचा हा वेग आश्चर्यजनक होता असे वाटण्याचे कारण नाही, कारण हा कॉंग्रेस सोशालिस्ट पार्टी आतून पोखरून खाण्याचा काळ होता. ‘युती न कराल तर शत्रू म्हणून फोडून काढू, युती कराल तर पोखरून कुरतडून काढू’ अशी ही भूमिका होती. ही भूमिका कुणाला पटो न पटो, पण ती कम्युनिस्टांची भूमिका होती. दामोदरन् म्हणतात, रशियाच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागणे ही आमचीच नव्हे तर जागतिक कम्युनिस्ट चळवळींची चूक आहे. चुकीच्या रशियन मार्गदर्शनामुळे जर्मन कम्युनिस्ट एका सापळ्यात अडकले. यामुळेच फॅसिझम जर्मनीत विजयी होऊ शकला. हिटलरला वाढवण्यात स्टॅलीन सहभागी होता, ट्रॉटस्की मात्र नेहमीच हिटलरविरुद्ध झगडत राहिला, हे दामोदरन् ह्यांनी सांगितले हे बरे झाले.

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. कम्युनिस्ट पक्षाची भूमिका या युद्धाला विरोध करायचा, ही होती. काँग्रेसपक्ष या वेळी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध व्यापक व तीव्र आंदोलन करण्यास तयार होता. असे साम्राज्यवादविरोधी तीव्र आंदोलन ताबडतोब सुरू करण्यात यावे, ही कम्युनिस्ट पक्षाची आधीची भूमिका होती. दामोदरन् हे सांगत नाहीत. ही भूमिका त्यावेळी सर्व कम्युनिस्ट, सोशलिस्ट आणि सुभाषचंद्र बोस यांची भूमिका होती. पुढे या युद्धात सोव्हिएट रशिया येताच कम्युनिस्टांनी हे लोकयुद्ध असून त्याला पाठिंबा दिला पाहिजे, अशी भूमिका घेतली. इ. स. १९४२ साली राष्ट्र, गांधींच्या आदेशानुसार स्वातंत्र्यासाठी झगडत होते. कम्युनिस्ट काहीही जरी म्हणाले तरी सुभाषचंद्र बोस भारतीय स्वातंत्र्यासाठीच झगडत होते. दामोदरन् यांनी या कालखंडात उजेडात आलेल्या नेत्यांचा अवहेलनापूर्वक उल्लेख केला आहे! ते म्हणतात, सुभाष बोस, जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली आणि कुणालाही माहिती नसणारी माणसे या देशात एकाएकी नायक व नायिका म्हणून प्रसिद्ध झाली. गांधी-नेहरूंनीसुद्धा त्यांचे कौतुक केले. दामोदरन् यांनी केलेला हा उल्लेख त्यांच्याच कोत्या मनोवृत्तीचा द्योतक आहे. सुभाषचंद्र बोस हे बेचाळीसपूर्वीही अखिल भारतीय महत्त्वाचे नेते होते. देशभर त्यांच्याविषयी प्रचंड आदर होता. गांधीजींचाही पाडाव त्यांनी करून दाखवला होता. एवढी त्यांची लोकप्रियता बेचाळीसपूर्वी होती. इ. स. १९२९ सालीसुद्धा सर्व राष्ट्राने दखल घ्यावी, एवढी त्यांची कीर्ती होती. सुभाषचंद्रांच्या ध्येयधोरणाविषयी अनेकांच्या मनांत तीव्र मतभेद होते, पण त्यांच्या त्याग व देशभक्तीविषयी कधी दुमत नव्हते. गांधीजींनी सुभाषचंद्रांचा गौरव करू नये तर काय स्वातंत्र्य चळवळीला दगा देणाऱ्या चोरांचा गौरव करावा? जयप्रकाश नारायण यांच्याहीविषयी हेच म्हटले पाहिजे. १९३६ नंतर जयप्रकाश नेहमीच अखिल भारतीय कीर्तीचे नेते राहिले. आज तर कोट्यवधी लोकांच्या अंतःकरणात ते नायक आहेत.

बेचाळीस साली कम्युनिस्ट पक्षाने चूक केली. ब्रिटिश साम्राज्यवाद हाच आपला प्रमुख शत्रू होता. या वेळी आम्ही जनतेपासून तुटून पडलो. आमच्या प्रतिष्ठेची हानी झाली. आमचा पक्ष साम्राज्यशाहीचा हस्तक मानला गेला. आम्ही साम्राज्यशाहीविरोधी लढा भांडवलदार व काँग्रेस यांना अर्पण केला, असा विषाद व्यक्त करणाऱ्या माणसाचे सुभाषचंद्र व जयप्रकाश यांच्याबाबतचे कोते मन पाहिले म्हणजे आश्चर्य वाटू लागते. कम्युनिस्ट पक्षाची सभासद-संख्या एकोणचाळीस साली तीन हजार होती, ती बेचाळीस साली साडेचार हजार झाली—म्हणजे तीन वर्षांत सभासद-संख्या दीड हजारांनी वाढली. पण लोकयुद्धाला पाठिंबा दिल्यानंतर एका वर्षात आपली सभासद-संख्या अकरा हजाराने वाढून ती एकूण साडेपंधरा हजार झाली, असे दामोदरन् सांगतात. समाजवादी पक्ष पोखरून कम्युनिस्टांचा जेवढा फायदा झाला त्यापेक्षा जास्त फायदा साम्राज्यशाही ब्रिटिश सरकारला पाठिंबा दिल्यामुळे भारतीय कम्युनिस्टांचा झालेला दिसतो! पक्षाच्या वाढीच्या

दृष्टीने सत्ता-सत्ताधारी यांच्याविरुद्ध जनतेची आंदोलने करण्यापेक्षा सोयिस्कर वेळी सत्तेला सोयिस्कर पाठिंबा देणे उपयोगी असते, अशी खूणगाठ या अनुभवावरून भारतीय कम्युनिस्टांनी मारून ठेवलेली आहे की काय कळत नाही. कारण सत्तेशी सहकार्य करून सभासद-संख्या वाढवण्याचा उद्योग त्यांचा आजही चालूच आहे.

दामोदरन् सांगतात, ऐन स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी आम्ही पाकिस्तानच्या निर्मितीला पाठिंबा दिला, ही आमची चूक झाली! चूकच नोंदवायची असेल तर ती निदान पूर्णपणे नोंदवली पाहिजे, कारण भारतीय कम्युनिस्टांनी केवळ पाकिस्तान निर्मितीला पाठिंबा दिला नाही. त्यांनी हैद्राबाद संस्थानात निजामलाही स्वतंत्र राष्ट्र म्हणून वावरण्यास पाठिंबा दिला! या वेळेला त्यांचा अनेक राष्ट्रवादाचा सिद्धांत चालू होता. भारत हे एक राष्ट्र नव्हे तर तो अनेक राष्ट्रगटांचा मेळावा आहे. यापैकी जी जी राष्ट्रे एकत्र राहू इच्छितील त्यांच्या एकत्र राहण्याला सशर्त पाठिंबा (प्रत्येक राष्ट्राचे राष्ट्र म्हणून अस्तित्व शिल्लक राहावे व फुटावे वाटेल तेव्हा त्यांना फुटता यावे, अशी ही शर्त होती.) आणि फुटू इच्छितील त्यांना बिनशर्त पाठिंबा, अशी ही भूमिका होती! पाकिस्तानला पाठिंबा हा या भूमिकेचा एक भाग होता. कम्युनिस्टांच्या या वेळच्या भूमिकेचे रजनी पाम दत्तांनी कौतुक केले होते! ही भूमिकासुद्धा रशियाच्या प्रेरणेनेच भारतीय पक्षाने स्वीकारलेली होती. दामोदरन् यांना असे वाटते की पाकिस्तानच्या निर्मितीला आपण पाठिंबा दिला ही चूक झाली पण आजही त्यांना बहुराष्ट्रवादाचा सिद्धांत चुकीचा होता असे वाटत नाही! आजही त्यांना असे वाटत नाही की पाकिस्तानने अमेरिकेच्या लष्करी गोटात जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे इ. स. १९५२ नंतर भारतीय कम्युनिस्टांना भारत हे स्वतंत्र, सार्वभौम आणि अखंड राष्ट्र आहे, याची जाणीव रशियाला सोयिस्कर या कारणाने होऊ लागली आहे. यात काही चूक आहे.

कम्युनिस्ट राष्ट्रवाद मानत नाहीत, अशी लोकांची समजूत आहे. ही समजूत अर्धवट चुकीची आणि अर्धवट बरोबर अशी आहे. ती बरोबर या अर्थाने आहे की त्यांच्या वैचारिक भूमिकेत आंतरराष्ट्रवाद आहे, राष्ट्रवादाला जागा नाही. नेहमीच युरोपच्या इतिहासात राष्ट्रवादाचा वापर जहागीरदार–जमीनदारांनी आपल्या सोयी सांभाळण्यासाठी केला. त्याचा परिणाम दरिद्री जनतेच्या बाजूने विचार करणाऱ्यांच्या मनात राष्ट्रवादाविषयीची तुच्छता बळकट होण्यात झाला. पण हे राष्ट्रवादाचे एकमेव रूप नाही. विसाव्या शतकात काही देश समाजवादी झाले, जे देश समाजवादी झाले नाहीत त्यांनीही लोककल्याणकारी राज्याची भूमिका स्वीकारली. त्यामुळे राष्ट्रवाद या कल्पनेकडे जुन्या पद्धतीने पाहणे कम्युनिस्टांना अशक्य झाले. सर्व कम्युनिस्टांचा पितृदेश सोविएट रशिया आहे. रशियात राष्ट्रवादाची भावना प्रबल आहे. दामोदरन् यांनी याची नोंद केलेली आहे की ते मॉस्कोत असताना रशियात नेपोलियनचा पराभव झाला, झारांचा

विजय झाला याचा विजयोत्सव साजरा केला जात होता! दामोदरन् यांना ही प्रखर राष्ट्रभावना भीतिदायक वाटली. त्यांना असे वाटले की, झारांच्या मानाने नेपोलियन खचितच पुरोगामी होता. त्यामुळे पुरोगामी लोकांची बाजू घ्यायची असेल तर ती नेपोलियनची घ्यायला पाहिजे!

दामोदरन् यांनी आपण काय बोलतो आहो याचा गंभीरपणे विचार केलेला दिसत नाही. भारतीय जीवन अठराव्या शतकात सरंजामशाहीचे होते. बंगालच्या नबाबाचा पराभव करून बंगाल ताब्यात घेणारी ईस्ट इंडिया कंपनी त्या मानाने पुरोगामी होती. इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात नवीन ज्ञान, विचार व उद्योग आले याविषयी आपण कितीही चांगला विचार केला तरी त्याचा शेवट बंगालचा शोकदिन साजरा करू नये इथेच होणार. कंपनीचा विजयदिन भारतीयांनी साजरा करावा, ही मनोवृत्ती साम्राज्यवादी आहे. भारतावर राज्य करणारे सर्व इंग्रज लोक आपण या मागासलेल्या देशाची सुधारणा करीत आहो असेच सांगत होते, आणि अंशतः इंग्रजांचे हे म्हणणे खरेही होते. माणसांच्या इच्छेविरुद्ध त्यांना गुलाम करून पुरोगामी उत्पादनव्यवस्था लादण्याची भूमिका तत्त्वज्ञानात घेणे धोक्याचे असते. व्यवहारात त्याचा अर्थ जे पुढारलेले बलवान असतील त्यांनी मागासलेल्यांना गुलाम करणे रास्त आहे, हा होतो. दामोदरन् ह्यांना निश्चितच हे अभिप्रेत नाही. ते एका बेसावध पद्धतीने बोलत आहेत. पूर्व युरोपातील बाल्कन राष्ट्रांवर फौजेच्या मदतीने रशियाने कम्युनिझम लादला याचे त्यांना समर्थन करायचे आहे. चीनने तिबेटात लष्करी हस्तक्षेप केला याचेही त्यांना समर्थन करायचे आहे. पण पुरोगामी उत्पादनव्यवस्थेच्या इस्राएलच्या आक्रमक भूमिकेचे समर्थन व्हावे असे त्यांना खासच वाटत नसते.

चीन रशियापेक्षा जास्त राष्ट्रवादी आहे. व्हिएतनामचा लढा हा राष्ट्रवादीच लढा आहे. अरब राष्ट्रवादाचा लढा हा नेहमीच पुरोगाम्यांनी समर्थन केलेला लढा आहे. यामुळे राष्ट्रवाद कम्युनिस्टांना धड सोडताही येत नाही. आशिया-आफ्रिकेतील प्रत्येक स्वतंत्र होणारे राष्ट्र जगातल्या युद्धखोर साम्राज्यशाहीची शक्ती कमी करत आहे, हे दिसत असल्यामुळे राष्ट्रवादाचे स्वागत करणे कम्युनिस्टांना भाग असते, आणि तरीही प्रखर राष्ट्रवादी भावनेची वाढ कम्युनिझमच्या प्रसाराला मारक असते, म्हणून राष्ट्रवादाचा निषेधही करणे कम्युनिस्टांना भाग आहे. अशा वेळी वैचारिक सुसंगतीचे सोंग जतन करण्याचा चांगला मार्ग हा असतो की, ज्या ठिकाणी आपण आक्रमण करतो तिथे आक्रमण केले हे कबूल करण्याऐवजी त्याच देशातील मूठभर प्रतिगाम्यांच्या विरुद्ध प्रचंड जनतेला आपण पुरोगामी जीवन जतन करण्यासाठी मदत करतो आहो, असे म्हणायचे असते. हा सोपा धटिंगपणा नेहमीच बलवंतांना जितका परवडतो तितकी वैचारिक सुसंगती परवडत नाही.

भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी कम्युनिस्टांनी बहुराष्ट्रवादाचा पुरस्कार केला. त्यामागे सोपे गणित हे होते की जर भारताचे एकाधिक तुकडे पडले तर क्रमाक्रमाने क्रांती करणे सोपे जाईल. भारताला कम्युनिस्ट करण्यासाठी सुलभ मार्ग, एकराष्ट्र अस्तित्वात येऊ न देणे हा होता. म्हणून मुसलमान धर्माधिष्ठित राष्ट्र मागत होते त्यालाही पाठिंबा, हिंदू समाजातील दलितांचे स्वतंत्र राष्ट्र आहे याला पाठिंबा, म्हणजे जातीवर आधारलेल्या राष्ट्रवादाला पाठिंबा, द्रविडांचे स्वतंत्र राष्ट्र आहे या सांस्कृतिक राष्ट्रवादाला पाठिंबा व जे संस्थानिक भारतात विलीन होऊ इच्छित नव्हते व स्वतःला राष्ट्र समजत होते त्यांनाही पाठिंबा, अशी भूमिका त्या वेळच्या कम्युनिस्टांनी घेतली होती.

एक तर ही भूमिका मध्ययुगीन सरंजामशाहीची लष्करी भूमिका आहे. एक एक किल्ला जिंकीत राज्य वाढवावयाचे, त्याप्रमाणे प्रथम तेलंगणाचे येनान करायचे व मग एकेक खेडे जिंकीत पुढे सरकायचे, ही भूमिका मध्ययुगीन आहे. संस्थानिक आणि लीगसारखे पक्ष आपल्या रक्षणासाठी अमेरिकेची मदत घेतील, त्यामुळे अमेरिकेला लष्करी तळ स्थापण्यास भारतात नव्या जागा मिळतील, हे विसरणे शहाणपणाचे नव्हते. अंधश्रद्ध आणि मागासलेली जनता नेहमीच समाजपरिवर्तनाला विरोधी असते, म्हणून नव-समाजरचनेसाठी प्रबल केंद्राची गरज असते, हेही विसरणे योग्य नव्हते. पण एकदा काँग्रेसचे राज्य म्हणजे अमेरिकन साम्राज्यशाहीचे राज्य, ही भूमिका घेतल्यानंतर जे खरोखरच अमेरिकन साम्राज्यशाहीचे चाहते होते त्यांच्या हेतूला साह्यकारी होण्यात कम्युनिस्टांनी धन्यता मानली! नेहरू समाजवादी व उदारमतवादी तर होतेच, पण ते नेहमीच रशियावादीही राहिले. सदैव रशियावादी असणाऱ्या नेतृत्वाला 'साम्राज्यशाहीचे हस्तक' व अमेरिकावादी असणाऱ्या लीगला आवश्यक राष्ट्रवादाचे नेते समजणे हे दीर्घकाळ कम्युनिस्ट करीत आले. या चुकीचे कारण वासाहतिक राष्ट्रांच्या स्वातंत्र्यलढ्याचा अर्थ समजून घेण्यात कम्युनिस्टांनी सदैव चूक केली, हा आहे. आमची राजवट नसेल तर उरलेले सगळे जागतिक साम्राज्यशाहीचे हस्तक, ही भूमिका आत्मघात करणाऱ्या अनेक चुकांना जन्म देत असते.

दामोदरन् म्हणतात, वसाहत प्रश्नाविषयीचे लेनिनचे प्रबंध भारतीय कम्युनिस्टांना इ. स. १९६० पर्यंत ज्ञात नव्हते! हे खरे असेल तर हा मुद्दा फारच भयावह आहे. कारण कम्युनिस्टांनाही लेनिनचे समग्र वाङ्मय उपलब्ध होण्यात अडचणी आल्या, असा याचा अर्थ आहे. दामोदरन् ह्यांना असे म्हणण्याची सोय आहे, पण हे त्यांचे म्हणणे सोयीचे असले तरी खरे नाही. कारण लेनिनचे वासाहतिक प्रश्नांविषयीचे विवेचन स्वातंत्र्यपूर्व-काळातसुद्धा वेळोवेळी भारतातील बिगर कम्युनिस्टांनी उद्धृत केलेले आहे. जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण, सुभाषचंद्र बोस, मानवेंद्रनाथ रॉय ही अशी माणसे होती की ज्यांचा या लिखाणाशी चांगला परिचय होता. खरी मेख लेनिनचे लिखाण माहीत

नव्हते ही नाही, तर भारतीय कम्युनिस्ट आणि त्यांचे सूत्रधार यांच्या मते भारताला लागू पडणारे हे विवेचन नव्हते ही आहे. गांधी इंग्रजांचा एजंट म्हणून इंग्रज सरकार व कॉंग्रेस दोघेही जनतेचे सारखेच शत्रू, असे कम्युनिस्टांना वाटले!

दामोदरन् म्हणतात, भारतात इंग्रजांनी एक शासनसंस्था उभी केलेली होती. ही शासनसंस्था कॉंग्रेसच्या हाती आली, त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात एका वैशिष्ट्यपूर्ण राजकीय व आर्थिक घडण असलेल्या सत्तेला सामोरे जावे लागले. या शासनाचे योग्य मूल्यमापन करण्यात कम्युनिस्टांना अपयश आले. कम्युनिस्टांना अपयश आले हे खरे आहे, पण आज तरी शासनसंस्थेचे योग्य मूल्यमापन कम्युनिस्ट करीत आहेत काय? दामोदरन् यांच्या मते, लष्कर व नोकर यांत समाविष्ट झालेले अनेक भारतीय यामुळे भारतीयांची प्रशासनकुशल शासनयंत्रणा हे भारतीय शासनाचे एक वैशिष्ट्य आहे. दुसरे वैशिष्ट्य भारतीय भांडवलदारांनी केलेली भांडवलशाहीची प्रगती हे आहे. खरोखरी ही कम्युनिस्टांच्या पराजयाची कारणे आहेत काय? अजूनही आपल्या पराजयाचे कारण कम्युनिस्ट ओळखू शकत नाहीत, हे दुर्दैव आहे. पण हे केवळ कम्युनिस्टांच्या बाबतीत दुर्दैव नाही, ते समाजवाद्यांच्या बाबतीतही दुर्दैव आहे. आधुनिक उद्योगव्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांचे सामाजिक परिणाम समजून घेणे भारतातल्या समाजवाद्यांना मंजूर असलेले दिसत नाही. भारतातील शासनयंत्रणा भांडवलशाहीची आहे यात वाद नाही, पण ही परंपरागत भांडवलशाहीची रचना नसून आधुनिक भांडवलशाहीची रचना आहे. यामुळे सामाजिक वातावरणात जो फरक पडतो तो केवळ प्रमाणाचा नसून प्रकाराचा आहे. परंपरागत भांडवलशाही आणि नवी भांडवलशाही यांच्यांतील फरक प्रकाराचा आहे हे अजूनही सगळे समाजवादी मान्य करीत नाहीत. कम्युनिस्ट तर हे मान्य करणारच नाहीत. युरोपातील फ्रान्स, इटली या देशांतील कम्युनिस्ट पक्ष आता हळूहळू हे मान्य करीत आहेत, पण अजून हा मुद्दा मान्य करण्याची परवानगी भारतीय कम्युनिस्टांना मिळालेली दिसत नाही! कारण एकदा प्रकाराचा भेद मान्य केला म्हणजे त्यापाठोपाठ संघटनेचे स्वरूप व लढ्याचे स्वरूपही बदलावे लागते.

भारतीय शासन सदैव अलिप्ततावादी राहण्याचा प्रयत्न करीत आले. हा अलिप्ततावाद म्हणजे सर्व संघर्षांत तटस्थ भूमिका घेणे असा नसून तो परवडेल तितका रशियाला अनुकूल अलिप्ततावाद आहे. परिणामी असलेले भारतीय शासन रशियाला सोयीचे वाटते. आजचे शासन राष्ट्रवादी आहे, ते भारताच्या सोयीला आशयात अग्रक्रम देते आणि अभिव्यक्तीत रशियाच्या सोयीला पुरेसा वाव ठेवते. इतके तरी रशियानुकूल शासन भारतात दुसरे येईल काय, हा रशियासमोरचा प्रश्न आहे. म्हणून भारतीय कम्युनिस्टांना सोविएट रशिया हे शासन मोडू देत नाही, उलट पाठिंबा देऊन बळकट करण्याचा आदेश देतो. या ठिकाणी जनतेचे हित आणि समाजवादाचे हित या बाबी

गौण ठरतात व रशियाचे हित महत्त्वाचे ठरते. सोविएट रशियाच्या मार्गदर्शनाची ताबेदारी चालू आहे तोपर्यंत भारतात उदारमतवादी नवभांडवलशाहीची राज्यरचना जतन करणे, दृढ करणे याहून कम्युनिस्टांना निराळे काही करता येणे शक्य नाही.

आधुनिक भांडवलशाही राष्ट्रे मर्यादेबाहेर भाववाढ जाऊ देत नसतात, मर्यादेपलीकडे ते मंदीही येऊ देत नाहीत. शहाणा बाप मुलगा दीर्घकाळ जगावा म्हणून त्याच्या दोन तोंडात मारतो, पण त्याला भलतेसलते खाऊ देत नाही,– तसा शासनाचा प्रकार असतो. फार चलनवृद्धी अगर फार मंदी होऊ लागताच शासन हस्तक्षेप करते. लगेच भांडवलदार 'बुडालो, बुडालो' अशी ओरड करतात. खरे म्हणजे ते बुडत नसून वाचत असतात. फार बेकारी वाढू नये, दमादमाने लोककल्याण होत आहे, असा आभास शिल्लक राहावा, परंपरागत समाजरचनेचे प्रतिगामी हितसंबंध पुरोगामी भाषेत बलवान करावे, असलेल्या समाजरचनेत अनेकांचे हितसंबंध निर्माण करावे, पगारवाढ आणि नोकरीची सुरक्षितता या दोन मागण्यांत कामगार संघटना गुंतवून टाकाव्या, आपणच रोज क्रांतीच्या घोषणा कराव्या, सर्व प्रचारयंत्रणा कौशल्याने वापरून शोषकांनीच शोषितांच्या कल्याणाचे नेते म्हणून मिरवावे, असे अनेक उद्योग नवभांडवलशाही करत असते! तेजीमंदीचा तोल साधून जनतेची क्रयशक्ती ढासळू न देता उत्पादनवाढ आणि ही उत्पादनवाढ होत असताना सार्वजनिक क्षेत्रात वाढ, पण सार्वजनिक क्षेत्राचा खाजगी क्षेत्राच्या हितासाठी वापर, असे हे सूत्र आहे. या वातावरणात जनतेच्या चळवळींचा विस्कळीतपणा, दुबळेपणा वाढत जातो. यावर उपाय काय, याचे चिंतन कम्युनिस्ट करणार आहेत काय? असा हा प्रश्न आहे. अंतिमतः हा प्रश्न मार्क्सवादाच्या फेरविचारापर्यंत नेणारा आहे. म्हणूनच वर याचा उल्लेख आलेला आहे की, दामोदरन् आज तरी अशा फेरविचाराला तयार आहेत काय?

आपण वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यासाठी रशियात कसे जात असू, धोरणे ठरवण्यात रशियन नेते मार्गदर्शन कसे करीत असत, स्वतःची चूक नसताना आपण आत्मटीका कशी करीत असू याचा तर उल्लेख दामोदरन् यांनी केलेला आहेच, पण एक्कावन्न सालच्या निवडणूक जाहीरनाम्यात भारतात मागासलेली अर्थव्यवस्था असल्यामुळे समाजवाद हे तातडतोबीचे ध्येय नाही अशी भूमिका कम्युनिस्टांनी घेतल्याचाही उल्लेख आहे. याचा अर्थ असा होतो की १९३०–३५ साली नेहरू सांगत होते, अजून समाजवादाला योग्य वेळ आलेली नाही. ते पटण्यास कम्युनिस्टांना एक्कावन्न साल उजाडावे लागले! त्रेपन्न सालापासून नेहरूच असे म्हणू लागले की आता दमादमाने समाजवाद उभारला पाहिजे. शहात्तर साली काँग्रेसच समाजवाद आणीत आहे, तेव्हा आपल्याला पाठिंबा देण्यापेक्षा दुसरे काही काम उरलेले नाही, असे कम्युनिस्टांना वाटू लागलेले आहे काय? १९४८ साली त्यांचा सशस्त्र उठाव फसला, पण तोच एक मार्ग योग्य

आहे असे साठ साली नक्षलवाद्यांना वाटू लागले. बहात्तर सालापर्यंत हाही मार्ग पूर्णपणे फसला, पण अजून तरी नव्याने विचार करण्याची तयारी झालेली आहे काय ? दामोदरन् सांगतात, केरळमध्ये कम्युनिस्टांनी निवडणुका जिंकल्या, निवडणुकीत आपला विजय झाला आहे हे खरे असले तरी शासनसंस्था भांडवलशाहीच आहे, कामगारवर्गाच्या हाती सत्ता आलेली नाही, असे दामोदरन् यांचे मत होते. पण हे मत पक्षाला मान्य नव्हते! सत्ता राबवण्यासाठी कम्युनिस्ट सरकारसुद्धा त्याच पोलिसांचा वापर करीत असतात. कम्युनिस्ट राजवटीतही कामगारांच्यावर गोळीबार होतात. अशा गोळीबाराचे पक्ष समर्थन करतो, इत्यादी बाबी दामोदरन् सांगतातच. या नोंदींचा एक विशिष्ट अर्थ दामोदरन् लक्षात घेत नाहीत. एक विचार म्हणून आपण कम्युनिस्ट होतो, आपण आर्थिक धोरणाचे पुरस्कर्ते होतो, समतेचेही पुरस्कर्ते होतो, पण मानवी मनात अहंच्या प्रतिष्ठेची एक जाणीव आहे, म्हणून शक्यता असली की सत्तेत जाण्याची उत्सुकता असते. त्यासाठी आपण युक्तिवाद व समर्थने जन्माला घालतो. आपल्याकडून जे काही घडेल त्याचे तात्त्विक समर्थन करतो.

मानवी मन आक्रमण, बचाव, स्वसमर्थन यांनी भरलेले आहे. त्याचे उत्तर एका व्यक्तीचा ध्येयवाद, एका कार्यक्रमाला बांधलेला पक्ष हे नसून कुणाही एकाच्या समर्थन प्रवृत्तीला व सत्ता प्रवृत्तीला फारसा वाव सापडणार नाही अशी अनेकांची शक्ती जागी ठेवणे हा असतो. नेत्याला अनुयायांची, पक्षाला जनतेची, शासनाला लोकप्रतिनिधींची, लोकप्रतिनिधींना नागरिकांची भीती असणे फार आवश्यक असते. या रचनेलाच लोकशाही असे म्हणतात. ही लोकशाही नसली तर भांडवलदार जातो, पण त्यापेक्षा जास्त शोषण सरकार करते! सरकारचे रूपांतर आपले हितसंबंध जतन करणाऱ्या व्यवस्थापकात होऊन मॅनेजेरियल स्टेट अस्तित्वात येते. नेता असणारी व्यक्ती आपल्या सहज प्रेरणांना तात्त्विक समर्थन देते. उरलेले निमूट बसले म्हणजे जनतेच्या कल्याणाच्या नावे एकाधिकारशाही सुरू होते. मानवी मनात जो विविध प्रकारचा दुबळेपणा आहे त्याला उत्तर शोधून काढल्याशिवाय प्रत्येक दुबळ्या माणसाला गौरव व प्रतिष्ठा मिळेल असे वातावरणच तयार होत नाही. चिलीत जो धडा कम्युनिस्टांना महाग किंमत देऊन शिकावा लागला तो धडा तुलनेने स्वस्त किंमतीत बंगाल व केरळमध्ये शिकण्याचा योग त्यांना आला. खरा प्रश्न हे धडे शिकायचे की नाही हा आहे. ते शिकताना मंडळी दिसत नाहीत. ज्या वेळी केरळमध्ये लोकमत कम्युनिस्टांच्या विरोधी गेले व आंदोलन सुरू झाले तेव्हा दामोदरन् म्हणतात, नेहरूंनी आम्हाला विचारले की इतक्या थोड्या अवधीत स्वतःला जनतेपासून इतक्या उत्तम रीतीने वेगळे पाडून घेणे तुम्हाला जमले कसे ? नेहरूंच्या या प्रश्नाचे केरळीय नेत्यांनी काय उत्तर दिले, हे आपणाला माहिती नाही. पण खरे उत्तर असे आहे : “आम्हाला हे जमले, कारण आम्हाला त्याचा अभ्यास आहे बेचाळीस

साली, अठ्ठेचाळीस साली, आम्हाला हे जमलेच होते. मग आताच न जमायला काय झाले ?" हे उत्तर शहात्तर सालीही खरे आहे, असे दिसते !

दामोदरन् यांच्या मुलाखतीत अनेक मुद्दे आलेले आहेत. हे सर्व मुद्दे वेगवेगळ्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. यातील एक भाग या ज्येष्ठ कम्युनिस्ट नेत्याचा रशिया-विषयीचा भ्रमनिरास हा आहे. सोविएट रशिया इतरांना मार्गदर्शन करण्यात वेळोवेळीं चुका करतो, हे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. पण स्वतःच्या राष्ट्रीय गरजांना रशिया फार मोठे महत्त्व देतो, म्हणून मार्गदर्शनाचा हक्क मात्र सोडत नाही, हे त्यांनी जागोजाग सुचवले आहे. स्टॅलिनविषयी त्यांचा भ्रमनिरास तर झालाच, पण रशियात झारशाहीचे कौतुक चालते याहीविषयी त्यांना विषाद वाटला ! इ. स. १९५८ साली दामोदरन् रशियात गेले. सोविएट रशियाने केलेली प्रचंड प्रगती पाहून ते प्रभावित झाले, पण प्रभावित होत असतानाच त्यांना अस्वस्थ करणारे काही प्रश्नही जाणवत होते. त्यांनी रशियन पंतप्रधानांना विचारले, " बोरिस पास्टर्नाक हा शेवटी लेखक आहे. त्याची मते आपल्याला मान्य नाहीत, पण याबाबत इतकी चिंता करण्याचे कारण काय आहे ? पास्टर्नाकला वाईट वागणूक मिळाली ही गोष्ट क्षम्य कशी मानता येईल ? एवढी प्रचंड क्रांती केलेल्या पक्षाला, जनतेचा एवढा प्रचंड पाठिंबा असणाऱ्या व एवढ्या प्रगत बलवान राष्ट्राला एखाद्या लेखकाची भीती वाटावी हे कसे शक्य आहे ? " क्रुश्चेव्हने चर्चा करण्याचे टाळले ! दामोदरन् यांच्या पुढे जाऊन काही भारतीय कम्युनिस्टांनी रशियन पंतप्रधानाला असेही विचारले होते की तुमच्याजवळ उत्पादन साधनावर सामाजिक मालकी स्थापित झालेली आहे. पन्नास वर्षे तुम्ही दोन पिढ्या घडवलेल्या आहेत. आता देशात कुणी कामगारशत्रू, भांडवलदार, साम्राज्यवादी असा शिल्लक नाही. मग तुम्हाला स्वतंत्र विचार, स्वतंत्र वृत्तपत्रे, राजकीय स्वातंत्र्य इ. ची भीती का वाटते ? आजही रशिया आपल्याच जनतेला विचार-प्रचार करण्याचे स्वातंत्र्य सतत का नाकारतो ? हा मोठा मूलभूत प्रश्न आहे. बिगर कम्युनिस्ट शासन म्हणजे जनतेच्या मूठभर शत्रूंचे कामगारद्रोही शासन असे कम्युनिस्ट मानतात. जे स्वातंत्र्य लोकांना देणे जनतेच्या शत्रू असणाऱ्या राजवटीला परवडते, तितकेही स्वातंत्र्य जनतेला देणे मित्र राजवटींना सर्व शत्रूंचा नायनाट करून पन्नास वर्षे झाल्यानंतर देणे का परवडत नाही ? असा हा प्रश्न आहे. भांडवलशाहीतील स्वातंत्र्य खोटे, नकली व कागदी आहे म्हणून समाजवाद्यांनी अधिक प्रत्यक्ष व खरे स्वातंत्र्य देऊन स्वातंत्र्य वाढवायला हवे. कम्युनिस्ट राजवटीला पन्नास वर्षे झाल्यानंतरसुद्धा आपल्या जनतेची, आपल्याच निष्ठावंत पक्ष-सदस्यांची भीती का वाटते ? ह्याचे कोण उत्तर देणार ?

दामोदरन् ह्यांनी क्रुश्चेव्हला विचारले, तुम्ही मद्यपानबंदीचा विचार का केलेला आहे ? कम्युनिस्ट हे नैतिक व धार्मिक कारणामुळे दारूचे विरोधक नाहीत, पण तेही दारूला व्यसनच

मानतात. आणि म्हणून लोकांना व्यसनी करणे हा काहीजणांच्या उपजीविकेचा व्यवसाय असू नये, असे मानतात. या संदर्भात मद्यपानबंदीचा प्रश्न दामोदरन् यांनी विचारलेला आहे. महान रशियन नेत्यांना दारूबंदीची कल्पना मान्य आहे, पण ते म्हणतात, जर दारूबंदी करण्याचा प्रयत्न झाला तर प्रचंड प्रमाणात हातभट्ट्या वाढतील, त्यातून गंभीर समस्या निर्माण होतील. भारतात दारूबंदीचा अनुभव हाच आहे! पण समाजवादी शासनाला आपल्या प्रशासनाविषयी अधिक खात्री वाटायला नको काय? समाजवादी शासन भ्रष्टाचाराच्या धास्तीमुळे योग्य कायदे करण्यास इतके घाबरलेले असावे काय? दामोदरन् यांनी रशियातील भ्रष्टाचाराविषयी शासनाशी चर्चा केली नाही, पण पक्ष-चिटणीसच असे सांगतात की रशियात भ्रष्टाचाराचे प्रमाण प्रचंड असून क्रांतीनंतर पन्नास वर्षांनीसुद्धा हा भ्रष्टाचार कमी करण्यात अगर संपवण्यात रशियाला यश आलेले नाही! दामोदरन् आयुष्यभरचे निष्ठावंत कम्युनिस्ट; त्यांना रशियाविषयी विशेष प्रेम व आस्था जरी वाटली तरी सगळेच काही धड चाललेले नाही, मोकळेपणाने सत्य सांगितले जात नाही, असे त्यांना वाटते. शिवाय हा समाजवादी देश आक्रमणेही करतो, यामुळे रशियाबाबत त्यांचा खूप मोठा भ्रमनिरास झाला असेल, तर ते स्वाभाविक आहे.

दामोदरन् चीनमध्येही गेले होते. चीनमध्ये त्यांनी भारत-चीन सीमातंट्याचा प्रश्न चिनी नेत्यांसमोर ठेवला. त्यांनी विचारले की कायदेशीर, भौगलिकत्व, ऐतिहासिकदृष्ट्या कदाचित चिनी बाजूही बरोबरही असू शकेल, पण पाकिस्तानबरोबर तुम्ही समझोता करता, मग भारताबरोबर तुम्ही समझोता का करीत नाही? भारत-चीन भांडणामुळे भारतातील सर्व प्रतिगामी शक्ती बलवान होतील, कम्युनिस्ट दुबळे होतील. खरोखरी हा प्रश्न एवढी मोठी किंमत देण्याजोगा आहे काय? लेनिनने सर्व शेजारी राष्ट्रांशी तडजोडी केल्या होत्या, त्याचा जगावर चांगला परिणाम झाला. तसे तुम्ही का करीत नाही? चिनी पंतप्रधान चौ एन् लाय यांनी दोन महत्त्वाच्या गोष्टी दामोदरन् यांना सांगितल्या. चौ आपल्या बंधू कॉमरेडला अतिशय महत्त्वाचे सत्य सांगत होते. चौ म्हणाले, लेनिनने जे केले ते योग्य होते. कारण रशिया त्या वेळी एकटा होता. चौ एन् लाय अतिशय स्पष्टपणे हे सांगत आहेत की, जेव्हा आपण दुबळे असतो तेव्हा निमूटपणे तडजोडी करून जगाच्या सद्भावना मिळवाव्यात, पण जेव्हा आपण बलवान असतो त्या वेळी असे वागण्याची गरज नसते! बलवंतांनी आपल्या इच्छा पूर्ण कराव्यात. चिनी नेते याच भूमिकेला समाजवाद समजतात. दामोदरन् याला राष्ट्रीय दुरभिमान मानतात.

दामोदरन् यांनी पुढे विचारले, 'तुम्हाला अमेरिकन साम्राज्यशाहीच्या हल्ल्याची भीती वाटते काय?' चौ एन् लायनी सांगितले, "धोका अमेरिकन साम्राज्यशाहीकडून नसून भारताकडूनच आहे." चाऊंचा मुद्दा बरोबर होता. तैवान, कोरिया, आणि जपान इथून चीनच्या गाभ्यावर अमेरिका हल्ला करू शकते. आणि पाकिस्तानातून अमेरिका

टेहळणीही करू शकते. अशा वेळी भारत-चीन सीमा अमेरिकन साम्राज्यशाहीला फारच महत्त्वाची वाटेल असे मानण्याचे कारण नाही. म्हणून धोका अमेरिकन साम्राज्यशाही-कडून नाही. कम्युनिस्ट न होता प्रगतिपर व स्थिर शासन असणारा भारत रशियाची सहानुभूती व अमेरिकेची मदत सतत मिळवत आहे, शिवाय आफ्रो-आशियन राष्ट्रांचा नेता बनण्याचा प्रयत्न करत आहे. ही शांततावादी प्रगतिशील राजवट हा चीनला खरा धोका आहे! हे चाऊंचे म्हणणे बरोबर होते. दामोदरन् यांना चिनी भूमिकेत राष्ट्रीय दुरभिमानाशिवाय दुसरे काही दिसले नाही. कॉ. कोनारसारख्या मंडळींनी चीनची बाजू रास्त मानली. हे दामोदरन् यांना पटले नाही. पण डांगे चिनी नेत्यांचे खंडण करू लागले. हा त्यांना निर्लज्जपणा वाटतो! उदारमतवादी दामोदरन् यांचे असे मत आहे की, चीनची बाजू चुकीची असल्यामुळे आपण तिचे समर्थन करू नये. पण शेवटी चीन कम्युनिस्ट राष्ट्र आहे, त्याच्या विरुद्ध, बरोबर असली तरी भारतासारख्या भांडवलदार देशाची बाजू घेणे निर्लज्जपणाचे आहे. उदार कम्युनिस्टसुद्धा राष्ट्रद्रोहाचा वारसा नकळत कसा जतन करतो, याचे हे नमुनेदार उदाहरण आहे. दामोदरन् स्वतः राष्ट्रद्रोही नसतील, पण त्यांचा हा विचार पाकिस्तानला पितृदेश मानणाऱ्या भारतीय मुसल-मानांच्यासारखाच आहे. या मुलाखतीत चीनविषयी फारसा तपशील नाही. तारिक अलीने विचारले नाही, दामोदरन् बोलले नाहीत! शेवटी ही मुलाखत आहे, प्रबंध नव्हे.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची दोन शकले उडाली व त्यातून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जे चीनवादी अगर डावे कम्युनिस्ट मानले जातात, त्यांचा गट वेगळा पडला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष जो रशियावादी आणि उजवा कम्युनिस्ट पक्ष मानला जातो त्यांचा गट वेगळा पडला. या दोन गटांतील नेमके मतभेद कोणते आहेत? रशियाशी सहकार्य करायचे आणि इतिहास-परंपरा प्राप्त-समाजवादी पितृदेशनिष्ठा जतन करायची की आशियात सर्वांत मोठे नवे पितृराष्ट्र चीन निर्माण झाले आहे त्याची बाजू घ्यायची, यावर हे मतभेद आहेत काय? किंवा लोकशाही मार्गाने कार्य करणे शक्य आहे तोवर आपण संसदीय मार्गाने जाऊ, ज्या दिवशी हा मार्ग बंद होईल तेव्हा वेगळा विचार करू, अशी एक बाजू आणि संसदीय लोकशाही प्रश्न सोडवू शकतच नसते, क्रांती हाच मार्ग आहे म्हणून संसदीय लोकशाही खिळखिळी करून मोडणे इतकेच तिचे महत्त्व, बाकी प्रश्न सुटण्यासाठी क्रांतीच करावी लागेल अशी दुसरी बाजू यावर हे मतभेद आहेत काय? दामोदरन् यांच्या मते असे कोणते महत्त्वाचे मतभेद नाहीत.

दामोदरन् म्हणतात, काहीजण चीनवर टीका करीत त्यामुळे एक गट रुष्ट असे, काहीजण रशियावर टीका करीत यामुळे दुसरा गट रुष्ट असे. हे दोन्ही गट असंतुष्ट असत, धुसफुसत, पण रशियाविरुद्ध चीन हे काही पक्ष फुटण्याचे कारण नाही. स्वातंत्र्योत्तर

काळात सर्वच कम्युनिस्टांना संसदीय मार्गाने जाण्याचा रोग लागलेला आहे. निवडणुका जिंकणे आणि सत्तेवर येणे यापलीकडे कम्युनिस्टांना दुसरे काही सुचत नाही. या निवडणुकीच्या रोगाने सर्वचजण ग्रस्त असल्यामुळे वादाचा प्रश्न जास्त जागा पदरात पडण्यासाठी काय करावे इतकाच आहे. १९५२ साली लोकसभेत जे बळ पक्षाला मिळाले, जवळजवळ तेच १९६२ साली होते म्हणून जागा वाढतील कशा, हा चर्चेचा प्रश्न होता. एका गटाचे म्हणणे असे की हर मार्गाने काँग्रेसची मक्तेदारी मोडली पाहिजे, यासाठी आवश्यक असेल तर जनसंघ आणि मुस्लिम लीग यांच्या बरोबरसुद्धा तडजोडी कराव्या. दुसऱ्या बाजूचे म्हणणे, काँग्रेसमधील पुरोगामी गटाशी तडजोडी करणे हा उत्तम मार्ग आहे. मतभेद झाले आणि चळवळ फुटली,...ती या डावपेचाच्या मुद्द्यावर. मूलभूत वैचारिक असे मतभेद दोन गटांत नव्हते. त्यामुळे दोन गटांत आजही कार्यपद्धतीत मूलभूत महत्त्वाचा फरक दिसतच नाही.

दामोदरन् यांच्यासमोर तारिक अलींनी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हा प्रश्न समाजवादी क्रांतीचा आहे. ' निवडणुकीतील विजयाचा फायदा घेऊन जागोजाग सोविएटधर्तीची साधने तयार करण्याचा प्रयत्न कम्युनिस्टांनी करायला नको होता काय? असा तो प्रश्न आहे. तारिक अलींच्या प्रश्नाचा खरा हेतू हा की जर कम्युनिस्टांना क्रांती करायची असेल तर त्यांनी हे ओळखले पाहिजे की, जेव्हा मूलभूत परिवर्तनाची वेळ येईल तेव्हा जमीनदार, भांडवलदार इ. उजव्या शक्ती आपले अस्तित्व टिकवण्यासाठी निकराचा प्रयत्न करतील. या वेळी पोलीस, लष्कर आणि शासनयंत्रणा एकत्रित येऊन कम्युनिस्टांविरुद्ध वापरली जाईल. जेव्हा अशी वेळ येईल त्या वेळी शासनाच्या संघटित शक्तीला आव्हान देता येईल, अशा पद्धतीची साधने आधीच रचून ठेवणे आणि त्यासाठी निवडणुकीतील विजयाचा फायदा घेणे कम्युनिस्टांचे काम नव्हते काय? याबाबत भारतीय कम्युनिस्टांनी काय केलेले आहे? तेलंगण, बंगाल, केरळ या ठिकाणी अशा पद्धतीने महत्त्वपूर्ण काम करता आले असते ते का झालेले नाही? या प्रश्नामागे एक विचारसूत्र आहे. ते विचारसूत्र असे: शांततेने परिवर्तन होत असेल तर अवश्य होवो, आम्ही ते करू, पण शांततेने परिवर्तन होत असते, यावर आमचा विश्वास नाही, म्हणून आमच्या मार्गाने जाण्याची पूर्वतयारी आम्ही करीतच राहू.

दामोदरन् यांनी अशा सोविएट्सची उभारणी हे सर्वांत महत्त्वाचे कार्य होते हा मुद्दा मान्य केलेला आहे. म्हणजे शांततेने परिवर्तन होणे शक्यच नाही, असे सूत्र मान्य केलेले आहे. दामोदरन् पक्षशिस्तीपासून पुष्कळसे स्वतंत्र होत आहेत, पण हा स्वतंत्र विचार त्यांना नक्षलाइट मंडळींच्या जवळ नेत आहे. परिवर्तन शांततेच्या मार्गाने शक्यच नाही, म्हणून सशस्त्र क्रांतीची तयारी करीतच राहिले पाहिजे. ही नक्षलाइट भूमिका आहे. नक्षलवादी आणि दामोदरन् यांच्यांत फरक एकच राहतो, तो म्हणजे सशस्त्र

उठाव करण्याइतकी आपली तयारी झालेली आहे व तशी वेळ आलेली आहे, असे नक्षलवादी मानतात आणि दामोदरन्, अजून तयारी झालेली नाही, म्हणून उठाव करू नये, असे मानतात. बाकी सशस्त्र उठाव आवश्यक असतो यावर एकमत आहे.

भारतीय कम्युनिस्टांनी अशी सोविएट धर्तीची रचना करण्याचा प्रयत्न केला नाही, हे दामोदरन् ह्यांचे म्हणणे अर्धसत्य आहे. भारतीय कम्युनिस्ट प्रामुख्याने शहरांत काम करीत राहिले. ग्रामीण भागात काम केल्याशिवाय सोविएट धर्तीची रचना करता येत नाही एवढे त्यांचे म्हणणे खरे आहे, पण भारतीय कम्युनिस्टांनी तेलंगणामध्ये अशा प्रकारची रचना केलेली होती. जवळजवळ नलगुंडा, वरंगल या दोन जिल्ह्यांत आणि करीमनगर जिल्ह्यातील काही भागांत त्यांनी प्रांतिक शासन संपुष्टातच आणले होते. पण ही रचना भारत सरकारने लष्करी ताकदीवर अठ्ठेचाळीस ते एक्कावन्न या काळात मोडून काढली! केरळात अशा प्रकारची रचना करण्याचा योग सत्तावन्ननंतर आला होता. ती करता येऊ नये यासाठी शासन दक्ष होते. बंगालमध्ये सदुसष्टनंतर असल्या प्रकारची रचना सिद्ध होत आली होती, ती प्रचंड शक्तीने मोडून काढण्यात आली होती. त्याही वेळी लष्कराचा वापर करण्यात आला. सोविएट धर्तीची शासनाला आव्हान देऊ शकेल अशी रचना उभारण्याचा प्रयत्न भारतीय कम्युनिस्ट सतत करीत आले. त्यांना अशी रचना उभारता येणार नाही यासाठी भारतीय प्रशासन सतत दक्ष राहिले. एका मर्यादे-बाहेर प्रशासन शिथिल असल्याशिवाय अशा प्रकारची रचना उभारण्यास संधी मिळत नाही, हे सत्य आहे, आणि भारतीय प्रशासन अजून तितके शिथिल झालेले नाही. म्हणून कम्युनिस्टांना निवडणुका जिंकता येतात, पण सोविएट्स उभारता येत नाहीत.

शासनाला आव्हान देऊ शकेल अशा प्रकारची सोविएट्स उभारण्याचा प्रयत्न शहरांतही चालू होता, पण तोही कोसळला आहे. ग्रामीण भागात जोपर्यंत कॉंग्रेस बलवान आहे तोपर्यंत या प्रयत्नांना फारसे यश येण्याचा संभव नाही आणि प्रस्थापित समाजरचनेत सतत कोट्यवधींचे हितसंबंध गुंफीत राहण्याचा प्रयत्न आधुनिक भांडवलशाहीची शासन-यंत्रणा सतत करीत आहे, तोपर्यंत कम्युनिस्टांना निवडणुका जिंकून दाखवणे याहून काही निराळे करता येणेही कठिण आहे. दामोदरन् या प्रश्नाचा विचार करण्यास तयार नाहीत.

ही सगळी मुलाखत पाहिली म्हणजे आपल्याला दामोदरन् यांच्या मनाचे दोन थर दिसू लागतात. रशिया व चीन येथील समाजवादी राज्ये यात काही उणीव आहे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या काम करण्यात उणिवा आहेत म्हणून आपण सतत नव्याने प्रश्नांचा विचार केला पाहिजे, नव्याने अभ्यास केला पाहिजे, नव्याने धोरणे आखली पाहिजेत असे त्यांना वाटते, हा त्यांच्या मनाचा एक थर आहे. एका ध्येयवादी प्रामाणिक कार्य-

कर्त्याला हे जाणवणे स्वाभाविक आहे, पण त्याबरोबरच त्यांच्या मनाचा एक दुसरा थर आहे. हा थर त्यांना पुन्हा एकदा परत शुद्ध क्रांतिकारी मार्गाकडे खेचू इच्छितो. संघटना करण्याची लेनिनची पद्धती, माओची पद्धती आपण अंगीकारली पाहिजे, असे त्यांना वाटते. कारण लेनिन व माओ यशस्वी क्रांतीचे नेते होते. शिथिल प्रशासन, लष्करी पराजय, अर्धवट जमीनदारशाही आणि परंपरागत भांडवलशाहीची रचना यांचे नेते झार व चांग कै शेक होते. त्यांनी स्वीकारलेले मार्ग कार्यक्षम प्रशासन, उदारमतवादी भांडवलशाही या वातावरणात कालबाह्य होतात असे काही दामोदरन् यांना वाटत नाही. बदलण्याचा प्रयत्न करताना माणूस पुन्हा जुन्याच वळणाने जातो! "मोअर इट चेंजेस, मोअर इट रिमेन्स द सेम–म्हणजे जो जो बदलायला जावे तो तो गाडी मूळ पदावर येते,"–ही म्हण अशा वेळी अधिकच सार्थ वाटू लागते!

# वस्तुस्थितीचे अटळ आव्हान आणि मार्क्सवादी

कार्ल मार्क्स यांच्याविषयी बोलताना आचार्य दादा धर्माधिकारी यांनी असे विधान केले आहे की, मार्क्सविषयी मला अतोनात आदर वाटतो. इतका आदर वाटतो की, मी मार्क्सला ईश्वराचा अकरावा अवतार मानतो! मीही स्वतः मार्क्सविषयी अतोनात आदर बाळगणारा माणूस आहे. मी स्वतः नास्तिक असल्यामुळे मार्क्सला परमेश्वराचा अवतार मानू शकणार नाही, पण जर मी आस्तिक असतो तर मीही मार्क्सला एक अवतारी पुरुष असेच मानले असते. मार्क्सला अवतारी पुरुष मानून आपण त्याच्या चिंतनाचे स्वतःवर असणारे ऋण स्वीकारीत असतो आणि त्याबरोबरच आपल्या वैचारिक जडण-घडणेला आकार देणारा महापुरुष म्हणूनही आपण आदर व्यक्त करीत असतो. पण आदर व्यक्त करणे आणि ऋण मान्य करणे याचा अर्थ बदललेल्या परिस्थितीची दखलसुद्धा न घेणे हा करावा काय? याविषयी मात्र मी साशंक आहे. मी स्वतः मार्क्सवादी चिंतन एक वास्तववादी चिंतन म्हणून स्वीकारतो. मार्क्सवाद हे कोणतेही स्वप्नरंजन नव्हे; तो वास्तववाद आहे, व या वास्तववादाचा हेतू अस्तित्वात असलेली वस्तुस्थिती इष्ट दिशेने बदलणे हा आहे, अशी माझी समजूत आहे. जग आहे त्या अवस्थेपासून असावे त्या अवस्थेपर्यंत नेण्यासाठी बदलावे लागेल. ते बदलावे कसे, हा मार्क्सवादी चिंतनाचा मुख्य प्रश्न मानला पाहिजे.

मार्क्सवाद हा वास्तववाद आहे; असे सांगताना माझ्यासमोर मुख्यत्वेकरून दोन कल्पना आहेत. पहिली कल्पना अशी की, ज्या काळात मार्क्स आहे त्या काळात अस्तित्वात असणाऱ्या वास्तव परिस्थितीचे विश्लेषण हा मार्क्सच्या विवेचनाचा आधार मानला पाहिजे. मार्क्सच्या डोळ्यांसमोर जी युरोपची परिस्थिती होती ती जर वेगळी असती तर त्याचे सर्व विवेचनच वेगळे झाले असते. समजा, मार्क्स इसवी सनाच्या सोळाव्या शतकात जन्माला आला असता तर मार्क्स सोळाव्या शतकात जन्माला येऊनही तो भौतिकवादी राहिला असता. अर्थरचना हा समाजव्यवस्थेचा पाया आहे, या निर्णयावर तो आला असता. अतिरिक्त मूल्याचा सिद्धान्त त्याही अवस्थेत त्यांनी मांडला असता. पण यांत्रिक उत्पादनाचा आणि औद्योगिक क्रांतीचा सोळाव्या शतकात आरंभच झालेला नसल्यामुळे सोळाव्या शतकातील वास्तव समोर ठेवूनच मार्क्सला विचार करणे भाग होते. एकोणिसाव्या शतकात प्रत्यक्षात तो जन्माला आला म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या

उत्तरार्धातील वास्तव त्यांच्या नजरेसमोर आहे. आज आपण विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उभे आहोत. आपण एकतर असे म्हटले पाहिजे की, एकोणिसाव्या शतकातील वास्तव आणि विसाव्या शतकातील वास्तव यांच्यात काहीच बदल झालेला नाही. नाहीतर आपण असे म्हटले पाहिजे की या बदललेल्या वास्तवाच्या संदर्भात आपल्याला मार्क्सवादाचा पुन्हा एकदा विचार केला पाहिजे.

या ठिकाणी आपण मार्क्सवादाचा अभ्यास करताना दोन भिन्न पातळींचा विचार करीत आहोत, हे समजून घेण्याची गरज आहे. एकतर अभ्यासाची अशी दिशा दिसू शकते की, जे मार्क्सने म्हटले आहे ते त्याचे चिंतन आहे. म्हणून त्या चिंतनाच्या प्रकाशात विचार करणे म्हणजे मार्क्सवादी पद्धतीने विचार करणे, हा मार्ग सोपा आहे. कारण मार्क्सने विचार करून ठेवलेलाच आहे. आपल्याकडे फक्त त्याचे म्हणणे समजून घेणे इतकेच कार्य अशा वेळी शिल्लक राहते! पण आपण दुसरी दिशा स्वीकारली तर अडचणी फार मोठ्या आहेत. एकोणिसाव्या शतकातील वास्तव ज्या पद्धतीने मार्क्सने तपासले त्या पद्धतीने विसाव्या शतकातील वास्तव तपासण्याची जबाबदारी आपल्याला घ्यावी लागते. मूळ वास्तवाचे स्वरूपच बदललेले असल्यामुळे अभ्यासासाठी आपल्यासमोर असणारी सामग्रीच बदललेली आहे. या बदललेल्या सामग्रीचा विचार मात्र आपण मार्क्सच्या पद्धतीने करणार आहोत. अभ्यास करण्याची ही दुसरी पद्धत अधिक कठीण आहे. तरीही ती स्वीकारली पाहिजे, असे मला वाटते. जे सामाजिक भौतिक वास्तव अस्तित्वात नाही, ते अस्तित्वात आहे असा भ्रम करून घेणे हेही वास्तववादाला योग्य नाही. वास्तव बदलल्याच्या नंतरसुद्धा जर ते आपण विचारात घेणार नसू तर मग हे तत्त्वज्ञान वास्तववादी आहे, या आग्रहातच काही अर्थ राहणार नाही. आणि वास्तव हे नहमी बदलतच असते. सामाजिक, भौतिक वास्तव गतिमान असते, हे नाकारून आपण मार्क्सवादी आहोत असा दावा करणे हास्यास्पदच ठरेल, असे मला वाटते.

एकोणिसाव्या शतकातील वास्तव आणि विसाव्या शतकातील वास्तव यांत फार मोठे अंतर पडले आहे. याचे एक महत्त्वाचे कारण स्वतः मार्क्स हेच आहे. त्याच्या चिंतनाचे जे प्रत्यक्ष परिणाम जगावर झाले त्यामुळे वास्तव बदललेले आहे. पण त्याबरोबरच जे अप्रत्यक्ष परिणाम झाले त्याहीमुळे वास्तव बदललेले आहे. बदलाची एक स्वयंसिद्ध प्रतिक्रिया असते. कोणीही प्रयत्न न करता केवळ कालाच्या ओघात काही बदल होतच असतो. त्याहीमुळे काही बदल झालेले आहेत. नुसत्या विसाव्या शतकातील तंत्रविद्येचा विचार केला तरीसुद्धा बदलाचे प्रमाण फार मोठे आहे, ही गोष्ट आपोआपच लक्षात येते. मार्क्सच्या काळात कोळसा आणि वाफ यांचा वापर होता. विसाव्या शतकात जो विजेचा वापर आहे तो मार्क्सच्या डोळ्यांसमोर असू शकत नव्हता.

मार्क्सचे विचार हे नुसते पुस्तकात कधी राहिले नाहीत. त्याच्या विचारांवर श्रद्धा ठेवणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांनी सर्व जगभर प्रत्यक्ष जनतेची आंदोलने उभी करण्याचा प्रयत्न केला. मार्क्सचेच म्हणणे असे होते की एखादी विचारसरणी ज्या वेळेला समाजाकडून स्वीकारली जाते आणि समूहचे समूह ती विचारसरणी प्रमाण मानू लागतात त्यावेळी तो विचार हा नुसता विचार राहत नाही, तर तो विचार हीच एक भौतिक शक्ती होऊन जाते. मार्क्सच्या चिंतनावर आधारलेली एक प्रचंड क्रांती विसाव्या शतकाच्या आरंभी सोविएट रशियात घडून आली. ही क्रांती घडेपावेतो स्वतःला कम्युनिस्ट म्हणविणारे राष्ट्र गटात अस्तित्वात नव्हते. ही क्रांती घडून आल्यानंतर स्वतःला मार्क्सवादी म्हणविणारे मार्क्सचे मार्गदर्शन प्रमाण मानणारे एक शासनच अस्तित्वात आले. हे प्रथमच कम्युनिस्ट झालेले राष्ट्र छोटेसे किरकोळ नव्हते, तर एक अस्ताव्यस्त पसरलेले मोठे राष्ट्र होते. हे राष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर सर्व मजूर चळवळींवर एक परिणाम अगदी स्वाभाविक होता. तो म्हणजे आपणही क्रांती करू शकू असा विश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला. रशियन राष्ट्रक्रांतीमुळे जगभरच्या समाजवादी आंदोलनात एक नवीन विश्वास निर्माण झाला आणि त्याबरोबरच सर्व भांडवलशाही देश आणि भांडवलशाही सांभाळणारी सरकारे यांच्या मनात एक नवीन सावधपणा निर्माण झाला. आपल्या इथेही क्रांती होऊ शकेल या धास्तीमुळे उद्योगपती व भांडवलदार यांना बदलणे भागच होते. हा मार्क्सच्या विचारांचा जगावर झालेला साक्षात परिणाम म्हटला पाहिजे.

रशियन राज्यक्रांती होण्याच्या पूर्वीसुद्धा काही भूतदयावादी लोक मजुरांची परिस्थिती सुधारावी यासाठी प्रयत्न करीत होतेच. मार्क्सच्या डोळ्यांसमोर भांडवलशाहीची जी अवस्था आहे तिचे स्वरूप अनिर्बंध आणि स्वैर असे आहे. मजुरांचे कामाचे तास किती असावेत याविषयी कोणते बंधन नाही. मजुरांचा पगार किती असावा याविषयी कोणते बंधन नाही असा तो काळ होता. कच्चा माल भांडवलदारांना बाजारात विकत घ्यावा लागे. पक्का माल बाजारात विकावा लागे. हा बाजार सर्वांना खुला आहे, असे व्यवहारतः नसले तरी तत्त्वतः मानले जाई. या खुल्या बाजारात खुल्या स्पर्धेत कच्च्या-पक्क्या मालाच्या किंमती ठरत. पुरुषाच्या निम्मी मजुरी मुलांना द्यावी, हा संकेत त्या वेळी मान्य होता. पण त्याबरोबर प्रौढांपेक्षा निम्मेच काम मुलांच्याकडून अपेक्षावे, हे मात्र अजून त्या वेळी मान्य झालेले नव्हते. यामुळे अत्यंत कमी वेतन आणि बारा बारा तास काम, अशी मजुरांची मोठी दयनीय अवस्था होती. आणि लोकशाहीच्या नावाखाली या सर्वांचे समर्थनही होत असे.

या परिस्थितीचा अभ्यास करून एकच निर्णय घेता येण्याजोगा होता. तो निर्णय म्हणजे हा की क्रमाने दारिद्र्य सर्वव्यापक होत जाणार. काहीजणांच्या हाती संपत्ती केंद्रित

होणार. म्हणून एका बाजूला संपत्तिमान आणि दुसऱ्या बाजूला दरिद्री अशा दोन गटांत हे जग विभागले जाणार. अजून जनतेला मतदानाचा अधिकार मिळालेलाच नव्हता. प्रौढ मतदान अस्तित्वातच नव्हते. सरकार जे असे ते निवडण्याचा अगर बदलण्याचा अधिकार जनतेला नव्हताच. जर सरकार निवडणुकीच्या मार्गाने बदलता येणे तत्त्वतः आणि व्यवहारतः अशक्यच असेल तर क्रांतीखेरीज दुसरा कोणताच मार्ग नव्हता. ही क्रांती सशस्त्र क्रांतीच असणे भाग होते. दुसरा कोणता पर्यायच अस्तित्वात नव्हता. म्हणून मार्क्स सशस्त्र क्रांती आणि कामगारवर्गाची हुकूमशाही या कल्पनांचा स्वीकार करतो.

रशियन राज्यक्रांतीच्या पूर्वीच्या काळात मजुरांची ही परिस्थिती बदलावी, त्यांचे वेतन वाढावे, त्यांचे कामाचे तास कमी व्हावे यासाठी प्रयत्न करणारे भूतदयावादी लोक होते. पण त्यांच्या प्रयत्नांना फारसे यश येत नव्हते. रशियन राज्यक्रांती झाल्यानंतर धास्तावलेल्या भांडवलदारांनी किमान वेतनाची कल्पनाही स्वीकारली आणि कामाचे कमाल तास किती असावेत याबाबतचे बंधनही स्वीकारले. कामगारवर्गाने चिडून संतापून क्रांतीला प्रवृत्त होऊ नये यासाठी, त्यांची डोकी थंड व्हावीत यासाठी, नानाविध उद्योग भांडवलदार करू लागले. लवकर त्यांच्या असे लक्षात आले की, असे उद्योग करणे सोयीचे आहे आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. या उद्योगातील एक उद्योग कामाचे तास कमी करणे हा असतो. स्थूलमानाने आज आपण भारतात आठ तास काम म्हणजे पूर्ण काम असे मानतो. पण याबरोबरच पगार वाढवणे हाही एक उद्योग चालू असतो. या दोन उद्योगांच्या खेरीज नवे हितसंबंध निर्माण करणे हा एक महत्त्वाचा उद्योग असतो. कारखानदार मजुरांसाठी स्वस्त धान्याची दुकाने काढतात, त्यांच्या मुलांसाठी शाळा काढतात, औषधोपचारासाठी दवाखाने काढतात, म्हातारपणासाठी प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी अशा सोयी करतात, त्यांच्या रजेची व्यवस्था करतात, पूर्ण पगारी सुट्ट्यांच्या सोयी करतात, त्यामुळे असह्य असे काम आणि असह्य दारिद्र्य ही कामगारवर्गाची अवस्थाच बदलून जाते. क्रांतीच्या नादी लागण्यापेक्षा पगारवाढीच्या मागे लागणारा कामगार भांडवलदारांना परवडतो. कारखाना, कामगार, आणि उद्योगपती यांच्या संबंधाची वास्तवताच इथे बदलून जाते.

ही वास्तवता बदलून गेल्यामुळे एक निष्कर्ष बदलून जातो. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर मध्यमवर्ग ऱ्हास पावेल आणि सर्वत्र दारिद्र्य फैलावेल हा निष्कर्ष बदलतो. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर क्रमाने वरिष्ठ नोकरदारांचा भांडवलशाहीत हितसंबंध गुंतलेला वरिष्ठ मध्यमवर्ग अस्तित्वात येतो आणि उरलेल्या नोकरदारांचा पगारवाढ मागण्यावर तृप्त असणारा नवा कनिष्ठ मध्यमवर्ग अस्तित्वात येतो. या प्रक्रियेत कामगारांच्या

चळवळी क्रांतीच्या चळवळी न राहता पगारवाढ मागणाऱ्या चळवळी होऊन जातात. मग सगळाच विचार नव्याने करावा लागतो.

वास्तवता जेव्हा बदलते तेव्हा ती अनेकविध अंगांनी बदलत असते. मार्क्सच्या काळापर्यंत युरोपातील राष्ट्रवाद हा वरिष्ठ वर्गाचा राष्ट्रवाद होता. राष्ट्रातील जनतेच्या भौतिक गरजांच्या बाबतीत पूर्णपणे उदासीन असणारा आणि सत्ताधारी वर्गाच्या सोयी सांभाळण्यासाठी जनतेला बलिदान करण्यास भावनात्मक आवाहन करणारा असा हा राष्ट्रवाद होता. म्हणून मार्क्सने राष्ट्रवाद ही एक प्रतिगामी संकल्पना ठरवली. ते बरोबरच आहे. त्यात काही चूक नाही. पण विसाव्या शतकात नव्याने जागे होणाऱ्या आशिया–आफ्रिकेचे स्वरूप याहून निराळे आहे. आशिया–आफ्रिकेतील राष्ट्रवाद हा एका बाजूने साम्राज्यशाहीच्या विरोधी उभा असणारा लढा आहे. दुसऱ्या बाजूने या राष्ट्रवादाच्या नेत्यांना जनतेच्या दारिद्र्याला उत्तर शोधण्यासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य हवे आहे. ज्या दिवशी राष्ट्रवाद ही संकल्पना जनतेच्या दारिद्र्याला उत्तर शोधीत असते व साम्राज्यवाद विरोधी लढ्याचा भाग बनते त्या दिवशी राष्ट्रवादाची संकल्पनाच बदलून जात असते. भांडवलदार जनतेच्या कल्याणाविषयी कितीही उदासीन असले तरी स्वतःच्या कल्याणाविषयी त्यांना उदासीन राहता येत नाही. भांडवलशाही आपल्याला सोडवता न येणाऱ्या अंतर्विरोधात सापडून मरेल हे मार्क्सचे भाकीत खरे ठरले की खोटे ठरले, हे सांगता येणे कठीण आहे. कारण मंदीच्या चक्रांचा विचार करता करता केवळ जिवंत राहण्यासाठी भांडवलशाही जनतेची क्रयशक्ती घसरू नये याची काळजी घेणे शिकेल, याचे स्वप्न कुणालाच पडणे शक्य नाही.

आज भांडवलशाहीसुद्धा क्रयशक्ती ढासळू नये याच्या उपाययोजना शोधीत असताना दिसत आहे. क्रयशक्ती ढासळू नये यासाठी म्हणून एक नव्या पद्धतीची यंत्रणा निर्माण करावी लागते. ही एक अशी यंत्रणा असते, जिथे कामगारांना वेतन मिळते, पण त्यांच्या कामातून विक्रीचा माल तयार होत नाही! सगळी आधुनिक सरकारे लोककल्याणाचे काम जे करीत असतात त्यामागचे अर्थशास्त्र हे असे आहे. शासन सडका बांधू लागते, धरणे बांधू लागते, त्यात हजारो मजुरांना काम मिळते, पण सडक जेव्हा बांधून होते तेव्हा ती विकायची नसते. ज्यातून विक्रीमाल तयार होत नाही अशी रोजंदारी जर अस्तित्वात नसेल तर जनतेची क्रयशक्ती घसरण्याचा धोका असतो. ही क्रयशक्ती घसरली की त्यामुळे मंदीचे संकट येऊन भांडवलशाहीच त्या अरिष्टात कोसळण्याची भीती असते, म्हणून असल्या प्रकारचे उद्योग चालू ठेवावे लागतात. नफ्याची प्रेरणा असणाऱ्या खाजगी भांडवलदारांना विक्रीमाल तयार न करणारे हे उद्योग चालवता येत नसतात, म्हणून भांडवलशाहीत लोककल्याणकारी राज्य या नावाने हे उद्योग शासन करीत असते! जनतेच्या कल्याणाला आपण वचनबद्ध आहोत, असे म्हणणारी सरकारे

आपण शाळा किती काढल्या, सडका किती बांधल्या याचा खूप गवगवा करतात. खरे म्हणजे भांडवलशाही व्यवस्थेला दीर्घजीवी करण्याचे हे सगळे मार्ग असतात.

या घटनेचा अर्थ हा होतो की भांडवलशाही समाजालाच आपल्या अस्तित्वासाठी शासनाने सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश करावा ही गोष्ट समर्थनीय मानावी लागते आणि सार्वजनिक क्षेत्रातील कामकाज चालवण्यासाठी सतत वाढते कर देण्यास भांडवलदारांना तयार व्हावे लागते. वाढते सार्वजनिक क्षेत्र आणि भांडवलदारावरील वाढते कर यांकडे बोट दाखवून भांडवलशाहीतील सरकारे आपण लोकशाही मार्गाने समाजवादाकडे जात आहोत, असे वर्षानुवर्षे सांगू शकतात. या सगळ्या बाबींकडे मुद्दाम लक्ष वेधण्याचे एक कारण आहे. ते कारण असे आहे की, जुन्या भांडवलशाहीविरोधी लढ्यासाठी जी साधने, ज्या संघटना आणि ज्या व्यूहरचना आपण स्वीकारल्या त्या सर्वच क्रमाने कालबाह्य होत आहेत, याकडे लक्ष वेधावे. आधुनिक भांडवलशाही हितसंबंधियांची एक व्यापक चौकट उभारीत असते, हे आपण समजून घेतले पाहिजे. या व्यापक चौकटीतील एक दुवा पगारदार नोकर हा असतो. त्याचे वाढते पगार देत राहणे आणि सार्वजनिक क्षेत्र उत्पादक ठरो वा अनुत्पादक ठरो वाढवीत राहणे आणि त्यासाठी करही वाढवीत राहणे हा एक उद्योग चालू असतो. अजून एक दुवा कामगारवर्ग असतो. हा कामगारवर्ग स्वतःला पगारवाढ मागत असतो. खरे म्हणजे शासनाला वाढते कर देणे आणि मजुरांना वाढते पगार देणे यांमुळे भांडवलदार मेटाकुटीस यायला पाहिजे. आपण अगदी मरणोन्मुख झालो असून रडकुंडीला आलो आहोत, असे भांडवलदार नेहमी म्हणत असतो. प्रत्यक्षात मात्र आपल्याला असे दिसते की त्याचीही संपत्ती वाढते आहे. मजुरांचे पगार वाढतात, शासनाचे कर वाढतात आणि भांडवलदारांचे संचित वाढते! कुणाच्या-तरी शोषणातून हे सगळे घडत असले पाहिजे ही गोष्ट उघड आहे.

वाढलेली संपत्ती वरच्यावर जिरवणे आणि अप्रत्यक्ष करांच्या रूपाने सगळे ओझे ग्राहकांच्या डोक्यावर टाकणे या प्रक्रियेत शोषण होणार असेल तर नोकरदार, उद्योगपती, औद्योगिक कामगार इत्यादी गटांत न येणाऱ्या छोटा शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील छोट्या छोट्या उद्योगांत पसरलेला असंघटित माणूस यांचेच होणार. ज्याचे उत्पादनतंत्र विशाल संघटनांच्या विरोधी आहे, ज्याच्या नवयुगाच्या जाणिवा अजून अविकसित आहेत, असा दारिद्र्यरेषेखाली असणारा जो चाळीस टक्के लोकसमूह त्यांच्या-साठी आपली जुनी साधने आणि लढण्याची जुनी तंत्रे काहीच देऊ शकणार नाहीत! या बदललेल्या वास्तवातील नव्या गुंतागुंतीचा विचार मार्क्सवाद्यांनी करायला नको काय? हा माझ्यासमोरचा कायमचा प्रश्न आहे.

सर्व जगातील मजुरांनो आणि कामगारांनो, तुम्ही एक व्हा, संघटित व्हा; कारण

गमावण्यासाठी तुमच्याजवळ गुलामगिरीच्या बेड्यांखेरीज दुसरे काहीच नाही आणि कमावण्यासाठी मात्र सर्वच बाबी आहेत, या हाकेला एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी फार मोठा अर्थ होता, आज तो अर्थ राहिलेला नाही. कामगारांनो, एक व्हा, संघटित व्हा, कारण गमावण्याजोगे तुमच्याजवळ पुष्कळ आहे, तुम्ही संघटित झाला नाहीत तर ते गमावले जाईल आणि कमावण्याजोगेही पुष्कळ आहे, असे सांगण्याच्या अवस्थेत आपण आलो आहोत. मार्क्ससमोर संघटना क्रांतीसाठी होती. कामगारांच्या संघटनांनी जर क्रांती करून सत्ता हातीं घेतली तर पुढे काय होईल ? हा मुद्दा आपण बाजूला ठेवू. पण कामगार संघटित झाले आणि क्रांती झाली नाही तर काय होईल ? फार चमत्कारिक प्रश्न आहे. कारण संघटित कामगार कामाचे कमी तास आणि वाढता पगार मागणार, भांडवलदार तो देणार, कामगारांच्या संघटना आणि शासनयंत्रणा राबवणारी नोकरशाही दोन्ही मिळून जर शोषणाची अवजारे झाली, तर पुढे काय करावे ? जुन्या चिंतनात याचे उत्तर सापडणार नाही.

जुन्या भांडवलशाहीत कमी वेतनावर मजूर मिळत होता. कारण बेकारांचे थवे हिंडत होते. याचा अर्थ असा आहे की शहर कामगारांचे जे अतिशय दुर्दैवी वेतन असे आपण म्हणतो ते मिळण्याच्या आशेने शहरात हिंडणारे बेकार विपुल आहेत. कारण ग्रामीण भागात त्याहीपेक्षा वाईट परिस्थिती होती. ग्रामीण भागात अधिक असह्य परिस्थिती असल्याशिवाय शहरात बेकारांचे थवे जमत नाहीत. शहरात बेकारांचे थवे हिंडू लागल्याशिवाय वाटेल तितक्या कमी पगारावर भांडवलदारांना मजूर मिळत नाहीत. मजुरांची परिस्थिती भयाण होती हे खरे. पण त्याचे कारण ग्रामीण भागात त्याहीपेक्षा भयाण परिस्थिती होती. हे चित्र झाले एकोणिसाव्या शतकाअखेरच्या जुन्या भांडवलशाहीचे. नव्या भांडवलशाहीत तुलनेने औद्योगिक कामगारांची परिस्थिती सुधारलेली आहे. ग्रामीण भाग मात्र तोच एकोणिसाव्या शतकासारखा शिल्लक आहे! सुट्ट्या नाहीत, रजेच्या सोयी नाहीत, कामेही नाहीत, कामाचे तास ठरलेले नाहीत, संघटना नाहीत, संघटनेची शक्यता नाही असे हे सगळे उदास चित्र आहे. विसाव्या शतकात तर शहरातील कामगार आणि ग्रामीण भागातील माणूस यांमधील अंतर अधिकच वाढलेले आहे.

पगारवाढ मिळते आहे, उत्पन्नाची हमी आहे, कामाचे तास ठरलेले आहेत तोवर कामगार क्रांती करणारच नाही. त्याला क्रांती करावीशी वाटू नये, अशी यंत्रणा नव्या भांडवलशाहीने सिद्ध केलेली आहे. अशा वेळी दारिद्र्यरेषेखालच्या चाळीस टक्क्यांचा विचार करताना मार्क्सवाद्यांचे दायित्व काहीच नाही काय ? या दायित्वाचा विचार आपण करू लागलो म्हणजे गांधीवाद हा मार्क्सवादाला अधिक कालानुरूप व अधिक व्यावहारिक रूप देणारा विचार आहे की काय, असा प्रश्न विचारण्याच्या टप्प्यावर आपण

येऊ लागतो आणि या टप्प्यावर आपण जेव्हा उभे राहतो तेव्हा जयप्रकाश नारायण यांची समग्र क्रांतीची कल्पना हा एखादा भोळा स्वप्नरंजनाचा प्रकार नसून ते वस्तुस्थितीचे उभे केलेले अटळ आव्हान आहे असे वाटू लागते. मार्क्सवाद्यांनी या ठिकाणावर उभे राहून जर नवे चिंतन केले नाही तर मग आपण शास्त्रीय आहोत आणि वास्तववादी आहोत या अभिमानात तरी अर्थ कोणता राहील ?

# जनता पक्षापुढील आव्हाने

मार्च महिन्याच्या २० तारखेला रात्री निवडणुकांचे निकाल जसजसे जाहीर होऊ लागले, तसतसे माझे मन आनंदित होण्याच्याऐवजी क्रमाने उदासीन होत होते! इंदिरा गांधी रायबरेली मतदारसंघातून चालू असलेल्या मतमोजणीत राजनारायण यांच्यापेक्षा काही हजार मतांनी मागे आहेत, ही बातमी ज्या वेळी नभोवाणीवर आली त्या वेळी माझी उदासीनता अधिक गडद झालेली होती!

ही उदासीनता आपल्या चेहऱ्यावर कोणत्याही ठिकाणी दिसू नये, सर्वांच्या आनंदात आपणही उत्साहाने सहभागी आहोत हेच लोकांना जाणवावे, याचा मी अटोकाट प्रयत्न करीत होतो. ज्या नांदेड शहरात मी होतो तेथील लोकसभेची जागा काँग्रेस पक्ष हरणार हे निश्चितच होते. फक्त ही जागा किती हजार मतांनी काँग्रेस पक्ष हरेल, एवढाच काय तो मतभेदाचा मुद्दा होता. अगदी आरंभापासून नांदेड लोकसभा मतदारसंघ हा मुख्य मंत्र्यांच्या प्रतिष्ठेचा मतदारसंघ आहे व म्हणून तो आपण पराभूत केला पाहिजे, याविषयीची निश्चित भूमिका मी घेतलेली होती. शेवटच्या पंधरवड्यात तर प्रचाराची एक फार मोठी आघाडी मी सांभाळीत होतो. तेव्हा या जागी काँग्रेस हरली पाहिजे ही माझी निश्चित भूमिका होती. हा मतदारसंघ पराभूत करण्यासाठी आपली सर्वशक्ती पणाला लावली होती. निवडणुकीच्यापूर्वी सुमारे एक पंधरवडाभर काँग्रेसने केवढाही प्रयास केला तरी ही जागा आम्ही जिंकू आणि भरघोस मतांनी जिंकू ही खात्री मी व्यक्त केलेली होती. मुख्य मंत्र्यांच्या प्रतिष्ठेचा हा मतदारसंघ काँग्रेसने सुमारे एक लक्ष चौतीस हजार मतांनी गमावला!

खरे म्हणजे मी काँग्रेस पक्षाचा सभासद कधीच नव्हतो. ज्या तरुण वयात माझा काँग्रेसशी संबंध होता ते पक्षसभासद होण्याचे वय नव्हते. स्वातंत्र्योत्तर कालात मी सातत्याने काँग्रेस पक्षावर कमीअधिक प्रमाणात विरोधी टीकाच करीत आलो. सर्व निवडणुकींत काँग्रेसविरोधीच प्रचार केला आणि काँग्रेस पक्ष सत्तेतून खाली उतरला पाहिजे हीच भूमिका मी घेतली. आयुष्यभराचा सगळा संबंधच विरोधी पक्षांशी असल्यामुळे निवडणुकीत काँग्रेसचा पराभव हा नेहमीच आनंदाचा विषय राहिला. पण माझे मन मोठे चमत्कारिक आहे. ते एकाच वेळी दोन दोन, तीन तीन पातळींवरून परस्पर भिन्न दिशांनी

विचार करीत असते. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पाडाव ही अतिशय महत्त्वाची आणि समाधानाची गोष्ट होती. तो झाला याविषयीचा आनंद खोटा नव्हता. तो आनंद खराच होता, पण या पाडावाचे इतर अनेक गंभीर परिणाम माझ्या मनाला जाणवत होते. त्यामुळे मन अतिशय उदासीन झाले होते, हेही काही खोटे नाही. या उदासीनतेचे एक कारण अगदी स्पष्ट आहे. नांदेड लोकसभा मतदार संघातून उभे असणारे जाणते व अनुभवी गृहस्थ गो. रा. म्हैसकर हे माझे व्यक्तिगत मित्र होते. मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नामधील त्यांची जाणकारी व या मुद्द्यांवर त्यांचा असणारा भर मला माहिती होता. आपण एका चांगल्या कार्यकर्त्याचा पराभव करतो आहोत, याची जाणीव होती. त्याहीपेक्षा विशेष म्हणजे त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांच्याशी आमचे कोणत्याही मुद्द्यांवर कितीही मतभेद असोत, 'मराठवाड्याचा विकास' या प्रश्नावरील त्यांची ज्वलंत निष्ठा आम्हाला मान्य होती. जुन्या हैद्राबाद राज्यात मराठवाड्याची काहीशी उपेक्षाच झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मराठवाडा बिनशर्तवादी राहिला याची कोणतीही चाड न बाळगता पुढच्या वीस वर्षांत पुन्हा मराठवाड्याची उपेक्षाच झाली. केवळ योगायोगाने एक संधी आम्हाला अशी मिळालेली होती, की ज्यामुळे इतर कुणावर अन्याय न करता मराठवाड्याच्या विकासाचे न्याय्य हक्क आम्ही पदरात पाडून घेऊ शकलो असतो, नांदेडची जागा पडणे म्हणजे शंकरराव चव्हाणांचा राजकीय अस्त हे आम्हाला माहिती होते.

महाराष्ट्रात काँग्रेसच्या लोकसभेच्या २८ जागा पडल्या. त्यामुळे चव्हाणांचा अस्त फार लवकर झाला. महाराष्ट्रात काँग्रेसने कर्नाटकाप्रमाणे खूप जागा जिंकल्या असत्या तरीही नांदेड मतदार संघ पडल्यानंतर चार-दोन महिन्यांत चव्हाणांना खाली उतरणेच भाग होते. काँग्रेसचा पाडाव पाहत असताना मराठवाड्याचा वेगाने विकास होण्याचा जो संभव निर्माण झालेला होता त्याचाही अस्त आम्ही पाहत होतो. पण संपूर्ण राष्ट्राच्या भवितव्याचा विचार करताना हे दुःख गिळणे भाग होते. इंदिरा गांधींच्या राजकीय नेतृत्वाचा ज्या पद्धतीने अस्त होत होता तीही विषाद वाटणारीच घटना होती. तो लोकशाहीवर श्रद्धा असणाऱ्या नेतृत्वाचा पराभव नव्हता, पण त्याबरोबर हेही लक्षात ठेवायला हवे, की हा हुकूमशाहीचाही पराभव नव्हता. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेच्या पोटी लोकशाहीला हुकूमशाहीची कळा आणणाऱ्या एका असुरी आकांक्षेचा तो पराभव होता. काँग्रेसचे नेतृत्व क्रमाने इतक्या खालच्या पातळीला जावे ही गोष्टच इतकी दुःखद होती, की काँग्रेसचा पाडावही विषादपूर्ण होतो. हा विषाद त्या वेळी व्यक्त करण्याची सोय नव्हती. आता वातावरण पुष्कळ निवळले आहे. आता तो विषाद व्यक्त करायला हरकत नाही.

१९७७ साली झाली ही काही भारतातील पहिली निवडणूक नव्हती. याही पूर्वी भारतात

निवडणुका होतच आल्या होत्या. जून १९७५ ला आणीबाणी जारी झाली. त्याच्यापूर्वी काही आणीबाणी नव्हती. १९७१ सालच्या लोकसभा निवडणुकीत, ७२ सालच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस प्रचंड मतांनी निवडून आलेलीच होती, पण त्याही वेळीं आम्ही काँग्रेसचा पाडाव व्हावा याचाच प्रयत्न करीत होतो. ५२ सालपासून या देशातले विरोधी पक्ष काँग्रेस पक्षाच्या पराभवाचाच प्रयत्न करीत होते. त्या काळात काही आणीबाणी नव्हती. जून १९७५ ला आणीबाणी आली नसती आणि परंपरेप्रमाणे ७६ ला लोकसभेच्या निवडणुका झाल्या असत्या तरी विरोधी पक्ष काँग्रेसचा पराभव करण्यासाठी उभे राहिले असते. विरोधी पक्षांनी काँग्रेसच्या पराभवाचा कसोशीने प्रयत्न करणे ही निराळी गोष्ट आणि जनतेने या प्रयत्नांना प्रतिसाद देऊन काँग्रेसचा पराभव करणे ही निराळी गोष्ट. या दोन घटनांच्यामध्ये फरक आहे हे आपण नेहमीच लक्षात ठेवले पाहिजे. जसजसा या दोन घटनांच्यामधील फरकाचा आपण विचार करू, तसतसा काँग्रेस पक्षाच्या पराभवामुळे माझ्यासारख्या व्यक्तीला वाटणाऱ्या विषादाचाही उलगडा होत जाईल.

काँग्रेस पक्षातील माणसे सरसहा वाईट आहेत असे माझे कधीच मत नव्हते, उलट त्याही पक्षात अनेक चांगले आणि विविध क्षेत्रांतले तज्ज्ञ असे कार्यकर्ते आहेत हे माझ्यासारख्याला दिसतच होते. काँग्रेस पक्ष जो कार्यक्रम घेत होता, तो नेहमी वाईटच होता असे नाही. काँग्रेस पक्षानेही विविध क्षेत्रांत अतिशय चांगले काम केलेले आहे. इंदिरा गांधींनी आणीबाणी जारी करून लोकशाहीचा मुडदा पाडला असा आक्रोश जेव्हा आपण करतो त्या वेळीं, जून ७५ पर्यंत सुमारे २८ वर्षे या देशात लोकशाही जिवंत होती याची कबुलीही आपण देत नसतो काय ? आणि ही लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम सर्वांत मोठा व सत्ताधारी पक्ष म्हणून मोठ्या प्रमाणात काँग्रेसने केले याचीही कबुली आपण देत नाही काय ? व्यक्तिशः माझे असे मत आहे, की या देशात काँग्रेसने खरी लोकशाही रुजवण्याचा आणि टिकवण्याचा कधी प्रयत्नच केला नाही. त्याने फक्त लोकशाहीचा आभास टिकवून ठेवलेला होता, पण सर्वसामान्यपणे असे मानले जात असे की या देशात लोकशाही आहे, नियोजन आहे, सेक्युलॅरिझम आहे. क्रमाने अर्थव्यवस्थेची लोकशाहीकडे वाटचाल चालू आहे, अशा अनेक गोष्टी मानल्या जात होत्या. यातील एकही बाब निखालस खरी अगर निखालस खोटी म्हणता येण्याजोगी नव्हती. तरीही काँग्रेस पक्षातील सर्वच व्यक्ती वाईट आहेत असे तेव्हाही माझे मत नव्हते, आजही माझे तसे मत नाही. आणि तरीही काँग्रेस पक्षाचा पराभव केला पाहिजे, हे मात्र माझे निश्चित मत होते.

काँग्रेस पक्षाचा पराभव केला पाहिजे, या मताचे कारण त्या पक्षाने आणीबाणी लादली हे नव्हते. काँग्रेस पक्षाच्या पराभवाची आम्ही वाट पाहत होतो, धडपड करीत होतो,

याची कारणे निरनिराळी होती. एक कारण असे की लोकशाहीमध्ये सत्तेवर असणारा पक्ष पराभूत झालाच पाहिजे. सत्तेवर असणाऱ्या पक्षाला पराभवाची भीतीच नसली तर सत्तेला जनतेची भीतीच शिल्लक राहत नाही. जनतेची भीती नसणारी सत्ता क्रमाने अकार्यक्षम व भ्रष्ट होत जाते. अकार्यक्षम शासनाशिवाय फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढत नसतो आणि भ्रष्टाचार वाढत चाललेले शासन कधी कार्यक्षम राहत नसते. काँग्रेस पक्षाला निवडणुकीची भीतीच वाटत नसे. काँग्रेसमधील आमचे एक ज्येष्ठ मित्र तर मला नेहमी सांगत की, जेव्हा आम्ही निवडणूक जिंकतो तेव्हा पाच वर्षे राज्य करतो आणि जेव्हा आम्ही निवडणूक हरतो तेव्हा विरोधक सहा महिने राज्य करतात, चार-दोन माणसे इकडे तिकडे होतात, पुढे साडेचार वर्षे सत्ता आमचीच असते! सत्ता जाण्याची भीती असल्याशिवाय सत्ताधारी पक्ष जनहितदक्ष असूच शकत नाही. म्हणून काँग्रेस पक्षाचा एकदा पराभव झाला पाहिजे असे आमचे मत होते—आणि हे मत लोकशाहीप्रमाण असणाऱ्या काँग्रेसजनांचेही होते. एकदा आमच्या पक्षाचा फार मोठा पराभव झाल्याशिवाय बजबजपुरी थांबणार नाही, असे काँग्रेसचे अनेक लोक बोलून दाखवीत. उलट काँग्रेस पक्षाच्या अवस्थेविषयी कित्येकदा काँग्रेस पक्षातीलच कार्यकर्ते अतिशय कडवटपणे बोलत, हे लक्षात घेतले पाहिजे.

ज्याप्रमाणे सत्ताधीश पक्षांना निवडणुकीत पराभूत होण्याची भीती पाहिजे, त्याप्रमाणे विरोधी पक्षांना लोकशाही मार्गाने सत्तेवर येण्याची आशा पाहिजे. ही आशा जर विरोधी पक्षाच्या जवळ नसेल तर विरोधी पक्ष क्रमाने बेजबाबदार व विध्वंसक होऊ लागतो. ही प्रक्रिया येथेच थांबत नाही. लोकशाही जीवनपद्धतीवर मुळातच विश्वास नसणारे व हिंसात्मक साधनांनीच सत्ता उलथून टाकता येते अशी श्रद्धा बाळगणारे गट प्रभावी होऊ लागतात. लोकशाही स्थिर होण्याला ही परिस्थिती उपयोगी नसते. काँग्रेस पक्ष विरोधी कार्यकर्त्यांची सतत फोडाफोड करीत असल्यामुळे या देशात जोमदार विरोधी पक्ष उभा राहण्याची शक्यताच काँग्रेसने नष्ट केली होती. विरोधी पक्ष बलवान होऊ शकले नाहीत, याचा संपूर्ण दोष काँग्रेसकडे आहे असे नाही, पण दोषाचा प्रमुख वाटा काँग्रेसकडे आहे असे मी मानतो. विरोधी पक्षांनी केलेली मागणी जनतेत रुजते असे पाहताच आपल्या भूमिका बदलून ती मान्य करायची, हे संधिसाधू धोरण व माणसांची फोडाफोड हे जर सत्ताधारी पक्ष करू लागला आणि शासनाचा कार्यक्रम आपल्या पक्षाच्या सोयीने वापरू लागला तर विरोधी पक्षाची वाढच अशक्य होऊन जाते. काँग्रेसने या सर्व पद्धती वापरल्या. या देशासमोर ‘काँग्रेस अगर अराजक’ अशी भीती सदैव उभी राहिलेली असे. ही भीती नष्ट होण्यासाठी विरोधी पक्ष कधी तरी सत्तेवर येणे आवश्यक होते. म्हणून काँग्रेसचा पाडाव हा आवश्यक मानणे भाग होते.

काँग्रेस पराभूत झाली पाहिजे, या भूमिकेला अजूनही एक कारण होते. काँग्रेस पक्ष हा

संघटित पक्ष म्हणून क्रमाने अस्तित्वातून मावळत होता. क्रमाने तो वेगवेगळ्या हेतूंनी एकत्र आलेल्या माणसांचा मेळावा बनत होता. एखाद्या यात्रेजत्रेला चार माणसे जमावीत किंवा चार लाख माणसे जमावीत तसे काँग्रेसचे स्वरूप होत होते. संघटित पक्ष म्हणून अस्तित्व संपल्यामुळे आपल्या पक्षाचा कार्यक्रम जनतेला समजावून सांगण्यात पक्षालाच रस उरलेला नव्हता. अमलात आणण्यात तर मुळीच रस उरलेला नव्हता. घोषणा आणि कृती यांचा कोणताही संबंधच दिसत नव्हता. इकडेतिकडे हेलकावे खात मध्यम मार्गाने काँग्रेस चालत असे. काँग्रेसजनांची (सत्तेत असणाऱ्या नेत्यांची) बोलण्याची भाषा मध्याहून सदैव किंचित डावीकडे झुकलेली असे, या डाव्या भाषाशैलीच्या काही लकबी असत आणि प्रत्यक्ष कृती मध्यापासून पुष्कळच उजवीकडे कार्यरत झालेली असे! जे काँग्रेसजन प्रत्यक्ष सत्तेत नसत ते किती जहाल डावे बोलत याला धरबंद नव्हता, त्याची कुणाला भीतीही नव्हती आणि किती प्रतिगामीपणे वागत याचीही कोणाला क्षिती नव्हती. संपूर्ण समाजवादी ध्येयधोरण रेखीवपणे व अचूकपणे अमलात आणण्यासाठी ज्या संघटना लागतात त्या आपल्या देशात अस्तित्वात नाहीत. काँग्रेस अशा संघटना अस्तित्वात येऊ देत नाही. कोणत्याही कार्यक्रमाचा संपूर्ण विचका हे काँग्रेसने आपले वैशिष्टय केलेले होते. अशा वेळी काँग्रेसचा पाडाव करणे जास्त डावे बोलणारा, पण निदान काही प्रमाणात मध्याहून डावीकडे झुकणारे धोरण अमलात आणणारा पक्ष अस्तित्वात आल्याशिवाय व तो सत्तेत असल्याशिवाय समाजवादाच्या दिशेने वाटचाल अशक्य आहे. म्हणून काँग्रेसचा पाडाव झाला पाहिजे ही भूमिका होती.

या दोन्ही भूमिका आणीबाणीपूर्वीच्या आहेत. जून ७५ ला आणीबाणी अस्तित्वात आल्यामुळे प्रश्न बदलले नाहीत, प्रश्न तेच राहिले. पूर्वीही आम्ही हे म्हणत होतो, की लोकशाही बळकट व्हायची असेल आणि रुजायची असेल तर काँग्रेसचा पाडाव झाला पाहिजे. आणीबाणीमुळे नाममात्र अस्तित्वात असलेला लोकशाहीचा जो भ्रम होता तोही संपला— आणि एकदम या लोकशाहीच्या अस्तित्वाच्या प्रश्नाने उग्र रूप धारण केले. आणि जो समाजवादाचा आर्थिक प्रश्न होता तो तर मुळी आणीबाणीचा गाभाच होता, तोही या निमित्ताने उफाळून निघाला! या आणीबाणीचा आर्थिक प्रश्नांशी अधिक निकट संबंध आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. ना. यशवंतराव चव्हाण म्हणत, आणीबाणीच्या बुडाशी आर्थिक कारणे आहेत. त्यांना असे म्हणायचे होते की, विरोधकांनी अर्थव्यवस्था खिळखिळी करून टाकली आहे व आर्थिक अनवस्था प्रसंग निर्माण केला आहे. त्यामुळे देश धोक्यात आला आहे. म्हणून अर्थव्यवस्था भक्कम पायावर पुन्हा उभी करण्यासाठी आणीबाणीची आवश्यकता आहे.

यशवंतराव चव्हाणांचे हे म्हणणे फारसे खरे नव्हते. आपण जे बोलतो आहोत त्याच्या खरेपणावर त्यांचाही विश्वास होता की नव्हता कोण जाणे! कारण आणीबाणीच्या

काळातसुद्धा अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी करण्यात शासनाला यश आलेले नाही. तसा शासनाने पद्धतशीर प्रयत्न केल्याचेही दिसून येत नाही. पण तरीही आर्थिक प्रश्नांचा आणीबाणीशी निकट संबंध आहे. बाबू जयप्रकाश नारायण यांच्या सर्व आंदोलनातच हा मुद्दा गृहीत होता.

१९६७ साली निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा बऱ्याच मोठ्या प्रमाणात पाडाव झालेला होता. त्याचे कारण त्या वेळेची आर्थिक परिस्थिती व अन्न परिस्थिती हेच होते. या पराभवातच काँग्रेस पक्षाचे अनेक अतिरथी, महारथी समाप्त झाले. पराभूत झालेल्या या ज्येष्ठ नेत्यांचा आपले वजन ठेवण्याचा प्रयत्न चालू होता. इंदिरा गांधींनी आर्थिक प्रश्न हाताशी धरूनच आपले नेतृत्व उभे केले. १९६९ सालच्या बँक राष्ट्रीयीकरणामुळे या देशातील लाखो लोकांच्या आशा प्रज्वलित झाल्या. इंदिरा गांधी काहीतरी करून दाखवतील या आशेमुळेच ७१ साली लोकांनी त्यांना प्रचंड मतदान केले! भारतात शासनाने पुरोगामी कार्यक्रम अमलात आणावा असे दडपण निर्माण करण्यात जनतेला यश आले नाही, हे खरे आहे, पण जे कोणी पुरोगामी कार्यक्रम अमलात आणतील त्यांना आपण उचलून धरतो हे जनतेने दाखवून दिले होते. प्रत्येक पुरोगामी कार्यक्रमाने आपण लोकप्रिय व बळकट होतो हे दिसत असूनही काँग्रेस पक्ष त्या मार्गाने जात नव्हता. इतका व्यवहारात तो उजवा होता. जनतेच्या भ्रमनिरासाला सुरवात झाली; त्यातूनच जयप्रकाशांचे आंदोलन सुरू झाले.

भ्रष्टाचारविरोध हे जयप्रकाशांच्या आंदोलनाचे मुख्य सूत्र होते. भारतीय जनतेला चटकन समजणारा 'भ्रष्टाचार' हा शब्द आहे, पण त्याचा अर्थ अत्यंत गुंतागुंतीचा आहे. शासकीय नोकर पैसे खातात इतकाच त्याचा अर्थ नाही, तर शासनच काळा पैसा निर्माण व्हावा याला सहायक ठरते आणि तो पैसा राजकीय भ्रष्टाचारात वापरला जातो असाही त्याचा अर्थ आहे. काही हितसंबंधियांच्या नफ्यातोट्यासाठी जनतेला कायमचे दरिद्री ठेवण्यात येते आणि निवडणूक इतकी खर्चिक केली जाते की, गोरगरीब जनतेच्या आकांक्षांचे प्रतिबिंबच निवडणुकीत उमटू शकत नाही, हाही त्याचा अर्थ आहे. म्हणून जयप्रकाशांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात जमिनीच्या फेरवाटपापासून सुशिक्षितांच्या बेकारीपर्यंत आणि परंपरागत समाजरचनेच्या परिवर्तनापासून आमूलाग्र शैक्षणिक पुनर्रचनेपर्यंत अनेक प्रश्न येतात, म्हणून ज्या वेळी जयप्रकाश भ्रष्टाचारविरोध हा शब्द वापरतात त्या वेळी त्या शब्दात समग्र क्रांती अभिप्रेत असते. हा सगळा प्रश्नच प्रामुख्याने आर्थिक आहे. जयप्रकाशांचे आंदोलन नसते अगर आंदोलनाला जयप्रकाशांच्यासारखा नेता नसता तर कदाचित आणीबाणीही आली नसती!

आणीबाणीचे अठरा महिने हा एक अंधारलेला कालखंड आहे. वाडवडिलांच्यापासून

लोकशाहीची भाषा जिच्या कानावर पडली अशा एका व्यक्तीने सत्तापिपासेपोटी आपल्या राजकीय जीवनाचा आणि २७ वर्षे सत्ताधारी असणाऱ्या एका विशाल पक्षाचा पूर्ण सत्यानाश करून टाकावा याची ही दुःखद कहाणी आहे! आणीबाणीच्या कालावधीत जे अनन्वित प्रकार घडले, लाचारी आणि सत्तापिपासा यांचे जे बीभत्स दर्शन घडले त्याच्या तपशिलात जाण्याची गरज नाही. पण आणीबाणीचे तीन महत्त्वाचे लाभ आहेत, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आणीबाणीचा पहिला लाभ हा की, लोकशाही मार्गाने देशाची वेगाने प्रगती होऊ शकत नाही, त्यासाठी काही काळपर्यंत तरी हुकूमशाही आवश्यक आहे, असे मानणाऱ्या लोकशाहीवाद्यांचा आणीबाणीमुळे भ्रमनिरास झाला. जे मूलतःच हुकूमशाहीवादी आहेत, त्यांना हुकूमशाहीखेरीज दुसरी कोणती समाजरचनाच आवडत नाही. या मंडळींचा विचार वेगळा केला पाहिजे. मार्क्सच्या पद्धतीने सांगायचे तर या मंडळींचा स्वातंत्र्याला विरोध नसतो. आपल्या स्वार्थाच्या विरोधी जाईल अशा इतर सर्वांच्या स्वातंत्र्याला विरोध असतो. पण सगळेच जण असे नसतात. बहुतेक मंडळी लोकशाहीवादी असतात. त्यांना लोकशाही हवी असते, लोकशाही प्रिय असते, ती प्रमाणही असते, पण त्यांना असे वाटते, की लोकशाही यशस्वी होण्यासाठी किमान काही मर्यादेत तरी आर्थिक विकास व्हायला हवा, आर्थिक सुस्थिती यायला हवी. आणि हे घडण्यासाठी काही काळ तरी सर्वांना शिस्तीत धरायला हवे. म्हणून हुकूमशाही हवी. भारतात लोकशाहीवादी असणारे पण पाच दहा वर्षे ती स्थगित ठेवावी असे म्हणणारे अनेकजण होते. आणीबाणी आल्याबरोबर कित्येकांनी याच भूमिकेतून तिला पाठिंबा दिला. प्रत्यक्षात चित्र असे दिसले की, ज्यांना काहीच मिळालेले नाही त्यांचा आक्रोशही हुकूमशाही बंद पाडते. म्हणून हुकूमशाही ही फक्त अर्थव्यवस्थेलाच उजवे वळण देणारी व जनतेला अधिक दरिद्री करणारी एक घटना ठरते. आणीबाणीत गरिबी हटावच्या दृष्टीने काहीच झाले नाही. फक्त उद्योगपतींना काही नव्या सवलती मिळाल्या. अर्थव्यवस्थेने लोकमताचा दाब संपल्यानंतर अधिक उजवे वळण घेतले. श्रमजीवींच्या चौरस संघटनांचा संघटित दाब जर अस्तित्वात नसेल तर लोकशाहीचा संकोच अर्थव्यवस्थेला उजवे वळण देत असतो, या घटनेची पुरेशी धास्ती आता भारतीय समाजवाद्यांनी घेतलेली आहे. निवडणुकीनंतर ज्या भाषेत डावे कम्युनिस्ट आणि उजवे कम्युनिस्ट बोलत आहेत, त्यावरूनसुद्धा हा मुद्दा स्पष्ट होईल. आणीबाणीमुळे भारतासारख्या असंघटित राजकारणाच्या देशात लोकशाहीचे असणारे महत्त्व अधिक स्पष्ट झाले, हीसुद्धा कमी महत्त्वाची बाब नाही.

या देशातील जनतेची धास्तीच कुणाला वाटत नव्हती. काहीही केले तरी आपण निवडूनच येतो ही खात्री असल्यानंतर अशी धास्ती वाटण्याचे कारणही नसते. पण लोकशाहीचा संकोच करून लोकांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न जर झाला तर जनता संतापाने पेटून उठू शकते ही गोष्ट या निवडणुकीत अतिशय उग्रपणे प्रकट झाली आहे.

यापुढे सत्ताधारी पक्ष लोकशाहीचा संकोच करण्याची पुन्हा हिंमत दाखवू शकणार नाही– आणि जर तशी हिंमत कुणी दाखवलीच तर लगेच देशभर यादवीयुद्ध सुरू होईल, हे आता स्पष्ट झालेले आहे. लोकशाहीच्या हक्कांचा संकोच करण्याबाबत सत्ताधारी पक्षाला वाटणारी भीती ही लोकशाहीच्या यशाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. आणीबाणी आणि नंतरच्या निवडणुकीच्यामुळे सत्तेच्या ठिकाणी ही धास्ती पुरेशा प्रमाणात निर्माण झाली आहे. ही एक चांगलीच गोष्ट म्हटली पाहिजे. आणीबाणीमुळे निर्माण झालेली तिसरी चांगली व महत्त्वाची गोष्ट अशी की, आपले जुने हेवेदावे विसरून अनेक राजकीय पक्ष एकत्र आलेले आहेत. एका पक्षाचे दोन पक्ष व्हावे, त्यांचे पुन्हा वेगवेगळे गट पडावे असा जो आधीच दुबळया असणाऱ्या विरोधी पक्षांत स्वतःचे सामर्थ्य खच्ची करून घेण्याचा उद्योग चालू असे तो बंद पडून राजकीय पक्ष एकत्र येत आहेत. केवळ पक्ष एकत्र येत आहेत यापेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की आपले जुने नाव, त्याचे अहंकार आणि जुने कार्यक्रम यांचे विसर्जन करून एका कार्यक्रमावर उभ्या राहिलेल्या नव्या पक्षात आपले विसर्जन करून घेण्यास हे पक्ष सिद्ध झालेले आहेत. यामुळे छोट्या कारणावर वेगवेगळ्या चुली मांडण्याची इच्छा राजकारणातून मावळत असून छोटे छोटे मतभेद असले तरी पक्ष म्हणून एकत्र येण्याची व एकत्र राहण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. डॉ. लोहियांच्या धाडशी भूमिकेतून ही प्रक्रिया सुरू झाली. बाबू जयप्रकाश नारायणांच्या व्यक्तिमत्त्वामुळे ही प्रक्रिया एका महत्त्वपूर्ण टप्प्यापर्यंत पोहोचलेली आहे.

या निवडणुकीत आपला विजय होऊन सत्ता आपल्या हाती येईल असे विरोधी पक्षांना स्वप्नातही वाटले नव्हते. त्यांची फार तर अपेक्षा ही की, भारतीय लोकसभेत कधीही नव्हता, एवढा मोठा आणि बलवान विरोधी पक्ष म्हणून आपण बसू शकू. विरोधी पक्षांच्या अंदाजाप्रमाणे काँग्रेसला २९० जागा मिळतील. सर्व प्रांतिक पक्ष व अपक्ष यांना मिळून ५० जागा मिळतील आणि जनता पक्षाला उरलेल्या म्हणजे २०० च्या आसपास जागा मिळतील. जाहीरसभेत त्यांचे बोलणे काहीही असो, खाजगीत सावधपणे ते हे अंदाज मांडत होते. काँग्रेस पक्ष आरंभी आपण प्रचंड बहुमताने विजयी होऊ असे समजत होता, पण शेवटी शेवटी काँग्रेसही या निर्णयावर आली होती की, आपल्याला २८०–२९० पेक्षा अधिक जागा मिळणार नाहीत. कुलदीप नायर यांची माहिती जर तारतम्याने पारखून घेतली तर असे दिसते की, इंदिरा गांधी शेवटी या निर्णयावर आलेल्या होत्या की आपल्याला २४०–२५० जागा मिळतील. बहुमतात नसलेला, पण लोकसभेतील सर्वांत मोठा पक्ष असे आपले स्वरूप राहील. आणि आपण तात्पुरते मंत्रि-मंडळ बनवू शकू. त्या दृष्टीने त्यांनी पूर्वतयारीस आरंभ केलेला होता. पण सर्वांचेच सर्व अंदाज कोसळून पडले. स्वतः पंतप्रधानच पराभूत झाल्या आणि जनता पक्ष प्रचंड मतांनी निवडून आला. २४ मार्च १९७७ रोजी केंद्रात प्रथमच काँग्रेसेतर सरकार अस्तित्वात येत होते.

हिंदुस्थानात काँग्रेसचा पाडाव झाला ही चांगलीच गोष्ट म्हटली पाहिजे. याही वेळी जर निवडणुकीत काँग्रेस निवडून आली असती तर त्यानंतर या देशात लोकशाही शिल्लक राहिली नसती. यापेक्षा भयावह गोष्ट म्हणजे क्रमाने सशस्त्र आंदोलने सुरू झाली असती आणि तसा आरंभ जर झाला असता तर भारताची अखंडताच संपली असती. हा मुद्दा केव्हा तरी एकदा तपशिलाने सांगायला हवा. तो मुद्दा असा आहे की, भारतीय लोकशाहीचा शेवट हा भारतीय राष्ट्राच्या अखंडतेचाही शेवट ठरणार आहे. आणीबाणीच्या काळात एस्. एम्. जोशी यांनी जागोजाग हा मुद्दा तपशिलाने समजावून सांगितला होता.

काँग्रेसचा पाडाव झाला आणि जनता पक्ष निवडून आला ही गोष्ट चांगली झाली, यात माझ्या मनात तरी शंका नाही. पण हे घडत असताना आपण किंमत कोणती मोजली आहे, याचा एकदा थंड डोक्याने विचार करायला हवा. एवढी मोठी घटना घडताना किंमत मोजावीच लागत असते. ती मोजावी लागली याविषयी फारशी कुरकुर करण्याचे कारण नाही. पण आपण किंमत कोणती मोजली आहे हे एकदा स्वच्छ उघड्या डोळ्यांनी तपासून घेतले पाहिजे. म्हणजे एवढी मोठी किंमत ज्या आशाआकांक्षेसाठी आपण मोजली तिचेही महत्त्व लक्षात येईल. आपल्या आशाआकांक्षा जर काही प्रमाणात फलद्रूप झाल्या तर आज मोजलेली किंमत क्षम्य होऊन जाईल. उलट जे पदरात पडेल ते इतके महत्त्वाचे असेल, की या किंमतीचे समर्थनही करता येईल आणि जर या आकांक्षा फलद्रूप झाल्या नाहीत तर सगळ्याच किंमती फोल वायद्याच्या मोजल्या गेल्या असा त्याचा अर्थ होईल !

क्रमाने आरंभ करायचा तर काँग्रेसच्या राजवटीत मद्रास 'द्रविड मुन्नेत्र कळहम'च्या ताब्यात गेलेला होता. आपणाला दक्षिणेत विजय मिळावा म्हणून काँग्रेसने या संघटनेशी तडजोड केली. आज मद्रासवर अण्णा द्रविड मुन्नेत्र कळहमचे राज्य आहे. केरळवर काँग्रेस, मुस्लिम लीग आणि कम्युनिस्ट या युतीचे राज्य आहे. क्रमाने यातून काँग्रेस हा घटक यापुढे नगण्य महत्त्वाचा होत जाणार आहे. व्यवहारतः उजवे कम्युनिस्ट आणि मुस्लिम लीग यांच्या ताब्यात केरळ आहे. आपण जर प्रयत्नच केला आणि काँग्रेसच्याच तोडफोड नीतीचा अवलंब केला तर डावे कम्युनिस्ट आणि मुस्लिम लीग या युतीच्या हाती आपण केरळ देऊ शकतो. पंजाब अकाली दलाच्या ताब्यात आहे. काश्मीर शेख अब्दुल्लांच्या ताब्यात आहे आणि बंगाल डाव्या कम्युनिस्टांच्या ताब्यात आहे. उरलेल्या भारतात तीन प्रांत काँग्रेसच्या ताब्यात आहेत, इतरांच्यावर जनता पक्षाचे राज्य चालू आहे. पैकी बंगाल, केरळ आणि मद्रास एकीकडे आणि काश्मीर दुसरीकडे ही यापुढे दीर्घकाळची डोकेदुखी ठरणार आहे. द्विपक्ष लोकशाहीचा सिद्धान्त मान्य केल्यानंतर ज्यांचे सरकार केंद्रात आहे त्यांचेच सरकार सर्व प्रांतांत असावे ही अपेक्षा करता येणार नाही.

पण हा द्विपक्ष लोकशाहीचा सिद्धान्त नाही. केंद्रात सरकार जनता पक्षाचे येईल अगर काँग्रेसचे येईल, त्यामुळे काही प्रांत यांचे अगर त्यांचे राहतील. पण केरळ, मद्रास, बंगाल आणि काश्मीर हे प्रांत कुणाचेच राहणार नाहीत! हे कुणाच्या तरी 'मित्रांचे' ते प्रांत राहणार, म्हणजे हे चार प्रांत नेहमी कुणाच्या तरी बरोबर राहणार. केंद्रात ज्यांची सत्ता आहे त्यांच्या विरोधकांचे मित्र होण्याचा हे प्रांत प्रयत्न करणार. त्यांची अगदी साधी मागणी असते. ती म्हणजे प्रांत व केंद्र यांचे संबंध पुन्हा एकदा नव्याने निश्चित करावे लागतील! आणि हे निश्चित करताना प्रांतिक स्वायत्तता अधिक वाढवून द्यावी लागेल. मी या यादीत पंजाबमध्ये अकाली दलाचे सरकार असले तरी त्याचा समावेश केलेला नाही. उद्या महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाचे मंत्रिमंडळ आले तरी त्यांचा या यादीत समावेश नाही. कोणे एके काळचे अकाली दल आज शिल्लक नाही. मी ज्या चार प्रांतांचा उल्लेख केला आहे तेथील नेतृत्व भारतीय राष्ट्रवादावर विश्वास ठेवणारे नाही. काँग्रेसच्या काळात हा प्रश्न होताच, पण जनता पक्षाच्या काळात हा प्रश्न यापुढे अधिकाधिक गंभीर होत जाणार आहे, याची जाण आपण ठेवायला पाहिजे.

या निवडणुकींच्या निमित्ताने सर्वांचे अस्तित्वच पणाला लागले होते. त्यामुळे येतील त्यांना बरोबर घेऊन जाणे भाग होते. कोण काय बोलतो आहे,: याचा विचार करण्यास अवकाशच नव्हता. मुख्य सूर आणीबाणीत जनतेवर झालेले अत्याचार हा गृहीत धरून त्याला जोडून ज्या कुणाला जे बोलायचे असेल ते बोलण्याची मुक्त मुभा होती. प्रत्येकजण आपआपल्या मनातील बाबी बाहेर बोलून दाखवीत. यातून एक महत्त्वाची बाब हळूहळू साकार होत गेली. आर्थिक प्रश्न निवडणुकांत मागे पडलेलाच होता, पण निदान सामाजिक प्रश्न तरी लोकांच्या डोळ्यांसमोर यावेत याचेही कुणाला भान उरलेले दिसत नव्हते. कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम हा सर्व पुरोगामी मंडळींनी पुरस्कारलेला एक राष्ट्रीय महत्त्वाचा कार्यक्रम, तो या निवडणुकीत हास्यास्पद ठरला! सक्तीचे कुटुंब नियोजन आणि राजकीय हुकूमशाही या दोन बाबी जणू काही एकच आहेत असे चित्र या निवडणुकीत दिसून आले. महाराष्ट्रात कापूस एकाधिकार हा एक टीकेचा महत्त्वाचा मुद्दा ठरलेला होता. इमाम बुखारी आपल्या अनुयायांना धार्मिक आवाहन करीत होते. हिंदू जातीयवादी आणि मुस्लिम जातीयवादी परस्परांच्या गळ्यात गळा घालून एक-मेकांच्या सज्जनतेची ग्वाही देत होते आणि या दोघांच्याही सज्जनपणाची ग्वाही काँग्रेस-बाहेर असणारे विरोधी पक्षांतील सर्व सेक्युलर लोक देत होते! उजव्या शक्तीचा एक भीतिदायक उद्रेक या निवडणुकीच्या निमित्ताने दिसून आला.

काँग्रेस पक्षातील माणसे सगळीच वाईट आहेत असे नव्हे. काँग्रेस पक्ष जे कार्यक्रम घेत होता ते कार्यक्रमही सगळेच वाईट आहेत असे नव्हे. आमच्या राजकारणातील मुख्य दुखणे हे होते, की समान विचारांच्या कार्यकर्त्यांनी बांधलेले राजकीय पक्ष राजकारणात

प्रभावी होत नव्हते आणि केवळ सत्तेच्या छायेखाली एकत्र आलेला मेळावा राजकारणात प्रभावी दिसत होता. कार्यक्रमाशी एकनिष्ठ असणारा समान विचारांच्या कार्यकर्त्यांचा पक्ष जर राजकारणात प्रभावी झाला नाही तर अनेक विसंवादी धोरणांची अर्धी कच्ची अमलबजावणी होत राहते. यातून उद्भवणारे नानाविध ताण हेच सर्व दुर्दशेत रूपांतरित होत असतात. काँग्रेस पक्षाचा पाडाव करण्यासाठी नाइलाजाने का होईना, पण जनता पक्षाच्या नावाने पुन्हा एकदा तसाच मेळा आम्ही गोळा करीत होतो. काँग्रेसला 'शंभूमेळा' म्हटले म्हणजे लोक टाळ्या वाजवतात. जनता पक्षाला 'शंभूमेळावा' म्हटले म्हणजे त्यांचा सात्त्विक संताप जागा होतो, खरे तर हाही एक शंभूमेळाच आहे. सत्तेत असणाऱ्या उच्च पदस्थांनाही अजून जाहीर सभेतून एकमुखाने बोलता येत नाही. मग ही माणसे मनाने एकसारखी झाली असे कसे म्हणावे ? ही अवस्था नेत्यांची आहे, अनुयायांची अवस्था तर यापेक्षा जास्त विसंवादी आहे.

लोकशाहीचे अस्तित्व जतन करण्यासाठी आणि काँग्रेसचा पाडाव घडवून आणण्यासाठी सर्व उजव्या शक्तींना प्रचंड बळ मिळवून देणारे वातावरण आम्ही घडवीत होतो आणि काँग्रेसचा पाडाव जर घडला तर तिची जागा घेणारा एक नवा मेळा आम्ही रचीत होतो. हे सगळे भाग होते. सर्वांचाच नाइलाज होता हे मान्य केले तरी काँग्रेस पक्षाचा पाडाव होत असताना घडलेली ही घटना मन उदासीन करणारीच होती. जनता पक्षाच्या विजयाचा विचार ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर करणे भाग आहे.

लोकशाहीच्या दृष्टीने विचार करायचा तर पहिला प्रश्न हा आहे की जबाबदार लोकशाहीवादी राजकारण जनता पक्ष सुरू करणार आहे काय ? गेल्या काही महिन्यांचा अनुभव या बाबतीत संमिश्र आहे; तो निखालस चांगला नाही. पहिली गोष्ट म्हणजे ज्या प्रचंड प्रमाणात जनता पक्ष विजयी झाला आहे, तो याचा पुरावा आहे की इंदिरा गांधींनी निवडणुका निष्पक्षपातीपणे घेतल्या, हे अजून जनता पक्षाने मान्य केलेले नाही. निवडणूक लढवणाऱ्या सर्वांनाच मुक्त प्रचाराची मुभा दिली होती. एक फर्नांडिस यांचा अपवाद सोडला तर निवडणूक लढवणारे सर्व कार्यकर्ते मोकळे होते. फर्नांडिस तुरुंगात होते, ती राजकीय कैद नव्हती. जॉर्जला न्यायालयाने निर्दोष सोडलेले नाही. नव्या सरकारने खटला मागे घेऊन फार चांगला पायंडा पाडला असे म्हणण्याची सोय नाही. पण काहीही असले तरी इंदिरा गांधी हुकूमशहा होण्यासाठी निवडणूक लढवीत होत्या असे म्हणता येत नाही. निवडणुकीत पाडाव झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली यावर चर्चा फार होते, पण त्यांनी निष्पक्षपाती निवडणुका घेतल्या व पराभव झाल्यानंतर राजीनामा दिला याचा योग्य गौरव करण्याची बुद्धी मात्र होत नाही. ही गोष्ट कुणालाच फारशी चांगली नाही. राग मी समजू शकतो, पण त्यात तोल जाणे नेत्यांना शोभत नाही.

इंदिरा गांधींचे योग्य श्रेय नाकारण्यासाठी नवनव्या घोषणा अधिकृत, अनधिकृतपणे पसरवण्याचा सवंग उद्योग सध्या जनता पक्षाने चालवलेला आहे. हा उद्योग उद्याला महागात पडणार आहे. इंदिरा गांधींनी लष्कराच्या हाती सत्ता द्यायचे ठरविले होते, पण लष्करानेच ते नाकारले, ही अशीच एक सवंग थाप आहे. 'कालकुपी' अजून बाहेर काढलेली नाही, तरीही तिच्यात काय आहे, काय नाही यावर लोकसभेत निवेदन मात्र करण्यात आलेले आहे! परवाच गृहमंत्री चरणसिंग यांनी, इंदिरा गांधींनी सर्व विरोधी नेत्यांची कत्तल करण्याचा कट रचलेला होता असे सूचित केले. या व अशा-सारख्या घोषणा अजून सहा महिने पुरतील. मार्च महिन्यापासून सतत वाढत जाणारे भाव जर खाली आले नाहीत तर काँग्रेसने काय काय चुका केल्या व काँग्रेसजन किती धूर्त होते याविषयीची निवेदने जनता पक्षाला फार तारक होतील, असे वाटत नाही. जनता पक्षाच्या नेत्यांनी आपल्या समोरची आव्हाने जर गंभीरपणे लक्षात घेतली नाहीत तर केवळ घोषणांचे राजकारण फार काळ तारक होऊ शकणार नाही.

लोकशाही निर्दोष राहायची असेल तर भारतात विरोधी पक्षही बलवान असण्याची गरज आहे. आजपर्यंत काँग्रेस हा सत्ताधारी पक्ष होता. यापुढे तो विरोधी पक्ष म्हणून काम करील. काँग्रेस बलवान करण्याचे काम जनता पक्षाने करावे असे कुणीच म्हणणार नाही, पण काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या मंडळींना आपली पदे घेऊन जनता पक्षात येण्याची परवानगी देणे हे फारसे चांगले कृत्य नव्हे. लोकशाहीत पक्ष मोकळेच असतात. म्हणून जो येऊ इच्छितो त्याचे स्वागतच असते. पण त्याने मागच्या पक्षाच्या आधारे मिळवलेली पदे सोडून द्यायला पाहिजेत. पण हे पथ्य सत्तेला सोयिस्कर कधीच नसते. पूर्वी काँग्रेस हे पथ्य पाळीत नसे, कारण ते त्यांच्या सत्तेला सोयिस्कर नव्हते. आता जनता पक्ष हे पथ्य पाळीत नाही. कारण ते आता यांच्या सत्तेला सोयिस्कर नाही. 'प्राप्त परिस्थितीत नाइलाज म्हणून आम्ही या तडजोडी करीत आहोत' हाच संधिसाधू राजकारणाचा खुलासा असतो. त्यापेक्षा वेगळा खुलासा जनता पक्षाजवळही नाही.

लोकसभा जिंकली, आता राज्यसभेत बहुमत करून घ्यायचे आहे, म्हणून काही तडजोड. राष्ट्रपतिपदाची निवडणूक जिंकलीच पाहिजे म्हणून इतर काही तडजोडी. महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकात आपण फार दुबळे आहोत, तिथे बलवान झालेच पाहिजे, म्हणून काही तडजोडी; आणि सर्व तडजोडीवर एकमेव स्पष्टीकरण हे, की प्राप्त परिस्थितीत आमचा नाइलाज आहे! या मंडळींना कुणीतरी सांगायला पाहिजे, की सोयीचे असते तेव्हा तत्त्वनिष्ठ राहणे याला तत्त्वनिष्ठा म्हणत नसतात. गैरसोयीचे असूनही तत्त्वनिष्ठ राहणे यालाच तत्त्वनिष्ठा म्हणतात. गनिमी काव्याचे डावपेच शत्रूविरुद्ध लढायला उपयोगी पडतात. गनिमी कावा आणि डावपेच हे शुद्ध, परिपक्व लोकशाही निर्माण करायचे

रस्ते नव्हेत. जी बेचाळीसावी घटनादुरुस्ती बेकायदेशीर, लोकशाहीविरोधी व अनैतिक आहे असा जनता पक्षाचा दावा आजही आहे, तिचा आधार नव्या मंत्रिमंडळाने किती वेळा घेतला आहे हेही एकदा पाहावे लागेल.

जनता पक्षाने काहीच केले नाही असा त्याचा अर्थ नव्हे. जनता पक्षाचा विजय हीच लोकशाहीला महत्त्व देणारी घटना आहे. अजून त्यांनी पडलेल्यांना गव्हर्नर करण्याची पद्धत स्वीकारलेली नाही. विरोधी पक्षनेत्याला वेळोवेळी विश्वासात घेणे, त्याला मंत्र्याचा दर्जा देणे, नभोवाणीवर विरोधी पक्षाला वाव देणे, विधानसभेच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाचा कौल आल्यानंतर घेणे, वटहुकुमांच्या आधारे राज्य करणे कमी करणे, हे तर जनता पक्षाने केलेले आहेच, पण नक्षलवाद्यांची मुक्तता हेही महत्त्वाचे पाऊल आहे. जे जनता पक्षाचे मित्र नाहीत व शिवाय ज्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही, ज्यांनी तत्त्व म्हणून हिंसा स्वीकारलेली आहे, त्यांनाही जर गुन्ह्याचा पुरावा नसेल तर केवळ विचारासाठी अटक नाही, ही भूमिका योग्यच आहे, याखेरीज या वेळी प्रथमच अधिकारारूढ पक्ष, मित्रपक्ष व विरोधी पक्ष यांच्याशी चर्चा विचारविनिमय करून एकमताने राष्ट्रपती ठरवीत आहेत. या सर्व घटना महत्त्वाच्या आहेत. म्हणजे लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची व चांगली पावले जनता पक्ष उचलीत आहे. तक्रार ही आहे, की पुरेशी पावले उचलली जात नाहीत आणि जी उचलली जातात ती नेहमीच चांगली असतील याची खात्री नाही.

नवे सरकार पक्षान्तराला बंदी करणारे बिलच आणीत आहे. हा कायदा झाल्यानंतर आणि झाला तर ते लोकशाहीच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. विरोधी पक्ष म्हणून जिद्दीने उभे राहण्याची क्षमता अजून काँग्रेसने दाखवलेली नाही. कुस्तीत चीतपट होतच असते, पण पराभूत पहिलवानानेसुद्धा पुन्हा पायावर उभे राहण्यास तयार असले पाहिजे. ते चित्र अजून दिसत नाही. ढासळत चाललेल्या बुरुजाप्रमाणे दररोज काँग्रेस पक्ष ढासळत आहे. हे जर असेच चालू राहिले तर काँग्रेस पक्ष अस्तित्वातून संपून जाईल आणि मग पराभवाची भीती नसलेला अस्ताव्यस्त पसरलेला एक जनता पक्षच शिल्लक राहील! सध्या जनता पक्ष ७२ मार्चमधील काँग्रेस पक्ष होण्याच्या मनोवृत्तीत दिसतो आहे, ७८ सालच्या मार्च महिन्यात ७२ सालच्या मार्च महिन्याची अवस्था येणे म्हणजे परिपक्व लोकशाहीच्या दिशेने आपला विकास होणे आहे असे मी मानत नाही. विरोधकांची सरकारे उलथून कशी पाडावी यात आपली बुद्धी खर्चण्यापेक्षा लोकशाहीच्या नव्या प्रथा निर्माण करून रुजवाव्या कशा यात थोडा विचार वापरला तर तो हवा आहे. सत्तेत येण्याच्या आदले दिवशीपर्यंत 'राइट टु रिकॉल–विश्वास गमावलेल्या प्रतिनिधीला परत बोलावण्याचा हक्क' हे लोकशाहीचे प्राणतत्त्व आहे असा ज्यांचा दृढविश्वास होता त्यांना आता हा हक्क 'अव्यवहारी' वाटू लागला आहे!

अव्यवहार्य काय नसते ? अशिक्षित, अडाणी, अंधश्रद्ध व दीन जनतेला मतदानाचा अधिकार देऊन समतेवर आधारलेला समाज अस्तित्वात आणण्याची प्रतिज्ञा करणारे पुरेसे अव्यवहारीच होते, आणि ज्यांच्या राज्यावर सूर्य मावळत नाही त्याचे राज्य शस्त्र न घेता संपवण्याची आकांक्षा बाळगणारे अव्यवहारीच होते. ज्यांना सत्ता चालवण्याचा कोणताच पूर्वानुभव नव्हता, त्यांना विश्वासपूर्वक निवडून देणारे या देशातील लोकही अव्यवहारी आहेत. जगातील सगळी स्वप्ने अव्यवहारीच पाहत असतात व त्यांचीच अव्यवहारी जिद्द स्वप्न साकार करते ! व्यवहारी लोक फक्त नफ्या–तोट्याचे हिशेब लिहितात ! फार तर ' ऑडिट ' करून घेतात. ' राइट टु रिकॉल ' जगात कोठे अस्तित्वात नाही काय ? जिथे तो अस्तित्वात आहे तिथे तो कायद्याच्या व्यवहार्य भाषेत नोंदवला नाही काय ? खरी मेख निराळी आहे. या देशातले अडाणी लोक लक्षात घेत उपद्व्यापी मंडळी त्यांना वेळोवेळी चिथावतील. त्यामुळे कारभार अशक्य होईल अशी भीती आहे. या अडाणी मंडळींना दर पाच वर्षांनी एकदा चिथवावे हेच सत्ता स्थिर राहाण्यासाठी चांगले आहे. उरलेले सगळे अव्यवहार्य आहे, असे हे मनातले गुपित आहे. हे तर जुन्या पंतप्रधानांचे मत झाले. हेही मत मान्य असेल त्यांनी आपण इंदिरा गांधींच्या भूमिकेचे वारसदार आहो असे जरूर अभिमानाने सांगावे. लोकशाहीत त्यांना ते स्वातंत्र्य जरूर आहे. पण ' राइट टु रिकॉल 'ला अव्यवहार्य म्हणणाऱ्यांनी जयप्रकाशांचा वारसा सांगू नये. काँग्रेसने म. गांधींना मोडीत काढले होते. जनता पक्ष जयप्रकाशांना मोडीत काढणार आहेत किंवा काय, हे वर्ष–दोन वर्षांत समजेल.

जनता पक्षाकडून आशा भरपूर आहेत, पण आशा आहे तितकीच शंकाही आहे. जनता पक्षाला एका समान कार्यक्रमावर श्रद्धा असणाऱ्या तत्त्वनिष्ठ पक्षाचे स्वरूप येणार आहे काय ? ते येणारच नाही असेही नाही. येईलच असेही नाही. काल राजकारणात कुणाच्या भूमिका काय होत्या यात मला रस नाही. आज त्यांच्या भूमिका काय आहेत यात मला रस आहे. माणसे बदलत नसतातच असे नाही. परिस्थितीचा परिणाम होतच असतो. एक माणूस सावरकरांच्याकडून प्रेरणा घेऊन आरंभ करतो. पुढे कम्युनिस्ट होतो. नंतर ' रॉइस्ट ' होतो आणि शेवटी मानवतावादी होतो ! बदल होतच असतो. संघात बदल होईल काय ? जनसंघात बदल होईल काय ? या चर्चेत मला रस नाही. माझ्यासमोर प्रश्न आहे तो हा की, सर्वांच्यामध्ये सर्व प्रकारचा बदल झालेला आहे, हे मला मान्य आहे, पण हा बदल कार्यक्रमात कधी दिसणार आहे काय ? असा तो प्रश्न आहे.

आज जनता पक्षात मला स्थूल मानाने तीन प्रवाह दिसतात. वातावरणाच्या दृष्टीने सर्वांत प्रभावी प्रवाह सेक्युलर व समाजवादी विचारांचा आहे. कार्यकर्त्यांच्या दृष्टीने अतिशय तत्त्वनिष्ठ आणि जिद्दीच्या कार्यकर्त्यांचा जो थवा आहे तो हिंदुत्वनिष्ठ बिन-समाजवादी विचारांनी भारलेला आहे–आणि या गंगा–यमुनेत ' सेक्युलर, 'पण निश्चित-

पणे उजव्या मनोवृत्तीचे असे प्रवाह आहेत. जुन्या जनसंघवाद्यांनी ह्याची नोंद घ्यावी की वरील तीन प्रवाहांत त्यांचे वर्णन करीत असताना त्यांना 'बिनसमाजवादी' म्हटले आहे, उजव्या मनोवृत्तीचे म्हटलेले नाही. मला हे तीन प्रवाह जाणवतात. या तीन प्रवाहांची रस्सीखेच चालू आहे.

समाजवाद्यांना वाटते, आपण वातावरण व कार्यक्रम यांच्या आधारे जनता पक्षाला समाजवादी विचारांशी बांधलेल्या कार्यकर्त्यांच्या संघटनेचे रूप देऊ. जनसंघाच्या कार्यकर्त्यांना वाटते, हवा व वातावरण या तात्पुरत्या बाबी असतात, आपण प्रत्येक गोष्टीला 'हो' म्हणण्याची तयारी ठेवावी, जर आपण वाट पाहू शकलो तर सत्ता व संघटना आपलीच आहे. माणसे कालप्रवाहात बदलतात हे एक सत्य आहे, पण प्रसंगानुसार इकडचे तिकडचे बोलून झाले म्हणजे माणसे न बदलता मूळ पदावर येतात. हे दुसरे सत्य. यापैकी कोणते सत्य उद्या सिद्ध होणार आहे? सापडतील त्यांचा गोळा केलेला मेळा समाजवाद आणीत नसतो. असे 'गोळाबेरीज पक्ष,' लोकशाहीही बळकट करीत नसतात. जनता पक्ष एका व्यवस्थित संघटनेत क्रमाने रूपांतरित होत आहे, तेव्हा तो नुसता 'मेळा' राहणार नाही, ही अगदी उघड गोष्ट आहे, पण हा सुसंघटित पक्ष काँग्रेसपेक्षा डावा पक्ष होणार–की काँग्रेसपेक्षा उजवा पक्ष होणार? चरणसिंग म्हणतात, गेली तीस वर्षे नेहरूंच्या मार्गाने जाऊन देशाचा सत्यानाश झाला, म्हणून आता यापुढे गांधींच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे. यातला सूचित अर्थ जर लक्षात घेतला तर चरणसिंग पक्षाला उजवे वळण देण्याचा प्रयत्न करणार, इतके सत्य शिल्लकच राहते व हेच अडचणीचे ठिकाण आहे.

प्रौढ मतदानावर आधारलेल्या लोकशाहीत राजकीय पक्षांना पारंपरिक उजवे धोरण कधी घेताच येत नाही. जनता पक्ष संपूर्णपणे उजवा पक्ष होईल ही भीती कुणीच बाळगण्याचे कारण नाही. तो काँग्रेसपेक्षा उजवा होणार की डावा असा प्रश्न आहे. प्रश्न बिर्ला–उद्योगसमूहाचे महत्त्व वाढणार, की अजून कोणत्या उद्योगसमूहाचे महत्त्व वाढणार हा नाही–कारण कोणत्याही उद्योगसमूहाचे महत्त्व वाढले तरी अर्थकारण उजवीकडे झुकलेले मध्यममार्गी असेच राहते.

घोषणा आणि साचेबंद कल्पना यांचा आग्रह हा काही मोठा तत्त्वनिष्ठेचा भाग नव्हे. राष्ट्रीयीकरण करायचे आणि एकशे दहा दशलक्ष टन क्षमता असणाऱ्या पोलाद कारखान्यांतून साठ दशलक्ष टन उत्पादन करायचे, अकराशे मेगॅवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सहाशे मेगॅवॅट वीज उत्पन्न करायची, प्रचंड पगाराचे मॅनेजर ठेवायचे आणि कारखाने तोट्यात आणायचे म्हणजे उत्पादन घट व तूट दोन्हीही पदरात घ्यायची, किंवा खरेदी व विक्रीत व्यापारी पंचवीस टक्के अंतर ठेवतो यामुळे शेतकरी व गिऱ्हाईक यांची

लुबाडणूक होते, म्हणून सरकारने व्यापार ताब्यात घ्यायचा व व्यवस्थापनाचा खर्च चौतीस टक्के करायचा, हे सर्व खेळ काँग्रेस पक्ष वर्षानुवर्षे खेळलेला आहे! राष्ट्रीयीकरण हा शब्द वापरला म्हणजे ह्या सर्वांचे समर्थन होत नसते. हा समाजवाद नव्हे. समाजवाद ही कल्पना आपण आशयावर तपासली पाहिजे. गरजेच्या वस्तूंची वेगाने उत्पादनवाढ ही एक कसोटी आहे. कारण उत्पादनवाढीची प्रक्रिया अधिक वेगाने होणार नसेल तर गरीब राष्ट्रांना समाजवादाचा उपयोग नाही आणि समाजातील सर्वांत खालच्या वर्गाच्या जीवनमानात सतत होत राहणारी वाढ ही दुसरी अट आहे. ही दुसरी अट आपण पार पाडू लागलो व त्याबाबत पुरेसे प्रामाणिक असलो, तर ज्याच्याजवळ संपत्ती जमा झाली आहे त्याचा संपत्ती-संचय कमी कसा करावा याचा वेगळा विचार करावा लागत नसतो. श्रीमंतांच्याकडील पैसा काढून कसा घ्यावा हा समाजवादाचा मुख्य विचार नव्हे, तर गरिबांना चांगले जीवन उपलब्ध कसे करून द्यावे हा मुख्य विचार आहे. त्याची अमलबजावणी करताना श्रीमंतांची संपत्ती काढून घ्यावी लागते, हा मूळ हेतूच्या पूर्ततेसाठी कार्यक्रम. श्रीमंतांकडील संपत्ती काढून घेतली व सरकारने ती पचवून, ठेवून दिली व जनतेच्या पदरात काहीच पडले नाही, तरीसुद्धा 'श्रीमंतांची श्रीमंती गेली की नाही' असे विचारून समाजवाद आल्याचा आनंद मिरवावा इतका पुस्तकीपणा मजजवळ नाही.

म्हणून जनता शासनाच्या समोर आज सरळसरळ दोन प्रश्न आहेत. उत्पादनवाढीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी तुम्ही काय करणार? दुसरा म्हणजे, सर्वांत दरिद्री जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी तुम्ही काय करणार? या दोन्ही प्रश्नांच्याबाबत अजून जनता पक्षाने घोषणांच्यापेक्षा जास्त काही केलेले नाही. गेल्या मार्च महिन्यापासून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढतच आहेत. त्या उतरणे सोडाच, अजून स्थिरही झालेल्या नाहीत. इंदिरा सरकारच्या राजवटीवरची व्याख्याने भाववाढ आवरण्यास उपयोगी पडत नाही. या दृष्टीने आपण अंदाजपत्रक पाहू लागलो तर त्यात काय आहे? जनता सरकारच्या अंदाजपत्रकात या दृष्टीने फारसे काही नाही, थोडीशी धूळफेक आहे.

रेल्वेचे दर वाढवले नाहीत हा काही पुरुषार्थ नव्हे, रेल्वेचे दर वाढवले नाहीत, कामगारांचे पगारही वाढवलेले नाहीत. यंदाच्या वर्षांत नवी कामेही घ्यायची नाहीत. मग दिलासा काय? तर 'प्लॅटफॉर्मचे' तिकिट कमी झाले! आणि आश्वासन काय? तर मागास भागात आम्ही रेल्वे नेणार आहोत. या आश्वासनाची पूर्तता यंदा नाही. जेव्हा नवी कामे पुढे सुरू होतील तेव्हा दरवाढ आहेच. पण तो पुढच्या वर्षीचा प्रश्न झाला. यंदा वाढ नाही. घट नाही. जैसे थे चालू आहे. जनता पक्षाच्या राज्यात रेल्वेची आज आहे ती अवस्था व आहे ती तिकिटे जरी चालू राहिली तरी प्लॅटफॉर्म अधिक स्वस्त होतील असा अंदाज दिसतो! सर्वसामान्य अंदाजपत्रकाचे स्वरूपही तेच आहे. त्यात

गमती–जमतीच्या गोष्टी आहेत. लष्करी खर्चात कपात. चौदाशे कोटींच्या खर्चात बावीस कोटींची कपात, ही पुरी दोन टक्केही नाही! ही कपात सांकेतिक म्हटली पाहिजे. एखाद्या उद्योगपतीने काटकसर म्हणून टेरिलीनचा सूट शिवण्याऐवजी टेरिकॉटचा सूट शिवावा व आपण म. गांधींच्या मार्गाने टप्प्याटप्प्याने जात आहोत असे सांगावे, त्यातलाच हा प्रकार आहे!

हे सर्व सांगण्याचा हेतू जनता सरकारची थट्टा करणे हा नाही. कारण या अंदाजपत्रकात काही असावे ही अपेक्षा नव्हती! काहीच असणार नाही ही खात्री होती. जुन्याच सरकारची अंदाजपत्रके नव्या सरकारला पहिल्या वर्षी डागडुजी करून मांडावी लागत असतात, हे साधे व्यावहारिक सत्य आहे. जनता पक्षाने अजून मूलभूत महत्त्वाचे असे काहीही केलेले नाही. हे सत्य फक्त नोंदवायचे आहे. त्याबद्दल त्यांना दोषही नाही, त्याबद्दल तक्रारही नाही. पण आपण फार मोठे परिवर्तन केले आहे, अशी प्रौढी त्यांनीही मिरवू नये. तक्रार निराळी आहे. अजून जनता पक्ष ज्या मार्गाने जाणार त्याच्या दिशाही स्पष्ट झालेल्या नाहीत. नाही म्हणायला परवा जॉर्ज फर्नांडिस यांनी आपले औद्योगिक धोरण जाहीर केले. ते पुरेसे समाधानकारक आहे असे म्हणता येईल. ग्रामीण भागात अधिक रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या लघू उद्योगांना उत्तेजन व सवलती हे धोरण एका बाजूने मागासलेल्या भागात औद्योगीकरण नेणारे आहे. आर्थिक असमतोल कमी करण्याच्या ध्येय–धोरणाला ही भूमिका पूरक आहे. ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करणे ही गोष्ट जनतेचे जीवनमान वाढवण्याच्या उद्दिष्टाला सुसंगत आहे. शिवाय हे धोरण परराष्ट्रीय आयातीवर कमी भर देणारे आहे. पण ही अशी एखादी दिशा पुरेशी आहे काय? आणि सगळीच धोरणे इतकी सुसंगत आहेत काय? परवा रिझर्व्ह बँकेने व्याजाचे दर कमी केले ही गोष्ट अल्पबचतीला उत्तेजन देण्याच्या धोरणाचा भाग समजावी काय?

जनता पक्षाविषयी मी निराश मुळीच नाही. भरपूर आशावादी आहे. काँग्रेस पक्षाविषयी माझ्या मनात रागच इतका जास्त आहे की जनता पक्षाच्या बाजूने विचार करताना थोडासा पक्षपात करून का होईना पण त्यांचे समर्थन करावे असेच मला वाटणार आहे. पण हे सांगणे म्हणजे पुनःपुन्हा आशा आहे, आशा आहे इतकेच सांगणे झाले. अजून घडलेले काहीच नाही. अजून दिशाही स्पष्ट नाहीत. नागमोडी वाटचाल शंका निर्माण करणारी आहे. तेव्हा वर्षभर वाट पाहण्यास हरकत काहीच नाही, ती वाटही आम्ही पाहू. सत्तेची पाच वर्षे मिळालीच आहेत, तेव्हा जनतेला पाच वर्षे वाट पाहण्याससुद्धा सांगता येईल. तेवढा आपला अधिकार आहे. ‘जनता पक्षाचे शंभर दिवस’ या नावाचे एक भाषण बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांनी काँग्रेस पक्षाची शंभर वर्षे भरून उलटल्यानंतर दिले आहे! सत्तावीस वर्षे सत्तेत राहून अजून पाच वर्षे मुदत मागण्यासाठी जी मंडळी मैदानात

उतरली होती त्यांनी शंभर दिवसांत फारसे काही घडले नाही असा आक्रोश करू नये. आपण बॅ. विठ्ठलराव गाडगीळ किंवा यशवंतराव चव्हाण यांना विचकण्याचे कारण नाही. त्यांना आपण रोखठोक मैदानात उत्तरे देऊ.

मी विचकतो आहे तो माझ्या स्वतःच्या सदसद्‌विवेकबुद्धीला. ती सांगते आहे, " अरे! आशा ठेवायला हरकत नाही. ती ठेवच, पण अजून अभिमानाने सांगण्याजोगे काहीच घडलेले नाही, याचा संकोचही आपल्या प्रिय मेळाव्याविषयी बोलताना ठेव! "

# संपूर्ण क्रांतीची दिशा

बाबू लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्याविरुद्ध सर्वांत मोठा आक्षेप असेल तर तो हा की राजकारणातील वास्तववाद हा त्यांना फारसा कळत नाही. राजकारण हे क्षेत्रच असे आहे की या क्षेत्रातील नेत्यांना आपला ध्येयवाद तर जतन करावाच लागतो, पण व्यवहारात हा ध्येयवाद साकार होण्यासाठी वास्तववादाचे भान ठेवावे लागते. जयप्रकाशबाबूंनी या दिशेचा फारसा गंभीरपणे कधी विचार केलेला दिसत नाही. त्यामुळे एक सफल राजकीय नेते म्हणून त्यांची प्रतिमा कधी फार उजळून निघाली नाही. या त्यांच्या जीवनभरच्या प्रवाहाला अपवादभूत ठरणारा असा प्रसंग म्हणजे गतवर्षी झालेले राजकीय सत्तांतर हा होय. बाबू जयप्रकाश नारायण यांच्याविषयी अनेकांचे अनेक प्रकारचे आक्षेप होते. पण या सर्व आक्षेपांच्यामधून काही निर्विवाद बाबी वगळल्या जात. यांपैकी एक गोष्ट म्हणजे जयप्रकाशांना कोणत्याच अर्थाने सत्तेचा मोह नव्हता. काहीजणांना आपण सत्तास्थानी असले पाहिजे याची जबर महत्त्वाकांक्षा असते. या महत्त्वाकांक्षेच्या पोटी सत्तेला धोका आला की माणसे मूल्य गुंडाळून ठेवायला लागतात. एखादा नेता हुकूमशहा होतो; उरलेले सत्तेत टिकण्यासाठी लाचार खुशमस्करे होतात एक गट असा असतो, ज्यांना प्रत्यक्ष सत्तेत असण्यात फारसा रस नसतो, पण जे सत्तेत आहेत त्यांचे सूत्रधार होण्याची इच्छा असते. आपल्या हातात सूत्रे नसली तरी चालतील, पण निदान लोकांना आपण सूत्रधार वाटलो पाहिजे अशी इच्छा असते. जयप्रकाशांना सत्ताधारी अगर सत्तेचा सूत्रधारी होण्याचा कधीच मोह नव्हता. सत्तेविषयीची प्रामाणिक अनासक्ती हे जयप्रकाशांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिले; आणि त्यांच्या या स्वभावधर्माविषयी जवळपास सर्वांचे एकमत राहिले. जयप्रकाशांच्याविषयी विचार करताना अजून तीन बाबी निर्विवाद आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांच्या राष्ट्रभक्तीविषयी कोणालाही शंका नाही. पूर्वी एकदा ' ब्लिट्झ् ' या नियतकालिकाने त्यांच्या राष्ट्रभक्तीविषयी शंका व्यक्त केली होती. तिला उत्तर देताना जयप्रकाशांनी असे लिहिले होते की, " ज्या दिवशी माझी राष्ट्रनिष्ठा डळमळीत होईल, त्या दिवशी या देशात कुणी देशभक्त उरलेला असणार नाही. " आपल्या राष्ट्रनिष्ठेविषयी जयप्रकाशांनाही सार्थ अभिमान आहे; इतरांनाही त्याविषयी शंका नाही. जयप्रकाशांच्या लोकशाहीप्रेमाविषयीही शंका नाही. या ठिकाणी लोकशाहीप्रेम हा शब्द तांत्रिक अर्थाने घ्यायचा नाही. आम्ही निवडणुकांचे स्वातंत्र्य हिसकावून घेणार नाही, राजकीय स्वातंत्र्य हिसकावून घेणार नाही, मतस्वातंत्र्य

अबाधित ठेवू, पण ज्यांचे आमचे विचार जुळत नाहीत त्यांचे सहकार्य आम्ही घेणार नाही, व त्यांच्याशी आम्ही सहकार्यही करणार नाही, अशी काहीजणांची लोकशाही कल्पना असते. बाबू जयप्रकाश नारायण यांच्या मनात मतभेद असणाऱ्यांच्याविषयीसुद्धा फारसा दुरावा कधी दिसत नाही. ही उदार सहिष्णुता हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. ऐन संघर्षाच्या काळातसुद्धा ते एकदा असे म्हणाले होते, "इंदिरा गांधी मला मुलीसारख्या आहेत. त्यांच्याविषयी माझ्या मनात कोणताही हेवा निर्माण होईलच कसा?" आणि मोठ्या प्रमाणात त्यांचे हेही म्हणणे खरे दिसते. अजून एक तिसरी निर्विवाद गोष्ट आहे, ती म्हणजे या देशातील सर्व दरिद्री लोकांच्याविषयी त्यांना असणारी उत्कट तळमळ. या तीन निर्विवाद बाबी सोडल्यानंतर बाबू जयप्रकाश नारायण यांच्याविषयी अनेकांचे अनेक मतभेद आहेत. कित्येकदा तर असे वाटते की जयप्रकाशांच्याविषयी ज्या बाबी सर्वजण निरपवाद मानतात त्यामुळेच त्यांच्याशी असणाऱ्या उरलेल्या मतभेदांना महत्त्व येते.

बाबू जयप्रकाश नारायण हे एका भव्य आंदोलनाचे एक सफल यशस्वी नेते म्हणून आता राष्ट्रनायक झालेले आहेत. ज्या बिघडलेल्या परिस्थितीविरुद्ध त्यांना संघर्ष करावा लागला ती परिस्थिती बिघडण्यास काही प्रमाणात ते स्वतःही कारणीभूत होते. जयप्रकाशांनी जर राजकारण-संन्यास घेतला नसता तर कदाचित परिस्थिती इतकी कोसळत गेली नसती. बावन्न-त्रेपन्न साली जयप्रकाशांनी घेतलेल्या निर्णयांचा या देशाच्या सगळ्या राजकारणावरच गंभीर परिणाम झालेला होता. पण जुन्या गोष्टी काहीही असल्या तरी एक दिवस जयप्रकाशांना सत्तेविरुद्धच्या संघर्षाचे नेते व्हावे लागले. बाबू जयप्रकाश नारायण यांचे नेतृत्व नसते तर गुजरात आणि बिहारच्या भावनाप्रधान तरुणांना सर्वांना एकत्र आणून सत्तांतर घडवणे कधीच जमले नसते. संघर्षाच्या ज्या भट्टीतून अनेक पक्ष वितळून जनता पक्ष बनला ती घटना जयप्रकाशांच्या नेतृत्वाशिवाय कधी साकार झाली नसती. आणीबाणीच्या अंधारलेल्या कालखंडात जयप्रकाश यांचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात सर्वांचे मनोधैर्य जतन करणारे ठरले. म्हणून जर कुणी असे म्हटले की सर्व संघर्षाचे आणि सत्तांतराचे नेतेच जयप्रकाश होते, त्यावर आता कुणी वाद घालणार नाही. जयप्रकाशांना एक राजकीय पक्ष जाणे आणि दुसरा राजकीय पक्ष येणे यांत कधीच फारसा रस नव्हता. काँग्रेस पक्षाचा राजकीय पाडाव घडवून आणणे यासाठी जयप्रकाश झगडत नव्हते. ते ज्या मुद्द्यावर झगडत होते त्याचा अगदी प्रारंभिक पण अपरिहार्य टप्पा काँग्रेस पक्षाचा पाडाव हा होता. निवडणुकीत काँग्रेस पक्ष पडणे हे अनेकांचे साध्य होते. जयप्रकाशांच्यासाठी ते साध्य तर नाहीच, पण सत्तेत असणारा पक्ष बदलणे हे त्यांच्या साध्याचे महत्त्वाचे असे साधनही नाही. आपण आंबा लावतो फळ खाण्यासाठी. हे फळ पदरात पडणे हे साध्य. आंब्याचे रोपटे, त्या रोपट्यासाठी कुंपण, वेळेवर पाणी ही सगळी कमीअधिक प्रमाणात साधने. पण त्याही पूर्वी कचरा साफ करावा लागतो हे साध्यही

नव्हे आणि साधनही नव्हे. तो केवळ अपरिहार्य म्हणून करावा लागणारा प्रारंभाचा टप्पा आहे. जयप्रकाशांची मागणी काँग्रेसचा पाडाव ही नव्हती. पण काँग्रेसचा पाडाव झालेला आहे. कारण जयप्रकाशांना जे अभिप्रेत होते त्यातली ही तुलनेने सोपी असणारी गोष्ट होती. त्यांना खरोखरी अभिप्रेत होते भ्रष्टाचाराचा पाडाव करणे.

भ्रष्टाचार विरोधी आंदोलन हा जयप्रकाशांच्या आंदोलनाचा आरंभ होता. राजकीय नेते अतिशय गुंतागुंतीच्या गहन समस्यांना कधी कधी अत्यंत सोपे आणि आकर्षक असे नाव देतात. जयप्रकाशांच्या मनात असणाऱ्या समग्र क्रांतीच्या अनेक पदरी आणि गुंतागुंतीच्या प्रक्रियेला अतिशय सोपे आणि आकर्षक असे नाव भ्रष्टाचारविरोध हे आहे. जयप्रकाशांच्या पद्धतीने आपण विचार करू लागलो तर भ्रष्टाचार विरोध आणि समग्र क्रांती या दोन्हींचाही त्यांच्या मनात अर्थ एकच आहे असे आढळून येईल. एखादी व्यक्ती बेकायदेशीर मार्गाने संपत्ती गोळा करते याला आपण भ्रष्टाचार म्हणतो. जयप्रकाश नारायण याला भ्रष्टाचार म्हणतीलच, पण त्यांची भ्रष्टाचाराची कल्पना याहून फार व्यापक आहे. व्यक्तीने आपल्या स्वार्थासाठी अनुचित मार्गाने संपत्ती गोळा करणे हा तर भ्रष्टाचार आहेच, पण अनुचित मार्गाने पक्षासाठी पैसा गोळा करणे हाही भ्रष्टाचार आहे. त्यापुढे जाऊन कायदेशीर मार्गाने संपत्ती गोळा करणे अगर संपत्ती गोळा करण्याची मुभा ठेवणे यालाही ते भ्रष्टाचार म्हणतात. गुजरात व बिहारच्या विद्यार्थी आंदोलनाचा भर बेकायदेशीर मार्गाने व्यक्तींनी स्वतःसाठी, गटासाठी, अगर पक्षासाठी संपत्ती गोळा करण्याच्या विरुद्ध होता. जयप्रकाशांचा या बेकायदेशीरपणाला विरोध तर होताच, पण त्यांचा मुख्य भर कायदेशीर मार्गाने संपत्ती साठवण्याच्या विरुद्ध होता. काहीजणांच्या हातांत संपत्ती गोळा व्हावी आणि ती कायद्याच्या आधारे गोळा व्हावी हाच भ्रष्टपणा आहे, असे जयप्रकाशांचे म्हणणे होते. काळ्या पैशाला जयप्रकाशांचा विरोध होताच, पण कायद्याने मान्य केलेल्या पांढऱ्या पैशाच्या अर्थरचनेलाही त्यांचा विरोध होता. आणि कायदेशीर अर्थरचनेच्या विरोधाचा आग्रह त्यांच्या बाबतीत अधिक तीव्र होता. शासनाने स्वीकारलेले आर्थिक नियोजन तसे कायदेशीरच आहे. पण या नियोजनामुळे संपत्तिवानांचीच सोय झाली, म्हणून तो भ्रष्टाचार मानला पाहिजे, असे जयप्रकाशांना वाटत होते. सर्वसामान्य जनतेच्या हिताविरुद्ध जाणारे सर्व कायद्याचे राज्यच भ्रष्ट आहे. असे राज्य निर्माण करणारा कायदा भ्रष्ट आहे. या भ्रष्ट कायद्याला निर्माण करणारे सर्व राजकारण व निवडणुकीची यंत्रणा भ्रष्ट आहे. या भ्रष्टतेला अप्रत्यक्षपणे साह्यभूत होणारी सर्व यंत्रणा—मग त्यात समाजरचनेपासून शिक्षणापर्यंत अनेक बाबी येतात हे सगळे भ्रष्ट आहे. यासाठी शिक्षण बदलावे लागेल, राजकारण बदलावे लागेल, समाजरचना व अर्थरचना बदलावी लागेल. सर्व पातळींवर भ्रष्टाचाराचा प्रतिकार करावा लागेल, असा जयप्रकाशांचा आग्रह होता. म्हणून त्यांच्या विवेचनात संपूर्ण क्रांतीचा

नकारात्म भाषेतील आविष्कार भ्रष्टाचार विरोध हा होता. आणि भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचा भावात्मक आशय संपूर्ण क्रांती हा होता.

एखादा माणूस सत्तेच्या जोरावर कोटी–दोन कोटी रुपयांची इस्टेट निर्माण करतो ही वाईटच गोष्ट आहे. पण ती तुलनेने किरकोळ मानली पाहिजे. सत्ताच समाजातील संपत्ती अशा रीतीने फिरवते की त्यातून जनतेच्या पदरी फारसे काही पडत नाही, ही अधिक भयावह गोष्ट आहे. बाबू जयप्रकाश नारायण यांच्या डोळ्यांसमोर अधिक भयावह गोष्ट अधिक तीव्रतेने होती.

जयप्रकाश नारायणांचा विचार करताना एक गोष्ट सदैव लक्षात ठेवली पाहिजे की ते एके काळचे मार्क्सवादी आहेत, आणि मार्क्सवादाने त्यांच्या मनावर काही मूलभूत संस्कार केलेले आहेत. ते पुसले जाण्याचा संभव नाही. आज जयप्रकाश नारायण मार्क्सवादी नाहीत. पण ते जरी मार्क्सवादी नसले, ते सातत्याने कम्युनिस्ट विरोधी विचार करीत असले व जागोजाग त्यांना मार्क्सवाद अपुरा वाटत असला तरी त्यांच्या मनावर मार्क्सचा फार खोल ठसा आहे. हा खोल ठसा त्यांचे मन कधी बुजवू शकलेला नाही. एक काळ असा होता ज्या वेळी बाबू जयप्रकाश नारायण नुसते मार्क्सवादी नव्हते तर जवळजवळ कम्युनिस्टच होते. पुढे एक काळ असा आला ज्या वेळी ते स्वतःला कम्युनिस्ट विरोधक समजू लागले, पण तरीही ते स्वतःला मार्क्सवादीच म्हणत. पुढच्या काळात ते असे म्हणू लागले की आपण मूलतः मार्क्सच्या ध्येयवादाशी सहमत आहोत. अगदी अलीकडच्या काळात मार्क्सवादाबाबत जयप्रकाश फारसे बोलत नाहीत. पण त्यांचे मन हा प्रभाव कधी सोडू शकत नाही. मार्क्सवाद्यांची एक प्रमुख कल्पना अशी आहे की, समाजरचनेचा पाया अर्थरचना हा असतो. ही अर्थरचना बदलल्याशिवाय समाजरचनाही बदलता येत नाही आणि समाजातील माणसाचे भवितव्यही घडवता येत नाही. बाबू जयप्रकाश नारायण आज बोलताना फार तर असे म्हणतील की, अर्थरचना बदलली म्हणजे उरलेले सगळे आपोआप होईल, असे मानणे हा भ्रम आहे. पण अर्थरचना बदलण्याचा त्यांचा जो आग्रह त्या आग्रहापासून ते दूर जाऊ शकलेले नाहीत.

इतर सर्व प्रश्न व्यर्थ आणि फोल आहेत. खरा प्रश्न अर्थरचनेचा आहे. ती एकदा बदलली म्हणजे इतर सर्व बाबी क्रमाने बदलतील, असे मार्क्सवादी तोंडाने बोलतात, पण इतर सर्व बाबी क्रमाने बदलतील यावर मार्क्सवाद्यांचाही विश्वास नसतो. अर्थरचना मूलभूत आहे, असे मार्क्सवादी म्हणतात आणि त्यावर त्यांचा विश्वास असतो. अर्थरचनेवर समाजरचना, राज्यरचना अवलंबून असते असे मार्क्सवादी म्हणतात, पण त्यांचा स्वतःचा या मतावर बेताचा विश्वास असतो. मार्क्सवाद्यांचा विश्वास हा असतो की अर्थरचना बदलण्यासाठी राजसत्ता ताब्यात घेणे भाग आहे. राजसत्ता बदलण्यासाठी

अर्थसत्ता ताब्यात घेण्याचा उद्योग मार्क्सवादी करीत बसणार नाहीत. ध्येयवादी मंडळी राजसत्ता ताब्यात घेतल्यानंतर राजसत्तेच्या जोरावर अर्थरचना व समाजरचना बदलू शकतात यावरच मार्क्सवाद्यांचा विश्वास असतो. म्हणून तोंडाने ते अर्थसत्तेचे प्रभु व सांगत असले तरी व्यवहारात राजसत्ता हाती घेणे हाच त्यांचा कार्यक्रम असतो आणि मार्क्सवाद्यांनी राजसत्ता हाती घेऊन अर्थरचना बदलली आहे व एकदा अर्थरचना बदलली म्हणजे क्रमाक्रमाने समाजरचना व संस्कृती बदलेल याची ते वाट पाहत बसले आहेत, असे कधी घडत नाही. मार्क्सवाद्यांच्या हातात राजसत्ता आली की सत्तेचा वापर अर्थकारण, समाजकारण, शिक्षण, संस्कृती सगळेच बदलून टाकण्यासाठी केला जात असतो. क्रमाक्रमाने सगळे बदलेल हे मार्क्सवाद्यांनाही प्रामाणिकपणे मान्य नसते.

मार्क्सवाद्यांच्या डोळ्यांसमोर असणारी क्रांती सर्वांगीण क्रांतीच असते. भांडवलशाहीतील अर्थरचना त्यांना मान्य नसते. त्यांना एक अशी रचना हवी असते, जी सर्वांना काम देण्याची हमी देईल आणि कामाचा मोबदला किमान जीवनमान सांभाळून जगण्याइतका असेल याचीही हमी देईल. ही हमी फक्त कामगारांच्यासाठी म्हणून नसते तर एकूण एक नागरिकाला ही हमी देण्याची भूमिका असते. भांडवलशाहीत परंपरागत समाज-रचना बरीच बदलते, पण सरंजामशाहीतील समाजरचना खूपशा प्रमाणात आपले अस्तित्व टिकवून उभी असते. मार्क्सवाद्यांना ही समाजरचना संपूर्ण मोडून समतेवर आणि स्वातंत्र्यावर आधारलेला नवीन समाजच निर्माण करावयाचा असतो. म्हणून मार्क्सवाद्यांच्याही डोळ्यांसमोर स्वप्न संपूर्ण क्रांतीचेच असते. मतभेदाचा विषय, ही संपूर्ण क्रांती करणे त्यांना जमले आहे काय हा पहिला असून, अशी संपूर्ण क्रांती करणे त्यांना जमू शकेल काय हा दुसरा आहे. मार्क्सवाद फक्त आर्थिक क्रांतीपुरते बोलतो आणि जयप्रकाश संपूर्ण क्रांतीविषयी बोलत आहेत या भ्रमातून आपण जितक्या लवकर मुक्त होऊ तितके चांगले. मार्क्सवाद संपूर्ण क्रांतीविषयीच बोलत असतो आणि जयप्रकाशही संपूर्ण क्रांतीविषयीच बोलत आहेत. बाबू जयप्रकाश नारायणसुद्धा आपल्या संपूर्ण क्रांतीच्या कल्पनेत अर्थव्यवस्थेचे परिवर्तन हा भाग मूलभूत मानतात.

मार्क्सवादी मंडळी क्रांती होण्याच्या आधी क्रांतीसाठी संघटना बांधीत असतात. ही संघटना बांधताना धार्मिक आणि सामाजिक प्रश्न आपल्या संघटना-बांधणीला बाधक ठरतील अशी त्यांना सतत भीती वाटते. आर्थिक प्रश्न सोडून इतर सर्व प्रश्नांच्याविषयी स्वतः बोलायचे नाही, इतर कोणी बोलू लागले तर त्याचा उपहास करायचा. अर्थरचना आद्य आहे, त्यावरचे लक्ष विभाजित करण्यासाठी जनतेचे शत्रू हा उद्योग करीत आहेत, अशा अनेक बाबी मार्क्सवादी बोलतात. याचे खरे महत्त्वाचे कारण हे आहे की त्यांना सत्ता हाती आल्यानंतर सगळे प्रश्न सोडवू असा विश्वास वाटतो. धार्मिक अंधश्रद्धेला चोंभाळीत बसण्याचा उद्योग ही अंधश्रद्धा रक्षणीय आहे या जाणिवेतून नसतो, तर

आज तिला डिवचणे धोक्याचे आहे व सत्ता हाती आल्यानंतर या अंधश्रद्धेचे दफन करायचेच आहे, असे मार्क्सवाद्यांना वाटते. अर्थव्यवस्था आद्य आहे हा घोष संघटना बांधण्याच्या वेळेला असतो, राजसत्ता हाती येईपावेतो असतो. सत्ता हाती आल्यानंतर मात्र अर्थरचना बदलून नंतर क्रमवादाची कास धरणे ही दिशा कोणी स्वीकारीत नाही. सत्ता हाती आली की वेगाने संपूर्ण क्रांतीचाच कार्यक्रम आरंभ होतो.

समाजरचनेचा पाया अर्थरचना आहे हे तत्त्वतः खरेही असेल. अर्थरचनाच बदलल्यानंतर समाजरचना व सामाजिक मन बदलतेच, हे अंतिमतः खरेही असेल, पण तत्त्वतः आणि अंतिमतः या गोष्टींचे व्यवहारात स्वरूप काय आहे ? मानवी मनाचा परंपरावाद इतका बळकट आहे की गरज संपलेल्या आणि उपयोग नसलेल्या वस्तू शतकानुशतके हे मन सांभाळून धरीत असते. अर्थरचना बदलल्यावर अंतिमतः समाजरचना बदलतेच, यातील अंतिमतः याचा अर्थ चार-पाचशे वर्षांनी असा होणार असेल तर व्यवहारात या अंतिमतःचा उपयोग नाही. हे सर्वांनाच माहीत असते म्हणून सक्तीने बदल आणि तातडीने बदल यावर क्रांती करणाऱ्यांचा आग्रह असतो. मार्क्सवादी मंडळींच्या डोक्यात सत्तेच्या शक्तीच्या जोरावर सक्तीचे व तातडीने बदल हे सूत्र पक्के असते. त्यांचेही तत्त्वज्ञान सर्व जनतेला नवी संस्कृती देण्याचेच असते. पण सर्व जनता संघटित करणे गैरसोयीचे ठरते. शेवटी संघटनेचा उपयोग सत्ता हाती घेण्यासाठी असतो, म्हणून कामगार संघटित करायचे असतात. क्रांतीपूर्वी क्रांतीचे अग्रदूत म्हणून जे कामगार संघटित केले जातात त्या वेळी कामगार या शब्दाचा अर्थ शहरातील औद्योगिक कामगार हा असतो. क्रांतीनंतर कामगारांची आदिसत्ता येते त्या वेळी कामगार या शब्दाचा अर्थ कम्युनिस्ट पक्षातील सत्तेत असणारी फळी इतकाच असतो. पण हे सरकार ज्या वेळी कामगारांच्या कल्याणासाठी काम करते त्या वेळी कामगार या शब्दाचा अर्थ सर्व जनता असा असतो.

या सर्व विवेचनामध्ये माझा हेतू मार्क्सवादी व कम्युनिस्ट यांचे समर्थन करण्याचा नाही. हेतू मुद्दा स्पष्ट असावा इतकाच आहे. मुद्दा स्पष्ट असला म्हणजे आपले मतभेदही स्पष्टपणे सांगता येतात. सत्तेच्या शक्तीच्या जोरावर आणि सक्तीने अर्थरचना बदलता येते हे खरे आहे आणि समाजरचना बदलता येते हेही खरे आहे. मी असे मानतो की, काही प्रमाणात सक्तीने समूहाचे मनही बदलता येते, पण सक्तीने कधी माणसांना निर्भय व स्वतंत्र करता येत नाही. सक्तीने पूर्णपणे मन गुलाम करण्यातही अजून यश आलेले नाही. पण सक्तीने पुष्कळांचे मन पुष्कळ प्रमाणात गुलाम करता येते. अडचण अशी आहे की सक्तीने कुणाचेही मन अल्प प्रमाणातसुद्धा निर्भय व स्वतंत्र करता येत नाही. सक्ती या ठिकाणी निरुपयोगी असल्यामुळे स्वातंत्र्य अस्तित्वात आणण्यात माणसाची

जात निर्भय व स्वतंत्र करण्यात नुसत्या शासनाला यश येण्याचा संभव कधीही नाही. मार्क्सवाद व जयप्रकाश यांचे रस्ते इथून वेगळे होतात.

मार्क्सवादी चिंतनाची सर्व उभारणी एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या थोडी अलीकडे पलीकडे झाली आहे. हा तो असा काळ आहे की ज्या वेळी प्रौढ मतदानावर आधारलेली लोकशाही जगात अस्तित्वातच नव्हती. जनतेला संघटित करण्याला कोणी वाव देणार नव्हते. लोकमताच्या आधारे सत्तान्तर ही कल्पनाही शक्य नव्हती. अशा काळात ज्यांना वेगाने संघटित करून सत्ता हाती घेता येईल त्यांना संघटित करण्याचा उद्योग जर मार्क्सने केला असेल तर त्यात नवल काहीच नाही. पण अशा क्रांतीच्या वेळी हे गृहीत धरावे लागते की, संघटित कामगार आपल्या संघटनेच्या शक्तीच्या जोरावर सत्ता हाती घेतील आणि सत्ता हाती घेतल्यावर मात्र हा संघटित वर्ग स्वतःचा विचार न करता सर्वांच्या कल्याणाचा विचार करील. संघटित होणारे वर्ग आपला स्वतःचा विचार न करता इतरांचा विचार करतील ही कल्पना जडवादी नसून अध्यात्मवादी आहे. संघटित जमीनदार रयतेचा विचार करतील असे आपण म्हणत नाही. संघटित भांडवलदार मजुरांचा विचार करतील असे आपण म्हणत नाही. कारण जमीनदार आणि शेतमजूर, भांडवलदार आणि कामगार यांचे हितसंबंध एकमेकांच्या विरोधी आहेत असे आपण मानतो. संघटित औद्योगिक कामगार आणि असंघटित ग्रामीण भागातला दरिद्री लोकसमूह यांचे हितसंबंध मात्र एकमेकांच्या विरोधी आहेत असे आपण समजत नाही. व्यवहारात अनेकदा हे हितसंबंध विरोधी आहेत असे दिसले तरी आपण ते कबूल करीत नाही, म्हणून कामगार सर्वांच्या कल्याणासाठी प्रयत्न करील असे बिनतक्रार आपण गृहीत धरतो. रशियात काय झाले ? हा प्रश्न या क्षणी माझ्या डोळ्यांसमोर नाही. प्रश्न असा आहे की, अपरिहार्यपणे संघटित कामगार दरिद्री जनतेच्या बाजूने उभे राहतील असे मानण्याला काही कारण आहे काय ? संघटित कामगार आणि असंघटित दरिद्री यांच्यातील हितसंबंधांचा वाढता विरोध आपल्याला डोळ्यांसमोर दिसू लागल्यानंतर क्रांतीचे नेतृत्व कामगारच करतील याबाबत मन डळमळीत होऊ लागते.

चीनच्या क्रांतीच्या वेळी स्वतःला मार्क्सवादी म्हणवणाऱ्या माओलाही काही फेरविचार करावा लागला. माओचा मार्ग सशस्त्र क्रांतीचा होता. हा मुद्दा आपण नजरेआड केला तर चिनी क्रांतीतील एक महत्त्वाची गोष्ट आपल्याला लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे माओचा प्रयत्न शहरात जमलेल्या औद्योगिक कामगारांना एकत्र करण्याचा नसून ग्रामीण भागात पसरलेल्या कोट्यवधी दरिद्र्यांना संघटित व जागे करण्याचा आहे. खेड्यांच्या आधारे माओ सर्व शहरांना घेरून शरण आणू इच्छितो. जयप्रकाशांना, हिंसेचा मुद्दा सोडला, हुकुमशाहीचा भाग सोडला तर रशियापेक्षा चीन अधिक जवळचा वाटतो. याचे मूलभूत कारण भारतातील डावे कम्युनिस्ट काँग्रेसविरोधी आंदोलनात सहभागी

होतील हे नाही. मूलभूत कारण हे आहे की माओ शेतकऱ्यांचा नेता आहे. तो उपलब्ध मानवशक्तीला वापरण्यावर अधिक भर देतो. सर्वसामान्यांचे जीवनमान सुखावह करणे आणि शेतीक्रांतीला अग्रहक्क देणे याला माओ महत्त्व देतो. मूलतः ही दिशा जयप्रकाशांच्या विचाराला समांतर आहे. मार्क्सवाद्यांच्या चिंतनाशी जयप्रकाशांचे अंतर या ठिकाणी अजून एकदा स्पष्ट होते. कारण संघर्ष, एकीकडे भांडवलदार–जमीनदार आणि दुसरीकडे सगळी जनता इतकाच नाही, तर लाखो संघटित कामगार एकीकडे आणि कोट्यवधी दरिद्री दुसरीकडे असाही संघर्ष आहे.

या सर्व विवेचनावरून काही बाबी स्पष्ट व्हाव्या अशी अपेक्षा. त्या स्पष्ट होतील याची खात्री मात्र नाही. स्वतःला मार्क्सवादी समजणारे काही कम्युनिस्ट दोन प्रकारची विवेचने समोर ठेवीत असतात. ही विवेचने त्यांच्या प्रामाणिक समजुतीतून बाहेर आलेली आहेत की सोय म्हणून त्यांनी पत्करलेली आहेत हे सांगता येणे कठीण आहे. कारण एखाद्या विवेचनावर ते मला पटत नाही म्हणून दांभिकपणाचा शिक्का मारणे योग्य होणार नाही. विवेचनाची एक दिशा अशी आहे की, जयप्रकाश नारायण संपूर्ण क्रांतीचा जयघोष यासाठी करीत आहेत की त्यांना इतर अनेक प्रश्न उपस्थित करून आर्थिक प्रश्नांच्यावरचे लक्ष बाजूला करायचे आहे. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अशा अनेक क्रांत्या एकाच वेळी बोलून दाखविण्याचा हेतू फक्त आर्थिक प्रश्नांच्यावरील लक्ष विचलित करणे इतकाच असू शकतो. ही दिशा स्वीकारणाऱ्या मित्रांना आपण हे सांगितले पाहिजे की केवळ अर्थरचना बदलून इतर सर्व परिवर्तने क्रमाने होतील याची वाट कुणीच पाहत नसतो. सर्वांनाच संपूर्ण क्रांतीचा विचार करावा लागतो. इतर प्रश्नांचे उल्लेख आर्थिक प्रश्न डावलण्यासाठी नसतात, तर केवळ आर्थिक परिवर्तन इथे आम्ही थांबणार नाही हे सांगण्यासाठी असतात. हे सांगत असतानाच आर्थिक प्रश्नांना गौण लेखणाऱ्या सर्व मंडळींना ते मूलभूत आहेत आणि निकडीचे आहेत हेही सांगावे लागत असते. जनता पक्षाच्या सरकारने संपत्तीचा अधिकार हा व्यक्तीचा मूलभूत अधिकार नाही अशी भूमिका घेतली आहे. या भूमिकेचा अर्थ जनता पक्षातील तीनचतुर्थांश कार्यकर्त्यांना पुनःपुन्हा समजून देण्याची गरज आहे असे वाटते.

विवेचनाची दुसरी दिशा याहून निराळी आहे. काही मार्क्सवादी जुन्या कॉंग्रेस शासनाला नव्या जनता पक्षाच्या शासनापेक्षा तुलनेने पुरोगामी समजताना दिसतात. कॉंग्रेस राजवट तुलनेने पुरोगामी होती आणि जनता पक्षाची राजवट तुलनेने प्रतिगामी आहे, असे म्हणणाऱ्या मंडळींना कॉंग्रेस राजवटीत सधन शेतकऱ्यांचा एक नवा वर्ग पद्धतशीरपणे वाढविला गेला ही घटना पुरोगामी आहे असे म्हणायचे नसते. कॉंग्रेसच्या राजवटीत काही औद्योगिक घराणी अधिक संपत्तिमान झाली ही घटना पुरोगामी आहे असेही म्हणायचे नसते. त्यांना म्हणायचे असते ते हे की कॉंग्रेसचा औद्योगीकरणावर

भर होता ही गोष्ट पुरोगामी होती आणि काँग्रेस कामगारांना प्राधान्य देत होती ही गोष्ट पुरोगामी होती. जनता पक्ष ग्रामीण भागाला जास्त प्राधान्य देतो आहे, ही घटना प्रतिगामी आहे. ग्रामीण भागाला प्राधान्य असे म्हटले की, महाराष्ट्रातील दलित समाजातील विचारवंतांना एकदम साशंकता वाटू लागते. ग्रामीण भागाला प्राधान्य याचा अर्थ आज ग्रामीण भागात असलेल्या परंपरागत समाजरचनेला संरक्षण हा नसतो. उलट ग्रामीण भागाला प्राधान्य याचा अर्थ याच्या संपूर्ण विरोधी असतो हे सांगण्यावर आपण भर दिला पाहिजे. ग्रामीण भागाला प्राधान्य म्हणजे ग्रामीण भागात परंपरागत समाज-रचना जी टिकाव धरून बसलेली आहे ती उद्ध्वस्त करण्याला प्राधान्य आणि ग्रामीण भागात जे अफाट दारिद्र्य आहे तिथे नवा रोजगार निर्माण करून जीवनमान वाढविण्याला प्राधान्य. ग्रामीण भागात जो मनाचा मागसलेपणा आहे तो संपवण्याला प्राधान्य.

उद्योगीकरण या शब्दाचाही आपण एकदा फेरविचार केला पाहिजे. कारण उद्योगीकरणाने देशातील गरजेच्या उत्पादनवाढीच्या प्रक्रियेला हातभार लावला पाहिजे तर ते उद्योगीकरण पुरोगामी असते. जे दरिद्री आहेत ते दरिद्रीच राहतील. उलट उरलेल्यांचे काही उद्योग उद्ध्वस्त झाल्यामुळे ते नव्याने दरिद्री होतील आणि जनतेच्या गरजेचे उत्पादन फारसे न वाढता अवांतर उत्पादनच वाढेल ही काही मोठी पुरोगामी भूमिका म्हणता येणार नाही. आपल्या देशात बोलका वर्ग शहरातच फार आहे. तो कोणत्यातरी प्रकारचा कामगार आहे. या वर्गाच्या हितसंबंधाच्या विरुद्ध यापुढचे आर्थिक धोरण नेणे भाग आहे, त्याशिवाय कोट्यवधी दरिद्र्यांच्या प्रश्नांकडे वळता येणारच नाही आणि धोरण आपल्या विरोधी गेले की ते जनतेच्या कल्याणाचे आहे या मुद्द्याकडे दुर्लक्ष करून हे धोरण प्रतिगामी आहे, असा आक्रोश यापुढे वाढत जाणार आहे. म्हणून जे संघटित कामगारांच्या (यात सर्व प्रकारचा नोकरवर्ग आला.) विरोधी आहे पण जनतेच्या बाजूचे आहे ते धोरण प्रतिगामी नसते हे समजावून सांगण्यावर भर देणे आवश्यक आहे. तुलनेने पुरोगामी, तुलनेने प्रतिगामी या चर्चेतील व्यर्थपणा आपल्याला समजावून सांगता आला पाहिजे.

संपूर्ण क्रांतीचा कार्यक्रम सर्वांना स्वातंत्र्य व प्रतिष्ठा देणारा असल्यामुळे तो सत्तेची शक्ती वाढवून फार पुढे जाणार नाही, तर जनतेची शक्ती वाढवून पुढे रेटावा लागणार आहे. म्हणून या क्रांतीत हुकूमशाही गृहीत धरणाऱ्या क्रांतीप्रमाणे शासन हे एकमेव साधन नव्हे, ते फक्त एक महत्त्वाचे साधन आहे ही बाब सतत स्पष्ट केली पाहिजे. आपली अडचण अशी आहे की आपण फक्त मूठभर वरिष्ठ वर्गाला स्वातंत्र्य आवश्यक आहे असे गृहीत धरून बसतो आणि उरलेल्यांना फक्त गरजांची पूर्ती पुरेशी आहे असे मानतो. या भ्रमात अडकलेल्या मंडळींनी सुरक्षिततेच्या मोहात पडून प्रथम स्वातंत्र्य गमावले

आणि नंतर सुरक्षितता धोक्यात आली हा आक्रोशही करण्याची संधी त्यांना मिळू शकली नाही. स्वातंत्र्याची गरज ज्यांना काहीच मिळाले नाही त्या दरिद्र्यांना जास्त असते. संघर्ष करण्याचा अधिकार खरे म्हणजे त्यांनाच महत्त्वाचा असतो. प्रस्थापिताविरुद्ध संघर्ष करण्याचा अधिकार फक्त स्वातंत्र्यात शिल्लक असतो. संपूर्ण क्रांतीचा विचार करताना बाबू जयप्रकाश नारायण सतत स्वातंत्र्यवादी राहिले. या गोष्टीला वैचारिक दृष्टीने तर महत्त्व आहेच, पण व्यावहारिक दृष्टीनेही महत्त्व आहे.

तुलनेने कमी जमीन आणि अधिक लोकसंख्या असणारा आपला देश आहे. अफाट दारिद्र्य असणारा भाग नुसता असंघटितच नाही तर परंपरावादी आहे. आपल्याकडे विषमतेला इहलौकिक स्वार्थानेच समर्थन दिलेले नाही, तर परंपरागत धर्माचेही संरक्षण आहे. म्हणून जर या देशात स्वातंत्र्य संपले तर समतेच्या घोषणाच होत राहतील, व दरिद्र्यांच्या पदरात काहीच पडणार नाही. शहरात उद्योगीकरण वाढेल आणि ग्रामीण भाग तसाच राहील, याची धास्ती आहे. जनतेच्या स्वातंत्र्याच्या आग्रहाला एक व्यवहारवाद म्हणूनसुद्धा आपल्या राजकारणात महत्त्व आहे.

काँग्रेस पक्षाला आर्थिक आघाडीवर संपूर्णपणे अपयश आले अशी काहीजणांनी स्वतःच्या मनाची कल्पना करून घेतली आहे. आर्थिक आघाडीवर काँग्रेस पक्षाला खरोखरच अपयश आले काय ? या प्रश्नाचा एकदा आपण फेरविचारच केला पाहिजे. जनतेच्या दारिद्र्याचा प्रश्न हा काँग्रेसच्या राजकारणात जाहीर सभांमधून बोलण्याचा नित्यविषय होता. 'गरिबी हटाव' हे तर शेवटच्या कालखंडात काँग्रेस पक्षाचे ब्रीदवाक्यच बनलेले होते. पण प्रत्यक्षात मात्र काँग्रेस राजवटीत आपल्याला देशाचे चित्र निराळे दिसू लागते. काँग्रेसच्या प्रदीर्घ राजवटीकडे आपण पाहू लागलो म्हणजे प्रथमतः लक्षात येत असेल तर हे की या राजवटीत बेकारी सतत वाढत राहिली. अशिक्षित आणि अकुशल समाजात बेकारी होतीच. लोकसंख्येच्या वाढीबरोबर त्या बेकारांचीही संख्या वाढली. पण त्याबरोबर शिक्षणाची वाढ आणि सुशिक्षितांच्या बेकारीची वाढ हीदेखील मोठ्या प्रमाणात झाली. काँग्रेस राजवटीत सुशिक्षितांची बेकारी व एकूण जनतेची बेकारी वाढत गेली हे खरे आहे. ज्या कालखंडात बेकारी वाढत असते त्या कालखंडात सर्वसामान्य जनतेचे जीवनमान घसरत जाणार हे उघड आहे. त्यामुळे बेकारी वाढली त्याबरोबर दारिद्र्यही वाढत गेले हेही नाकारता येणार नाही. काँग्रेस स्वतःला समाजवादाची पुरस्कर्ती मानत आली, पण तिच्या कारकीर्दीत उद्योगपतींच्याजवळ असणारा पैसाही वाढत गेला. आणि राष्ट्रीयीकरण ज्या क्षेत्रात झाले ते राष्ट्रीयीकरण दुहेरी अपयशी ठरले. राष्ट्रीयीकरणाने खाजगी मालमत्तेवर वाढते नियंत्रण आणायला पाहिजे. आमचे राष्ट्रीयीकरण खाजगी क्षेत्राला उपकारकच ठरत गेले. शिवाय राष्ट्रीयीकरण उत्पादनवाढीला साह्यकारी झाले पाहिजे. आमचे राष्ट्रीयीकरण उत्पादनवाढीला अडथळा करणारे ठरले. या सर्व बाबी खऱ्या

आहेत. या बाबी डोळ्यांसमोर ठेवूनच काँग्रेस पक्षाला आर्थिक आघाडीवर संपूर्णपणे अपयश आले असे काहीजण म्हणतात. मला स्वतःला वरील आक्षेपांतील एकही आक्षेप खोटा वाटत नाही. पण हे सर्व आक्षेप खरे गृहीत धरले तरीही त्याचा अर्थ आर्थिक आघाडीवर काँग्रेसला अपयश आले असा होत नाही. जाहीर सभेतील व्याख्यानांच्या आधारे हेतूंचा शोध घेणे पुरेसे ठरत नाही. वर्षानुवर्षे चालू असणारा व्यवहार लक्षात घेऊनच हेतूबाबतचे अनुमान करावे लागते. लोकशाहीत लोकांना मते मागायची असल्यामुळे अपरिहार्यपणे जाहीर सभेतील भाषणात काही दंभ समाविष्ट होतोच. बंधूंनो, तुम्ही आम्हाला मते द्या आणि आजच नव्हे तर येती पाच-पंचवीस वर्षे आम्हाला मते द्या, कारण आम्ही तुम्हाला दरिद्रीच ठेवणार आहोत, असे कोणत्याही पक्षाला जाहीर रीतीने सांगता येणे शक्य नसते. यामुळे जाहीर सभेत असणाऱ्या व्याख्यानांच्या आधारे हेतूविषयी बनवलेली मते आपल्याला धोका देण्याचा संभव असतो.

काँग्रेस पक्षातील मनातील हेतूंचा विचार करताना तीन घटक सतत नजरेसमोर ठेवावे लागतात. स्वातंत्र्यपूर्व काळात या देशातील उद्योगपती मोठ्या प्रमाणात काँग्रेसचे साहाय्यकर्ते राहिले. या उद्योगपतींचा एक नेहमीचाच मुद्दा असा की गरजा वाढवत नेणे आणि त्याला अनुसरून उत्पादन वाढवत नेणे आणि उत्पादन वाढवण्यासाठी उद्योगीकरण वाढवत नेणे, ही बाब या देशात अत्यंत महत्त्वाची आहे. वाढत्या उद्योगीकरणाबरोबर या देशाचे आधुनिकीकरणही होईल आणि वाढत्या उत्पादनामुळे जीवनमान वाढून दारिद्र्यही दूर होईल असे या उद्योगपतींना वाटत होते. म्हणूना वाढते उद्योगीकरण हा त्यांचा ध्यास होता. जवाहरलाल नेहरूंच्यासारखे समाजवादी हा परिस्थितीवर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक होता. पंडित नेहरूंना आधुनिकीकरण आणि उद्योगीकरण यांचा ध्यास होता. स्वतः पंडित नेहरू समाजवादी होते. पण त्यांच्या डोळ्यांसमोरील समाजवाद क्रमाक्रमाने येणारा, अर्थरचनेचे स्वरूप नियोजनावर आधालेल्या नियोजित अर्थरचनेचे असावे, राष्ट्रीय क्षेत्राची व्याप्ती सतत चढती वाढती ठेवावी आणि उद्योगीकरण वाढवत न्यावे असे पंडित नेहरूंना वाटे. कारण त्यांना असे वाटे की, जर सार्वजनिक क्षेत्र वाढले, नियोजन सर्वगामी झाले तर लोकशाहीची चौकट न मोडता क्रमाक्रमाने आपण समाजवादाकडे नक्की जाऊ. मार्क्सवादी क्रमवादी नसतात, पण नेहरू आग्रहाने क्रमवादी होते; कारण ते मुख्यत्वेकरून फेबियन समाजवादी होते. अजून एक तिसरा घटक आपण विचारात घेतला पाहिजे. आपण कैक शतके गुलामगिरीत राहिलो; फारा दिवसांनी आपण स्वतंत्र होतो आहोत. आपल्या प्रदीर्घ गुलामगिरीची कारणे कोणती ? प्रथम म्हणजे फुटीरपणा व विस्कळीतपणा आणि दुसरे म्हणजे भौतिक प्रगतीच्या दृष्टीने असणारे मागासलेपण. म्हणून हा गट असे मानत असे की स्वातंत्र्य बलवान करणे आणि राष्ट्र बलवान करणे यासाठी उद्योगीकरण आवश्यक आहे. काँग्रेसने केलेल्या उद्योगीकरणाचे लाभ या देशाला निश्चितच झालेले आहेत. रेडिओ आणि रेल्वे, मोटारी

आणि सडका, लोखंड आणि पेट्रोल, किंबहुना धरणे, खत कारखाने, शस्त्रास्त्रांचे कारखाने या साऱ्यांवर काँग्रेसचा भर होता. या सगळ्या उद्योगीकरणाच्या धोरणातून आपले काही प्रमाणात आधुनिकीकरण झाले आहे. राष्ट्राला अभिमानास्पद असे काही लष्करी जय झालेले आहेत व भारत सहजासहजी उठाव करून आतल्या अगर बाहेरच्या सत्तेला ताब्यात घेता येणे कठीण झाले आहे. राष्ट्र म्हणून एकात्मता व बळकटी या साऱ्यांच्यामुळे वाढलेली आहे. काँग्रेसची राजवट संपली तरी त्या राजवटीने जे काही अस्तित्वात आणले त्याचे लाभ याहीपुढे पिढ्यान्‌पिढ्या होणार आहेत.

काँग्रेस राजवटीत भ्रष्टाचार भरपूर होता, उधळपट्टीही होती, चुकीची दिशा घेणेही होते. हे सगळे असले तरी भारतातील अन्नधान्याचे उत्पादन त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात तिप्पट करून दाखवले आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. हिंदुस्थानात खाण्यापिण्याची चंगळ अशी अलीकडच्या काळात कधी नव्हतीच, पण उपाशी लोक असंतोषाने पेटून उठले व त्या क्षोभापुढे राज्य कोसळून पडले ही घटना या देशात घडली नाही. राज्य उलथून पडेल इतका क्षोभ माजू न देता राज्य सुरक्षित राहील, याची काळजी घेऊन लोक कुरकुरतील पण बंड करणार नाहीत, एवढे भान ठेवून उद्योगीकरण वाढवत न्यावे, देश आधुनिक करावा, लष्करी दृष्टीने बळकट करावा आणि प्रस्थापिताच्या हितसंबंधाला फारसा धक्का न लावता अर्थरचनेवर शासनाची पकड बळकट करत न्यावी, हे काँग्रेस राजवटीचे मनातले हेतू होते. जे हेतू जाहीर सभेत बोलून दाखवले जात होते त्या संदर्भात काँग्रेस अयशस्वी ठरणारच; कारण ते हेतू मनातच नव्हते. पण शासनकर्त्यांच्या मनात जे हेतू होते ते विचारात घेतले तर काँग्रेसला बहुअंशी यशच मिळाले आहे, अपयश मिळालेले नाही, याची नोंद आपण घेतली पाहिजे.

ही नोंद घेण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. कार्यक्रम कितीही चांगला असो, माणसे चांगली नसतील तर कार्यक्रमाचा विचका होतो, अशी एक सार्वत्रिक समजूत आहे. ही समजूत फारशी खरी नाही इतकेच मला म्हणायचे आहे. माणसे प्रामाणिक आणि चांगली असली पाहिजेत या मुद्द्यावर मतभेद ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. व्यक्ती हा घटक नेहमी महत्त्वाचा असतोच, पण पहिली अडचण अशी आहे की सर्व शासनव्यवहार व्यवस्थितपणे चालवता यावा इतकी चांगली माणसे आपण आणणार कोठून? कारण हा सगळी शासनयंत्रणा चांगल्या माणसांनी भरण्याचा प्रश्न आहे आणि नुसती शासनातील माणसेच चांगली असणे पुरेसे ठरणार नाही. त्यांना सहकार्य करण्यासाठी उरलेले लोकही चांगले असावे लागतात. इतकी चांगली माणसे समाजामध्ये सर्व प्रकारचे भ्रष्ट व दरिद्री वातावरण असताना निर्माण होणार नाहीत. आणि समजा, ही सर्व चांगली माणसे उपलब्धही जरी झाली तरी कार्यक्रम जर वाईट असेल तर वाईट कार्यक्रम निष्ठेने राबविणे यापेक्षा ही चांगली माणसे अधिक काही करू शकणार नाहीत.

व्यक्तींचे चरित्र आणि चारित्र्य महत्त्वाचे असतेच, पण अर्थव्यवस्थेला एक वस्तुनिष्ठता असते, त्यामुळे हा प्रश्न चारित्र्यवान माणसे निर्माण करण्याचा नाही. काही चारित्र्यवान माणसे कोणत्याही वेळी निर्माण होतातच, पण मोठ्या प्रमाणात चारित्र्यवान माणसांची निर्मिती किमान जीवन उपलब्ध करून दिल्याविना शक्य नसते. एक गट असे मानतो की देशापुढील खरा प्रश्नच आर्थिक नसून चारित्र्यवान माणसे निर्माण करण्याचा आहे. हा गट जाणता अगर अजाणता आर्थिक प्रश्न सोडवण्याच्या कल्पनेला दुय्यम आणि गौण स्थान देण्याच्या प्रयत्नात असतो. म्हणून हे आवर्जून स्पष्ट केले पाहिजे की काँग्रेस पक्षाचे अपयश माणसे वाईट असल्यामुळे निर्माण झालेले अपयश नव्हे.

काँग्रेस राजवटीच्या दीर्घ कालखंडात जे संपत्तिमान उद्योगपती होते त्यांच्याजवळचा धनसंचय कमी झाला नाही, तर वाढला. संघटित असणारा व दडपण आणू शकणारा वर्ग तुलनेने आपल्या प्रश्नांना काहीतरी सूत्र ठेवू शकला. त्यांची दडपण आणण्याची शक्ती जितकी जास्त होती तितके ते फायद्यात राहिले; पण असंघटित असणारा जो ग्रामीण भाग याचे दारिद्र्य जवळपास जसेच्या तसे राहिले. ही घटना उगीचच घडलेली नाही किंवा वाईट माणसांनीही घडवलेली नाही. काँग्रेस ज्या पद्धतीने आर्थिक धोरण आखत होती त्या पद्धतीचा हा अपरिहार्य परिणाम होता. राज्यकर्त्यांनी कळत नकळत दोन भूमिका डोळ्यांसमोर ठेवलेल्या होत्या. एक तर त्यांच्यासमोर राष्ट्र बलवान करण्याचा आणि औद्योगिक पायाभरणीचा प्रश्न होता. दुसरे म्हणजे ही मंडळी झिरपण्याच्या सिद्धान्ताचा स्वीकार करीत होती. उत्पादनच वाढत राहिले तर मग हे वाढलेले उत्पादन क्रमाक्रमाने जीवनमान वाढवीलच. शिवाय आपण विकासाचे कार्यक्रम हाती घेतो आहोत याच्या परिणामी सर्वांचे जीवनमान हळूहळू वाढेलच आणि सर्वांचेच वाढणार असल्यामुळे ग्रामीण जनतेचेही वाढेल. उत्पादनवाढीच्या प्रक्रियेबरोबर जीवनमानातील वाढ क्रमाने झिरपत जाईल, असा हा अंदाज आहे. जे अफाट दारिद्र्य पसरलेले दिसते तो आर्थिक धोरणांचा परिपाक आहे. माणसे चांगली—वाईट असण्याचा परिणाम याबाबत फार थोडा आहे.

संपूर्ण क्रांतीचा विचार करीत असताना ही क्रांती सफल झाल्यानंतर माणसे किती सुखी होतील या विषयीची स्वप्ने रंगविणे यात मला फारसा अर्थ दिसत नाही. खरा प्रश्न संपूर्ण क्रांती ही एकाएकी घडणारी गोष्ट नसून दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे हे ओळखण्याचा आहे. या दीर्घकाळ चालणाऱ्या प्रक्रियेचा जेव्हा पुरेसा विकास होईल त्या वेळी काय घडेल हा मुद्दा आपण स्वप्ने पाहणाऱ्यांच्यासाठी राखून ठेवावा व या क्रांतीचा आरंभ व्हावा म्हणून आपण पावले कोणती टाकणार आहोत. या आरंभीच्या पावलांचा विचार करावा. हेच जास्त सुज्ञपणाचे आहे. आधुनिक काळात आपल्या राजकीय जागृतीला जेव्हापासून आरंभ झाला तेव्हापासून एक प्रश्न आमचे नेते सतत मांडीत

आले. तो प्रश्न असा आहे की, या देशाची मुख्य समस्या अफाट पसरलेले जनतेचे दारिद्रय आणि त्यातही विशेषत: ग्रामीण भागात पसरलेले दारिद्रय ही आहे. इ. स. १८७०-७१ साली हाच प्रश्न होता. गांधीजींनी याच प्रश्नाकडे आग्रहाने लक्ष वेधलेले होते. आजही आपल्यासमोर हाच प्रश्न आहे. भारताच्या ग्रामीण भागात पसरलेले अफाट दारिद्रय हा आपल्यासमोर असणारा पहिला प्रश्न आहे. एक तर हा तीन-चतुर्थांश जनतेचा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे हा ग्रामीण दारिद्रयाचा प्रश्न उग्र असल्या-मुळे खेड्यातून शहराकडे येणारी रीघ वाढते आणि शहरात गर्दी व बेकारीच्या नव्या समस्या निर्माण होतात. या ग्रामीण जनतेच्या दारिद्रयाला आपण कोणत्या प्रकारे उत्तर देणार आहोत ? हा माझ्या मते समग्र क्रांतीच्या प्रक्रियेतील पहिले पाऊल टाकण्याचा प्रश्न आहे.

या समस्येकडे वेगवेगळ्या दिशेने पाहता येईल. शेतीत असणारी लोकसंख्या ही फार जास्त आहे. तिला शेतीतून काढून नव्या उद्योगांच्याकडे वळवायला पाहिजे ही एक दिशा आहे. या ठिकाणी नवे उद्योग म्हणताना शहरातील यंत्रोद्योग अभिप्रेत आहेत. वाढते उद्योगीकरण शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी करीत नेईल. यामुळे एकीकडे उत्पादनवाढ होईल आणि दुसरीकडे ग्रामीण भागात जीवनमानात वाढ होईल. ही सगळी दिशा पूर्णपणे फसलेली आहे. दरसाल लोकसंख्येत जी वाढ होते त्याच्या एक-चतुर्थांशसुद्धा उद्योगीकरणातील कामगारसंख्येत वाढ होत नाही, म्हणून प्रश्न ग्रामीण भागातच अल्पभांडवली नवे उद्योग उभारण्याचा आहे. शेतीला जोडधंदा मिळवून देण्याचा आहे. ग्रामीण भागात नवा रोजगार मिळवून देणारे औद्योगिक धोरण हा या क्रांतीचा नगण्य असा प्रारंभ म्हटला तरी तो अपरिहार्यपणे स्वीकारावा लागणारा पर्याय आहे. यामुळे ग्रामीण भागात उद्योगधंदे व त्या उद्योगात जे निर्माण होईल ते इतरत्र निर्माण करण्यास मनाई असा दुहेरी कार्यक्रम आखावा लागेल.

हा कार्यक्रम निश्चितपणे गांधीवादी कार्यक्रम आहे असे म्हणता येणार नाही. हा ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम आहे. पण ग्रामस्वावलंबनाचा कार्यक्रम नाही. वीज आणि यंत्र या दोहोंचा येथे स्वीकार आहे आणि जोडीला अधिक तपशीलवारपणे आखावे लागलेले राष्ट्रीय नियोजन आहे. यापुढे मोठ्या शहरांच्या अधिक वाढीला कायदेशीर मनाई आणि शेतीला जोड असणाऱ्या उद्योगधंद्याला प्राधान्य या दोहोंचाही विचार आपणाला करावा लागणार आहे. हे समग्र क्रांतीचे पाऊल म्हणजे अगदी पहिले पाऊल टाकतानासुद्धा काही द्वंद्वे आपणासमोर उभी आहेत त्यांचाही विचार केला पाहिजे.

यापैकी एक द्वंद्व उद्योगीकरणाच्या भूमिकेशी निगडित आहे. या देशातील शेतीच्या पुनर्रचनेचा प्रश्नसुद्धा उद्योगीकरणाशी जोडलेलाच आहे. राष्ट्र म्हणून जगण्याची किमान

क्षमताही उद्योगीकरणाशी निगडित आहे. राष्ट्रीय सामर्थ्य आणि संरक्षण व्यवस्था दुबळी होऊ न देता, किमान व आवश्यक अशा उद्योगीकरणाचा आग्रह शिथिल होऊ न देता ग्रामीण भागात अधिकाधिक रोजगार निर्माण करणारे धोरण व्यवहारात आखावे कसे ? हे पहिले द्वंद्व आहे. जर ग्रामीण भागात नवा रोजगार निर्माण करण्याच्या बाजूकडे दुर्लक्ष झाले तर उद्योगीकरणातून संपत्तीचे केंद्रीकरण आणि जनतेच्या दारिद्र्यात वाढ इतकेच फलित हाती येत असते. आणि उद्योगीकरणाकडे दुर्लक्ष करणारे देश जीवनमान वाढवू शकत नसल्यामुळे दारिद्र्य दूर करण्याचा प्रश्न सफलपणे हाताळण्यात विफल ठरत असतात. म्हणून प्रश्न यंत्रवाद की ग्रामवाद ? असा नसून ग्रामीण पुनर्रचनेसह उद्योगीकरण असा आहे. आणि हा गुंता सोप्या उत्तराने सुटणार नाही.

दुसरे द्वंद्व आमच्या शिक्षणाचे आहे. शिक्षणाचा विकास हा परंपरावादातून मानवी मन मोकळे करण्यासाठी तर आवश्यक आहेच, पण जबाबदार नागरिक घडवण्यासाठीही आवश्यक आहे. जर हे शिक्षण उत्पादन व्यवस्थेशी जोडले नाही तर शिक्षणाच्या विकासातून फक्त सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत असते. त्यातून नवा असंतोष निर्माण होतो. शिक्षण जर उत्पादन व्यवस्थेशी जोडावयाचे असेल तर जीवनाच्या सर्वांगीण नियोजनाच्या भूमिकेचा स्वीकार करावा लागतो. शुद्ध ज्ञानविकास, साक्षात उपयोगिता नसणाऱ्या पण माणसांना सुसंस्कृत करणाऱ्या शास्त्रांचा विकास आणि नवे संशोधन या बाबी धोक्यात न आणता केंद्रीकरण फारसे वाढू न देता उत्पादन व्यवस्थेशी शिक्षण जोडावे कसे ? हा एक प्रश्नच आहे. आणि या शिक्षणात सुसंस्कृत मन निर्माण करण्याची प्रक्रिया दुर्लक्षित न करता उपयोगी माणूस तयार कसा करावा ? हाही एक प्रश्नच आहे. तिसरे द्वंद्व संघटित समूह आणि सर्वसामान्य जनता यांच्यातील विरोधाचे आहे. संघटित समूह म्हणताना माझ्यासमोर केवळ औद्योगिक कामगार नाहीत. औद्योगिक कामगार हाही एक संघटित समूह आहेच. पण त्याखेरीज तंत्रज्ञ हाही एकसंघटित समूह आहे. पगारदार नोकरवर्ग हाही एक संघटित समूह आहे. भांडवलदार वर्ग कमी संघटित नसतो. समाजातील हे सर्व संघटित गट आपले हक्क आणि सोयी यांत सतत वाढ करीत असतात. त्यासाठी शासनावर दडपण आणीत असतात. पगारवाढ, महागाई भत्ता वाढ, राहण्याला घरे, नियंत्रित दराने अन्नधान्य, रजा, पेन्शन इथपासून ते अप्रत्यक्ष करात वाढ आणि प्रत्यक्ष करातून सूट मिळवण्याचे विविध उद्योग हे संघटित समूह करीत असतात. या संघटित समूहांच्यापैकी भांडवलदारवर्ग अप्रत्यक्ष कराच्या वाढीला फारसा विरोधी कधीही नसतो. तो फक्त प्रत्यक्ष करवाढीवर नाखुश असतो. प्रत्यक्ष करवाढ करायची तर उद्योगीकरणाच्या विकासाच्या जबाबदाऱ्या शासनाने स्वीकारल्या पाहिजेत. कारण प्रत्यक्ष कर वाढत असताना फारसे उद्योगीकरण उद्योगपती करीत नसतात. अप्रत्यक्ष कर कितीही वाढवले तरी भांडवलशाहीची कंबर मोडता येत नाही. प्रत्यक्ष करवाढ करून एकीकडे भांडवलशाहीच्या विकासावर अंकुश ठेवायचा तर

दुसरीकडे सार्वजनिक क्षेत्र वाढवून सत्तेचा सर्वंकष प्रभाव वाढविण्याचे धोरण ठेवावे लागते. संघटित कामगार व नोकरवर्ग यांची शक्ती वाढत गेली तर जनतेच्या पदरात काहीच पडत नाही. आणि जर ही शक्ती मोडली तर शासनावर अंकुश ठेवायलाच कोणी उरत नाही. मग हुकूमशाहीची वाढ अपरिहार्य असते. आणि हुकूमशाहीत जनतेच्या दारिद्र्याला उत्तर मिळेलच ही हमी कोण देणार ?

समग्र क्रांतीची पहिली पहिली पावले टाकायची असे म्हटले तरी ती फार काळजीपूर्वक टाकावी लागतील. एकूण देशाच्या उत्पादनात व एकूण देशाच्या सामर्थ्यात वाढ हा विचार महत्त्वाचा आहेच, पण तो काही काळ दुय्यम समजून ग्रामीण भागात रोजंदारीची वाढ आणि चाळीस टक्के लोकसमूह दारिद्र्यरेषेखाली आहे या दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येच्या टक्केवारीत घट असा विचार जर आपण करू शकलो तरच क्रांतीच्या दिशेने पहिले पाऊल आपल्याला टाकता येईल. अर्थव्यवस्थेतील बदलाशिवाय क्रांतीला पाया नाही आणि हा अर्थव्यवस्थेतील बदल दरिद्र्यांचा जो सर्वात खालचा तळ त्यांना काही नवे जीवनमान उपलब्ध करून देत नसेल तर त्या क्रांतीला काही अर्थ नाही. ही दोन सूत्रे आपण समोर ठेवली तर जनता पक्ष क्रांतीच्या दिशेने काही प्रामाणिक कार्य करत आहे काय ? याचे उत्तर दक्षणी आपण देऊ शकू.

क्रांतीचे हे पहिले पाऊल जर आपल्याला टाकता आले तर मग फुरसतीने आपण चरित्र, चारित्र्य आणि राष्ट्रवाद, नीती, संस्कृती आणि मानवता या सगळ्या भोळ्या, भगव्या प्रश्नांची अखंड चर्चा बिनधास्त मनाने करण्याइतके सुदैवी ठरू.

# आणीबाणी आणि साहित्यिक

: १ :

आणीबाणीच्या काळात मराठी साहित्यिकांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी फारसे काही केले नाही, ही गोष्ट बिनतक्रार प्रथम कबूल केली पाहिजे, पण ती एकदा कबूल केली म्हणजे थोडेफार ज्यांनी काही केले आहे त्यांना श्रेय द्यायला हरकत नाही असे आपल्याला वाटू लागेल. श्रीमती दुर्गाबाई भागवत या शासनाचा निषेध करण्याच्या मुद्द्यावर अग्रभागी होत्या; त्यामुळे जवळजवळ एकाकीपणे त्या लढत होत्या. त्यांच्याविषयीची कृतज्ञता सर्वांनीच व्यक्त केलेली आहे.

पण दुर्गाबाईंच्याखेरीज इतरही अनेक मंडळी होती. आपापल्या वकुबानिशी ही माणसे काम करीत होतीच. आणीबाणीच्या काळात पु. ल. देशपांडे अनेकदा एक गोष्ट सांगत : जाहीर सभांमधून आणि आपल्या व्याख्यानांमधून त्यांनी ही गोष्ट आणीबाणीत अनेकदा सांगितलेली आहे. ते म्हणत, आपल्या सत्तेची झिंग चढलेला हिरण्यकश्यपू सत्तेच्या कैफात जेव्हा माज चढल्यासारखा वागू लागला त्या वेळी प्रल्हादाला 'नारायण नारायण' म्हणण्याचा हक्क नाकारण्यात आला. प्रल्हादाचा छळही झाला. पण शेवटी नारायण कुणाला म्हणायचे हा प्रल्हादाचा हक्क जेव्हा सततच नाकारला जाऊ लागला, त्या वेळी स्थिरपणे उभे असणारे खांबही एकदम तडकले व त्यातील नरसिंहशक्तीने हिरण्यकश्यपूचे आतडे बाहेर काढले ! सत्ताधारी नवे असोत की जुने, लोकांची तोंडे बंद करण्याचा उद्योग जर त्यांनी थांबवला नाही, तर त्यांचा हिरण्यकश्यपू होतो. पु. ल. देशपांडे यांची ही गोष्ट म्हणजे शासनाचे अभिनंदन नव्हते; पण ते ती सांगत असत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही वारंवार शासनाचा निषेध त्या काळात नोंदवलेला आहे. वसंत बापट, मंगेश पाडगावकर यांच्यासारख्या कवींनी आपल्या कवितांमधून निषेध नोंदवला होता. लीलाधर हेगडे तर शासनाविरुद्ध 'साधने'तून लिहितच होते. ही नावे सहज आठवणारी म्हणून लिहिली. त्यामुळे आणीबाणीच्या काळात कुणीच काही करत नव्हते असे मानण्याचे कारण नाही.

राम शेवाळकरांसारखे काही लेखक आणीबाणी आता गरज संपल्यामुळे उठवण्यात यावी

अशी मागणी राष्ट्रपतींकडे करीत होते. शेवाळकरांच्या पत्रकावर सुमारे दीडशे साहित्यिकांनी सह्या दिलेल्या आहेत. ग. वा. बेहरे यांच्यासारखे काही संपादक असलेल्या परिस्थितीतून मार्ग काढून शासनाविरुद्ध जितके लिहिता येईल तितके लिहितच होते. कऱ्हाडच्या संमेलनात भाऊसाहेब खांडेकरांनी सर्व भारतीय राष्ट्राला असणारे एकमेव आशास्थान जयप्रकाश यांना ईश्वराने आपले उरलेले सर्व आयुष्य द्यावे अशी प्रार्थना केली होती.

हे जे शासनाविरुद्ध आवाज उठविणे चालू होते ते पुरेसे नव्हते हे तर खरेच; पण शासनाने निदान शाब्दिक दखल घ्यावी इतकेही वजन या निषेधाला प्राप्त झाले नव्हते. केन्द्र शासनाने सुचवले नसते तर कदाचित दुर्गा भागवतांनाही अटक झाली नसती. साहित्यिक करीत असलेल्या निषेधाकडे दुर्लक्ष करायचे असे दोन कारणांमुळे त्या वेळच्या महाराष्ट्र शासनाने ठरवलेले होते. एक तर, या साहित्यिकांना जनतेत फारसे वजन नाही, तेव्हा त्यांना भिण्याचे कारण नाही असे शासनाला वाटे. दुसरे म्हणजे, साहित्यिकांनी जर लेखनावरील बंदीबाबत थोडी कुरकुर केली तर तिला वाव द्यायला हरकत नाही असेही त्या वेळेच्या शासनाला वाटे. हे सर्व जरी खरे मानले तरी काही ना काही निषेध चालूच असे हेही खरे आहे.

व्यक्तिशः माझ्यापुरते सांगायचे तर मी पोलिसांनी सभा बेकायदा आहे असा इशारा दिल्यानंतरसुद्धा २ ऑक्टोबर १९७५ ला शासनाची परवानगी न घेता महात्मा गांधींच्यावर व्याख्यान दिलेच होते. त्या व्याख्यानात वर्तमान राजकारणाचे संबंधही अनेक ठिकाणी आले होते. या भाषणाबद्दल अटक होण्याचा संभव आहे हे मला कळवले गेलेच होते, पण तो धोका पत्करून मी बोललो होतो. आणीबाणीच्या काळात सर्व महाराष्ट्रभर मी ‘ इसापनीती ’ या विषयावर व्याख्याने देत हिंडत होतो आणि हे ‘ इसापनीती ’ नावाचे व्याख्यान इसापच्या नावावर दिलेले शासनविरोधी राजकीय व्याख्यानच होते. त्याही काळात आमची अभ्यासशिबिरे चालू होती. गटसभांच्यामधून आणीबाणीविरोधी प्रचारही चालू होता. ‘ प्रगति-दशक ’ या नावाचा एक कार्यक्रम त्या वेळी महाराष्ट्र शासन घेत असे, त्या प्रगति-दशकाची चेष्टा करणे, वीस कलमी कार्यक्रमाची चेष्टा करणे हेही व्याख्यानातून चालू असे. आणीबाणीच्या काळात माझा एक हुकमी विषय ‘ अपक्ष व्यासपीठ ’ या नावाचा असे. जरी विषयाचे नाव अपक्ष व्यासपीठ असले तरी विवेचनातील मांडणी सगळी शासनाविरोधीच असे. वीस कलमी कार्यक्रमाचे वर्णन करताना “ कलम पहिले—पुढील एकोणीस कलमांची अमलबजावणी केल्यास गरिबी दूर होईल. कलम विसावे—वरील एकोणीस कलमांची अमलबजावणी झाल्यास गरिबी निश्चित दूर होईल. मधली अठरा कलमे आणीबाणी चालू असेपावेतो जनहितासाठी जनतेला सांगता येणे शक्य नाहीत, म्हणून कुणीच त्यांची अमलबजावणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे शासनाला वाटत असावे.” या पद्धतीने मी अनेकदा बोलत असे.

इंदूर येथे भरलेल्या मध्यभारत मराठी साहित्य सभेच्या हीरक महोत्सवाच्या अध्यक्ष-पदावरून बोलताना मी हे अतिशय तपशिलाने सांगितले होते की, विरोधी बोलण्याचे स्वातंत्र्य संपल्यामुळे शासनाची सर्व विश्वसनीयता संपलेली आहे व म्हणून तुम्ही जे काही सांगता त्यावर माझा विश्वास नाही. कुणाचाही विश्वास नाही, म्हणून काही चांगले घडते आहे यावरही आमचा विश्वास नाही. हे सगळे आणीबाणीत मी बोलत होतो असे सांगणे म्हणजे फारसा मोठा पुरुषार्थ नव्हे, याची मला जाणीव आहे. हे सारे आम्ही मोठ्या शौर्याने लढत होतो हे सांगण्यासाठी म्हणून मी नोंदवलेले नाही; पण आमच्याजवळ फार मोठा पराक्रम नसला तरी निदान आम्ही शासनाचे स्तुतिपाठक नव्हतो, आमचे विव्हळणे चालू होते, इतके तरी म्हणता येईल. त्या कालखंडात मी ‘ साधने ’तून जे लिखाण केले आहे, त्या माझ्या लिखाणाचे वर्णनही या विव्हळण्यात येऊन गेले असे म्हटले पाहिजे.

आणीबाणीच्या काळात मराठी साहित्यिक इतके केविलवाणे का वागले, हा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. त्याचे सरधोपट एकच एक उत्तर देता येणार नाही. यासाठी वेगवेगळी कारणे आपण विचारात घेतली पाहिजेत. त्या सर्वांचाच थोडा थोडा परिणाम झालेला आहे. एक तर या प्रतिकारशून्यतेचे कारण काँग्रेस शासनाचे सामर्थ्य आणि-चातुर्य यात आहे. महाराष्ट्रातच म्हणून नव्हे तर भारतातच कुठेही साहित्यिक शासना विरुद्ध फार मोठ्या जिद्दीने उभे राहिलेले दिसत नाहीत. एक तर, काँग्रेस हा संपूर्ण देशभर अस्ताव्यस्त पसरलेला विशाल पक्ष होता. त्यामुळे स्वतःला ‘काँग्रेसमन’ म्हणवून घेणारे साहित्यिक सर्वत्र होते. त्यांचा आणीबाणीला पाठिंबाच होता. दुसरे म्हणजे, कम्युनिस्ट साहित्यिक भरपूर होते. त्यांचाही आणीबाणीला पाठिंबा होता. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाने आणीबाणीला पाठिंबा दिल्यामुळे दलित साहित्यिकांचाही आणीबाणीला पाठिंबा होता. साहित्यिकांचा एक महत्त्वपूर्ण गट आणीबाणीला पाठिंबा देत जिकडेतिकडे वावरत होता. काँग्रेसने अतिशय चतुरपणे ही भूमिका घेतलेली होती की आम्ही लोकशाहीवादीच आहोत. आमचा लोकशाहीवर दृढ विश्वास आहे. पण जनतेने निवडून दिलेली सरकारे व लोकप्रतिनिधींच्या विधानसभा यांना कामच करू द्यायचे नाही असे विरोधकांनी ठरविल्यामुळे नाइलाजाने आणीबाणी आणावी लागली. ती अतिशय थोड्या वेळेपुरती आहे. यामुळे आणीबाणीचे पहिले काही महिने तर या समजुतीत गेले की निवडणुका आठ महिन्यांवर आहेत. त्यापूर्वी महिना-दोन महिने आधी आणीबाणी संपणार व तुरुंगातील लोक बाहेर येणार. चार-दोन महिने शांतता लाभली तर बिघडले कुठे ? प्रतिकारसुद्धा करावा वाटू नये असे हे वातावरण होते. प्रतिकार करण्याजोगे काही घडलेच नाही, असेच जर साहित्यिकांना वाटत असेल तर मग ते प्रतिकार काय करणार ? आणि अशा अवस्थेत प्रतिकार घडलाच नाही, त्याला आश्चर्य काय म्हणून मानणार ? काहीतरी गंभीर घडले आहे, हे जाणवायलाच सहा

महिने जावे लागले! ते जाणवले तेव्हा प्रतिकाराची शक्यता संपलेली होती. प्रतिकार-शून्यतेचा एक घटक हा आहे.

दुसरा एक घटक आहे. तोही आपण विचारात घ्यायला हवा. स्वातंत्र्योत्तर काळात क्रमाने शासनाने सर्वांना साह्य देण्यास आरंभ केला. या साह्यामुळे सर्वांचेच शासनाचे अवलंबित्व वाढलेले होते. कागदाचा कोटा, शासकीय जाहिराती, शासनाची अनुदाने, शासनाकडून मिळणारी पारितोषिके, मानधन असे हे अनंत प्रकार आहेत. हे सारे हितसंबंध प्रतिकाराची इच्छा नष्ट करीत होते हे खरेच आहे; पण त्यापेक्षा अजून दोन महत्त्वाच्या बाबी खऱ्या आहेत. पहिली बाब म्हणजे, ललित लेखकांना आणीबाणीचा फारसा उपसर्ग नव्हता. भाषाशास्त्र, व्याकरण, इतिहास, तत्त्वज्ञान यालाही फारसा उपसर्ग नव्हता. म्हणून तो लेखक जे लिहीत आला त्याला उपसर्ग नव्हता. आज तो जे लिहीत होता त्याला उपसर्ग नव्हता. फक्त राजकारणावर विरोधी बोलणे शासनाने बंद पाडलेले होते. शेकडो-हजारो लेखक असे होते की त्यांना मोकळीक असतानाही त्यांनी राजकारणावर काही लिहिलेले नव्हते. बंदी असताना राजकारणावर लिहिल्या-वाचून काही अडणार नव्हते. या मंडळींना आपण प्रतिकार करावा असे वाटावे तरी कशामुळे ?

आणीबाणीच्या पूर्वी जी लोकशाही चालू होती तिच्यात भ्रष्टाचार आणि ओंगळ सत्ता-पिपासा याचे किळसवाणे प्रदर्शन होते. विरोधी पक्षांच्या वागण्यात पुरेसा बेजबाबदारपणा, आततायीपणा आणि हुल्लडबाजी होती. म्हणून ज्याला आम्ही लोकशाही म्हणत होतो तिचा मध्यमवर्गाला उबगच आलेला होता. हा सर्व बेबंदपणा बंद पाडला पाहिजे आणि कोणातरी बलवान माणसाने जिद्दीने राष्ट्र कामाला लावले पाहिजे असे सतत मध्यम-वर्गाला वाटत आले. बांगला देशच्या निर्मितीपासून अणुस्फोट केल्यामुळे इंदिरा गांधींविषयी मध्यमवर्गाच्या आशा फार उंचावलेल्या होत्या. अशा वेळी त्यागाच्या परं-पराच समाजात शिल्लक राहिलेल्या नसतात. शाळा, महाविद्यालये व तत्सम संस्था चालवणाऱ्यांना संस्था टिकवण्यात रस असतो, वृत्तपत्रकारांना वर्तमानपत्र टिकवण्यात रस असतो, नोकरदारांना नोकऱ्या टिकवण्यात रस असतो; त्याग व बलिदानात रस कुणालाच नसतो. तेव्हा साहित्यिकांनाही आपापली ‘ चमडी वाचून जिवंत राहणे ’ यातच रस वाटला तर नवल काय मानावे ? खास विरोधी पक्षांची वर्तमानपत्रेसुद्धा प्रेस वाचवण्या-साठी स्तुतिपाठक बनली. ज्यांनी युद्धकंकण बांधले होते तेच बांगड्या भरून नाचू लागले. तर मग साहित्यिकांना आपण किती दोष देणार आहोत ?

वरील सर्व कारणांपेक्षा अधिक बलवत्तर असे एक कारण आहे. ते कारण म्हणजे हे की मूलतः हा लढा राजकीय होता. विधानसभा बरखास्त करा आणि नव्या निवडणुका घ्या,

ही एक मागणी. पंतप्रधान–राजीनामा द्या, ही दुसरी मागणी. या दोन मागण्यांच्या जोडीला मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करा ही एक तिसरी मागणी होती. बाबू जय-प्रकाश नारायण ज्या संपूर्ण क्रांतीचा विचार मांडीत होते, त्यात राजकीय पक्षांना केव्हाही रस फारसा नव्हता, आताही रस फारसा आहे असे नाही. तेव्हा मुख्य लढा राजकीय होता. स्वातंत्र्याचा लढा हा तेव्हा तरी मुख्य नव्हता. कारण स्वातंत्र्य होतेच. या राजकीय लढ्यात राजकीय पक्ष कसे वागले ? याचा एकदा हिशेब दिला पाहिजे. महा-राष्ट्रात सर्वांत मोठा पक्ष काँग्रेस. त्यांचे राज्यच चालू होते. त्या खालोखाल बलवान पक्ष शेतकरी कामगार पक्ष. पक्ष म्हणून हा पक्ष शासनविरोधात उतरलेला नव्हता. उलट, तो वीस कलमी कार्यक्रमाला सहकार्य करावे या मूडमध्ये होता. दलितांचे पक्ष आणि कम्युनिस्ट सरकारच्या बाजूने होते. म्हणजे शासनविरोधी होते कोण ? तर सर्वोदयवादी, समाजवादी आणि जनसंघ. यांची मिळून महाराष्ट्रात शक्ती किती ! असा एक प्रश्न आहे. पण जी शक्ती होती, ती तरी वापरण्याची इच्छा किती ? शासनाने ज्यांना अटकच केली त्यांचा इलाज नव्हता, त्यांना तुरुंगात जाणे भाग होते. पण जे बाहेर होते त्यांनी सत्याग्रह केले काय ? निदान आपले राजकीय कार्य चालू ठेवले काय ? तसे काही दिसत नाही.

त्या काळात एस्. एम्. जोशी यांना मी म्हणालो होतो, ज्यांना पक्ष होते ते पक्षकार्य सोडून निष्क्रिय होऊन बसले आहेत. प्रायः ते तोंड लपवून जातात. मला पक्ष नसल्या-मुळे सोडायला काही नाही. त्यामुळे मी स्वागताला हजर आहे. आणीबाणीच्या काळात एसेमचा प्रचार चालू होता. पण त्यांच्याबरोबर कोण होते ? आमच्यासारखे बेकार वळवळे आणि तुरळक निष्ठावंत लोक सोडले तर बाहेर असणारे पक्षाचे पदाधिकारी हेसुद्धा तोंड चुकवून जात असत. हा प्रश्न शक्ती किती होती याचा नाही. प्रश्न आहे लढण्याची इच्छाच नव्हती हा. राजकीय प्रश्नावर राजकीय कार्यकर्तेच लढायला तयार नव्हते. लढ्याचे वातावरणच नव्हते. लढा चालू असला म्हणजे पेटणारे पेटतात. त्या आगीत न पेटणारेही पेटतात. मग साहित्यिकही पेटतात. एरवी नवरदेव झोपा घेत असताना वऱ्हाड्यांनी काय केले हा प्रश्न साहित्यिकांना कोण विचारणार ?

इतकी कारणे नोंदविल्यानंतर साहित्यात प्रभावी असणाऱ्या कलावादाचाही विचार केला पाहिजे. कला ही कलेसाठी आहे की जीवनासाठी आहे, या प्रश्नाला माझे उत्तर जीवनसापेक्ष आहे. पण जर कुणी म्हणाला, मी कलेसाठी कला मानतो, तर मी काय म्हणेन ? मी म्हणेन, ठीक आहे. तुझी भूमिका तू सांभाळ. माझा मतभेद आहे. पण कलावादी मला शत्रूही वाटत नाहीत, तुच्छही वाटत नाहीत. ते सन्माननीय विरोधक वाटतात. अडचण या तात्त्विक भूमिकेची नाही. अडचण व्यावहारिक रूपाची आहे. मी कलावादी असल्यामुळे समाज आणि समाजाचे प्रश्न यांच्याशी माझा संबंध येऊ

देणार नाही, असे सांगून जेव्हा लेखक स्वतःच्या वासना आणि विकृती एवढेच आपले चिवडण्याचे क्षेत्र ठरवतात, आणि तेही धड त्यांना चिवडता येत नाही तेव्हा मात्र तुच्छता वाटू लागते. त्यांच्या क्रांतीची मर्यादाच समलिंगी संभोग, हस्तमैथुन, पशुसंभोग, लिंगविकृती, मनोविकृती अगर ग्राम्यशब्द ही दिसू लागते. तेव्हा तुच्छता वाटल्याशिवाय राहात नाही. समाजापासून तुटून आणि दूर राहाणे यातच माझा पुरुषार्थ आहे, असे जर कलावंत समजत आले आणि यालाच जर आपले ते स्वातंत्र्य समजत आले, तर मग समाजजीवनाविषयी उदास असणारी ही सर्व मंडळी समाजाचे स्वातंत्र्य धोक्यात जरी आले तरी उदासीन राहाणार, हे उघड आहे.

सर्व कलावादी मंडळी कलावंतांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी असतात. या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी त्यांना सेन्सॉर बोर्ड नको असते. जर ही स्वातंत्र्यवादी मंडळी आणीबाणीच्या विरुद्ध स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ प्राणपणाने उभी राहिली असती, तर या सन्माननीय विरोधकांना मी त्यांची मते मान्य नसतानासुद्धा वंदनीय विभूती मानून त्यांची पूजा केली असती, पण हे कधी घडायचे नसते. सर्वांच्या स्वातंत्र्याशी ज्यांची बांधिलकी असते ते जीवनवादी असतात. फक्त आपलेच स्वातंत्र्य जे सांभाळतात ते अप्रत्यक्षरीत्या सर्वांच्या गुलामगिरीचे तटस्थ उदासीन निरीक्षक बनत असतात! कला-वादाला व्यावहारिक रूप हे येत असते, तसेच ते आले तर त्यात आश्चर्य फारसे नाही, विषाद मात्र आहे. साहित्यिकांना प्रतिकारशून्य करण्यात त्यांचा कलावादही सहभागी होता. पण हा घटक सर्वांत कमी महत्त्वाचा मानला पाहिजे.

सबंध जनतेचे स्वातंत्र्य क्रमाने गुंडाळले जात होते. जनतेच्या भोवती गुलामगिरीचे सर्व पाश आवळले जात होते. या वेळी साहित्यिक फारसे प्रभावी ठरले नाहीत, हे सत्यच आहे. ते प्रतिकारशून्य का झाले, याविषयीच्या कारणांची नोंद म्हणजे या केविलवाण्या पराभूत वस्तुस्थितीचे समर्थन नाही. ती नुसती कारणाची नोंद आहे. आणि ती करणे यासाठी आवश्यक आहे की मूळ राजकीय आंदोलनच निष्प्रभ आणि दुबळे ठरले, यावर भर न देता कलावादाची वाङ्मयीन भूमिका बडवीत बसण्याचा मोह आमच्या विचारवंतांना होऊ नये इकडे लक्ष वेधावे. शेवटी शीर्षके आणि मथळे यात फारसे काही नसते. कलावंताच्या स्वातंत्र्याचे वाण घेऊन कलावादीही बलिदान करू शकतात आणि जनतेचे नाव घेऊन जीवनवादीही शासनाचे भाडोत्री स्तुतिपाठक बनू शकतात. तत्त्व-ज्ञानावर आधारलेल्या हुकूमशाह्या नेहमीच स्वतःला जीवनवादी म्हणविणाऱ्या साहित्यि-कांचा पाठिंबा मिळवीत राहिल्या, हेही एक सत्य आहे. खरा प्रश्न वाङ्मयीन भूमिकेचा नसतो. प्रश्न असतो मूल्ये सांभाळण्यासाठी बलिदान करावे लागते, या त्यागाच्या परंपरा आपण किती रुजवलेल्या व जपलेल्या आहेत हा!

: २ :

भारतीय लोकशाहीच्या संदर्भात गेल्या मार्च महिन्यात झालेल्या निवडणुकांना विशेष महत्त्व आहे. खरोखरी उमेदवार कसे ठरतात, मतदार मतदान कसे व का करतात, या बाबींचे विश्लेषण बरेच गुंतागुंतीचे आहे. संकेत असा आहे की निवडून आलेल्या सभासदांच्या भूमिकेला जनतेने कौल दिलेला आहे असे समजावे. सत्य काहीही असो, निवडणुकीतील कॉंग्रेस पक्षाच्या पराभवाची कारणे कोणतीही असोत, संकेतानुसार आपण असे मानले पाहिजे की भारतीय जनतेने आणीबाणीच्या विरुद्ध आणि लोकशाही स्वातंत्र्याच्या बाजूने मतदान केले आहे. विरोधी पक्ष उरलेले सर्व प्रश्न सोडून लोकशाही की हुकूमशाही, या एका मुद्द्यावर निवडणूक लढवीत होते. विरोधी पक्षाला मत म्हणजे लोकशाहीला मत अशी मांडणी होती. यामुळे गेल्या निवडणुकीत भारतीय जनतेने लोकशाहीच्या बाजूने कौल दिला असे जर कुणी म्हटले तर आपण तूर्त तरी हे मत मान्य करायला हवे.

लोकशाही की हुकूमशाही अशा प्रकारची निवड हा जसा या निवडणुकीचा महत्त्वाचा भाग होता त्याप्रमाणे, साहित्यिकांनी निवडणुकीत सहभागी होणे; त्यांनी शासनाविरुद्ध भूमिका घेणे हाही गेल्या निवडणुकीतील एक आगळा प्रकार होता. दुर्गाबाई भागवत, पु. ल. देशपांडे हे ज्येष्ठ साहित्यिक निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले होते. माझ्यापुरते सांगायचे तर मी एक वर्माचा मतदारसंघ निवडलेला होता. या मतदारसंघात कॉंग्रेसचा पराभव घडून आला याचे अगदी स्वल्प का होईना काही श्रेय मलाही माझ्या नावावर जमा करावे लागेल. सर्वच साहित्यिक या निवडणुकीत मोठ्या हिरिरीने उतरले होते, असे नाही पण जे काही साहित्यिक निवडणुकीत उतरले होते त्यामुळे कॉंग्रेस पक्ष हादरलेला होता. सर्वसामान्यपणे राजकीय नेते काही बाबी विसरून जातात. साहित्यिक व कलावंत यांचाही एक चाहता वर्ग असतो, सामान्यपणे साहित्यिक निवडणुकीच्या रणधुमाळीत उतरत नसतात, पण जेव्हा ते उतरतात तेव्हा समाजावर त्यांचा फार मोठा नैतिक परिणाम होत असतो. ज्यांना निवडणुकीला उभे राहायचे नाही, ज्यांना सत्तापदी जायचे नाही, ज्यांचा वैयक्तिक स्वार्थ नाही, अशी ही माणसे असतात. ती जेव्हा उच्चरवाने निषेध करू लागतात तेव्हा समाजावर त्याचे गंभीर परिणाम होतात. सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाला जेव्हा हे परिणाम दिसू लागले तेव्हा त्यांचा तोल गेला. त्या वेळचे मुख्य मंत्री जे बेजबाबदारपणे बोलले त्याची पार्श्वभूमी ही अशी आहे.

आता निवडणुका संपलेल्या आहेत. तेव्हा उरलेले गरम प्रश्न सोडून मूळ तात्त्विक मुद्द्याकडे आपण वळायला पाहिजे. शासनाने पारितोषिके द्यावीत अगर देऊ नयेत, किंवा पारितोषिके देणारी यंत्रणा खाजगी असावी अगर असू नये, हे सर्व मुद्दे फार गौण

आहेत. महत्त्वाचे मुद्दे दोन आहेत. पहिला मुद्दा हा की, मला स्वातंत्र्य पाहिजे या विधानाचा अर्थ हे साहित्यिक आणि विचारवंत कोणता करतात; आणि या प्रश्नाचा विचार जे करू पाहतात त्यांना वाङ्मयीन भूमिका कोणती ठेवावी लागते. आणीबाणीत स्वातंत्र्याचा संकोच झाला, ही गोष्ट खरी आहे; पण जे स्वातंत्र्य आणीबाणीतसुद्धा काँग्रेस शासनाने शिल्लक ठेवलेले होते त्याची कक्षा लहान नव्हती. एक तर शासनाने साहित्यिकांना पकडलेच नाही. अधूनमधून साहित्यिक शासनाच्या धोरणाविषयी नापसंती व्यक्त करीत होते. ही नापसंती अतिशय स्पष्टपणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. ल. देशपांडे यांनी व्यक्त केली होती, मीही केली होती. अटक फक्त दुर्गाबाईंना झाली. तो अपवाद समजला पाहिजे. सामान्यपणे साहित्यिकांना अटक झाली नाही. वर्तमान राजकारणाशी ज्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध येईल तेवढ्यावर बंधने आली. उरलेल्या ललित वाङ्मयावर अगर वैचारिक वाङ्मयावर कोणतीही बंधने नव्हती. त्यामुळे राजकारणात सरकारविरोधी बोलू इच्छिणाऱ्या साहित्यिकांच्यावर बंधने होती, पण ती राजकारणापुरती होती. इतर बाबींवर बंधने नव्हती. म्हणजे साहित्यिकांची आणि विचारवंतांची फार मोठी मुस्कटदाबी आणीबाणीने केली होती असे जे आपण समजतो ते फारसे खरे नाही. सगळे बंधनांचे स्वरूप वर्तमान राजकारणापुरते होते.

साहित्यिकांनी स्वतःला नेहमीच स्वातंत्र्य मागितले आहे. मला स्वातंत्र्य हवे असे सदैव साहित्यिक मानतात. या ठिकाणी मी नावाची व्यक्ती, तिला अनुभव घेण्याचे व अनुभव व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य हवे इतकेच साहित्यिक म्हणत असतात. सर्वच साहित्यिकांना मुक्त स्वातंत्र्य हवे, असे साहित्यिकांना प्रामाणिकपणे वाटत नाही. इतरांच्या स्वातंत्र्यावर जेव्हा बंधने येतात तेव्हा साहित्यिक इतर साहित्यिकांच्या स्वातंत्र्यासाठी झगडा देत आहेत असे चित्र प्रायः दिसत नाही. याची अनेक उदाहरणे देता येतील. आणीबाणीपूर्वी कित्येक वर्षे अशोक शहाणे यांनी मराठी वाङ्मयासंबंधी काही विधाने केली. त्यात अनेकांच्यासंबंधी अनेक अनुदार उद्गार होते. अशोक शहाणे यांच्या लेखनाचा निषेध करण्यासाठी जमलेल्या सभेत महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ साहित्यिक म्हणाले, 'आमच्या श्रद्धास्थानांना धक्का लावणारे हात तोडून टाकावे!' प्रत्येकजण जर आपल्या श्रद्धास्थानांना धक्का लागू नये यासाठी इतरांचे हातपाय तोडण्यास तयार असेल तर मग स्वातंत्र्य कुठे राहील?

गोपाळ गोडसे यांच्या 'गांधी हत्या व मी' या पुस्तकावर बंदी घालण्यात आली. त्या वेळी किती जणांनी निषेध केला होता? काही नाटकांच्यावर सेन्सॉरने जेव्हा प्रयोगांना बंदी घातली त्या वेळी निषेध करणारे किती जण होते? ज्याच्यावर बंदी येते तो आणि त्याचे दोन-चार मित्र हे सोडले तर उरलेले साहित्यिक नेहमी गप्प बसलेले असतात. जो तो आपल्यापुरते स्वातंत्र्य हवे इतके सांगतो. सर्वांनाच स्वातंत्र्य हवे या गृहीत कृत्यावर

प्रत्येक मनाई हुकुमाच्या विरुद्ध साहित्यिकांनी लढा किती दिला आहे, याची मोजदाद जर आपण करू लागलो तर चित्र फारसे उत्साहदायी आहे असे दिसत नाही. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी कधी आग्रह धरला नाही, त्यांनी स्वातंत्र्याचा संकोच झाला, याविषयी उगीचच शोक करावा ही गोष्ट हास्यास्पद आहे.

आपल्या स्वातंत्र्याच्या सर्व कल्पना सोयिस्कर आहेत. आणीबाणीच्या पूर्वीसुद्धा अनेकदा अनेकजण विनाचौकशी अटकेत होते. समाजाने कधी विनाचौकशी अटक नसावी हा आग्रह धरलेला नव्हता. निरनिराळ्या संघटनांच्यावर बंदी घालण्यात यावी अशी मागणी स्वातंत्र्याच्या कैवाऱ्यांनी अनेकदा केली आहे. स्वातंत्र्य हे आम्हांला आमच्यापुरते हवे असते. तेही आमच्या सोयीने हवे असते. कारण स्वातंत्र्याची कल्पना आपल्या मनात अजून फारशी रुजलेलीच नाही. अशा अवस्थेत पारितोषिकाने स्वातंत्र्याचा संकोच होतो, अगर आणीबाणीमुळे स्वातंत्र्याचा संकोच झाला असे म्हणण्यासाठी आपण किती हक्कदार आहोत, याविषयीच मला संशय आहे. खरा मूलभूत मुद्दा स्वातंत्र्याचा आहे, पारितोषिके हा अनुषंगिक मुद्दा आहे.

लोकशाही शासनात साहित्यिकांचे स्वातंत्र्य असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा लोकशाहीची कोणती कल्पना आपल्यासमोर असते ? सर्वच नागरिकांना समता, न्याय, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे आपण मानतो काय ? जर साहित्यिक सर्वांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणार असतील तर सर्वांच्यासह साहित्यिकांचे स्वातंत्र्य, सर्वांच्यासह माझे स्वातंत्र्य या भूमिकेला काहीतरी अर्थ असतो. लेखकांना सामाजिक दायित्व मान्य करूनच स्वातंत्र्याचा आग्रह धरता येत असतो. ज्यांना सामाजिक दायित्व मान्यच नाही त्यांनी सर्व समाज विविध दास्यांत असला तर काय करावे ? आमचे ते क्षेत्र नव्हे, ती आमची जबाबदारी नव्हे. समाजातील कालबाह्य चिंतनाचा व्यवहार स्वतंत्र असेल अगर नसेल–आमचे ते क्षेत्र नव्हे, ती आमची जबाबदारी नव्हे. अशी भूमिका घेतल्यानंतर लेखकांना मात्र स्वातंत्र्य हवे, कलावंतांना स्वातंत्र्य हवे, असे म्हणणे हाच बेजबाबदारपणा आहे. इतर कुणाला स्वातंत्र्य असो वा नसो, माझ्यावर त्याची जबाबदारी नाही. मला स्वतःला मात्र स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, ही भूमिका कितीशी समर्थनीय आहे ? जर आपण स्वातंत्र्य अस्तित्वात आणणे, ते टिकवणे व रुजवणे ही साहित्यिकांची जबाबदारी मानणार असू तर सामाजिक दायित्व साहित्यिकांच्यासाठी अपरिहार्य आहे, असे आपल्याला म्हणावे लागेल. कलावादी भूमिकांचा त्याग केल्याशिवाय स्वातंत्र्याच्या संकोचाविषयी साहित्यिकांना तक्रारच करता येणार नाही.

लोकशाहीत स्वातंत्र्याला महत्त्व असते. याचा अर्थ असा की शासन सर्वांचे स्वातंत्र्य

जपण्यास वचनबद्ध असते. समाज हे स्वातंत्र्य जतन करण्यास वचनबद्ध असतो आणि प्रत्येक नागरिक सर्वांचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य अस्तित्वात आणणे व जतन करणे ही आपली जबाबदारी मानतो. अशी ही लोकशाही जर आदर्श करायची असेल तर साहित्यिकांना सामाजिक दायित्व मान्य करणेच भाग आहे. शासनाचे निषेध स्वातंत्र्या-साठी पुरेसे ठरत नाहीत, स्वातंत्र्य ही कल्पना रुजवण्यासाठी एक फार मोठा झगडा द्यावा लागत असतो.

समाजात जर खरोखरी स्वातंत्र्य रुजवायचे असेल तर ती दुहेरी प्रक्रिया असते. एक तर इतरांच्या बाबतीत आपण सहिष्णू असावे लागते. आमच्या सहिष्णुतेच्या मर्यादा आपल्यापेक्षा वेगळा विचार करणाऱ्यांच्याबाबत उदासीनता, इतक्याच आहेत. सहि-ष्णुतेची खरी कसोटी आपल्या श्रद्धांच्यावर आघात करणाऱ्या लिखाणांच्याविषयी आपण किती सहिष्णुता दाखवतो या ठिकाणी लागते. कुणीच कुणाची मने दुखवायची नाहीत, सर्वांनी एकमेकांच्या अंधश्रद्धा जपायच्या या दिशेने आपल्या सहिष्णुतेचा प्रवास चालू असतो! मुळात ही दिशाच चूक आहे. सर्वांनीच सर्व बाबींची चिकित्सा करायची आणि या चिकित्सेबाबत श्रद्धा कितीही दुखावोत, सहिष्णुतेने वागायचे– या दिशेने आपल्याला प्रवास केला पाहिजे. देशातील धार्मिक अंधश्रद्धा असणाऱ्यांच्या कोणत्याही श्रद्धेय भूमिकेची चिकित्सा होताच जिथे निषेध मोर्चे निघतात तिथे फारसे स्वातंत्र्य अस्तित्वात असू शकत नाही.

आणि स्वातंत्र्याचा प्रश्न एका बाजूने जबाबदारीशीही निगडित आहे. विचार मांडणाऱ्याने 'मी विडंबन करणार नाही, विपर्यास करणार नाही, असत्यालाप करणार नाही, सत्य नाकारणार नाही, खंडन विचारांचे करीन, व्यक्तीचे करणार नाही,' अशा काही जबाब-दाऱ्या मान्य कराव्या लागतात. एका बाजूने सहिष्णुता असली व दुसऱ्या बाजूने जबाबदारीची जाणीव असली तरच स्वातंत्र्याचा निकोप विकास होत असतो. अनुभव असा आहे की बंधने घातल्याबरोबर जे लाचारपणे स्तुतिपाठ गात बसतात तीच मंडळी मोकळीक मिळाल्याबरोबर जास्तीत जास्त बेजबाबदारपणे आरडाओरड करू लागतात. स्वातंत्र्य नावाचे मूल्य ही मंडळी अस्तित्वातही आणू शकणार नाहीत, आणि जतनही करू शकणार नाहीत, हे उघड आहे.

खरा प्रश्न हा आहे की, आपण व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना किती प्रमाणात स्वतः मान्य केली आहे, किती प्रमाणात समाजात रुजवली आहे, सर्वांच्या स्वातंत्र्याची जबाबदारी आपण किती प्रमाणात मानतो? या बाबतीत अजून फारसे काही केलेले नाही, असा जर आपल्याच मनाचा कौल पडला तर त्याचा अर्थ व्यक्तिस्वातंत्र्य अस्तित्वात आणण्यासाठी आपण अधिक कष्ट करण्याची गरज आहे, अधिक दक्ष राहण्याची गरज

आहे, इतकाच मी मानतो. स्वातंत्र्य फारसे रुजलेले नाही, आपण ते फारसे आग्रहाने मागितलेलेही नाही, या प्रतिपादनाचा हेतू म्हणून आपण याही पुढे स्वातंत्र्य मागू नये व ते मावळले तर आक्रोश करू नये असे सांगण्याचा नाही; पण खरेच स्वातंत्र्याविषयी बोलायला आपण फारसे हक्कदार नाही; पण म्हणूनच स्वातंत्र्याविषयी बोलण्याचा हक्क आपल्याला प्राप्त होईल असे वागण्याची जबाबदारी आपण घेतली पाहिजे. इथे ज्या हक्कांविषयी मी बोलत आहे तो कायदेशीर हक्क नसून नैतिक हक्क समजायचा.

आपण जर स्वातंत्र्याविषयी आस्था आणि जागरूकता असणारा समाज निर्माण करू शकलो तर मग पारितोषिके देणाऱ्या शासनाचे बंदेही बहकल्याप्रमाणे बोलणार नाहीत आणि त्या समाजात पारितोषिकांच्यामुळे कुणाच्या स्वातंत्र्याचा संकोचही होणार नाही. जर आपण असा समाज निर्माण करू शकलो नाही तर मग शासनाने पारितोषिके दिली काय अगर न दिली काय, स्वातंत्र्याविषयी जागरूक नसणाऱ्या समाजात लाचारी आणि भाटगिरी यांना अप्रतिष्ठा नसते. उलट प्रत्येकजण आपली स्वामीनिष्ठा दाखवून तिची किंमत वसूल करण्यासाठी टपलेला असतो आणि त्यात पुरुषार्थ मानतो. नामदार शंकरराव चव्हाणांचा निषेध करणे अतिशय सोपे आहे, आम्ही हा निषेध पत्रकावर सह्या करण्यापेक्षा अधिक प्रभावी मार्गाने दाखवलेला आहे. शासनाची पारितोषिके नाकारणे हे त्या मानाने कठीण आहे. शासनापेक्षा निर्दोष अशी पर्यायी खाजगी व्यवस्था निर्माण करणे हे तर त्याहीपेक्षा कठीण आहे. पण या सर्व कठीण गोष्टी जरी आपण सिद्ध व साध्य केल्या तरी त्यामुळे खरा प्रश्न सुटत नाही. खरा प्रश्न अतिशय दूरगामी उपाययोजनेचा म्हणजे स्वातंत्र्यावर आधारलेली समाजरचना निर्माण करण्याचा आहे. साहित्यिक आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्याला तरी किंमत मोजून जतन करण्याजोगी बाब मानतात काय, या प्रश्नाचेसुद्धा उत्तर मोठे जरतारी द्यावे लागेल.

परिशिष्ट १

# मैं धुनी युवकों की तलाश में हूँ!

— जयप्रकाश नारायण

सम्पूर्ण क्रांति के बारे में जब भी कुछ कहने का अवसर मिलता है, मेरी आँखों के सामने वे परिस्थितियाँ जीवित हो जाती हैं, जिन्होंने मुझे इतनी तीव्रता से प्रेरित किया कि मैं उसमें कूद पड़ा. चंड़ीगड में जब बन्दी था तब भी अपनी डायरी में सम्पूर्ण क्रांति के बारे में लिखता था, उसके विभिन्न पहलुओं का खाका बनाने की कोशीश करता था. मेरी 'जेल डायरी' (मराठी में 'स्वगत') जिन पाठकों ने पढ़ी होगी उन्हें सम्पूर्ण क्रांति की मेरी कल्पना की कुछ झलक अवश्य मिली होगी. वह पर्याप्त तो नहीं है, पर विचार प्रारंभ करने के लिए वह कुछ ठोस सामग्री जरूर देता है.

सम्पूर्ण क्रांति की मेरी कल्पना किसी बने-बनाये ढाँचे में नहीं समा सकती है. वादों-सिद्धान्तों के कठमुल्लेपन से उपर उठना भी अपने आप में सम्पूर्ण क्रांति के वैचारिक पहलू का हिस्सा है. किसी एक सिद्धान्त के पास, किसी एक व्यक्ति के पास सारी समस्याओं का हल नहीं हो सकता है. सारी समस्याओं का हल तो शायद ईश्वर के पास ही होगा. सम्पूर्ण क्रांति की मेरी कल्पना में हर व्यक्ति इतना समर्थ होगा- बौद्धिक रूप से, आर्थिक एवं सामाजिक रूप से की अपने आस-पास के समुदाय की समस्याओं का सम्मिलित हल ढूंढ सकेगा, और सब के साथ उस दिशा में बढ़ सकेगा. सामुदायिक जीवन व्यक्ति को समर्थ बनायेगा और व्यक्ति समुदाय को सबल बनायेगा.

समाज की राजनीति, अर्थनीति, शिक्षानीति, सामाजिक परंपराये आदि सब इस प्रकार विकसित करनी होंगी कि समुदाय और व्यक्ति का यह संबंध बन सके और पनप सके. संपूर्ण क्रांति के संदर्भ में जब मैं राजनीति शब्द का प्रयोग करता हूँ तब उसका प्रचलित अर्थ- सत्ता की राजनीति- नहीं लेता हूँ. शब्द के प्रचलन के कारण ही इस शब्द का प्रयोग करता हूँ, किन्तु वह राजनीति सर्वथा भिन्न होगी. सत्ता के विकेंद्रीकरण की बात जैसे ही हम स्वीकार करते हैं वैसे ही राजनीति का स्वरूप आमूल बदल जाता है. जनता सरकार के रूप में मैंने उस नयी राजनीति का स्वरूप रखा है. मैं तो यहाँ तक कहूँगा

आहे, इतकाच मी मानतो. स्वातंत्र्य फारसे रुजलेले नाही, आपण ते फारसें आग्रहाने मागितलेलेही नाही, या प्रतिपादनाचा हेतू म्हणून आपण याही पुढे स्वातंत्र्य मागू नये व ते मावळले तर आक्रोश करू नये असे सांगण्याचा नाही; पण खरेच स्वातंत्र्याविषयी बोलायला आपण फारसे हक्कदार नाही; पण म्हणूनच स्वातंत्र्याविषयी बोलण्याचा हक्क आपल्याला प्राप्त होईल असे वागण्याची जबाबदारी आपण घेतली पाहिजे. इथे ज्या हक्कांविषयी मी बोलत आहे तो कायदेशीर हक्क नसून नैतिक हक्क समजायचा.

आपण जर स्वातंत्र्याविषयी आस्था आणि जागरूकता असणारा समाज निर्माण करू शकलो तर मग पारितोषिके देणाऱ्या शासनाचे बंदेही बहकल्याप्रमाणे बोलणार नाहीत आणि त्या समाजात पारितोषिकांच्यामुळे कुणाच्या स्वातंत्र्याचा संकोचही होणार नाही. जर आपण असा समाज निर्माण करू शकलो नाही तर मग शासनाने पारितोषिके दिली काय अगर न दिली काय, स्वातंत्र्याविषयी जागरूक नसणाऱ्या समाजात लाचारी आणि भाटगिरी यांना अप्रतिष्ठा नसते. उलट प्रत्येकजण आपली स्वामीनिष्ठा दाखवून तिची किंमत वसूल करण्यासाठी टपलेला असतो आणि त्यात पुरुषार्थ मानतो. नामदार शंकरराव चव्हाणांचा निषेध करणे अतिशय सोपे आहे, आम्ही हा निषेध पत्रकावर सह्या करण्यापेक्षा अधिक प्रभावी मार्गाने दाखवलेला आहे. शासनाची पारितोषिके नाकारणे हे त्या मानाने कठीण आहे. शासनापेक्षा निर्दोष अशी पर्यायी खाजगी व्यवस्था निर्माण करणे हे तर त्याहीपेक्षा कठीण आहे. पण या सर्व कठीण गोष्टी जरी आपण सिद्ध व साध्य केल्या तरी त्यामुळे खरा प्रश्न सुटत नाही. खरा प्रश्न अतिशय दूरगामी उपाययोजनेचा म्हणजे स्वातंत्र्यावर आधारलेली समाजरचना निर्माण करण्याचा आहे. साहित्यिक आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्याला तरी किंमत मोजून जतन करण्याजोगी बाब मानतात काय, या प्रश्नाचेसुद्धा उत्तर मोठे जरतारी द्यावे लागेल.

परिशिष्ट १

# मैं धुनी युवकों की तलाश में हूँ!

— जयप्रकाश नारायण

सम्पूर्ण क्रांति के बारे में जब भी कुछ कहने का अवसर मिलता है, मेरी आँखों के सामने वे परिस्थितियाँ जीवित हो जाती हैं, जिन्होंने मुझे इतनी तीव्रता से प्रेरित किया कि मैं उसमें कूद पड़ा. चंड़ीगड में जब बन्दी था तब भी अपनी डायरी में सम्पूर्ण क्रांति के बारे में लिखता था, उसके विभिन्न पहलुओं का खाका बनाने की कोशीश करता था. मेरी 'जेल डायरी' (मराठी में 'स्वगत') जिन पाठकों ने पढ़ी होगी उन्हें सम्पूर्ण क्रांति की मेरी कल्पना की कुछ झलक अवश्य मिली होगी. वह पर्याप्त तो नहीं है, पर विचार प्रारंभ करने के लिए वह कुछ ठोस सामग्री जरूर देता है.

सम्पूर्ण क्रांति की मेरी कल्पना किसी बने-बनाये ढाँचे में नहीं समा सकती है. वादों-सिद्धान्तों के कटमुल्लेपन से उपर उठना भी अपने आप में सम्पूर्ण क्रांति के वैचारिक पहलू का हिस्सा है. किसी एक सिद्धान्त के पास, किसी एक व्यक्ति के पास सारी समस्याओं का हल नहीं हो सकता है. सारी समस्याओं का हल तो शायद ईश्वर के पास ही होगा. सम्पूर्ण क्रांति की मेरी कल्पना में हर व्यक्ति इतना समर्थ होगा- बौद्धिक रूप से, आर्थिक एवं सामाजिक रूप से की अपने आस-पास के समुदाय की समस्याओं का सम्मिलित हल ढूँढ सकेगा, और सब के साथ उस दिशा में बढ़ सकेगा. सामुदायिक जीवन व्यक्ति को समर्थ बनायेगा और व्यक्ति समुदाय को सबल बनायेगा.

समाज की राजनीति, अर्थनीति, शिक्षानीति, सामाजिक परंपराये आदि सब इस प्रकार विकसित करनी होंगी कि समुदाय और व्यक्ति का यह संबंध बन सके और पनप सके. संपूर्ण क्रांति के संदर्भ में जब मैं राजनीति शब्द का प्रयोग करता हूँ तब उसका प्रचलित अर्थ- सत्ता की राजनीति- नहीं लेता हूँ. शब्द के प्रचलन के कारण ही इस शब्द का प्रयोग करता हूँ, किन्तु वह राजनीति सर्वथा भिन्न होगी. सत्ता के विकेंद्रीकरण की बात जैसे ही हम स्वीकार करते हैं वैसे ही राजनीति का स्वरूप आमूल बदल जाता है. जनता सरकार के रूप में मैंने उस नयी राजनीति का स्वरूप रखा है. मैं तो यहाँ तक कहूँगा

कि जनता सरकार की मेरी कल्पना सिर्फ राजनीतिक व्यवस्था की नहीं, बल्कि एक नयी जीवनशैली की कल्पना है.

कुछ लोग कहते है कि यह सब मेरा दिवास्वप्न है. उन लोगों से मैं किसी बहस में नहीं पड़ूँगा. इतना जरूर कहूँगा कि जिसने सपने देखने छोड़ दिये हो, उससे क्रांति कभी नहीं हो सकती है. क्रांतिकारी स्वप्नदर्शी नहीं होगा तो नये समाज की तस्वीर कहाँ से मिलेगी ? मैं तो उन सपनों को साकार करनेवाले धुनी युवकों की तलाश में हूँ. युवकों को मैंने संपूर्ण क्रांति की गाड़ी का इंजन कहा है. युवा शक्ति–जिसमें छात्र शक्ति भी शामिल है–का ही वह अपूर्व जागरण था जिसने मुझे इस आंदोलन में खींच लिया. युवकों में आदर्शों के प्रति कुर्बान होने का साहस होता है और अपने भविष्य पर खतरा उठाने की उमंग भी होती है. इसलिए मुझे वे नये मूल्यों के वाहक लगते हैं. सामाजिक कुरीतियों के खिलाफ, छुआछूत, तिलक, दहेज, जाति-भेद आदि–युवक संघर्ष कर सकते हैं. उन्होंने संघर्ष किया भी है और उस हद तक भारतीय समाज में विकास भी हुआ है. फिर भी बहुत बड़ा काम बाकी है, जिसे पूरा करनेके लिए युवकों को संगठित रूप से आगे आना होगा. सामाजिक परिवर्तन की गाड़ी जितनी तेज चलेगी, आर्थिक, राजनीतिक परिवर्तन उसी रफ्तार से उसके पीछे आयेगा.

संपूर्ण क्रांति का मेरा स्वप्न जमीन पर उतारना युवा शक्ति के ही हाथ है. मैं तो यह दिन देखनेके लिए नहीं रहूँगा, पर समाज का अंतिम व्यक्ति जब इज्जत के साथ जीवन जी सकेगा, अपनी क्षमता भर मेहनत कर सकेगा और अपनी आवश्यकता भर पा सकेगा तब मुझे संतोष होगा.

इस काम में लगे युवकों के लिए मेरी अनेक शुभकामनायें.

२२७६३
२७७३
REFBK-0022763